अहवाल क्रमांक : १९०

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लातूर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# अकरावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२२

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लातूर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# अकरावा अहवाल

## पंचायती राज समिति

(सन २०२०-२०२१)

**समिति प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६) *श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

* डॉ. संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची “समिती सदस्य” म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून नामनियुक्ती केली.

## पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) *** रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) *** रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२)(का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर २०१८ रोजींपासून नामनियुक्त केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निंमत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्त केलेली आहे.

*** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा अकरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा

गोळा केला तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधी प्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्य साधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने लातूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने लातूर जिल्हा परिषदेस दिनांक १०, ११ व १२ सप्टेंबर, २०१८ रोजी भेट देऊन डॉ.विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी तसेच सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ व १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, लातूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ. नितीन करीर, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, डॉ. प्रदीप व्यास, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग श्री. नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग), श्रीमती आय. ए. कुंदन, सचिव, महिला व बाल विकास विभाग, श्री. मंगेश मोहीते, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एस. डी. सुर्यवंशी, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री .वि. ल. लहाने, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. सतिश तुपे, सह सचिव,

वित्त विभाग, श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. श्री. दे. लोढे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ काशिनाथ गांगरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. आत्माराम लुबडे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. प्रमोद पाटील, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, डॉ. विजय वृंदेवए, सह संचालक, आरोग्य विभाग, श्री. प्रताप मोहिते, श्री. सु. रा. भोसले, श्री. माधव नागरगोजे, संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या लातूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २२ मार्च, २०२२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २२ मार्च, २०२२.

**संजय रायमुलकर**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|---|
| १ | एक | मौजे कबनसांगवी (ता.चाकूर) व मौजे कवठा केज तांडा (ता.औसा) येथील अपूर्ण वस्तीशाळांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत | ३.१५१ | १ |
| २ | दोन | शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गट स्तरावर कमी / जादा पुरवठयातील अनियमिततेबाबत. | ३.१५२ | ८ |
| ३ | तीन | जिल्हा परिषदेच्या तांत्रिक शाखा, बजेट शाखा व लेखा शाखा आणि वित्त विभागाचे अभिप्राय घेतलेले नसताना कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता देवून दायित्व निर्माण केल्याबाबत. | ३.४६६ | १७ |
| ४ | चार | मौजे जाऊवाडी जोडरस्ता सुधारणा करणे ग्रामा-८६ कि.मी. ०/०० ते ०/७०० च्या कामातील अनियमिततेबाबत. | ३.४६७ | २७ |
| ५ | पाच | मौजे वाघमारी तांडा (ता.जळकोट) येथील कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा या कामातील अनियमितता | ३.६३२ | ३५ |
| ६ | सहा | मौजे मांजरी (ता.लातूर) येथील पाणी पुरवठा योजनेअंतर्गतच्या कामातील अनियमिततेबाबत. | ३.७३५ | ४२ |
| ७ | सात | स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतिगृहांच्या अनुदान प्रदानातील नियमबाह्यतेबाबत. | ३.१०३१ | ५० |
| ८ | आठ | थकित आगाऊ रक्कमांबाबत (थकित अग्रिम) | ४.७९७/३३ | ५७ |
| ९ | नऊ | प्रमाणकांवर रक्कम प्राप्त झाल्याबाबतच्या स्वाक्षऱ्या नसल्याबाबत. | ५.७१ | ६४ |
| १० | दहा | जळकोट ग्रामपंचायतीत बनावट स्वाक्षरी करून केलेली अनियमितता. | ५.७२ | ६७ |
| ११ | अकरा | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याबाबत. | ३.६३४<br>३.७३४ | ७० |
| १२ | बारा | सर्वसाधारण शिफारशी | | ७८ |
| | | **परिशिष्ट-"अ"**<br>**शासन निर्णय व परिपत्रके** | | ८१ |
| | | **परिशिष्ट-"ब"**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | १३७ |

प्रकरण एक

**जिल्हा परिषद, लातूर**

**मौजे कबनसांगवी (ता.चाकूर) व मौजे कवठा केज तांडा (ता.औसा) येथील**

**अपूर्ण वस्तीशाळांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**परिच्छेद क्रमांक. ३.१५१ (सन २०१३-२०१४)**

जिल्हा परिषद लातूर सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्रमांक-८) - या कामकाजासाठी जिल्हापरिषदेने एकूण रुपये ६,७०,०००/- इतका खर्च केला आहे. या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/२०००/प्र.क्रं.३३/४४, दिनांक २२/१२/२००० नुसार मोजमाप पुस्तिकेत दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तसे केले नाही.

(२) या कामाच्या प्रथम हप्त्याची रक्कम कोणत्या प्राधिकारान्वये आहरण करण्यात आली याबाबत संबंधितांचा संयुक्तिक खुलासा सादर करावा.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना क्रमांक २३ मध्ये नोंदी घेणे आवश्यक असतांना तशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे करारनाम्यातील अटीप्रमाणे कामाची मुदत ६ महिने असताना काम पूर्ण न करता अपूर्ण स्थितीत आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद लातूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मोजमाप पुस्तिकेत दिनांकित नोंदी घेउन स्वाक्षरी केलेली आहे. स्वाक्षरीखाली दिनांक नमूद केला आहे.

(२) म.प्रा.शि.प.चे पत्र क्रं. ७०६५, दिनांक ३०/१२/२००८ नुसार सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत सन २००८-०९ मध्ये एकूण ७४ नवीन प्राथमिक शाळांसाठी (वस्तीशाळा) रूपये ६.७५ लक्ष एक रकमेनुसार एकुण ४९९.५० लक्ष तरतुद मंजूर होती. यापैकी जि.प.प्रा.शा. कबनसांगवी, ता. चाकुर व जि.प.प्रा.शा. कवठा केज तांडा ता.औसा या दोन वस्तीशाळा होत्या. या प्रत्येक बांधकामात २ वर्गखोल्या व १ मुख्याध्यापक कक्ष, स्वयंपाक गृह, मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व पिण्याचे पाणी सुविधा या कामांचा समावेश आहे. योजनेच्या प्रचलित नियमानुसार योजनेत मंजूर असलेली सर्व बांधकामे ही त्या त्या शाळेच्या व्यवस्थापन समितीमार्फत केली जातात. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या बांधकाम मार्गदर्शिकेतील निधीचे वितरण या सदराखाली दिलेल्या सुचनेनुसार समितीने करारपत्र केल्यानंतर या कामाच्या प्रथम हप्त्याची रक्कम तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्फत समितीने आहरीत केली.

(अ) जि.प.प्रा.शा. कबनसांगवी ता.चाकूर या कामाची मूळ मंजूर तरतूद रुपये ६.७५ लक्ष इतकी होती. परंतु मंजूर वर्ष सन २००८-०९ ते २०११-१२ पर्यत बांधकामासाठी जागा उपलब्ध न झाल्याने बांधकाम सुरु करता आले नाही. माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये जागा उपलब्ध झाल्यानंतर सदरचे बांधकाम हाती घेण्यास आले. परंतु तत्कालीन मंजूर रक्कम रुपये ६.७५ लक्ष मध्ये सदरचे काम आज रोजी होत नसल्याने या कामाचे चालू जिल्हा दरसूची सन २०१२-१३ नुसार रुपये ११.८३३ लक्ष रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले. त्यानुसार मुळ तरतुद वजा करता जास्तीची लागणारी रक्कम रुपये ५.०८३ लक्ष इतकी रक्कम ही म.प्रा.शि.प.चे पत्र क्रं.२६८० दिनांक १२/०७/२०१२ मधील सुचनेनुसार जि.प.सेस फंडातून घेण्यास आली व बांधकाम पूर्ण केले.

(ब) जि.प.प्रा.कवठा केज तांडा ता.औसा याही कामाची मूळ मंजूर तरतूद रुपये ६.७५ लक्ष इतकी होती. यासाठी रूपये ६.३५ लक्ष निधी अग्रिम स्वरुपात (३ हप्त्यात) दिलेला होता. तत्कालीन ग्रामशिक्षण समितीव्दारे सदरचे काम अर्धवट ठेवल्याने व सद्यस्थितीत मंजूर तरतूदीत काम पूर्ण होत नसल्याने उर्वरीत कामाचे चालू जिल्हा दरसुची सन २०१२-१३ नुसार रूपये २.५५ लक्ष रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले. यापैकी गटस्तरावर या कामातील शिल्लक रूपये ०.४० लक्ष व शाळास्तरावर उपलब्ध साहित्याचे मूल्य रुपये ०.५३३ लक्ष असे एकूण रुपये ०.९३३ लक्ष वगळता उर्वरीत लागणारा निधी रुपये १.६१७ लक्ष इतकी रक्कम जि.प.सेस फंडातून घेण्यात आली व बांधकाम पूर्ण केले.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता सर्व शिक्षा अभियान योजनेस लागू नाही. तथापि, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या सूचनेनुसार, या कामाची नोंद वर्क रजिस्टरमध्ये व मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आली आहे.त्याचप्रमाणे

(अ) जि.प.प्रा.शा. कबनसांगवी, ता. चाकूर येथील बांधकामासाठी जागा मिळण्यास विलंब झाला. सदरील जागेचा ताबा फेब्रुवारी २०१२ मध्ये मिळाला. सदरचे काम शाळा व्यवस्थापन समितीच्या दिरंगाईमुळे रखडले होते, ते दिनांक २५/०५/२०१५ रोजी पूर्ण करण्यात आले.

(ब) जि.प.प्रा.शा.कवठाकेज तांडा, ता.औसा येथील काम तत्कालीन ग्राम शिक्षण समितीच्या अंतर्गत वादामुळे प्रलंबित होते, ते काम दिनांक १२/०९/२०१६ रोजी पूर्ण करण्यात आले.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कबनसांगवी ता. चाकूर व कवठाकेज ता. औसा जि. लातूर येथील अपूर्ण वस्तीशाळा बांधकाम पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद सेसमधून सदर कामासाठी निधी खर्च झालेला असताना नमूना क्रमांक २३ मध्ये नोंदी न घेण्याबाबतचे स्पष्टीकरण योग्य आहे का? तो निधी सेसमधून खर्च करता येतो का? उक्त निधी खर्च करीत असताना जिल्हा परिषदेच्या, स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली आहे का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, सदर परिच्छेदामध्ये कबनसांगवी व कवठाकेज अशी दोन कामे होती. सदर कामे सर्वशिक्षा अभियानाची होती. सदर कामे उशिरा झाल्यामुळे तत्संदर्भात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे दिनांक १२ जुलै, २०१२ चे पत्र होते की, निधी कमी पडत असतील तर जिल्हा परिषदेच्या सेसमधून पुरवणी मागणी करावी. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद सेसमधून निधी घेऊन दोन्ही कामे पूर्ण केली आहेत, कबनसांगवी चे काम सन २०१५ ला पूर्ण झाले आहे तर कवठाकेज चे काम सन २०१६ ला पूर्ण झाले आहे. याबाबत समितीने विचारणा केली की, सन २०१३-१४ चा अर्थसंकल्प मंजूर करताना जिल्हा परिषदेच्या सेसमध्ये हा हेड तयार केला होता का ? व त्याला शिक्षण समितीची मान्यता घेण्यात आली होती का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सन २०१३-१४ चा अर्थसंकल्प मंजूर करताना जिल्हा परिषदेच्या सेस मध्ये हा हेड तयार केला असून अपूर्ण वस्तीशाळा बांधकाम पूर्ण करण्यासाठी ६ लाख ७५ हजार रुपयांचा निधीची तरतूद केली होती त्याला सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली होती. समितीने पुढीलप्रमाणे विचारणा केली की, सर्वसाधारण सभेची मान्यता अर्थसंकल्पाला असते. शिक्षण समितीच्या कामांना मान्यता आहे का? शिक्षण समितीने शिफारस केल्यानंतरच स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्प ठेवण्यात येतो आणि त्यानंतर तो सर्वसाधारण सभेपुढे जातो. शिक्षण समितीतून अर्थ समितीमध्ये, अर्थ समितीतून स्थायी समितीमध्ये आणि तेथून जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये जातो. शिक्षण समितीने अर्थसंकल्पात शिफारस केली, त्या शिक्षण समितीसमोर खर्चाची मंजुरी घेतली होती का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, माझ्याकडे उपलब्ध कागदपत्रानुसार त्या कामांना सर्वसाधारण सभेची मान्यता आहे. तरी याबाबतची अधिकची माहिती शिक्षणाधिकाऱ्यांकडून घेऊन समितीस सादर करण्यात येईल. यापूढे समितीने विचारणा केली की, शिक्षणाधिकाऱ्यांनी स्वतःचे अधिकार वापरुन हा निधी दिला आहे का? तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली. शिक्षण समितीची मंजुरी नसताना शिक्षणाधिकाऱ्यांना त्या कामांना मंजूरी देण्याचे अधिकार आहेत का? कामेही वेळेत पूर्ण झालेले नाहीत. त्यामुळे विनाकारण सेस फंडावर अधिकचा बोजा पडलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, उपलब्ध कागदपत्रांमध्ये शिक्षण समितीचा ठराव नाही, मात्र सर्वसाधारण सभेचा ठराव आहे आणि त्यामध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेनेही म्हटले होते. यावर समितीने विचारणा केली की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता देताना शिक्षण समितीने या कामांना मंजुरी दिली ते तपासून घेतले आहे का? तसेच तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी निधी देताना सर्व बाबी तपासल्या होत्या का त्यासाठी शिक्षण समितीचा ठराव होता का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, उपलब्ध कागदपत्रांमध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी २ कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता दिली आहे. मात्र रेफरन्समध्ये नाही. समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कशाच्या आधारे प्रशासकीय मान्यता दिली आहे जोपर्यंत शिक्षण समितीमध्ये ठराव होत नाही तोपर्यंत प्रशासकीय मान्यता देता येत नाही अर्थसंकल्प सर्वसाधारण सभा मंजूर करते, त्या-त्या खात्याची माहिती आल्यानंतर सर्वसाधारण सभा मंजुरी देते, मग त्या खात्यामध्ये ती नस्ती गेली पाहिजे होती, त्या खात्यामध्ये नियोजन झाल्याशिवाय प्रशासकीय मान्यता कशी दिली? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, ही कामे सर्वशिक्षा अभियानाची होती. यावर समितीने विचारणा केली की, सर्वशिक्षा अभियानामध्येही प्रशासकीय मान्यता देताना समिती आहे. फक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना हे अधिकार आहेत काय? मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, त्यावेळी कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष होते, त्या बैठकीचे कार्यवृत्त आहे, त्यामध्ये मान्यता घेतलेली आहे.

समितीने विचारणा केली की, सर्वशिक्षा अभियानांमध्ये जिल्हा निधीतून पैसे खर्च करण्यासाठी कोणाची मान्यता आवश्यक असते? जिल्हा निधीतील, शिक्षण विभागातून पैसे काढलेले आहेत. शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश घेतले होते काय? यासाठी शिक्षण समितीची मंजुरी घेतली होती का? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, त्यावेळी कार्यकारी समितीची बैठक झाली होती. कार्यकारी समितीची मान्यता आहे. मात्र शिक्षण समितीची मान्यता नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, सर्वशिक्षा अभियानाच्या कार्यकारी समितीला जिल्हा निधी खर्च करण्याचे अधिकार आहेत काय? कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणत्याही नियमांची खात्री न करता चुकीची मान्यता दिली आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, माझ्याकडे असलेल्या कागदपत्रांमध्ये शिक्षण समितीचा ठराव नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कार्यकारी समितीची मंजुरी आहे, कार्यकारी मंडळाची मंजुरी नाही. कार्यकारी समितीला अधिकार आहेत काय? त्यावेळेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कोण होते? श्री.ननावरे हे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी होते, ते आता निवृत्त झाले आहेत. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले.

यावर समितीने मत व्यक्त केले की, सर्वशिक्षा अभियानामध्ये त्या अधिकाऱ्यांनी शासकीय परवानगी घेतलेली नाही. वेळेत काम न झाल्यामुळे जिल्हा सेस निधीवर बोजा पडलेला आहे. शिक्षण समितीची मान्यता नाही. जिल्हा परिषदेचीही मंजुरी नाही. एकत्र बैठक झाली असेल तर हा भाग वेगळा आहे, त्यांनी त्याचे कार्यवृत्त तयार केले असेल. मात्र यामध्ये ऑथेंटिक प्रोसेस करायला पाहिजे होती ती केलेली दिसत नाही.

समितीने असे मत व्यक्त केले की महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नुसार आक्षेप आहे. तीन वेळा संधी दिली होती. मात्र तरीही हा परिच्छेद पंचायती राज समितीपुढे आला आहे. अनुपालन करून डिलिट करण्याबाबत तीन वेळा संधी दिल्यानंतरही हा परिच्छेद पंचायती राज समितीपुढे आला आहे, याचा अर्थ अनुपालन केलेले नाही जिल्हा परिषद लेखा संहिता सर्वशिक्षा अभियान योजनेस लागू नाही, असे म्हटले आहे. लेखासंहिता सर्वशिक्षा अभियानाला लागू नाही तरी जिल्हा निधीचे पैसे वापरले आहेत. जिल्हा निधीच्या पैशाला लेखासंहिता लागू आहे. समितीला चुकीची माहिती देण्यात आली आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यासाठी जबाबदार आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

समितीने पुढे विचारणा केली की, लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता सर्व शिक्षा अभियान योजनेस लागू नाही. तथापि, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या सूचनेनुसार या कामाची नोंद वर्क रजिस्टरमध्ये व मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आली आहे. अशी नोंद तर वर्क रजिस्टरमध्ये घेणे आवश्यकच आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, यासंदर्भात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी एक पत्र पाठविले आहे. तदनंतर समितीने अशीही विचारणा केली की, सर्व शिक्षा अभियानाकडून काम पूर्ण झाले नाही म्हणून जिल्हा निधीतील पैसा खर्च केलेला आहे. सर्व शिक्षा अभियानासाठी किती निधी दिलेला आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, दोन्ही कामांसाठी प्रत्येकी ६ लाख ७५ हजार रुपयांचा निधी दिलेला आहे. समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने जो निधी सेस फंडातून दिलेला आहे त्या निधीला लेखा संहिता लावणे आवश्यक आहे काय? दलित वस्तीतील समाज मंदिराचे काही कामे अपूर्ण आहेत म्हणून ग्रामपंचायतीच्या सामान्य कोट्यातून पैसे खर्च केलेले आहेत. सदरहू कामे ५ ते ७ वर्ष अपूर्ण राहिले होते म्हणून ५० हजार ते एक लाख रुपये सामान्य फंडातून दिलेले आहेत. ज्या कामांना कोणताही निधी उपलब्ध होत नाही ती कामे जिल्हा निधीतून केली जातात. लेखा संहिता सर्व शिक्षा अभियान योजनेस लागू होत नाही काय सर्व शिक्षा अभियानाचा निधी खर्च करण्यासाठी लेखा संहितेप्रमाणे काही अटी आणि शर्ती आहेत. सध्या शिक्षणाधिकारी कोण आहेत? सद्यस्थितीत श्री.मोहरे, हे प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) आहेत. समितीने पुढे विचारणा केली की, सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत येणारा निधी कुठे खर्च केला जातो? याबाबत समितीस उत्तर आले नाही. समितीने विचारणा केली की, शिक्षणाधिकारी यांना सर्व शिक्षा अभियान योजनेचा निधी खर्च करण्यासंदर्भातील अटी व शर्तीची माहिती आहे काय? शिक्षणाधिकारी यांना जर अशा प्रकारची माहिती नसेल तर ही गंभीर बाब आहे. याबाबतची समितीने गंभीर दखल घेतलेली आहे. जिल्हा परिषदेच्या सेस फंडावर शिक्षण विभागाचा काय अधिकार आहे? जिल्हा परिषदेला स्वतःचे असे उत्पन्नाचे माध्यम नसते. सरकारकडून मिळणारे अनुदान व सेसफंडावर जिल्हा परिषदेला अवलंबून राहावे लागते. सेस फंडातून मिळणारा निधी दुर्लक्षित भागांच्या कल्याणासाठी खर्च केला जावा असा दंडक आहे. असे असताना देखील सर्व शिक्षा अभियानासाठी निधी खर्च कसा करण्यात आला आहे. सेस फंडातील रक्कम खर्च करण्याचा शिक्षण विभागाला

अधिकार आहे काय? यावर प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी स्पष्ट केले की, जिल्हा परिषदेच्या सेस फंडातील निधी खर्च करण्याचा अधिकार शिक्षण विभागाला नाही. समितीने विचारणा केली की, यासंदर्भातील सर्व नियम व अटी माहिती असताना देखील तो निधी खर्च का करण्यात आला आहे? याबाबत समितीला उत्तर देण्यात आले नाही. समितीने अशी विचारणा केली की, तत्कालीन शिक्षणाधिकारी कोण होते? यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन यांनी विदित केले की, तत्कालीन शिक्षणाधिकारी एम.जे. देशमुख हे कार्यरत होते. समितीने सर्व शिक्षा अभियानासाठी सेस फंडाचा निधी कोणत्या नियमानुसार खर्च केला, असे विचारले असता जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी यांना कोणत्याही प्रकारचे उत्तर देता आले नाही. पंचायती राज समिती येण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधीतांसमवेत आढावा बैठक घेतली नव्हती काय? जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्याला स्वतःच्या खात्यासंदर्भातील माहिती अवगत नसेल तर ते सदरहू पदाचा कार्यभार कसा सांभाळत आहेत. सदरहू निधी खर्च करण्यासंदर्भात शिक्षण परिषदेचे पत्र प्राप्त होते तर त्यासंदर्भातील माहिती शिक्षणाधिकारी यांना का नाही ही गंभीर बाब आहे. त्यानंतर समितीच्या सचिवांनी समितीपुढे शिक्षण परिषदेचे पत्र वाचून दाखविले या सर्व शिक्षा अभियानात बांधकाम मंजुरीच्या तरतूदीपेक्षा लागणाऱ्या अतिरिक्त रकमेसंदर्भात राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे पत्र आहे. सदरहू पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, सर्व शिक्षा अभियान हा कालमर्यादित प्रकल्प असून सदर प्रकल्प अंतर्गत बांधकामे ही ज्या वर्षात मंजूर आहेत त्याच वर्षामध्ये मंजूर असलेल्या एकक किंमतीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे, तथापि, बऱ्याच जिल्ह्यांकडून सदर बांधकामे वेळेत सुरु न झाल्यामुळे व बांधकाम साहित्य दरवाढ झाल्यामुळे बांधकामाकरिता अतिरिक्त रकमेची मागणी वारंवार या कार्यालयास करण्यात येत आहे. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमामध्ये इतर उपक्रमांबरोबरच शाळा बांधकामे हा महत्त्वाचा घटक आहे. बांधकामे कंत्राट देऊन करण्याच्या प्रक्रियेस सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मान्यता नसल्याने तसेच शाळा बांधकाम प्रक्रियेत लोकांची मालकी निर्माण व्हावी, सदर बांधकामे आपल्या गावासाठी व आपल्या गावातील मुलांसाठी करावयाची आहेत, ही भावना लोकांच्या मनात निर्माण होण्याच्या दृष्टीने ही बांधकामे शाळा व्यवस्थापन समिती मार्फत गावकऱ्यांच्या सहकार्याने व परस्परांच्या सहभागातून करण्यात येतात. सबब काही कारणास्तव बांधकाम पूर्ण करण्याकरिता मंजूर रकमेपेक्षा जास्तीचा निधी लागत असल्यास असा जास्तीचा निधी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत उपलब्ध करण्याची तरतूद नसल्याने सदर निधी लोकसहभागातून उपलब्ध करणे अपेक्षित आहे. लोकसहभागातून अतिरिक्त निधी उपलब्ध करणे शक्य नसल्यास बांधकाम पूर्ण करण्यास लागणारी अतिरिक्त रक्कम जिल्हा परिषद सेस फंड अथवा शासनाच्या इतर योजनांमध्ये उपलब्ध असलेल्या निधीशी सांगड घालून उपलब्ध करून घ्यावी व सदर बांधकामे विहित कालावधीत पूर्ण करणेबाबतची कार्यवाही करावी. असे पत्रात नमूद केले आहेत.

याबाबत समितीने असे सूचित केले की, सदर प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी हा जिल्हा परिषदेचा आर्थिक सल्लागार आहे. त्यामुळे सर्व बिले तपासूनच देयके अदा करावीत. सदर निधी देतेवेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आक्षेप घेतला असता तर हा आक्षेप निघाला नसता. संबंधित खाते प्रमुखांनी त्यांची स्पष्ट नोट टाकली तर ती नोट बदलण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील नाहीत. पण दुर्दैव असे आहे की, सर्व खाते प्रमुख हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना घाबरतात. संबंधित खाते प्रमुखांनी नियमानुसार नोट बनवावी. दुर्दैव असे आहे की, कोणत्याही खाते प्रमुखांना त्यांच्या खात्याचे नियमच माहिती नाहीत. कोणत्याही खातेप्रमुखामध्ये आत्मविश्वास नाही. त्यामुळे ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांना घाबरतात. मुख्य कार्यकारी अधिकारी हे अधीक्षक आहेत. सर्व खाते प्रमुखावर नियंत्रण ठेवून त्यांच्याकडून योग्य प्रकारे काम करून घेण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आहे. काही मुख्य कार्यकारी अधिकारी खाते प्रमुखावर दबाव टाकून अशा प्रकारचे कामे करतात. सर्व खाते प्रमुखांनी नियमानुसार नोट टाकून कागपत्रांच्या पुराव्यासह फाईल तयार केल्यानंतर देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फाईलमध्ये बदल केले तर ते समितीस अवगत करावे.

आपल्या देशाचे दिवंगत नेते स्व. अटल बिहारी वाजपेयी यांनी उदात्त हेतूने सर्व शिक्षा अभियान योजना सुरु केली. ज्या गावांमध्ये शाळेसाठी इमारत नाही अशा गावांमध्ये शाळेचे बांधकाम करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. सर्व शिक्षा अभियान योजनेचे काम वेळेत पूर्ण केले नसल्यामुळे सेस फंडावर बोजा पडलेला आहे. सर्व शिक्षा अभियानासाठी सेस फंडातील निधी खर्च करण्यासाठीची कार्यवाही पूर्ण केलेली नाही. सदरहू निधीसाठी शिक्षण समितीची, स्थायी समिती, जिल्हा परिषद व शासनाची कोणत्याही प्रकारची मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे सदरहू कामामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. सदरहू प्रकरणी संबंधित खाते प्रमुख व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मुख्य जबाबदारी आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून दोषी अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करून चौकशी अहवालासह कारवाईचा अहवाल एका महिन्याच्या आत समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता सर्व शिक्षा अभियान योजनेस लागू नाही असे ज्या अधिकाऱ्याने नमूद केले आहे त्या अधिकाऱ्यावर देखील कारवाई करण्यात यावी व राज्यातील अनेक जिल्हा परिषदेमध्ये अशा प्रकारचे अनेक प्रकरणे आहेत. त्यामुळे सदरहू विषयासंदर्भात शिक्षण वित्त व ग्रामविकास सचिवांची साक्ष घेण्यात येईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे उत्तर दिले आहे की, सदर प्रकरणी कार्यकारी समितीने मंजुरी दिलेली आहे. खरे पाहता सदर प्रकरणी कार्यकारी समितीला मंजुरी देण्याचे अधिकारच नाहीत. सदर अधिकार हे कार्यकारी मंडळाला आहेत. कार्यकारी मंडळानी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत. निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत. या प्रकरणी तत्कालीन अधिकारी जबाबदार आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला खोटी माहिती देऊन समितीची दिशाभूल केलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बुकलेटमध्ये दिलेली उत्तरे हे समितीस समाधानकारक नाहीत. प्रत्येक खाते प्रमुखाकडून सर्व माहिती घेऊन ती स्वतः तपासून बुकलेट तयार करण्याची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने त्यांची होती. पण त्यांनी कोणतीही माहिती न तपासता बुकलेट तयार केल्याचे दिसून येत आहे. असत्य माहिती समितीला देणे हा समितीचा अवमान आहे. ज्या-ज्या अधिकाऱ्याने चुकीची माहिती दिलेली आहे, अशा अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी आपणाजवळ माहिती नसेल तर ती माहिती अवगत करून समितीला देणे आवश्यक होते. असे न करता आपल्या अधिकाऱ्यांने समितीला असत्य माहिती देऊन समितीचा वेळ वाया घातलेला आहे. समितीची दिशाभूल केलेली आहे. अशी उत्तरे म्हणजे समितीचा अवमान आहे. अशा अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली**

**अपूर्ण वस्तीशाळा बांधकाम पूर्ण करणेबाबत** :—सर्व शिक्षा अभियान योजनेतंर्गत ज्या गावांमध्ये शाळेसाठी इमारत नाही अशा गावांमध्ये शाळेचे बांधकाम करण्यात येते. लातूर जिल्हा परिषदेमध्ये सर्व शिक्षा अभियानासाठी सेस फंडातील निधी खर्च करण्यासाठीची कार्यवाही पूर्ण केलेली नाही, सदरहू निधीसाठी शिक्षण समितीची, स्थायी समितीची, जिल्हा परिषद व शासनाची कोणत्याही प्रकारची मंजूरी घेतलेली नाही. सदरहू प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

मौजे कबन सांगवी ता. चाकूर व मौजे कवठा केज तांडा ता. औसा ( मंजूर वर्ष २००८ ) या ठिकाणी वस्तीशाळांसाठी वर्ग खोलीचे बांधकाम सर्व शिक्षा अभियानांअंतर्गत मंजूर करण्यात आलेले होते. यासाठी प्रति एकक प्रमाणे रुपये ६.७५ लक्ष तरतुद मंजूर होती.

सदरचे बांधकाम हे अनुक्रमे बांधकामासाठी जागा उपलब्ध नसणे व ग्राम शिक्षण समितीतील अंतर्गत वादामुळे काम अर्धवट ठेवणे यामुळे तत्कालीन स्थितीत काम पुर्ण झाले नाही.

सदर बांधकाम विद्यार्थी हिताच्या दृष्टीकोनातून पूर्ण करणे महत्वाचे होते. करीता या कार्यालयाने तत्कालीन स्थितीत वरील दोन्ही बांधकामे पुर्ण करण्यासाठी सुधारीत अंदाज पत्रक तयार करून या कार्यालयाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्याकडे सादर केले होते. सदर सुधारीत अंदाज पत्रकावर या कार्यालयाने दिनांक १२ जुलै २०१२ रोजी पत्र देऊन जिल्हा परिषद सेस फंड अथवा शासनाच्या इतर योजना मध्ये उपलब्ध असलेल्या निधीशी सांगड घालुन बांधकामे वेळेत पुर्ण करावीत असे कळविलेले होते. त्या अनुषंगाने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. पंरास २००८/(३२२/०८) प्राशि-४ अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून सदर शाळाचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी सेस फंडा अंतर्गत (सन २०१३-१४) चा निधी दिनांक १३/०६/२०१३ च्या आदेशाने कबन सांगवी ता. चाकूर यासाठी रुपये ५.०८३ लक्ष व कवठाकेज तांडा ता. औसा यासाठी रुपये १.६१७ लक्ष असे एकूण रुपये ६.७०० लक्ष रुपयाची तरतुद शाळा बांधकाम पुर्ण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

सदर सेस फंडातील निधी सर्व शिक्षा अभियान अंतर्गतच्या अपूर्ण वस्तीशाळा बांधकामासाठी वापरताना तत्कालीन स्थितीत शिक्षण समिती, स्थाई समिती व सर्व साधारण सभा व शासन यांची मंजूरी घेणे अपेक्षीत होते. याबाबत असे की, उपरोक्त कामासाठी तरतूद केलेल्या निधीचे वितरण हे दिनांक २९/०३/२०१४ रोजी जि.प. सेस फंडातून करण्यात आले तत्कालिन स्थितीमध्ये ही बाब मान्यतेसाठी सर्व साधारण सभेकडे जाणे अपेक्षीत होते तथापि मा. सहायक संचालक ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र

दिनांक ०७ मार्च २०१४ नुसार या कालावधीमध्ये लोकसभेची निवडणूक आचार संहिता असल्यामुळे सदरची मंजूरी मान्यता घेता आली नाही. तथापि तदनंतर लगतच्या पुढील दिनांक ०१/०७/२०१४ रोजीच्या सर्व साधारण सभेमध्ये सदर कामांसाठी केलेल्या अर्थ संकल्पीय तरतूद व वितरणाची बाब अवलोकनार्थ ठेवून निदर्शनास आणुन देण्यात आली. तसेच यास शिक्षण समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्रायः-**जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**वित्त विभागाचे अभिप्रायः-**अप्राप्त

**ग्राम विकास विभागाचे अभिप्रायः-(वित्त-३)** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अपूर्ण वस्ती शाळांची बांधकामे पूर्ण झाली आहेत काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, अपूर्ण वस्ती शाळांची बांधकामे पूर्ण झाली आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, अपूर्ण वस्ती शाळांची बांधकामे पूर्ण करण्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाचे समाधान झाले आहे काय ? यावर विभागीय सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी विदित केले की, याबाबत विभागाने आढावा घेतला. सुरुवातीला काम मंजूर झाले तेव्हा जमीन उपलब्ध नव्हती. जेव्हा जमीन प्राप्त झाली त्यावेळी किमतीमध्ये वाढ झाली होती. यामुळे जिल्हाधिकारी सेसमधून अधिकचा निधी उपलब्ध करून काम पूर्ण करून घेतले आहे. विभागाचे समाधान झाले आहे. यावर समितीने विचारणा केली की, जमीन उपलब्ध नसताना प्रस्ताव कसा दिला ? याबाबत विभागीय सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी स्पष्ट केले की, त्यावेळी कसे घडले सांगता येणार नाही. जमीन नसताना काम मंजूर केले. खरे तर अशा वेळी कामास मंजुरी द्यावयास नको होती.

यावर समितीने मत व्यक्त केले की, कामाची पाहणी अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. काम प्रस्तावित करण्यापूर्वी जमीन उपलब्ध आहे की नाही हे पाहिले पाहिजे. उशीर झाला तर निधी जास्त लागतो. या पुढे काळजी घेण्यात यावी. याबाबत विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

मौजे कबनसांगवी (ता.चाकूर) व मौजे कवठा केज तांडा (ता.औसा) या ठिकाणी सन २००८-०९ मध्ये वस्तीशाळांसाठी वर्ग खोलीचे बांधकाम सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मंजूर करण्यात आले यासाठी प्रती एकक प्रमाणे रूपये ६.७५ लक्ष तरतुद मंजूर करण्यात आली होती. कबनसांगवी (ता.चाकूर) येथील वस्तीशाळा बांधकामासाठी सन २००८-०९ ते २०११-१२ पर्यंत जागा उपलब्ध न झाल्याने बांधकाम सुरू करण्यात आले नाही. माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये जागा उपलब्ध झाल्यानंतर सदरचे बांधकाम सुरू करण्यात आले. सदरचे बांधकाम विहित वेळेत न केल्याने सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार रूपये ११.८३३ लक्ष रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करून जास्तीची लागणारी रूपये ५.०८३ लक्ष इतकी रक्कम जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून घेऊन सन २०१५ मध्ये बांधकाम पूर्ण करण्यात आले.

तसेच मौजे कवठा केज तांडा (ता.औसा) येथील वस्तीशाळेचे बांधकाम ग्रामशिक्षण समितीद्वारे अर्धवट ठेवल्याने सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार रूपये २.५५ लक्ष रकमेचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले. यापैकी गटस्तरावर या कामातील शिल्लक रूपये ०.४० लक्ष व शाळास्तरावर उपलब्ध साहित्याचे मूल्य रूपये ०.५३३ लक्ष असे एकूण रूपये ०.९३३ लक्ष वगळता उर्वरीत लागणारा निधी रूपये १.६१७ लक्ष इतकी रक्कम जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून घेऊन सन २०१६ मध्ये बांधकाम पूर्ण करण्यात आले.

कबनसांगवी (ता.चाकूर) व मौजे कवठा केज तांडा (ता.औसा) येथील वस्तीशाळा बांधकामाचे काम सर्वशिक्षा अभियानांतर्गत करण्यात येत होते. सदर कामांना उशिर झाल्यामुळे राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रान्वये प्राप्त सूचनेनुसार या कामांना कमी पडत असलेला निधी जिल्हा परिषदेच्या सेसफंडमधून घेऊन दोन्ही कामे पुर्ण केली आहेत तसेच या कामांची नोंद वर्क रजिस्टरमध्ये व मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आली आहेत.

जिल्हा परिषद सेस फंडातील निधी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत अपूर्ण वस्तीशाळा बांधकामासाठी वापरताना तत्कालीन स्थितीत जिल्हा परिषदेच्या शिक्षण समिती, स्थायी समिती, सर्वसाधारण सभा व शासनाची मंजूरी घेण्यात आली नव्हती. तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत निधी खर्च करण्यासाठी लेखा संहितेप्रमाणे कोणत्या अटी व शर्ती आहेत, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता सर्व शिक्षा अभियान योजनेस लागू आहे काय, जिल्हा परिषदेच्या सेस फंडातील निधी अन्य योजनांसाठी वापरता येतो काय, यासंदर्भात कोणताही तपशील न तपासता चुकीची माहिती समितीस सादर करण्यात आली होती. या सर्वांस मुख्य लेखा व वित्त अधिकारी जबाबदार आहेत. तसेच साक्षीच्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांना समितीस माहितीस्तव आवश्यक असलेल्या महत्वाच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

ज्या गावांमध्ये शाळेसाठी इमारत नाही अशा गावांमध्ये शाळेचे बांधकाम करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून सदर बांधकामे आपल्या गावासाठी व आपल्या गावातील मुलांसाठी असल्याचा दृष्टीकोन ठेवून शाळा व्यवस्थापन समितीमार्फत गावकऱ्यांच्या सहकार्याने व परस्परांच्या सहभागातून बांधकामे विहित वेळेत पूर्ण करण्यासह या अभियानाअंतर्गत प्रकल्पांचे बांधकामे ज्या वर्षात मंजूर करण्यात आली आहेत त्याच वर्षामध्ये मंजूर असलेल्या निधीमध्ये पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी सर्व शिक्षा अभियांनाअंतर्गत शाळा बांधकामासाठी प्राप्त झालेला निधी विहीत मुदतीत खर्च केला नाही. त्यांचे स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीवर देखील नियंत्रण नव्हते. अधिकचा निधी लागल्यास लोकसहभागातून असा जादा निधी उभारून अशा शाळा खोल्या उभारणे हे शिक्षण परिषदेच्या दिनांक १२ जुलै, २०१२ रोजीच्या पत्रावरून दिसून येते पण याकडे शिक्षणाधिकारी यांनी डोळेझाक केली व असा जादाचा निधी शासनाकडे प्रस्ताव पाठवून मागविण्यात आला व त्याला शासनाच्या संबंधीत यंत्रणांनी देखील मान्यता दिली ही बाब सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनेचे फलनिष्पत्ती झाली नाही असे समितीला वाटते.

सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत शाळा खोली बांधकामासाठी विहित केलेल्या रक्कमेचे शाळा खोली बांधणे आवश्यक होते, अशा शाळांमध्ये गावातील मुले शिक्षण घेतात ही जाणीव गावांतील लोकांना व मुलांच्या पालकांना व्हावी व अशा शाळांना जादाचा निधी लागल्यास लोकवर्गणीतून/लोकसहभागातून करणे आवश्यक असतात. तत्कालीन शिक्षणाधिकारी व संबंधित अधिकारी यांनी या कामी कर्तव्यात कसूर केली असे स्पष्ट मत आहे. त्यामुळे याप्रकरणी जादा निधी लागल्यास असा निधी लोकसहभागातून उभारला न गेल्यामुळे तो सेस फंडातून खर्च करावा लागला व यासाठी शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी देखील उक्त योजनेचे उद्दीष्टे विचारात न घेता जादाच्या खर्चास सेस फंडातून मान्यता दिली याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

समिती सेस फंडातून वापरलेला निधी व सर्व शिक्षा अभियान या योजनेच्या फलनिष्पतीस मारक आहे असेही समितीचे मत आहे. त्यामुळे अशा प्रकारे प्रस्ताव पाठवून त्यास सेस फंडाच्या निधीतून मान्यता देणे हे गैर असून भविष्यात अशा प्रकारे निधी वापरास शासनाने प्रतिबंध करावा व त्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना एक सर्वंकक्ष परिपत्रक निर्गमित करून सूचना निर्गमित कराव्यात, तसेच लेखा संहितेत आवश्यक त्या ठिकाणी बदल करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच या कामी शिक्षणाधिकारी व संबंधित अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केली असा त्यांच्यावर ठपका ठेवून त्यांचे विरूध्द योग्य ती कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठवावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच यापुढे कोणत्याही योजनेअंतर्गत प्रकल्पाचे काम प्रस्तावित करताना विहित वेळेत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने त्यासाठी आवश्यक असलेली जागा गावामध्ये उपलब्ध आहे काय, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे या सर्व बाबींची तपासणी करून आवश्यक त्या शासकीय मान्यतेनंतरच निधी मंजूर करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावी. अशीही समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, लातूर

## शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गट स्तरावर कमी / जादा पुरवठ्यातील अनियमिततेबाबत.

**परिच्छेद क्रमांक. ३.१५२ (सन २०१३-१४)**

जिल्हा परिषद लातूर, सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक १०) - शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गट स्तरावर कमी/जादा अदाई झालेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) शासन निर्णय क्रमांक शा.पो.आ-२०१२/प्र.शि./४/शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई दिनांक १७/०८/२०१२ अन्वये १ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्याना ४५० उष्मांक १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार तसेच ६ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार वाटप करण्यात यावा असे असतांना पंचायत समिती स्तरावर प्रत्येक महिन्यात पटसंख्या निश्चित केल्याचे अभिलेखे व त्यानुसार योजनेच्या आहाराचे वाटप केल्याची संचिका लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-२००४/(२४६/०४) प्राशि-४, दिनांक ३१/०३/२००४ नुसार योजनेच्या प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणीसाठी तालुका व ग्रामस्तरावर समित्या स्थापन करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

(३) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक शा.पो.आ.२०१०/प्र.क्र.१८/प्रा.शि-४, दिनांक ०२/०२/२०११ **(परिशिष्ट क्रमांक-२.१)** मधील परिच्छेद क्र. ६ अन्वये मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याला आहारात भाजीपाला समाविष्ठ केल्या बाबत व आहार चविष्ठ असल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

(४) उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ अन्वये आठवड्यातून किमान एक दिवस विदयार्थ्याना पुरक आहार उदा. फळे, सोया बिस्किट, चिकू, दूध, राजगीरा लाडू, गुळ शेंगदाणे, चुरमुरे, इत्यादी पुरक आहार देणेबाबत निर्देश असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

(५) तालुका औसा मागणी ऑगस्ट १३ ते सप्टेंबर १३ मध्ये मसुरडाळ मागणी ६४४० किलोग्रॅम असताना वाटप ६३५८ किलोग्रॅम केले आहे. परंतु बिलावर ६५५८ किलोग्रॅम नमूद करून २०० किलोग्रॅम जादा दर्शवून रुपये १३,६००/- ची जादा अदाई झालेली आहे. संबंधिताकडून रक्कम रुपये १३,६००/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

(६) तालुका औसा मागणी ऑगस्ट १३ ते सप्टेंबर १३ मध्ये चवळीची मागणी ७५५२ किलोग्रॅम असून पुरवठा वाटप ७४१३ कि.ग्रा. केला आहे. मात्र बिलावर सदर चवळी ७४५३ किलोग्रॅम लाऊन ४० किलोग्रॅम जादा दर्शविली आहे. त्यामुळे ४० किलोग्रॅम दर रुपये ५६ प्रमाणे रुपये २,२४०/- जादा अदाई झालेली आहे. तरी संबंधितांकडून रक्कम रुपये २,२४०/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ३७ (१ व २ ) नुसार पैसे देण्याकरिता प्रस्तुत करण्यात आलेल्या कोणत्याही मागणी बाबत देयकावर स्वाक्षरी केली जाण्यापूर्वी लेखापाल/ उप लेखापाल यांचेकडून तपासण्यात येईल असे असतांना उपरोक्त देयकाची तपासणी केल्याची दिसून येत नाही.

(८) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग परिपत्रक क्रमांक शापोआ-२००९/ प्र.क्र.३८३/प्राशि-४, दिनांक २६/०२/२०१० **(परिशिष्ट क्रमांक-२.२)** मधील तरतूद क्रमांक (क्रमांक २) तालुकास्तरावर गटस्तरावर गट शिक्षणाधिकारी/ अधीक्षक शालेय पोषण आहार निश्चीत केलेल्या पाककृती नुसार ठरवून दिलेल्या धान्याची मालाची प्रमाणानुसार परिगणना करतील व आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या मालाचा शाळानिहाय मागणी पत्रानुसार पुरवठा धारकास पुरवठा आदेश देतील असे असताना पुरवठाकाराने देयकासोबत मालाच्या मागणीचे आदेश जोडलेले नाहीत. त्यामुळे मागणी नसताना पुरवठा झाला असल्याची शक्यता आहे.

(९) करारनामा दिनांक ०१/११/२०११ अन्वये करारनाम्यातील अट क्रमांक ५ नुसार मालाचा पुरवठा शाळानिहाय मागणी पत्रकानुसार आवश्यक तेवढ्यात प्रमाणात पुरवठा करणे बंधनकारक असताना पुरवठाधारक महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कन्झुमर्स

फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांनी करारातील अटीचा भंग करून रक्कम रुपये ५,२२,८९३/- कमी व रक्कम रुपये १,६५,६०९/- जादा पुरवठा केलेचे दिसून येते. धान्य पुरवठा करण्यात आलेल्या जादा पुरवठ्याची रक्कम रुपये १,६५,६०९/- एवढी रक्कम संबंधितावर जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुलात आणून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. तसेच मालाचा पुरवठा सुस्थितीतपणे न करता तालुका स्तरावर गट शिक्षणाधिकारी/अधिक्षक शालेय पोषण आहार यांचेशी संनियंत्रण व समन्वय न ठेवता व धान्यादी मालाच्या साठ्याची वेळोवेळी आढावा न घेता मालाच्या पुरवठा केलेचे स्पष्ट होते. करारातील अट क्रमांक ९ प्रमाणे कार्यवाही न करता पुरवठा धारकाच्या सोयीप्रमाणे पुरवठा केल्याचे स्पष्ट होते.

(१०) करारातील अट क्रमांक १२ नुसार प्रारंभिक पुरवठा दोन महिन्यांसाठी असेल या अटीचे उल्लघंन झालेले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद लातूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०११ **(परिशिष्ट क्रमांक - २.१)** नुसार शालेय पोषण आहार दिला आहे. सदर आहार देत असताना प्रत्यक्ष पट व संभाव्य उपस्थिती विचारात घेऊन शाळा, केंद्र व तालुका यांची संकलित मागणीनुसार आहार वितरण केले जाते. प्रत्येक शाळा स्तरावर उपस्थित विद्यार्थी व त्यांना वाटप करण्यात आलेले शालेय पोषण आहार, साठानोंदवही, चव रजिस्टर इ. लेखे उपलब्ध आहेत. संचिका/लेखे अवलोकनास्तव सादर करण्यात येत आहेत.

(२) तत्कालीन परिस्थितीत तांदुळ हा तहसील/रेशन दुकानामार्फत पुरवठा केला जात होता. तद्नंतर या योजनेचे स्वरूप सन २०११ पासून बदलण्यात आल्याने भारतीय अन्न महामंडळाकडून उचल करून पुरवठादारामार्फत शाळास्तरावर पुरवठा करण्यात येतो. शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणीसाठी शाळास्तरावर शालेय व्यवस्थापन समिती स्थापन केलेली आहे. अशी कार्यवाही केल्याचे लेखे सोबत जोडण्यात येत आहेत. तालुकास्तरावर पंचायत समिती स्तरावरील बैठकीमध्ये नियमित आढावा होत असून पोषण आहाराविषयी काहीही तक्रार नाही.

(३) शालेय पोषण आहारामध्ये भाजीपाला समाविष्ठ केल्याबाबत व आहार चविष्ट असल्याबाबत मुख्याध्यापकाकडून प्रमाणपत्र देण्यात येते. ही कार्यवाही केल्याबाबतचे लेखे अवलोकनास्तव सादर.

(४) आठवड्यातून एक दिवस शालेय विद्यार्थ्यांना पूरक आहार देण्यात येतो व त्याची नोंद नोंदवहीत घेतली जाते. अशी कार्यवाही केल्याचे लेखे अवलोकनास्तव सादर.

(५) जादा रक्कम अदा केल्याबाबत संबंधित लेखाधिकारी (शा.पो.आ) गट शिक्षणाधिकारी व अधीक्षक (शा.पो.आ), पंचायत समिती, औसा यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. तालुका औसासाठी पुरवठादाराने ६३५८ कि.ग्रॅ. मसुरडाळचा पुरवठा केला असून पुरवठादाराने ६५५८ कि.ग्रॅ. मसुरडाळचे बील पुरवठादारास अदा केले आहे. तरी जादा २०० कि.ग्रॅ.ची वसुली रक्कम रुपये १३,६००/- संबंधित पुरवठादाराकडून चलनाद्वारे वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आला आहे.

(६) औसा गटाकरीता ऑगस्ट २०१३ ते सप्टेंबर,२०१३ साठी पुरवठादाराने चवळीचा पुरवठा वाटप ७४१३ कि.ग्रॅ. केला असून संबंधित पुरवठादारास ७४१३ कि.ग्रॅ. चे बिल अदा करण्यात आलेले आहे.

(७) शासन परिपत्रक क्रं.शापोआ/२००९/प्र.क्रं.३८३/प्राशि-शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० नुसार गटस्तरावर पुरवठादाराने अधीक्षक (शा.पो.आ)/ गटशिक्षणाधिकारी यांचेकडे देयके सादर केल्यानंतर अधीक्षक (शापोआ) यांनी देयके तपासून शिक्षणाधिकारी (प्रा) यांचेकडे सादर करण्यात येतात. तदनंतर जि.प.स्तरावर लेखाधिकारी (शा.पो.आ) यांचे मार्फत देयके अर्थ विभाग, जि.प.लातूर यांचेकडे सादर करण्यात येतात. सोबत संदर्भिय शासन परिपत्रक जोडण्यात येत आहे.

(८) मुख्याध्यापकांकडून शालेय पोषण आहाराबाबतची मागणी केंद्रप्रमुखाकडे जमा होऊन त्यांच्याकडून गट शिक्षणाधिकारी यांचेकडे जमा केली जाते. व नंतर पुरवठादारास पुरवठा आदेश दिला जातो. त्यामुळे तालुक्याची एकत्रित मागणी पुरवठादारास दिली जाते. व त्यान्वये शाळास्तरावर मागणीनुसार पुरवठा केला जातो.

(९) जिल्ह्यातील गटस्तरावरून मागणी करण्यात आलेल्या मालापेक्षा अधिकचा पुरवठा केल्यामुळे संबंधित पुरवठादाराकडून रुपये ५९,६९०/- एवढी रक्कम वसूल करून चलनाद्वारे शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. सोबत मागणी व पुरवठा केल्याचे विवरणपत्र जोडण्यात येत आहे. कृपया अवलोकन व्हावे.

(१०) धान्यादी माल व तांदूळ पुरवठा हा दोन महिन्यांकरिता असतो व त्याचे पालन कटाक्षाने होईल याचे प्रयत्न केले जात आहेत. काही तांत्रिक अडचणीमुळे कधी कधी विलंब होतो मात्र शालेय पोषण आहारामध्ये खंड न पडता वेळेत धान्यादी माल व तांदुळ पुरवठा होईल याची दक्षता घेतली जाते.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखाधिकारी, गट शिक्षणाधिकारी व अधीक्षक यांना कारणे दाखवा नोटीस केव्हा देण्यात आलेल्या आहेत सदरहू रक्कम रुपये १३,६००/- केव्हा वसूल केली आहे? लेखापरीक्षणामध्ये निवडक महिन्यांमध्ये जादा पुरवठ्याची वसुली दर्शविली आहे. संपूर्ण आर्थिक वर्षामध्ये किती जादा पुरवठा केला आहे? त्याची वसुली केली आहे का? किती मालाचा कमी पुरवठा केला आहे? त्याबद्दल दंडात्मक कारवाई केली आहे का? कमी पुरवठा केल्यामुळे पर्यायी व्यवस्था काय केली? कमी जादा पुरवठा करण्याची कारणे काय आहेत? मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, जादा रक्कम अदा केल्याबाबत संबंधित लेखाधिकारी शा.पो.आ., गट शिक्षणाधिकारी व अधीक्षक शा.पो.आ., पंचायत समिती, तालुका औसासाठी पुरवठादाराने ६३५८ कि.ग्रॅ. मसुरडाळचा पुरवठा केला असून पुरवठादाराने ६५५८ कि.ग्रॅ. मसुरडाळचे बील पुरवठादारास अदा केले आहे. तरी जादा २०० कि.ग्रॅ.ची वसुली रक्कम रुपये १३,६००/- संबंधित पुरवठादाराकडून चलनाद्वारे वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आला आहे. समितीने विचारणा केली की, कोणत्या शाळेमध्ये किती पुरवठा करण्यात येतो. त्यासंदर्भातील सर्व माहिती उपलब्ध असते त्याप्रमाणे त्या शाळेवर अन्न धान्याचा पुरवठा केला जातो. संबंधित ठेकेदारांनी किती पुरवठा केला आहे त्यासंदर्भातील सर्व माहिती संबंधित अधिकाऱ्याकडे असते. पुरवठा केलेल्या धान्याच्या आधारेच बिले मंजूर केली जातात. २०० कि.ग्रॅ.चे पैसे जादा अदा करण्यात आलेले आहेत. त्यावेळी सदर बाब संबंधित अधिकाऱ्याच्या लक्षात का आली नाही? संबंधित अधिकाऱ्याने सदर प्रकरणी एवढा निष्काळजीपणा करण्याची कारणे काय आहेत?

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, संबंधित अधिकाऱ्याला शो-कॉज नोटीस दिलेली आहे. तदनंतर समितीने विचारणा केली की, १० ते १५ कि.ग्रॅ.चे पैसे जादा अदा केले असते तर ते समजू शकले असते परंतु २०० कि.ग्रॅ.चे पैसे जादा अदा करणे ही गंभीर बाब आहे. संबंधित पुरवठादाराकडून सदरहू जादा रक्कम वसूल केली आहे काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, संबंधित पुरवठादाराकडून १३,६०० रुपये चलनाद्वारे वसूल केलेले आहेत. तदनंतर समितीने विचारणा केली की, मागणीपेक्षा जास्त पुरवठा करण्याचे कारण काय आहे, संबंधित शाळेने किती कि.ग्रॅ.ची मागणी केली होती? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, संबंधित शाळेने ६,४४० कि.ग्रॅ.ची मागणी केली होती.

याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, संबंधित शाळेची ६,४४० कि.ग्रॅ.ची मागणी असताना ६,३५८ कि.ग्रॅ. वाटप करण्यात आले आहे शाळेतील नियमित उपस्थित विद्यार्थ्यांच्या आधारे धान्याची मागणी करणे आवश्यक आहे. असे असताना देखील संबंधित शाळेतील कर्मचारी हे पट संख्येच्या आधारे धान्याची मागणी करतात. त्यातील ३० ते ४० टक्के विद्यार्थी अनुपस्थित राहतात.

समितीने विचारणा केली की, संबंधित अधिकाऱ्याला शो-कॉज नोटीस केव्हा दिलेली आहे? सदर प्रकरण केव्हाचे आहे. संबंधित अधिकाऱ्यावर केव्हा कारवाई केलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, पंचायती राज समिती लातूर जिल्ह्यामध्ये येणार असल्याची तारीख पत्राद्वारे कळल्यावर दिनांक २ ऑगस्ट २०१८ रोजी यासंदर्भातील कार्यवाही केलेली आहे.

याबाबत समितीने मत व्यक्त केले की, हा शासनाचा निधी असून यामध्ये शासनाचे नुकसान झालेले आहे. यासंदर्भात ते वसुलीस पात्र आहे, असे ऑडीट पॅरामध्ये निघाले होते. त्यामुळे ही रक्कम तेव्हाच वसूल करणे आवश्यक होते. तेव्हा रक्कम वसूल न केल्यामुळे पुरवठादाराला पैसे वापरायला मिळाले. त्यामुळे आता ही रक्कम व्याजासह वसूल करावी. सदरची रक्कम वसूल केली नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. ४ वर्षे झाले त्याच्याकडून रक्कम वसूल केलेली नाही. जिल्हा परिषदेकडून आता समिती येणार असल्यामुळे कार्यवाही करण्यात आली आहे. संबंधितावर योग्य ती कार्यवाही केलेली नाही. व त्याला शो-कॉज नोटीस दिलेली नाही. ऑडीट २ महिने चालत असते. तुम्ही पावती दाखवू शकत नसाल तर हे पैसे वसूल करणे आवश्यक होते. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्याने कंत्राटदाराकडून ४ वर्षांपूर्वी रक्कम वसूल केली नाही व कार्यवाही केली नसल्यामुळे कार्यवाही न करणारा संबंधित अधिकारी दोषी आहे. तसेच आता व्याजासह रक्कम वसूल केली नाही, तर तुम्ही दोषी ठरणार आहात आणि कंत्राटदाराने जास्त पैसे घेतल्यामुळे तो देखील दोषी आहे. अशा प्रकारे यामध्ये ३ जण दोषी ठरतात.

समितीने अशी विचारणा केली की, तालुकास्तरावर गटस्तरावर गट शिक्षणाधिकारी / अधीक्षक शालेय पोषण आहार निश्चित केलेल्या प्रकृतीनुसार ठरवून दिलेल्या धान्याची मालाची प्रमाणानुसार परिगणना करण्यात येते व आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या मालाचा शाळानिहाय मागणी पत्रासह पुरवठा धारकास पुरवठा आदेश देण्यात येतो. असे असताना पुरवठादाराने देयकासोबत मालाच्या मागणीचे आदेश जोडलेले नाहीत. त्यामुळे मागणी नसताना पुरवठा झाला आहे काय ? जिल्हा परिषदेकडे ही योजना शालेय पोषण आहाराची हस्तांतरण योजना आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या योजनेसंदर्भात अधिकार देण्यात आलेले आहेत. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात धान्याचा पुरवठा केला जातो. शिक्षण समिती, सर्वसाधारण सभा, स्थायी समिती किंवा अर्थ समितीसमोर या बाबींची सर्व माहिती आली आहे काय ? मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये पैसे जमा झाले म्हणजे जिल्हा परिषदेकडे पैसे जमा झाले असा त्याचा अर्थ होतो काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, पूर्वी पटसंख्येमध्ये घट होत होती. परंतु आता आपण मोहीम आखली असून पटसंख्या वाढण्यासाठी प्रयत्न करीत आहोत.

समितीने विचारणा केली की, शालेय पोषण आहारामध्ये किती विद्यार्थ्यांना आहार दिला जातो, भाजीपाला कुठून मागविला जातो, याबाबतची माहिती स्थायी समितीला आणि शिक्षण समितीच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठेवली जाते काय ? वर्ग मंजुरी घेत असताना जिल्हा परिषदेकडे जाता, तेव्हा त्यांना याबाबतचा हिशोब दिला जातो. परंतु जिल्हा परिषदेला याबाबतचा प्रत्येक महिन्याचा खर्च का दिला जात नाही ? याबाबतची माहिती समितीला दिली पाहिजे ? हा विषय शिक्षण समितीसमोर येतो काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या ठिकाणी गेल्या ४ महिन्यांपासून कार्यरत आहे. तेव्हापासून हा विषय आलेला नाही. समितीने विचारणा केली की, पहिली ते आठवी या वर्गामध्ये शालेय पोषण आहाराचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे आणि त्यांच्याकरिता दर महिन्याला किती धान्य पाठविले जाते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व एचओडीकडून कामकाजाचा आढावा घेतला असेल. तरी देखील उत्तर देण्यास विलंब होत असेल तर हे योग्य नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत ८५१ शाळा आहेत व त्यांची विद्यार्थी संख्या २ लाख १८ हजार ८४१ आहे. उच्च माध्यमिकच्या २८० शाळा आहेत व १ लाख ३५ हजार ७१ विद्यार्थी संख्या आहे. दोन्ही मिळून शाळांची संख्या २ हजार १३७ आहे व एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या ३ लाख ४७ हजार २१२ आहे.

समितीने विचारणा केली की, या ठिकाणी अटी व शर्तीचे उल्लंघन झालेले आहे. शालेय पोषण आहारामध्ये भाजीपाला समाविष्ट केल्याबाबत व आहार चविष्ट असल्याबाबत मुख्याध्यापकाकडून प्रमाणपत्र देण्यात येते असे नमूद केले आहे. यासंदर्भात संबंधित ठिकाणी भेट दिली तर भाजीपाला आढळून येईल काय ? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, खरे सांगायचे तर अशा प्रकारचा भाजीपाला ८० टक्के शाळांमध्ये आढळून येणार नाही. पुढे समितीने विचारणा केली की, अशा शाळांवर कारवाई करणार काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, अशा शाळांवर अचानकपणे कारवाई करण्यात आली आहे. तदनंतर समितीने विचारणा केली की, शालेय पोषण आहारामध्ये भाजीपाला समाविष्ट केल्याबाबत व आहार चविष्ट असल्याबाबत मुख्याध्यापकांकडून प्रमाणपत्र देण्यात येते, परंतु मुख्याध्यापक स्वयंपाक चविष्ट असल्याचे प्रमाणपत्र देतात काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, यासंदर्भात मुख्याध्यापकांकडे बील पाठविले जाते आणि त्यांनी पोषण आहारामध्ये भाजीपाला समाविष्ट केलेला असल्याचे त्यांच्याकडून पत्र घेतले जाते.

त्यावर समितीने मत व्यक्त केले की, आहार तयार झाल्यावर आहार चविष्ट आहे, असे प्रमाणपत्र मुख्याध्यापक देत नाही त्याकरिता आहार व्यवस्था समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. करारनामा व इतर काही तांत्रिक अडचणीच्या बाबीमध्ये विलंब होतो मात्र शालेय पोषण आहारामध्ये खंड न पडता वेळेत पाठविला जातो. तसेच अट क्रमांक १२ अशी आहे की, २० दिवसामध्ये मालाचा टेस्ट रिपोर्ट आला पाहिजे, त्याशिवाय मालाचा वापर केला जात नाही. परंतु या उत्तरातून असे लक्षात येते की, करारनामा, अट क्रमांक १२ ची अंमलबजावणी होत नाही, माल वेळेत येत नाही. २० दिवसांपूर्वी माल आला असता तर तो टेस्टसाठी पाठविला पाहिजे. ज्या मालाचा पुरवठा शाळेत करण्यात आला, त्या मालाचे सॅम्पलचे नमुने घेतले नाहीत आणि ते टेस्टींगसाठी पाठविले जात नाहीत, असे असेल तर समितीला सत्य माहिती द्यावी. प्रत्येक बाबीचे सॅम्पल मुख्याध्यापकाकडे पाहिजे. कोणत्या मालाची खरेदी करायची आहे, तो माल कसा आहे, त्याचे नमुने मुख्याध्यापकाकडे पाहिजे. परंतु मालाचे नमुने मुख्याध्यापकाकडे राहत नाहीत. एका तालुक्यात १०० शाळा असेल तर केवळ एकाच शाळेतील माल किंवा अन्नधान्य टेस्टींगसाठी पाठविले जाते. टेस्ट रिपोर्ट कंत्राटदार स्वतःच आणून देतो.अशी बाब उघडकीस आल्यावर कनिष्ठ किंवा खालील कर्मचाऱ्याला शो-कॉज नोटीस दिली जाते. परंतु अधिकाऱ्यावर काहीच कारवाई होत नाही.

यावर समितीने विचारणा केली की, करारनाम्याची प्रत उपलब्ध आहे काय? प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, सध्या करारनाम्याची प्रत माझ्याकडे उपलब्ध नाही. गट शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरील करारनाम्याची प्रत उपलब्ध आहे. यावर समितीने विचारणा केली की, विभाग प्रमुखांच्या उत्तरातून असे दिसून येते की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागवार आढावा घेतलेला नाही. करारनाम्याची प्रत शाळेमध्ये नाही, हे सिद्ध झालेले आहे. याला कोण जबाबदार आहे ?

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ही जबाबदारी शिक्षण अधिकाऱ्यांची आहे.यावर समितीने विचारणा केली की, याबाबत शो-कॉज नोटीस दिलेली आहे काय ? प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, त्यावर संबंधित मुख्याध्यापकांना शो-कॉज नोटीस देण्यात आलेली आहे, शो-कॉज नोटीस देण्यात आल्याची तारीख समितीला अवगत करण्यात येईल. समितीने अशी विचारणा केली की, गट शिक्षण अधिकारी यांच्या करारनाम्याची प्रत का ठेवण्यात येते. लेखा संहितेची प्रत का ठेवण्यात येत नाही? शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जे धान्य पुरवठादारांकडून शाळांना पुरविण्यात येते त्यावेळी मुख्याध्यापकांकडून माल उतरवून घेतांना सदर मालाचे वजन किती किलो आहे त्याच्या प्रिंटेड पावत्या असतात, त्या प्रिंटेड पावत्यांवर मुख्याध्यापकांची सही घेतली जाते. प्रत्यक्षात माल मोजून दिला जात नाही. प्रत्येक गोणीमध्ये काही किलो माल कमी असतो. असे असताना यामध्ये मुख्याध्यापकांना दोषी ठरविले जाते. ही बाब शिक्षणाधिकारी यांना माहिती आहे काय ? प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी सांगितले की, या संदर्भातील माहिती घेऊन समितीस अवगत करण्यात येईल. समितीने विचारणा केली की, डाळ, तांदूळ इत्यादी साहित्यांच्या पावत्या प्रिंटेड असतात. अशा गोण्यांमध्ये माल कमी असल्यामुळे कंत्राटदारांना दोषी ठरविले पाहिजे. परंतु असे न करता मुख्याध्यापकांना दोषी ठरविण्यात येते. वरच्या पातळीवरून माल कमी येतो. ५० किलोच्या गोणीमध्ये माल कमी असतो ही गंभीर बाब आहे. दोषी कंत्राटदारावर कारवाई करण्यात आली आहे का? प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी सांगितले की, कंत्राटदारांकडून शाळेला धान्यादी मालाचा पुरवठा केला जातो. सदर पावती शाळा स्तरावर गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे ठेवण्यात येते. गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून सर्व जमाखर्चाचा हिशोब शिक्षण विभागाकडे सादर केला जातो. जेवढा माल कमी असतो त्याची नोंद केली जाते. सदर धान्यादी मालाच्या पावत्या गट शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावर ठेवण्यात येते. समितीने विचारणा केली की, करारनाम्यातील १ ते ४५ अटींचे पालन होत नाही. गट शिक्षणाधिकारी माहिती उपलब्ध करून देत नाहीत. त्यांच्याकडे धान्यादी मालाचा पुरवठा केला त्याच्या पावत्या आहेत काय? तसेच करारनाम्याची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय? प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी सांगितले की, गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे करारनाम्याची प्रत उपलब्ध आहे.

समितीने विचारणा केली की, मुख्याध्यापकांकडून शालेय पोषण आहाराची मागणी केंद्र प्रमुखांकडे केली जाऊन त्यांच्याकडून गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली जाते. त्या नंतर पुरवठादारास पुरवठा आदेश दिला जातो. त्यामुळे तालुक्यातील एकत्रित मागणी पुरवठादारास दिली जाते. मालाचा पुरवठा झाल्यावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल असे अटींमध्ये नमूद केले आहे. त्याप्रमाणे एसएमएस केला जातो काय? ठेकेदारांकडून मालाचा पुरवठा नीटपणे झालेला आहे काय? एसएमएस जातात किंवा नाही याची तपासणी करण्यात येते काय ? करारनाम्यातील सर्व अटींची पूर्तता झाली आहे काय ? प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी सांगितले की, पुरवठादाराकडून धान्यादी मालाचा पुरवठा झाल्यानंतर गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्यात येते. समितीने विचारणा केली की, मुख्याध्यापक व शालेय व्यवस्थापन समिती आहे. शालेय व्यवस्थापन समितीकडून एसएमएस केले जातात काय ? शाळा व्यवस्थापन समितीचे सचिव मुख्याध्यापक आहे, कंत्राटदाराकडून मालाचा पुरवठा होताना व माल शाळेत उतरविल्यानंतर तो बरोबर असल्याबाबत मुख्याध्यापकांनी केसबुकवर सही केली पाहिजे. अशा प्रकारे कार्यवाही केली जाते काय ? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले सांगितले की, ८ ते ९ एसएमएस (लघूसंदेश) करून कळविण्यात आले पाहिजे. याबाबत पुढील काळात दक्षता घेण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, नियमाप्रमाणे व अटींप्रमाणे एसएमएस केले आहेत काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, माझ्या माहितीनुसार फोन केले जातात. समितीने विचारणा केली की, करारनाम्यातील अटी प्रमाणे एसएमएस करणे आवश्यक आहे. तरी फोन केला जातो. त्यामुळे करारनाम्यातील अटीचा भंग केला जात आहे. करारनाम्यातील १ ते ४२ अटींचा भंग करण्यात आलेला आहे. यासाठी शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, अधीक्षक, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती हे सर्व जबाबदार आहेत. करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन केले जात नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, एसएमएस पाठविण्यात येतात, परंतु शाळा सुटल्यानंतर पुरवठादारांची गाडी आली तर फोन करण्यात येतो व फोनवरून माहिती देण्यात येते. यापुढे दक्षता घेण्यात येईल.

समितीने निदेश दिले की, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गट स्तरावर कमी जादा पुरवठ्यातील अनियमितता यासंदर्भात शालेय पोषण आहाराच्या करारनाम्यातील १ ते ४२ अटींचे पालन होत नाही. करारनाम्याची प्रत जिल्हा स्तरावर असते. गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक यांच्याकडे करारनाम्याची प्रत असायलाच पाहिजे. शालेय पोषण आहाराचे तालुका स्तरावरील अधिकारी

मुख्याध्यापक आहेत. परंतु यासंदर्भातील माहिती त्यांना दिसत नाही. शालेय पोषण आहारामध्ये भाजीपाला समाविष्ट केल्याबाबत व आहार चविष्ट असल्याबाबत मुख्याध्यापकाकडून प्रमाणपत्र देण्यात येते असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. मुख्याध्यापकांकडून करारनाम्यातील अटींचे पालन होत नाही. जबाबदारी टाळण्याचे हे प्रकार आहेत, काही बाबी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केलेल्या आहेत. शालेय पोषण आहाराबाबत शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक यांनी अट क्रमांक ११ प्रमाणे कार्यवाही केली पाहिजे. लोकांना एसएमएस केले पाहिजेत. शाळा व्यवस्थापन समितीचे सचिव मुख्याध्यापक आहेत. त्यांना या बाबींचे महत्व कळायला पाहिजे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत धान्यादी माल कमी जास्त किती आला त्याचा हिशोब ठेवला पाहिजे. त्यानुसार पेमेंट देण्यात येते. या विषयात शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, लेखाअधिकारी यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण पाहिजे. या प्रकाराबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करावी. या विषयाच्या अनुषंगाने जे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी करून कारवाईसह अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा. तसेच या विषयाबाबत संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धान्यादी माल कमी जास्त किती प्राप्त झाला आहे. त्यानुसार देयक अदा करण्यात येते. यासंदर्भात शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, लेखाधिकारी यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण आवश्यक आहे. तथापि, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत गट स्तरावर कमी जादा पुरवठयातील अनियमितते प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

शासन निर्णय दि.१७/०८/२०१२ अन्वये इ. १ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिने व इ. ६ ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिने युक्त आहारांसाठी अनुक्रमे १०० ग्रॅम व १५० ग्रॅम तांदुळ मागणी करणे अपेक्षित आहे. सदर शासन निर्णयाप्रमाणे प्रति विद्यार्थ्यावर शालेय स्तरावर तांदळाची मागणी करणे व तसा पुरवठा करणे व विद्यार्थी संख्येनुसार धान्यादी मालाची मागणी करणे व त्यानुसार पुरवठा करणे व त्यानुसार देयके अदा करणे असे अपेक्षित असताना लेखा परिक्षण वर्ष सन २०१३-१४ मध्ये औसा गटा अंतर्गत मसूर डाळीचा पुरवठेदाराने प्रत्यक्ष वाटप ६३५८ कि.ग्रॅ. चे केले असताना पुरवठादारास ६५५८ कि.ग्रॅ. चे देयके अदा केल्याचे आढळून आले. त्यानुसार जादा अदा केलेल्या २०० कि.ग्रॅ. मसूर डाळीचे रु. ६८ प्रति किलो या दराने एकूण रु. १३,६०० ची वसूली करण्यात आली आहे. तसेच, ऑगस्ट ते सप्टेंबर २०१३ मध्ये चवळीचा पुरवठा केल्यापेक्षा ४० कि.ग्रॅ. चवळीची जादा अदायगी केल्याचे लेखा परिक्षकाने नमूद केले आहे. प्रत्यक्षात सदर कालावधीत चवळीची मागणी ७५५२ कि.ग्रॅ. असून प्रत्यक्ष पुरवठा ७४१३ कि.ग्रॅ. केला आहे व त्याप्रमाणेच ७४१३ कि.ग्रॅ. च्या देयकाची अदायगी करण्यात आली आहे.

तसेच, करारनामा दि. १/११/२०११ अन्वये मधील अट क्र. ५ नुसार मागणी एवढाच माल पुरविणे आवश्यक असताना जादाचा पुरवठा करून त्यावरील रक्कम रू. १,६५,६०९/- ही जादा अदायगी केलेली आहे असे लेखा परिक्षकाने नमुद केले आहे. तथापि, शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद लातूर या कार्यालयाने उपलब्ध असलेल्या अभिलेखांची पडताळणी केली असता जिल्हयामध्ये जादा पुरवठा केलेल्या धान्यादी मालाचे प्रत्यक्षात वसुल पात्र रक्कम रू. ५९,६९०/- असल्याचे आढळून आली. त्यानुसार सदर रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात आली आहे.

या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद लातूर या कार्यालयाने दि. १२/०७/२०१९ च्या पत्राने कारणे दाखवा नोटीसीने तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्री. यु. एस. कुलकर्णी. तत्कालीन शालेय पोषण आहार अधीक्षक श्री. होळकर, तत्कालीन लेखा अधिकारी श्री. जाधव यांना शालेय पोषण आहार अंतर्गत गटस्तरावर कमी/जादा पुरवठयातील अनियमितते बाबत खुलासा मागविलेला आहे. संबंधितांचा खुलासा प्राप्त झाला असून संबंधितास पुढे कामकाजामध्ये असा दुर्लक्षित पणा अथवा चुक करणार नाही याची सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :-**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय:—**जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष :-

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शालेय पोषण आहार योजनेतील गट स्तरावरील पुरवठ्यातील अनियमितता. जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शिक्षण विभाग सहमत आहे काय? सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, जेवढा पुरवठा झाला त्यापेक्षा जास्त रक्कम अदा केली, एका प्रकरणात जेवढा पुरवठा झाला तेवढीच रक्कम दिली असून दुसऱ्या प्रकरणात अधिकची रक्कम परत घेण्यात आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकची माहिती विदित केली की, लेखा परिक्षण सन २०१३-१४ मध्ये दोन आक्षेप होते. मसूर डाळीचा पुरवठा २०० कि.ग्रॅ जास्त झाला. या बाबत १३,६०० रुपयांची वसुली केली. चवळीकरिता अधिकची रक्कम देण्यात आली. मात्र जेवढा पुरवठा झाला तेवढीच रक्कम अदा करण्यात आल्यामुळे वसुली केली नाही.

समितीने विचारणा केली की, विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. मालाच्या वजनामध्ये बरीच तफावत असते. तसेच त्या मालाची गुणवत्ताही नसते. तरी देखील या प्रकरणात केवळ ताकीद देण्यात आली आहे. वजनामध्ये व गुणवत्तेमध्ये फरक असताना केवळ ताकीद देणे योग्य नाही. यासंदर्भात संबंधितावर कारवाई करण्यात आली आहे काय? सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, किती आहार लागणार आहे याचा अंदाज घेऊन पुरवठादाराला ऑर्डर द्यायची असते. कधी मुले कमी उपस्थित असतात यामुळे कमी-जास्त होऊ शकते. ही मोठी चूक नाही. ऑर्डर दिली त्यापेक्षा जास्त पेमेंट केले तर ती चूक होऊ शकते. समितीने विचारणा केली की, विद्यार्थी संख्येनुसारच ऑर्डर दिली जाते. यामुळे संख्या कमी जास्त होण्याचा प्रश्नच येत नाही. सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, मुलांच्या पटसंख्येनुसार ऑर्डर दिली जाते. समितीने शालेय शिक्षण विभाग यांना विचारणा केली की, पुरवठा पेक्षा जास्त रक्कम अदा केली आहे. ती रक्कम वसूल झाली आहे. ग्रामीण भागात शालेय पोषण आहार काळया बाजारात विकला जातो. उरलेले धान्य असल्याने पुरवठादार कमी देतो व रक्कम तेवढीच घेतो. काही वेळा ते धान्य दिले असे दाखवून ते काळ्या बाजारात विकले जाते. असे होऊ नये याकरिता विभागाकडून नवीन सूचना देणार आहात काय ? सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, तांदूळ काळया बाजारात विकला जातो याचे कारण त्याची गरजेपेक्षा जास्त ऑर्डर दिली जाते. लहान मुलाकरिता १०० ग्रॅ. व मोठया मुलांसाठी १५० ग्रॅ. तांदूळ घेतला जातो. मुले तेवढा आहार घेत नाहीत यामुळे तो काळया बाजारात जातो. यामुळे विभागाने सूचना दिली आहे की, जेवढा लागेल तेवढयाच मालाची ऑर्डर द्या. साठा शिल्लक असल्यास तेवढी कमी करून पुढील ऑर्डर द्यावी.

समितीने विचारणा केली की, धान्याचे क्रॉस चेकींग केले पाहिजे. अनेक ठिकाणी माल उतरवून घेताना वजन केले जात नाही. १ किलो ऐवजी ९०० ग्रॅ. वजन असते. असे होऊ नये. या बाबत कडक अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात राज्यात एक सर्क्युलर (परिपत्रक) निर्गमीत करण्यात यावे.

सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, मालाचा ट्रक आल्यानंतर माल घेताना रजिस्टरमध्ये नोंद केली पाहिजे. त्यासाठी तेथे डिजीटल वजन काटा असणे अनिवार्य केले आहे. त्यांनी वजन काटा ठेवला नाही तर दंड देखील लावण्यात येईल. समितीने विचारणा केली की, मुख्याध्यापक किंवा गावातील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्या समोर माल घेऊन त्याची नोंद झाली पाहिजे. असेही काटे पकडले आहे की, ज्यामध्ये ॲडजेस्टमेंट केलेली असते. बऱ्याच ठिकाणी सबकाँट्रॅक्टर नियुक्त केले आहेत. यामध्ये सुधारणा करता येईल. जिल्हा स्तरावर कंत्राट देण्याचा शासन स्तरावर निर्णय घेता येईल. ४-५ जिल्ह्यांचा एकच कंत्राटदार नियुक्त केल्यावर तो प्रत्येक जिल्ह्यासाठी त्याचा एक सबकाँट्रॅक्टर नियुक्त करतो. सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की,त्यांनी वजन काट्यामध्ये काही बदल केला आहे असे आढळून आले तर ती गंभीर बाब असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

लातूर जिल्हा परिषदेतील सन २०१३-२०१४ या वर्षाच्या शालेय पोषण आहार या योजनेअंतर्गतच्या संदर्भातील लेखा परिक्षणाच्या अभिप्रायांची तपासणी केली असता समितीच्या निदर्शनास आले की, शालेय पोषण आहार करारनाम्यातील अट क्र. ५ नुसार मालाचा पुरवठा शाळानिहाय मागणी पत्रकानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात पुरवठा करणे बंधनकारक असताना पुरवठाधारक महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कन्झुमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांनी करारातील अटीचा भंग करून रूपये १,६५,६०९/- इतक्या जादा रकमेचा धान्य पुरवठा केलेला आहे. तसेच सन २०१३-१४ मध्ये तालुका औसा गटाअंतर्गत मसूर डाळ पुरवठादाराने प्रत्यक्ष पुरवठा ६३५८ कि.ग्रॅ. केला असताना ६५५८ कि. ग्रॅ. ची देयके अदा केलेली आहेत म्हणजेच २०० कि. ग्रॅ. कमी मसूर डाळ प्राप्त झालेली असताना त्याचीही  देयके अदा करण्यात आलेली आहेत.

वास्तविक इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक, १२ ग्रॅम प्रथिने व इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक, २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारांसाठी अनुक्रमे १०० ग्रॅम व १५० ग्रॅम तांदुळाची मागणी करणे अपेक्षित असताना, लातूर जिल्ह्यात पंचायत समिती स्तरावर मुख्यध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती, केंद्र प्रमुख, अधीक्षक (शा.पो.आ.), गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी(प्राथमिक) व लेखाधिकारी (शा.पो.आ.) यांच्यात सहनियंत्रण व समन्वय नसल्याने धान्यादी माल व तांदुळाच्या साठ्याचा वेळोवेळी आढावा न घेता मागणी केल्यामुळे पुरवठा धारकाच्या सोयीनुसार पुरवठा करण्यात येत असल्याने गटस्तरावर कमी व जादा प्रमाणात पुरवठ्यातील अनियमितता होत आहे. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मालाचा पुरवठा शाळानिहाय पत्रकानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात करणे बंधनकारक असताना जादा व कमी प्रमाणात पुरवठा केलेल्या प्रकरणांची चौकशी करून कारवाई करण्याचे निदेश समितीने दिले.

त्यानुषंगाने करारनाम्यातील अट भंग करून जिल्हयातील गटस्तरावरून मागणी करण्यात आलेल्या मालापेक्षा अधिकचा पुरवठा केलेल्या संबंधित पुरवठादाराकडून रूपये ५९,६९०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली . तसेच कमी पुरवठा करण्यात आलेल्या २०० कि.ग्रॅ. मसुर डाळीचे रू.६८ प्रति किलो या दराने एकूण रू. १३,६००/- इतकी रक्कम संबंधित पुरवठादाराकडून वसूल करण्यात आली. सदरहू रक्कमा चलनाद्वारे शासन खाती भरणा करण्यात आलेल्या आहेत.

**शालेय विद्यार्थ्यांना भाजीपाला समाविष्ट असलेला चविष्ट पोषण आहार व आठवड्यातुन एक दिवस फळे, दुध, सोया बिस्किटे, राजगीरा लाडु व गुळ शेंगदाणे यांचा समाविष्ट असलेला पूरक आहार नियमित व व्यवस्थितरित्या मिळण्यासाठी शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने तालुकास्तरावर गट शिक्षणाधिकारी व शालेय पोषण आहार अधीक्षक यांनी निश्चित केलेल्या पाककृतीनुसार ठरवून दिलेल्या धान्याच्या प्रमाणानुसार परिगणना करून आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या मालाचा शाळानिहाय मागणी पत्रानुसार पुरवठाधारकास पुरवठा आदेश द्यावा. यासाठी आवश्यक असलेले प्रत्येक महिन्यात पटसंख्या निश्चित केल्याचे अभिलेखे व त्यानुसार योजनेचे आहाराचे वाटप केल्याची संचिका/लेखे, साठानोंदवही व चव रजिस्टर इत्यादी अद्ययावत ठेवावेत. तसेच धान्यादी माल व तांदुळ पुरवठा यामध्ये नियमितता राहण्यासाठी मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती, केंद्रप्रमुख, अधीक्षक (शा.पो.आ.), गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व लेखाधिकारी (शा.पो.आ.) यांच्यात सहनियंत्रण व समन्वय ठेवणे आवश्यक असताना या जिल्हा परिषदेत असा समन्वय उपरोक्त अधिकारी यांनी ठेवलेला दिसून येत नाही.**

**लेखा आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक १२ ग्रॅम प्रथिनेनुसार आहार वाटप तसेच ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार वाटप करण्याबाबतचे पंचायत समिती स्तरावरील प्रत्येक महिन्यात पटसंख्या निश्चीत केल्याचे अभिलेखे व त्यानुसार आहार वाटप केल्याच्या संचिका लेखा परिक्षणास उपलब्ध केल्या नाहीत. जिल्हा परिषदेने लेखी माहिती उक्त लेखा संचिका लेखे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत असे या योजनेच्या अंमलबजावणी करण्याऱ्या अधिकाऱ्यांनी समिती समोर लेखी स्वरूपात माहिती पाठविणे हे अत्यंत दुर्दैवी आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. सदरची योजना राबविणारे शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (विस्तार) इत्यादी अधिकारी यांना ही योजना राबविण्यात काहीही स्वारस्य नाही हे दिसून येते. नोंदवह्या, लेखे संचिका इत्यादी अद्यायवत नसणे हे गंभीर आहे. लेखा आक्षेपात आक्षेप नमुद असूनही जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांने लेखे संचिका अवलोकनार्थ पाठविण्यात येत आहे. हे त्यांनी केलेल्या कर्तव्यात कसूर याचे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे या प्रकरणी ज्यांनी लेखे/संचिका वेळेत तयार केल्या नाहीत अशा कर्मचाऱ्याविरूद्ध तसेच ज्यांनी असे लेखे संचिका समितीच्या भेटीच्या वेळी अवलोकनार्थ पाठविण्यात येत आहेत असे नमूद केलेल्या अधिकाऱ्यांविरूद्ध त्यांनी अहवाल वर्षात राबविलेल्या या योजनेबाबत फेर आढावा घेऊन जी उदासीनता दाखविली अशा अधिकारी कर्मचारी यांचे विरूध्द नैसर्गिक न्याय तत्वाचा वापर करून चौकशी करावी आणि दोषीतांविरूद्ध कठोर कारवाई करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच शालेय पोषण आहाराचा धान्यादी माल व तांदुळ काळ्या बाजारात विकला जाऊ नये यासाठी विद्यार्थी ज्या प्रमाणात आहार घेतात त्यानुसार जेवढा लागेल तेवढ्याच मालाची मागणी करावी व साठा शिल्लक असल्यास तेवढा कमी करून पुढील मागणी करावी. तसेच शाळेचे मुख्याध्यापक/शिक्षक व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/**

सदस्य यांच्या उपस्थितीत डिजीटल वजन काट्यावर वजन करून मालाचा दर्जा व्यवस्थित असल्याची खात्री करून पोहोच पावतीवर तसे स्पष्ट नमूद करण्यासह शाळेच्या नोंदवहीवर प्राप्त मालाची नोंद करण्यात यावी. त्याचप्रमाणे माल पुरवठा करण्यासाठी उप कंत्राटदाराची नियुक्ती न करता प्रत्येक जिल्हानिहाय वेगवेगळा कंत्राटदार नेमण्यात यावा. या कार्यपद्धतीनुसार कामकाज होण्यासाठी विभागाने शासन निर्णय घेऊन त्वरीत परिपत्रक निर्गमित करण्यात यावे.

तसेच सचिवांनी साक्षीच्या वेळी विदित केल्याप्रमाणे कंत्राटदाराने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने डिजीटल वजन काट्यामध्ये वजन कमी करण्याच्या दृष्टीने फेरफार केल्यास संबंधीत दोषी व्यक्तीविरूद्ध तात्काळ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवून सदर वजन काटा जप्त करून त्यातील तथ्य शोधून काढून संबंधीतांवर कडक स्वरूपाची कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, लातूर

### जिल्हा परिषदेच्या तांत्रिक शाखा, बजेट शाखा व लेखा शाखा आणि वित्त विभागाचे अभिप्राय घेतलेले नसताना कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता देवून दायित्व निर्माण केल्याबाबत.

**परिच्छेद क्रमांक ३.४६६ (सन २०१३-१४)**

जिल्हा परिषद लातूर, सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक -२) जिल्हा परिषद लातूर बांधकाम विभागाच्या सन २०१३-१४ चे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेमध्ये जिल्हा वार्षीक योजनेअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये रक्कम रुपये १७१२.१५ लक्षाच्या एकूण १६५ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. याच कामातील रक्कम रुपये २८२/- लक्षाच्या एकुण ५७ कामांना कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी कोणतीही नस्ती, टिप्पणी, वित्त विभागाचे अभिप्राय, निर्माण होणारे दायित्व, कामाची गरज न पाहता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १०० नुसार नवीन कामास प्रशासकीय मान्यता देताना विभाग प्रमुख यांनी संबंधित प्रस्ताव कलम १२५ अन्वये सक्षम असणा-या प्राधिका-यापुढे मांडण्यात येईल. परंतु प्रस्ताव मांडण्यापूर्वी वित्त विभागाची सहमती घेणे ही विभाग प्रमुखाची जबाबदारी राहील. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी रुपये २८२/- लक्ष रकमेची एकुण ५७ कामे वित्त विभागाचा अभिप्राय न घेता प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत. यासाठी कार्यकारी अभियंता जबाबदार आहेत.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५२ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यानी प्रारंभिक निवेदन, अदमासे अंदाज, प्रारंभिक नकाशे, जागेबद्दल माहिती, प्रस्तावाची कारणे व कामाची मागणी, असे कोणतीही अभिलेखे नसताना कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत.

(३) कार्यकारी अभियंता, यांनी बांधकाम विभागातील तांत्रिक शाखा, बजेट शाखा, लेखा शाखा यांचे अभिप्राय घेणे आवश्यक असताना तसे न घेता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत.

(४) कार्यकारी अभियंता, यांनी विषय समिती/स्थायी समिती/जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता विविध विकास कामांना मंजूरी दिलेली आहे.

(५) कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समिती/स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(६) कार्यकारी अभियंता यांनी ५७ कामास प्रशासकीय मान्यता दिल्यामुळे मंजूर तरतूदीपेक्षा रक्कम रुपये ९५३.८६ लक्ष एवढे दायित्व निर्माण केलेले आहे.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८, चे नियम १०६ (क) नुसार पुर्वीचे दायित्व संपल्या खेरीज नविन दायित्व निर्माण करू नये असे स्पष्ट निर्देश असतानाही कार्यकारी अभियंता यांनी नवीन दायित्व निर्माण केले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १०१ (१) नुसार कोणत्याही बांधकामाच्या अंमलबजावणीची कार्यवाही करतांना मागितलेली सर्व रक्कम एका वर्षात पुरविणे शक्य होईल का या संबंधी विचार करणे आवश्यक आहे. निधीच्या अभावी संपूर्ण रक्कम एका वर्षात देणे शक्य होणार नसेल तर प्रत्येक वर्षात पार पाडावयाच्या बाबींचा कार्यक्रम निश्चित करून कार्यक्रम निश्चित करतांना अंमलबजावणी करावयाच्या बाबींना नुकसान पोहचणार नाही आणि त्यावर खर्च केलेली रक्कम वाया जाणार नाही याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच उपनियम (२) अन्वये मागील वर्षाच्या अखेरीस असलेले दायित्व पुर्ण करण्यासाठी पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे. परंतु असा कार्यक्रम निश्चीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे दिनांक

३१/०३/२०१४ अखेर ९५३.८६ लक्ष इतके दायित्व शिल्लक आहे. एकुण ५७ कामाच्या बाबतीत बांधकाम विभागाच्या अधिनस्त तांत्रिक शाखा, बजेट शाखा व लेखा शाखा यांचे अभिप्राय न घेता, वित्तीय परिणामाबद्दल वित्त विभागाचा सल्ला न घेता, प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची माहिती विषय समिती/स्थायी समिती/सर्वसाधारण समिती यांच्यासमोर न ठेवता कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता देवून दायित्व वाढविलेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चति होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद लातूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण योजने अंतर्गत रक्कम रूपये २८२.०० लक्ष च्या एकूण ५७ कामांना प्रशासकीय मान्यता देताना अनियमीतता झालेली असल्याने संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या संदर्भात जिल्हा परिषदेने शासनास आरोप पत्र या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिपला / बांधकाम / साप्रवि / कार्या८ / जिवायो / सीआर१६ / कावि७१८ / २०१४ दिनांक ७ /०७ /२०१४ अन्वये सादर केलेले आहेत. या प्रकरणी निगडीत व संबंधित अभियंत्यावर प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच शासनाने संदर्भीय आरोप संदर्भात शासन पत्र क्र.९२/१४-१५/प्र.क्र.सेवा-६/(बां) सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक ११/०५/२०१८ नूसार शासनाकडून काही बाबीचे त्रुटीसह स्पष्टीकरण मागविण्यात आलेले होते. जिल्हा परिषदेने शासनास स्पष्टीकरण सादर केले आहे. तसेच त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपला / बांधकाम / कार्या ३ / सीआर / कावि-८० / २०१६ दिनांक ०२/०६/२०१६ नुसार संबंधीतावर आरोप पत्रे दाखल केले आहेत.

(२) वरिलप्रमाणे अनियमिततेबाबत शासनास कार्यवाहीची शिफारस करण्यात आली आहे.

(३) वरिलप्रमाणे अनियमिततेबाबत शासनास कार्यवाहीची शिफारस करण्यात आली आहे.

(४) भविष्यात अशा प्रकारची कार्यवाही न होणे बाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(५) अनुक्रमांक ४ नुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे भविष्यात दक्षता घेण्यात येईल.

(६) दायित्व जास्त झाल्याने संबंधीतावर शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात आलेली आहे.

(७) अनियमितता झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून शासनास कार्यवाहीची शिफारस करण्यात आली आहे.

(८) परिच्छेदात नमूद केल्यानुसार संबंधितावर योग्य त्या प्रशासकीय कार्यवाहीस्तव प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. शासनाकडून अहवाल प्राप्त होताच संबंधितावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने शासनाकडे चौकशीच्या प्रस्तावाचा पाठपुरावा केव्हा केला, शासनाकडून प्रस्तावामध्ये कोणत्या त्रुटी दर्शविण्यात आल्या आहेत. दिनांक १७/७/२०१४ ते ११/५/२०१८ पर्यंत शासन स्तरावर प्रशासकीय कार्यवाहीचा प्रस्ताव कोणाकडे प्रलंबित होता ? पाच वर्षाच्या कालावधीत संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. १ ते ४ आरोपपत्र दिनांक १७/७/२०१४ रोजी ठेवण्यात आले आहेत. त्यानंतर शासनाकडून दिनांक ११/५/२०१८ रोजी काही त्रुटीवर स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेने दिनांक ९/७/२०१८ रोजी स्पष्टीकरण शासनाकडे सादर केले आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, रस्ता मजबुतीकरणासाठी वार्षिक योजनेचा निधी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाला होता. या कामांना जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यता दिली होती. वित्तीय मान्यता जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता बांधकाम यांची आहे. तांत्रिक मंजुरीसह प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार त्यांना दिले आहेत. १० लक्ष रुपयांपर्यंतचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले होते. वाढीव रकमेसाठी संमती का घेण्यात आली नाही. वित्तीय अधिकाऱ्यांनी देयक देतांना आक्षेप का घेतला नाही. कार्यकारी अभियंत्यांवर कारवाईची शिफारस केली आहे, मात्र मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी देयक देताना

सर्व बाबी का तपासल्या नाहीत? जिल्हाधिकाऱ्यांनी, डीपीसीने बजेट मंजूर केले. मग वित्तीय संमती त्यांची असली पाहिजे. प्रशासकीय मान्यता त्यांचीच पाहिजे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची वित्तीय संमतीची काय गरज आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांनी ५-५ लाख रुपयांच्या कामांना चुकीच्या प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत. त्यांनी २.८२ कोटी रुपयांच्या ५७ कामांना आपल्या स्तरावर बांधकाम समिती व इतर समित्यांची परवानगी न घेता प्रशासकीय मान्यता दिली आहे. यावर समितीने असा प्रश्न विचारला की, नियोजनाला कोणाची परवानगी घेतली, कामे कोणी मंजूर केली? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, कामे स्वतः कार्यकारी अभियंता यांनी मंजूर केली. समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियत्यांनी १० लाख रुपयांपर्यंतची प्रशासकीय मान्यता दिली पण नियोजन कोणी मंजूर केले? यामध्ये सर्वात जास्त जबाबदार मुख्य लेखा व वित्त अधिकारी आहेत. सहायक लेखाधिकाऱ्यांनी शिफारस कशी केली, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी देयके कशी काढली, फक्त कार्यकारी अभियंत्यांवर का कारवाई करण्यात आली आहे इतरांवर का कारवाई करण्यात आली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, कार्यकारी अभियंत्यांनी आपल्या स्तरावर कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. कामे झाली आहेत हे पाहून, एमबी पाहून देयके काढली आहेत. मात्र नंतर लक्षात आले की, तत्कालीन ३ सदस्यांच्या टीमने सखोल चौकशी केली. त्यावेळी निष्पन्न झाले की, कोणतीही परवानगी न घेता कार्यकारी अभियंत्यांनी आपल्या स्तरावर ५७ कामांना परस्पर प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत. यावर समितीने विचारणा केली की, पेमेंट कोणी दिले आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, पेमेंट मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दिले आहे. समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे वित्तीय सल्लागार मुख्य लेखा व वित्त अधिकारी आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी आक्षेप का घेतला नाही, देयके वित्त विभागाने दिली? कार्यकारी अभियंत्यांनी देयके पास केली वित्त विभागाने त्यांच्या अधिकाराचा वापर का केला नाही, सर्व बाबी न तपासता देयके कशी दिली ?

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, एमबीसहित देयके सादर झाल्यानंतर एमबीमध्ये फक्त प्रशासकीय मान्यता पाहिली गेली. निवडलेल्या कामांना कोणाचीही परवानगी नव्हती. त्यामुळे हा मुद्दा सर्वसाधारण सभेत आला होता. कार्यकारी अभियंत्यांनी स्वतः कामांना प्रशासकीय मान्यता दिली. सद्या ते कार्यकारी अभियंता म्हणून औरंगाबादला कार्यरत आहेत. त्यांना बोलाविले होते, मात्र ते आलेले नाहीत, त्यांना फोन केला होता, मात्र त्यांनी फोनही उचलला नाही. समितीने अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता देताना रेफरन्स काय दिला होता, कोणाच्या आदेशाचा रेफरन्स आहे? सदर कामामध्ये अनियमितता झाली आहे, भ्रष्टाचार झाला आहे हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केले आहे. हे प्रकरण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सन २०१६ ला गेले आहे. विभागीय आयुक्त कार्यालय व ग्रामविकास विभाग यांनी त्या संदर्भात काय पाठपुरावा केला आहे? कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) यांनी समितीस खुलासा केला की, सध्या कागदपत्रे आणलेली नाहीत. समितीने विचारणा केली की, त्या कार्यकारी अभियंत्यांनी कोणता संदर्भ देऊन मान्यता दिली आहे आणि यादी कोणी मंजूर केली आहे ? ९ कोटी ५६ लाख रुपयांचे दायित्व कसे निर्माण केले आहे. कामे केलेली नाहीत, अनियमितता झालेली आहे. सदर प्रकरणी कोणी चौकशी केली आहे काय? चुकीच्या प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत. यासंदर्भात ग्रामविकास विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हा परिषद यांनी काय पाठपुरावा केला आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी फक्त प्रशासकीय मान्यता पाहून चुकीची देयके दिली आहेत. ऑडिट पॅरा आल्यानंतर गेल्या ५ वर्षांत कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांच्या विरुध्द चौकशी प्रस्तावित केली होती. उप अभियंत्यांच्या कामांबाबत प्राथमिक चौकशी दिनांक १०जुलै २०१४ ला केली होती. त्यांच्या विरोधात ज्ञापन निर्गमित केले आहे. काही ठिकाणी कामे केलेली दिसून आलेली नाहीत, काम असमाधानकारक आहे, प्रस्तावित जागेवर रस्ता केल्याचे दिसून येत नाही, काम समाधानकारक नाही, असा प्रत्येक कामाच्या संदर्भात शेरा आहे. ४० प्रकरणांची चौकशी करून अहवाल दिलेला आहे. श्री.आताळे, शाखा अभियंता, श्री.चौधरी, कार्यकारी अभियंता यांच्या विरुध्द ज्ञापन काढले आहे. चौकशीमध्ये काही बाबी निदर्शनास आल्याचे सांगितले आहे. तीन कामे न करता मूल्यांकन करून त्यांची देयके देण्यात आली आहेत. पाच कामे प्रस्तावित ठिकाणी न करता इतरत्र केल्याचे दिसून येते, कार्यालय प्रमुख श्री.चौधरी यांनी शासनाचे कोणतेही निकष न पाळता पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी यांना अंधारात ठेवून नियमबाह्य कामांच्या मंजुऱ्या दिल्याचे सिध्द होते. सदरील प्रकरणांत कार्यालयाचे तसेच क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी गुंतलेले दिसून येतात, या कामासाठी कोणत्याही पदाधिकाऱ्यांची शिफारस असल्याचे दिसून आले नाही, वित्त विभाग, जिल्हा परिषद यांनी सदरील कामांवर वित्तीय नियंत्रण ठेवावयास पाहिजे होते, ते तसे ठेवू शकलेले नाहीत, असे ठपके ठेवले आहेत. चौकशी पथकाला ७ कामे केल्याचे आढळून आले नाही त्याची प्रत्येकी किंमत ५ लाख रुपये होती. सर्वांच्या विरोधात आरोपपत्र देखील दाखल केले आहे. श्री.चौधरी यांनी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत व बांधकाम समितीच्या बैठकीत सन

२०१३-१४ ची प्रत्यक्षात १६२ कामे मंजूर असताना जाणीवपूर्वक १०८ कामांचा उल्लेख करून २७ कामांना सभागृहासमोर आणले नाही, असा त्यांच्यावर ठपका ठेवला आहे. असे ठपके ठेवून सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे हे प्रकरण दिनांक १० जुलै २०१४ ला जिल्हा परिषदेकडून पाठविण्यात आले आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ती प्राथमिक चौकशी आहे. दिनांक १७ जुलै २०१४ ला श्री. चौधरी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केली होती. सर्वांची संयुक्त चौकशी करावी, असे शासनाने म्हटले आहे. ६ आरोपी होते. दिनांक २ जून २०१६ ला ६ जणांचा चौकशी अहवाल पाठविला आहे. शासनाचे दिनांक ११ मे २०१८ ला पत्र येऊन त्यांनी त्या संदर्भात काही त्रुटी पाठविल्या आहेत. आम्ही त्या त्रुटींची पूर्तता करून दिनांक ९ जुलै २०१८ ला हे प्रकरण पुन्हा मंत्रालयात पाठविले आहे. समितीने विचारणा केले की, अजून ती चौकशी सुरु झाली नाही का? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, चौकशी सुरु आहे, शासनाला त्रुटींची उत्तरे पाठविली आहेत. विभागीय आयुक्तांकडून श्री.आताळे, शाखा अभियंता यांची विभागीय चौकशी झाली होती. मात्र त्यामध्ये त्यांना निर्दोष सोडले होते. आम्ही तत्संदर्भात समाधानी नव्हतो म्हणून त्यांच्या संदर्भातील प्रकरण मंत्रालयात पाठविले आहे. यावर समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता सध्या कोणत्या पदावर कार्यरत आहेत? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सध्या ते औरंगाबादला क्वॉलिटी कंट्रोलमध्ये कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहेत, त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, मंत्रालयातील अधिकारी व जिल्हा परिषदेतील अधिकारी यांचे साटेलोटे आहे. मंत्रालयीन स्तरावरील संयुक्त चौकशीमध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची चौकशी का केली नाही ? तांत्रिक शाखा, लेखा शाखा, बजेट शाखा यांचे अभिप्राय घेणे आवश्यक होते, कारण देयके देण्याच्या वेळी त्यांच्याकडे देयके गेली आहेत. गंभीर बाब अशी की, सर्वांवर आरोप केल्यानंतरही सहायक आयुक्त, चौकशी, औरंगाबाद यांच्या चौकशीच्या निष्कर्षामध्ये आर्थिक अनियमितता करणे, प्रशासनाला खोटी माहिती देऊन प्रशासनाची दिशाभूल करणे इत्यादी बाबींवरील दोष सिध्द होऊ शकला नाही असे अहवालात नमूद केले आहेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, ६ जणांपैकी ३ जणांची विभागीय चौकशी विभागीय आयुक्त स्तरावर होती, इतरांची विभागीय चौकशी मंत्रालयात होती. समितीने विचारणा केली की, विभागीय चौकशी संबंधिताना वाचविण्यासाठी केली जाते. त्या अगोदर कारवाई का केली नाही, त्यांना निलंबित केले पाहिजे होते, अनियमितता असल्यामुळे एफआयआर दाखल केला पाहिजे होता. एफआयआर दाखल केल्यानंतर न्यायालयात प्रकरण चालले असते. एफआयआर दाखल झाल्यावर वसुली करता आली असती. सर्व प्रोव्हिजन असताना फक्त विभागीय चौकशीच का केली? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, आम्ही समाधानी नव्हतो म्हणून पुन्हा विभागीय चौकशी केली आहे. समितीने विचारणा केली की, विभागीय चौकशी करणारे औरंगाबादचे तत्कालीन विभागीय आयुक्त कोण होते? उपायुक्त, आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी समितीस विदित केले की, तत्कालीन विभागीय चौकशीची कार्यवाही सहायक आयुक्त श्री. कौस्तुडीकर यांनी केली होती.

समितीने अशी विचारणा केली की, ४ शासन निर्णयांचा संदर्भ देऊन प्रशासकीय मान्यता दिली आहे. बजेट ॲलोकेशन डीपीसीने केले आहे. देयक कसे काढले हा आक्षेप आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी डीपीसीच्या आधारे नियोजन दिले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी देयक काढताना अभिलेखे, कागदपत्रे बरोबर जोडली नाहीत हे का पाहिले नाही? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, देयक काढताना जोडलेल्या बाबीच पाहिल्या असतील आणि एमबी पाहून देयक काढले असेल. समितीने अशी विचारणा केली की, यादी कोणी मंजूर केली, जिल्हाधिकाऱ्यांचा संदर्भ काय आहे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, यादी मंजूरच केली नाही, जिल्हाधिकाऱ्यांचा संदर्भही नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी निधी दिला. बांधकाम समितीची परवानगी न घेता यादी केली.

समितीने विचारणा केली की, हे सन २०१३-१४ चे काम आहे. ९ कोटी ५३ लाख रुपयांची अफरातफर झाली आहे. कार्यकारी अभियंत्यांपासून मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण जबाबदार आहेत. उप विभागीय कार्यालय, विभागीय कार्यालय व वित्त विभाग सुध्दा जबाबदार आहेत. त्यांच्याकडे देयके गेली, त्यांची जबाबदारी होती, त्यांनी देयके तपासले पाहिजे होते, त्यांनी तपासणी न करता देयके पास केली, त्यामुळे हे सर्व लोक जबाबदार आहेत, त्यांच्यावर जबाबदारी निश्चिंत करून कार्यवाही करण्यात आली आहे काय? उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, वर्ग-१ चे पद आहे. विभागीय चौकशीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने त्रुटी काढल्या आहेत.

त्यावर समितीने सूचना केली की, सदरहू प्रकरण हे सन २०१३-१४ चे आहे. सदर प्रकरणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे, मात्र मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्यांनी सन २०१४ पासून सन २०१८ पर्यंत याबाबत काहीच कार्यवाही केलेली नाही. फक्त त्रुटी पाठविल्या आहेत. सन २०१४ ला प्रस्ताव दिला आहे आणि त्याचे त्रुटीपत्र सन २०१८ ला येत आहे, सदरहू प्रकरणी आयुक्त

कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. एवढे गंभीर आरोप असताना देखील त्यांना सदरहू चौकशीमधून दोषमुक्त का करण्यात आलेले आहे? सदर प्रकरणी जिल्हा परिषदेने कोणत्याही अधिकाराचा वापर केला नाही. तसेच सदर प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे, असे आताचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केलेले आहे. सदरहू प्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दोषी अधिकाऱ्यावर कारवाई का केलेली नाही? याचा अर्थ तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी हे संबंधित अधिकाऱ्याला पाठीशी घालत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर देखील कारवाई होणे आवश्यक आहे.

समितीने असे निदेश दिले की, तांत्रिक शाखा, बजेट शाखा,लेखा शाखा यांचे अभिप्राय घेतलेले नसताना, तसेच वित्त विभागाचे अभिप्राय घेतले नसताना कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता देवून दायित्व निर्माण केले आहे. सदर प्रकरण हे सन २०१३-१४ चे आहे. सदरहू कामामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे, हे सिद्ध झालेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद लातूरमार्फत संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीमध्ये दोषारोप सिद्ध झालेले आहेत. सदरहू चौकशीनंतर संबंधित कार्यकारी अभियंता यांना दोषमुक्त करण्यासंदर्भात आयुक्त कार्यालयाचा अभिप्राय प्राप्त झालेला आहे. यामध्ये एकूण १५० प्रकरणे आहेत. संबंधित अधिकाऱ्यावर दोषारोप निश्चित केले असताना देखील त्या अधिकाऱ्याला दोषमुक्त करणे ही गंभीर बाब आहे. सदरहू प्रकरणी प्रत्यक्षदर्शनी असे दिसून येते की, कार्यकारी अभियंता यांना दोषी धरुन अन्य अधिकाऱ्यांना पाठीशी घातलेले आहे. सदरहू प्रकरण गंभीर असून सदर प्रकरणाची फेर चौकशी करण्यात यावी. सदर चौकशीमध्ये दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून चौकशीच्या अहवालासह कारवाईचा अहवाल एका महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा, तसेच सदरहू प्रकरणी विभागीय आयुक्त, वित्त विभागाचे प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रधान सचिव आणि ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव यांची साक्ष घेण्यात येईल तसेच आजच्या बैठकीसाठी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना उपस्थित राहण्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र व्यवहार केला होता. तसेच त्यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क देखील केला होता, मात्र संबंधित कार्यकारी अभियंता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा फोन घेतला नाही. समितीची परवानगी न घेता ते समितीच्या बैठकीस अनुपस्थित राहिले आहेत. एका जबाबदार अधिकाऱ्याचे अशा प्रकारचे वर्तन म्हणजे समितीचा अवमान आहे. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीची नोंद समितीने गांभिर्याने घेतलेली आहे. आजच्या बैठकीची संबंधित अधिकाऱ्याला पूर्व सूचना देऊन देखील ते समितीसमोर उपस्थित नसल्यामुळे त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई करण्यात यावी. त्यांची अनुपस्थिती व त्याबाबत समितीने घेतलेली गंभीर नोंद याचा उल्लेख त्यांच्या चौकशी अहवालामध्ये करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

बांधकाम-तांत्रिक शाखा बजेट शाखा, लेखा शाखेचे अभिप्राय घेतले नसताना तसेच वित्त विभागाचे अभिप्राय घेतलेले नसताना कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता देऊन दायित्व निर्माण केल्याप्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात येऊन सदर चौकशीमध्ये दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईसह चौकशी अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

तांत्रिक शाखा बजेट शाखा, लेखा शाखेचे अभिप्राय घेतले नसताना तसेच वित्त विभागाचे अभिप्राय घेतलेले नसताना कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता देवून दायित्व निर्माण केल्याप्रकरणी ग्रामीण रस्ते व विकास मजबुतीकरण करणे त्यासाठी रु. २८२.०० लक्ष एकूण ५७ कामासाठी प्रशासकीय मान्यता देताना अनियमितता झालेली असल्याने या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.. जिपला/बांध/सीआर-८०/कार्या-६३/कावि ८०,दिनांक २ जून २०१६ अन्वये दोषी असलेल्या अधिकारी कर्मचारी यांचेवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करणेबाबत शासनास कळविण्यात आले आहे. यात तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. आर.एम. चौधरी, श्री. आर.एन.शेळके, उप अभियंता, श्री. एस.ए. आताळे, शाखा अभियंता, श्री. एन.जी.बर्दापुरकर शाखा अभियंता, श्री. ए.एस.भाटसंगे, उप अभियंता व श्री. एम.एम.साळुंके शाखा अभियंता, श्री. जे.एस. कोनाळे ग्राम विकास अधिकारी यांचे वर दोषारोप ठेवून शासनाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यानंतर या कार्यालयाने जा.क्र.जिपला/बांध/कार्या-/सीआर-८०/कावि ३४८/२०१८ दिनांक ९ जुलै २०१८अन्वये संबंधितांवर शिस्तभंगाच्या कार्यवाहीस्तव कळविण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने शासनाने क्र.एस-९२/१४१५/प्र.क्रं.४०/सेवा-६ (ब) सुधारित क्रं.एस-९२/१०१८ /प्र.क्रं.९६/सेवा ६ (अ) दिनांक १७ सप्टेंबर २०१८ नुसार जि.प.कडील कर्मचारी श्री.बर्दापुरकर एन.जी.शाखा अभियंता व श्री.आताळे एस.ए. शाखा अभियंता यांची विभागीय चौकशी केली असून विभागीय चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालानुसार नियम संगत कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री .एस. एम. साळूंके, तत्कालीन शाखा अभियंता व श्री. जे.एस.कोनाळे, ग्रामविकास अधिकारी यांची विभागीय चौकशी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत सुरु आहे.

श्री. आर. एम. चौधरी, कार्यकारी अभियंता, श्री.आर.एन.शेळके, उपअभियंता व श्री. एस.एम.भाटसंगे उप अभियंता यांचे विभागीय चौकशी शासन स्तरावर प्रलंबित आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय :** प्राप्त

**वित्त विभागाचे अभिप्राय :** अप्राप्त

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली आहे का? असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अहवाल केव्हा सादर केलेला आहे? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी समितीस खुलासा केला की, चौकशी पूर्ण झालेली आहे. संबंधितांवर दोषारोप पत्रे सादर करण्यात आलेली आहेत. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाने चौकशी पूर्ण केलेली आहे. त्यानुसार निर्णय दिलेला आहे. ग्राम विकास विभागातील शाखा अभियंत्यांची चौकशी पूर्ण झालेली आहे. संबंधित कर्मचारी जिल्हा परिषदेचा आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेने कारवाई करणे अपेक्षित आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी अहवाल सादर केलेला आहे. समितीने विचारणा केली की, अशी प्रकरणे सातत्याने येत आहेत. प्रकरण दुसऱ्या विभागाकडे हस्तांतरित केले जात असताना विलंब होतो आणि प्रत्यक्षात कारवाई होत नाही. राज्यामध्ये अशा प्रकारची १ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत या संदर्भात कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे का? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी समितीस खुलासा केला की, विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही पूर्ण केलेली आहे. संयुक्त चौकशी असल्यामुळे एकाच यंत्रणेने कार्यवाही केलेली चांगली असते. जिल्हा परिषदेतील कर्मचारी असल्यामुळे त्यांनीच कारवाई करणे अपेक्षित आहे.

समितीने अशी विचारणा केली की, मंत्रालय स्तरावर चौकशीचे आणखी एक प्रकरण प्रलंबित आहे काय ? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी समितीस विदित केले की, ती चौकशी पूर्ण झालेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीची बैठक सुरु होण्यापूर्वी सुधारित उत्तर दिलेले आहे. यावर समितीचे सचिव यांनी समितीस अवगत केले की, श्री. आर. एम. संख्ये, श्री. भाटसंगे उप अभियंता यांच्या विरुध्द महाराष्ट्र शिस्त अपील व नियम, १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये दिनांक १७ जानेवारी, २०१८ च्या आदेशान्वये विभागीय चौकशी करण्यात आली. या प्रकरणी जिल्हा परिषदेने संबंधित अधिकाऱ्याविरुध्द जिल्हा परिषदेच्या स्तरावर कारवाई करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, लातुर यांना कळविण्यात आले. सदर प्रकरणी तत्कालिन अधिकारी यांची बचाव निवेदने व मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक लेखा शिर्षाखाली करण्यात आलेली आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, समिती अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने पाहणी करते. त्या ठिकाणी समितीला काही त्रुटी आढळून येतात. त्याचवेळी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या जातात. एक वर्ष होऊन कारवाई होत नसेल तर त्याला काही अर्थ राहत नाही. सचिवांच्या साक्षीमध्ये देखील असेच उत्तर दिले जात आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, वित्त विभागाची मान्यता घेऊन निविदा मंजूर केल्यानंतरच कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाले आहेत. लेखा आक्षेप कोणी काढलेला आहे? तांत्रिक शाखा, बजेट शाखा, लेखा विभागाचे अभिप्राय घेतले नसताना वित्त विभागाचे अभिप्राय घेतले नसताना प्रशासकीय मान्यता दिली आहे काय? संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी विदित केले की, प्रशासकीय मान्यता घेते वेळी नस्ती वित्त विभागात आली नव्हती. या संदर्भात समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली की, संचालकांनी दिलेले स्पष्टीकरण मान्य आहे काय? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी समितीस विदित केले की, विभागीय चौकशी झालेली आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, अहवाल तयार करीत असताना

चौकशी पथकाला कामे आढळून आली नाही. त्यानंतर त्यांच्याविरोधात कारवाई प्रस्तावित केलेली आहे. प्रस्तावित जागेवर काम न करता ते इतरत्र करण्यात आले आहे काय? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी समितीस विदित केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने दोषारोप पत्र बजाविले आहे. विभागीय चौकशी सविस्तरपणे करण्यात आलेली आहे. कार्यकारी अभियंता आणि शासनाचे मत रेकॉर्डवर घेण्यात आलेले आहे. त्यानुसार चौकशी अधिकाऱ्याने अहवाल दिलेला आहे. चौकशी अहवाल अंतिम असतो. समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीला कोणता अहवाल पाठविलेला आहे? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी समितीस खुलासा केला की, ती दोषारोप पत्रे असतील. तदनंतर समितीने विचारणा केली की, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणती तपासणी केली? एखादी नस्ती मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याकडे जाते. ती नस्ती पुढे पाठवितो मुख्य लेखा व वित्त अधिकारी दायित्वाची वस्तुस्थिती अवगत न करता संबंधित नस्ती पुढे निविदेसाठी कशी पाठविली आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, संबंधित नस्तीमध्ये २०२ कोटी ८२ लाख रुपयांची ५७ कामे होती. सदर नस्ती वित्त विभागाकडे मंजुरीसाठी न पाठविता कार्यकारी अभियंत्याने त्यांच्या स्तरावर प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. यामध्ये एक कार्यकारी अभियंता, दोन उप अभियंता आणि ४ शाखा अभियंता दोषी आढळून आले आहेत. संयुक्त चौकशीचा अहवाल शासनाकडे पाठविला. परंतु, शासनाकडून असे सांगण्यात आले की, वर्ग-१ आणि वर्ग-२ मधील प्रकरणांची चौकशी मंत्रालयीन स्तरावर होईल. तसेच वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील प्रकरणांची चौकशी विभागीय आयुक्त स्तरावर होईल. त्यानुसार एक कार्यकारी अभियंता, दोन उप अभियंत्यांचा चौकशी अहवाल वरिष्ठ पातळीवर पाठविला होता. तसेच संबंधित दोन शाखा अभियंत्यांचा चौकशी अहवाल आलेला आहे. तसेच दोन लोकांच्या चौकशीचा अहवाल प्रलंबित आहे. याबाबत समितीने अशी विचारणा केली की, चौकशी अहवाल कुठे पाठविला आहे ? चौकशी अहवालात काय म्हटले आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, विभागीय आयुक्तांकडे चौकशी अहवाल पाठविला आहे चौकशी अहवालात दोन लोक निर्दोष सुटले आहेत. सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस अधिकची माहिती देऊन विदित केले की, यामधील दोषारोपाची सविस्तर चौकशी मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी केलेली आहे. वित्त विभागाने छाननी न करता प्रशासकीय मान्यता घेतली असा मुद्दा आहे. वित्त विभागाने निविदेला मंजुरी दिलेली आहे.समितीने विचारणा केली की, ही कामे किती रुपयांची होती? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, ५७ कामे होती आणि त्यासाठी २८० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की ही कामे आढळून आली नसल्यामुळे ती अतिशय गंभीर बाब आहे. शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी शासनाकडे शिफारस केलेली आहे. यासंदर्भात पुढे काय झाले? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवाल दिलेला असून, दोषारोप पत्र बजाविल्यानंतर सविस्तर विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली होती. वित्त विभागाने निविदेला मंजुरी दिलेली आहे. निविदा मंजुर झाली, याचा अर्थ सर्व बाबी मंजूर झाल्या असा अर्थ त्यांनी काढलेला असावा. त्यामुळे त्यांना दोषमुक्त केले आहे.

समितीने विचारणा केली की, ग्रामीण रस्ते व विकास मजबुतीकरणसाठी रुपये २८२ लक्ष रूपयांची आवश्यकता होती. एकूण ५७ कामासाठी वित्त विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत. प्रारंभिक निविदा, रक्कमाचे अंदाज, प्रारंभिक नकाशे, जागेबद्दलची माहिती, प्रस्तावाची कारणे, कामाची मागणी इत्यादी अभिलेख्याची माहिती किंवा खात्री न करता मान्यता दिलेली आहे. बांधकाम विभागातील तांत्रिक शाखा, बजेट शाखा, लेखा विभागाचे अभिप्राय संबंधित कार्यकारी अभियंता यांनी घेतले नाहीत. प्रशासकीय कामाची टिप्पणी संचिका न काढता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समिती, स्थायी समिती यांच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर केली नाही. कार्यकारी अभियंता यांनी ५७ कामासाठी प्रशासकीय मान्यता दिल्यामुळे मंजूर तरतुदीपेक्षा रक्कम ९५३ लक्षचे दायित्व निर्माण केलेले आहे. कार्यकारी अभियंत्याची ५७ कामे होती आणि त्यासाठी २८० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेमध्ये दीड पटीने सुधारित प्रशासकीय मान्यता दिली जाते. २८० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्यामुळे तो दीड पटीमध्ये गेलेला आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ९५३ लक्ष रुपयांचे दायित्व अतिरिक्त निर्माण झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित कार्यकारी अभियंता आणि उप अभियंत्याला दोष मुक्त करण्याचे कारण काय आहे? हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. समितीने त्या ठिकाणी भेट दिली होती. तांत्रिक शाखा, बजेट शाखा, लेखा शाखा यांचे अभिप्राय घेण्यात आले नव्हते. तसेच वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले नव्हते. या प्रकरणी कनिष्ठ अभियंत्याला जबाबदार धरण्यात आले आहे. कार्यकारी अभियंत्याने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यावेळी समितीने रुलिंग दिले होते. त्यानुसार कारवाई केली आहे काय? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दोषारोप पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केले होते. तद्नंतर समितीने विचारणा केले की, विभागाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना दोष मुक्त

केले आहे आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आहेत. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे काय? संबंधित अधिकारी शासकीय सेवेत कार्यरत आहेत काय? सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, संबंधित अधिकारी शासकीय सेवेत कार्यरत आहेत आणि ते औरंगाबाद येथे आहेत.

समितीने विचारणा केली की, संबंधित अधिकाऱ्यांना कोणत्या आधारे दोष मुक्त केलेले आहे? ऑडिटरने चुकीचे आक्षेप नोंदविले आहेत, ९५३ लक्ष रुपयांचे अतिरिक्त दायित्व निर्माण झाले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता नंतर देण्यात आली आहे काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, मी उदाहरण देणार आहे. १०० रुपये आले असतील तर १५० रुपयाची सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. त्यांनी १७५ रुपयांची अतिरिक्त प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. समितीपुढे विचारणा केली की, उपलब्ध तरतुदीपेक्षा ९५३ लक्ष रुपयांचे अतिरिक्त दायित्व निर्माण झाले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी नस्ती सादर केल्याशिवाय अध्यक्ष कामाची यादी देऊ शकत नाही. संबंधित अधिकाऱ्यांना दोषमुक्त कसे केले आहे. सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी निविदा मंजुर केलेली आहे. त्यानंतर इतर गोष्टी त्यांनी पाहिलेल्या नाहीत.

समितीने निदेश दिले की, सकृतदर्शनी ज्या त्रुटी समितीस दिसून आल्या होत्या त्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. सदर प्रकरणी मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. त्यामुळे उक्त प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करून कारवाईसह चौकशी अहवाल १५ दिवसांच्या आत समितीला सादर करण्यात यावा.

सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, समितीचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविण्यात यावा. सदर प्रकरणाची चौकशी करून कारवाईसह अहवाल सादर करण्यास एक महिन्याचा कालावधी द्यावा, अशी विनंती आहे.

**दिनांक १७ जुलै,२०१९ रोजीच्या विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती**

कार्यकारी अभियंता यांनी स्वतःच्या अधिकारात कोणत्याही शाखेचे व वित्त विभागाचे अभिप्राय न घेता प्रशासकीय मान्यता देवून जास्तीचे दायित्व निर्माण केल्याने काही काम मंजूर केलेल्या ठिकाणी न होता इतरत्र झाल्या प्रकरणी संबंधिताविरूध्द कार्यवाही करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र.जिपला/बांध/कार्या-३/सीआर-४० दि.०२.०६.२०१६ शासनाचे पत्र क्र.एस-९२/१४-१५ प्र. क्र.४०/लेखा-६ (ब) व सूधारीत पत्र क्र.जिपला/बांध/कार्या-३/सीआर-४८ दि.०९.०७.२०१८ अन्वये अहवाल शासनास सादर केलेला आहे.

(१) श्री.चौधरी आर.एम. कार्यकारी अभियंता श्री. भाटंगे बी. एस. उपअभियंता, श्री. शेळके आर.एम. उपअभियंता यांची अनियमिततेबाबत कार्यवाही करण्यासाठी दि.०९.०७.२०१८ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. अद्याप पर्यंत शासनाकडून अहवाल अप्राप्त आहे. तसेच मात्र अ.क्र.१ वरील श्री. चौधरी हे मयत झालेले आहेत. अ.क्र.२ वरील श्री.भाटसंगे हे सद्यस्थितीत सेवानिवृत्त झालेले आहेत.

(२) जिल्हा परिषद स्तरावरील कार्यरत वर्ग-३ चे कर्मचारी श्री.साळूंके एम.एम. तत्कालीन शाखा अभियंता श्री.बर्दापूरकर एन.जी.शाखा अभियंता श्री.आताळे तसेच श्री.कोनाळे जे.एस., ग्राम विकास अधिकारी यांच्या विरूध्द कार्यवाही प्रस्तावित करण्यासाठी पंचायत विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांना सूचना दिलेल्या आहेत.

(३) सदर प्रकरणातील श्री. साळूंके यांच्या विरूध्द प्रस्तावित केलेल्या चौकशीचा मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय खाते निहाय चौकशी परिषद सेवक, औरंगाबाद यांचा अहवाल पत्र २०१९/ विशा/कक्ष६/विचौ/प्र.क्र./सीआर/१६५ /कावि-१५३९ दि.२६.११.२०१९ नूसार संबंधीतावर ठेवण्यात आलेला आरोप सिध्द होत नसल्याचा निष्कर्ष दिलेला आहे. त्यानुसार या कार्यालयाचे आदेश क्र.२०जिपला/बांध/कार्या-३/सीआर-१८/कवि-१२६, दि.०५.०३.२०२० नूसार श्री.बर्दापूरकर यांना दोषारोपातून मुक्त करण्यात आलेले आहे.

तसेच श्री.आताळे एस.ए. शाखा अभियंता यांच्या विरूध्द प्रस्तावित केलेल्या चौकशीचा अहवाल सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय आयुक्त, कार्यालय औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१५ / विशा / कक्ष-६ / विचौ.प्र.क्र.३९ / कावि - १२१७ दि. १३.०७.२०१५ संबंधीतावर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याचा निष्कर्ष दिलेला आहे. त्यानूसार या कार्यालयाचे आदेश क्र. २०जिपला / बांध / कार्या-३ / सीआर-१८ / कवि - १२६, दि.०५.०३.२०२० नूसार श्री.आताळे यांना दोषारोपातून मुक्त करण्यात आलेले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेमध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१३-२०१४ मध्ये रूपये १७१२.१५ लक्षाच्या एकूण १६५ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. त्यापैकी रूपये २८२/- लक्षाच्या एकूण ५७ कामांसाठी प्रारंभिक निविदा, रक्कमांचे अंदाज, प्रारंभिक नकाशे, जागेबद्दलची माहिती, प्रस्तावाची कारणे, कामाची मागणी इत्यादी अभिलेखाची माहिती न घेता मान्यता दिलेली आहे. तसेच बांधकाम विभागातील तांत्रिक शाखा, बजेट शाखा, लेखा विभाग व वित्त विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत. प्रशासकीय कामाची टिप्पणी संचिका न काढता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समिती, स्थायी समिती, यांच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर केले नाही. कार्यकारी अभियंता यांनी ५७ कामांसाठी नियमबाह्य पध्दतीने मान्यता दिल्यामुळे मंजुर करण्यात आलेल्या तरतुदीपेक्षा रूपये ९५३ लक्षचे दायित्व निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १०६(क) नुसार पूर्वीचे दायित्व संपल्या खेरीज नवीन दायित्व निर्माण करू नये. तसेच नियम १०१ (१) नुसार कोणत्याही बांधकामाच्या अंमलबजावणीची कार्यवाही करताना मागितलेली सर्व रक्कम एका वर्षात पुरविणे शक्य होईल काय हे तपासून निधीच्या अभावी संपूर्ण रक्कम एका वर्षात देणे शक्य होणार नसेल तर प्रत्येक वर्षात पार पाडावयाच्या बाबींचा कार्यक्रम निश्चित करताना अमंलबजावणी करावयाच्या बाबींना नुकसान पोहचणार नाही आणि त्यावर खर्च झालेली रक्कम वाया जाणार नाही याबाबतची दक्षता घेणे आवश्यक आहे. उपनियम (२) अन्वये मागील वर्षाच्या अखेरीस असलेले दायित्व पूर्ण करण्यासाठी पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे. परंतु या नियमानुसार कार्यवाही झालेली नसल्याने कार्यकारी अभियंता यांनी बांधकाम विभागाच्या अधिनस्त तांत्रिक शाखा, बजेट शाखा व लेखा शाखा तसेच वित्त विभागाचे अभिप्राय न घेता परस्पर प्रशासकीय मान्यता देऊन माहे, मार्च २०१४ अखेर ९५३.८६ लक्ष इतक्या रकमेचे दायित्व शिल्लक आहे.

सदरील कामाचे देयक उपविभागाकडून तपासणी केल्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभाग लातूर यांच्याकडून तपासणी करून ते प्रमाणित केल्यानंतरच अर्थ विभाग जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आली. व तद्नंतर मान्यता देऊन रक्कमेची अदाई करण्यात आलेली आहे. वास्तविक या सर्व तपासणी मध्ये सदरहू दायित्व निदर्शनास आले पाहिजे होते व त्याचवेळी आक्षेप घेऊन देयक नामंजूर करणे आवश्यक होते. तसेच जिल्हा परिषदेचे वित्तीय सल्लागार मुख्य लेखा व वित्त अधिकारी आहेत. एमबीसहिता देयके सादर झाल्यानंतर निवडलेल्या कामांना कोणतीही परवानगी दिली नसताना फक्त प्रशासकीय मान्यतेच्या आधारे देयके अदा करण्यात आलेली आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आक्षेप घेऊन या प्रकरणात कार्यवाही करणे आवश्यक होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीमध्ये समितीस माहिती मिळाली की, ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण योजनेतील रू. २८२.०० लक्ष रक्कमेच्या एकूण ५७ कामांसाठी प्रशासकीय मान्यता देताना अनियमितता झालेली असल्याने श्री. आर.एम.चौधरी, कार्यकारी अभियंता, श्री. आर. एन. शेळके, उपअभियंता, श्री. एस.ए. आताळे, शाखा अभियंता, श्री. एन.जी. बर्दापुरकर, शाखा अभियंता, श्री. एस.एम. भाटसंगे, उपअभियंता, श्री. एस.एम.साळुंखे, शाखा अभियंता, श्री.जे.एस.कोनाळे, ग्रामविकास अधिकारी यांच्यावर दि.१७ जुलै २०१४ रोजी दोषारोप पत्र ठेवण्यात आले आहेत. त्यानंतर शासनाकडून दि. ११ मे, २०१८ रोजी काही त्रुटींवर स्पष्टीकरण मागविण्यात आले त्यानुसार जिल्हा परिषदेने दि. ९ जुलै, २०१८ रोजी याबाबतचे स्पष्टीकरण शासनाकडे सादर केले.- **यात श्री.आर.एम. चौधरी, कार्यकारी अभियंता हे मयत झाले असून श्री.भाटसंगे हे सेवानिवृत्त झाले आहेत. श्री.आर.एन.शेळके, उप अभियंता यांची अनियमिततेबाबत कारवाई करण्यासाठी दिनांक ९/०७/२०१८ रोजी शासनास प्रस्ताव सादर केलेला असून शासन कार्यवाहीसाठी प्रलंबित आहे. तसेच जिल्हा परिषद स्तरावरील वर्ग-३ चे कर्मचारी श्री.एन.एम.साळुंखे, श्री.एन.जी.बर्दापूरकर, श्री.आताळे अणि श्री.कोनाळे यांच्याविरुध्द कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली असून, श्री.बर्दापूरकर यांना दोषमुक्त करण्यात आले असून श्री.आताळे यांच्याविरुध्द देखील आरोप सिध्द होत नसल्याने त्यांना दोषमुक्त करण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. श्री.शेळके, उप अभियंता हे राज्यस्तरीय अधिकारी असल्यामुळे त्यांची शासन स्तरावर चौकशी प्रलंबित असल्याचे दिसून येते. लेखा आक्षेपात गंभीर आक्षेप निदर्शनास येऊनही विभागीय आयुक्तांच्या आयुक्त कार्यालयाने केलेल्या चौकशीतून संबंधित कर्मचारी दोषमुक्त होणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. समितीने साक्षीच्या वेळी निदेश देऊनही समितीच्या निदेशाचा गांभीर्याने विचार केल्याचे चौकशी समितीच्या निष्कर्षामधून दिसून येत नाही. दोषी अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याचे व त्यांना कार्यवाहीतून दोषमुक्त करण्याची बाब यातून दिसून येते. सदरची बाब अत्यंत गंभीर असून या संपूर्ण प्रकरणी फेर चौकशी करण्यात यावी असे समितीला प्रकर्षाने वाटते व त्यानुसार या संपूर्ण प्रकरणाची फेर चौकशी निष्पक्ष चौकशी अधिकाऱ्याकडून करण्यात**

**यावी तसेच या प्रकरणी नेमलेल्या चौकशी अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक कर्मचाऱ्यांना दोषमुक्त केले असल्यास त्यांचेवर देखील कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

तद्नंतर विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये समितीच्या असे निदर्शनास आले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीच्या वेळी समितीने चौकशी करण्याचे निदेश दिले असतानाही या प्रकरणाची अद्याप विभागीय चौकशी पूर्ण केलेली नाही व दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. यास्तव या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्याचे निदेश समितीने दिले. त्यानुसार समितीस सादर केलेल्या माहितीनुसार श्री. एस.एम. साळुंखे, शाखा अभियंता, श्री. एन.जी. बर्दापूरकर, शाखा अभियंता, श्री. एस.ए. आताळे, शाखा अभियंता यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने त्यांना दोषारोप पत्रातून मुक्त करण्यात आलेले असून याबाबतचे कार्यालयीन आदेश दि. ५ मार्च, २०२० रोजी काढण्यात आलेले आहे. तसेच श्री. आर. एन. चौधरी, कार्यकारी अभियंता हे मयत झालेले आहेत. श्री. एस.एम. भाटसंगे, उपअभियंता हे सद्यःस्थितीत सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री. आर.एन. शेळके, उपअभियंता यांच्यावर कार्यवाहीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. श्री.जे. एस. कोनाळे, ग्रामविकास अधिकारी यांच्याविरूध्दचा कार्यवाही चा प्रस्ताव पंचायत विभाग जिल्हापरिषद लातूर यांच्याकडे प्रलंबित आहे.

**समितीने विभागीय साक्षीच्या वेळी उच्च स्तरीय चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले असतानाही सन २०१८ पूर्वी सुरू केलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने कार्यवाही पूर्ण करून संबंधितांपैकी काही अभियंते व अधिकाऱ्यांना दोषमुक्त केलेले असून इतरांवरील कार्यवाही अद्यापही प्रलंबित आहे. वास्तविक या प्रकरणात बांधकाम विभागाच्या तांत्रिक शाखा, बजेट शाखा व लेखा शाखा तसेच वित्त विभागाचे अभिप्राय घेतलेले नसताना, विषय समिती व स्थायी समिती, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता परस्पर प्रशासकीय मान्यता देऊन काम करण्यात आलेली आहेत. जिल्हा परिषद व वित्त विभाग यांनी या कामावर वित्तीय नियंत्रण ठेवलेले नाही. प्रत्येकी ५ लाख रूपयांची ७ कामे केल्याचे आढळून आलेले नाही. ५ कामे प्रस्तावित ठिकाणी न करता इतरत्र करण्यात आलेली आहेत. ३ कामे न करता मुल्यांकन करून त्यांची देयके देण्यात आलेली आहेत. अशा प्रकारे या प्रकरणात इतक्या मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली असताना, केलेल्या विभागीय चौकशीमध्ये कोणताही दोषारोप सिद्ध झाला नाही. याचा अर्थ स्पष्ट आहे की, विभागीय चौकशी अधिकाऱ्यांनी संबंधित दोषींची योग्य प्रकारे चौकशी केलेली नसल्याने त्यांच्यावर कोणताही दोषारोप सिध्द झालेला नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे.**

**ग्रामीण रस्ते विकास व मजबूतीकरण या योजनेतील सन २०१३-२०१४ या वर्षातील ५७ कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होऊन ९ कोटी ५३ लाख रूपयांचे दायित्व निर्माण झालेले असताना याप्रकरणाची गांभीर्याने चौकशी झालेली नसून संबंधीत दोषी अधिकारी/कर्मचारी यांना संरक्षण देण्याची भुमिका संबंधीत चौकशी अधिकारी यांची असल्याचे दिसून येते. यास्तव या संपूर्ण प्रकरणाची फेर चौकशी निष्पक्ष अधिकाऱ्यांकडून तातडीने करण्यात यावी व या प्रकरणी दोषींतावर कडक स्वरूपाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीला सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, लातूर

## मौजे जाऊवाडी जोडरस्ता सुधारणा करणे ग्रामा-८६ कि.मी. ०/०० ते ०/७०० च्या कामातील अनियमिततेबाबत.

**परिच्छेद क्रमाक. ३.४६७ (सन २०१३-२०१४).—**

जिल्हा परिषद लातूर, सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक १२) जिल्हा परिषद, लातूर, बांधकाम विभागाचे सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षणात ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रक्कम रुपये १४,९९,८२६/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १४० नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. कामाची निविदा तपासली असता निविदेतील फॉर्म एम,२, ३ व ४ मध्ये सर्व माहिती भरण्यात आलेली नाही.

(२) सदर कामाची निविदा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूर केली असून ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२०१२/प्र.क्रं६८०/ वित्त ९ दिनांक १९/०३/२०१२ मधील **(परिशिष्ट क्रमांक-४)** टिप १ व २ नुसार अधिकारीस्तरावर दिलेल्या मान्यतेची माहिती विषयी समिती / स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात यावी असे आदेश असताना तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८७ अन्वये कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तसे केल्याचे दिसून आले नाही तसेच प्रमाणक क्रमांक ४८ दिनांक १८/०६/२०१४ अन्वये चाचणी अहवाल नसताना सुरक्षा अनामत परत केल्याचे दिसून येते.

(४) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विकास/१० प्र.क्र.२/९८ दिनांक १९/०८/१९९८ नुसार कंत्राटदारास देय रक्कम प्रदान करण्यापुर्वी कामाचा विमा उतरविणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसून येत नाही.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/२०००/ ३३/४४ दिनांक २२/१२/२००० नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणा-या अभियंता यांनी मोजमापाच्या नोंदी घेतल्यानंतर मोजमाप पुस्तीकेत दिनांकीत स्वाक्षरी करणे, आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नं. ६९ मध्ये घेण्यात यावी तथापि अशी नोंद घेतल्याची खात्री करता आली नाही.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १८० नुसार अंतिम मोजमाप घेऊन रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने कर्ण रेषा मारावयास पाहिजे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधिल नियम १४७ नुसार नमुना क्रमांक ४८ मध्ये करारनाम्याची नोंद घेण्यात आली नाही.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना नं. २३ मध्ये घेणे आवश्यक असताना नमुना २३ मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आली नाही.

(१०) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ३७ नुसार वित्त विभागाकडुन देयकाचे अचूक तपासणी केल्याचे दिसून आले नाही.

(११) काम पुर्ण झाल्यानंतर काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

(१२) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक जिपरा/२००९/१८०/परा८ दिनांक ३१/१२/२००९ अन्वये रस्त्याच्या कामाच्या देखभाल व दुरुस्ती दोष निवारण कालावधी कामाच्या जागी सविस्तर माहिती फलक लावणे ठेकेदारास बंधनकारक राहील असे असताना

माहिती फलक लावल्याबाबतचे कागदपत्रे / प्रमाणपत्र संचिकेत नसल्याने त्याबाबत खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद लातूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.—**

(१) सदरील काम हे ई-निविदा प्रक्रियेव्दारे मंजूर झालेले असल्यामुळे निविदेतील फॉर्म एम.२,३,४, मध्ये सर्व माहिती भरण्यात आलेली असून ती सोबत सलंग्न करण्यात आलेली आहे.

(२) सदरील कामाच्या मान्यतेची माहिती बांधकाम समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात आलेली आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ अन्वये कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात येवूनच काम पुर्ण व अंतिम करण्यात येते. सदरील कामाचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावरच देयकाची अंतिम अदायी करण्यात आलेली आहे.

(४) सदरील कामाच्या अंतिम देयकातून विम्याची १% रक्कम रुपये १५,०००/- कपात केली आहे. यापुढे कामाचे देयक प्रदान करण्यापूर्वी विमा उतरविण्याची कार्यवाहीची दक्षता घेण्यात येईल.

(५) मोजमाप पुस्तीकेच्या रकाना क्र.०१ मध्ये ज्या दिवशी मोजमापाची नोंद घेण्यात येते त्या दिवसाचा दिनांक नोंदवला आहे. तसा दिनांक प्रत्येक नोंदीच्या वेळी मोजमाप पुस्तिकेत शाखा अभियंता यांच्या स्वाक्षरीने नोंदविण्यात आलेला आहे. सदरील कामाच्या मोजमाप पुस्तीकेत नोंद घेणाऱ्या अभियंत्यानी मोजमाप नोंदविल्यानंतर मोजमापाची दिनांकित स्वाक्षरी केलेली नाही. यापुढे दक्षता घेण्यात येईल.

(६) सदरील कामाची नोंद काम पुर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना क्र.६९ मध्ये पृष्ठ क्रं.३८ वर घेण्यात आलेली आहे.

(७) सदरील कामाचे अंतिम देयक मोजमाप पुस्तीकेत नोंदवून अंतिम रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमाप पुस्तीकेवर लाल शाईने कर्ण रेषा मारण्यात आलेल्या आहेत. सोबत मोजमाप पुस्तीका क्रमांक २३१२ चे पृष्ठ क्रमांक ८७ ते ९३ संलग्न केलेले आहेत.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १४७ नुसार नमुना क्र.४८ मध्ये करारनाम्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना क्रमांक २३ मध्ये ठेवण्यात आलेली आहे व कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली आहे.

(१०) सदरील कामाचे देयक उप विभागाकडून तपासणी केल्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभाग लातूर यांचेकडून तपासणी करून ते प्रमाणित केल्यानंतरच अर्थ विभाग जि.प. लातूर यांचेकडे अंतिम मान्यतेसाठी सादर केले जाते व तद्नंतर पुर्णतः मान्यता देवून रक्कमेची अदाई करण्यात आली आहे.

(११) सदरील कामाचे अंदाजपत्रक शेड्यूल ऑफ वर्क प्रशासकीय/ तांत्रिक मान्यता तसेच काम पुर्ण झाल्यानंतर काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तीकेत नोंदविण्यात आलेला आहे.

(१२) सदरील कामाच्या जागी कामाची माहिती दर्शविणारा सविस्तर फलक लावण्यात आलेला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८७ अन्वये कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात येवून काम पूर्ण करण्यात येते. सदर साहित्याचा चाचणी अहवाल आल्यानंतरच त्या साहित्याचा वापर केला जातो. सदरहू साहित्याचा वापर केल्यानंतर चाचणी अहवाल घेऊन काय फायदा आहे, बिले काढतेवेळी सदर साहित्याचा चाचणी अहवाल मागविण्यात आला आहे. अशा वेळी त्या चाचणी अहवालाचा उपयोग तरी काय आहे,यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर चाचणी अहवाल येण्यास विलंब होत असल्यामुळे त्यांनी ते काम पूर्ण केले असेल.

समितीने विचारणा केली की, काम सुरु होण्यापूर्वी कोणत्याही कामाचा चाचणी अहवाल आलेला नाही. काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त झाला आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर चाचणी अहवालाचा काय फायदा, सदर साहित्याचा चाचणी अहवाल आल्यानंतरच ते काम सुरु केले असे आपणाकडे एकतरी काम आहे काय, यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, कोणत्याही कामाचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय सदर काम सुरु करता येत नाही. त्याचप्रमाणे आम्ही देखील सदरहू साहित्याचा चाचणी अहवाल आल्यानंतरच काम करीत आहोत. यावर समितीने मत व्यक्त केले की, सर्व कामांमध्ये सदर साहित्यांचा चाचणी अहवाल आल्यानंतरच काम करीत आहोत, अशी खोटी उत्तरे कार्यकारी अभियंता देत आहेत. संबंधित साहित्यांचे चाचणी अहवाल आल्यानंतरच काम सुरु करणे योग्य आहे, पण आपण तसे काम करीत नाहीत, असे आपल्या कामावरुन दिसून येत आहे. तरी देखील चाचणी अहवाल आल्यानंतरच काम करीत आहोत, अशी खोटी उत्तरे आपण देत आहात व खोटी उत्तरे देऊन समितीची दिशाभूल करीत आहात. हा समितीचा अवमान आहे. अशी नाराजी व्यक्त करीत समितीने विचारणा केली की, चाचणी अहवाल येण्यापूर्वीच काम का सुरु केले, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता चाचणी १९६८ चे नियम ८७ अन्वये कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तसे केल्याचे दिसून आले नाही. तसेच प्रमाणक क्रमांक ४८ दिनांक १८/०६/२०१४ अन्वये चाचणी अहवाल नसताना सुरक्षा अनामत परत केल्याचे दिसून येते. चाचणी अहवाल नसताना आपण सुरक्षा अनामत का परत केली, अतिशय निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन सदर काम केल्याचे दिसून येत आहे. सदरहू प्रकरणाला कोण जबाबदार आहे, सदरहू कामाचे कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) केव्हाचे आहे व चाचणी अहवाल केव्हा आलेला आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू कामाची कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) सन २०१३ ची आहे व चाचणी अहवाल सन २०१४ मध्ये आलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, कार्यारंभ आदेशाचा (वर्कऑर्डरचा) कालावधी किती दिवसांचा आहे, सदरहू कामाची प्रत्यक्ष सुरुवात केव्हा करण्यात आली यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू कार्यारंभ आदेशचा (वर्कऑर्डरचा) कालावधी हा ६ महिन्यांचा आहे. दिनांक २९ मार्च, २०१४ रोजी सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.

याबाबत समितीने नाराजी व्यक्त करून अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी यापूर्वी चुकीचे उत्तर दिलेले आहे. त्यांनी असे सांगितले की, चाचणी अहवाल आल्यानंतर आम्ही कामाला सुरुवात केलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार चाचणी अहवाल येण्यापूर्वीच सदरहू कामाला सुरुवात केली. अशा प्रकारचे चुकीचे उत्तर देऊन कार्यकारी अभियंता बांधकाम हे समितीची दिशाभूल करीत आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू कामाचा चाचणी अहवाल आल्यानंतरच सदरहू काम सुरु होणे अपेक्षित आहे. पण दुर्दैवाने तसे झाल्याचे दिसून येत नाही व समितीने असे मत व्यक्त केले की, लातूर जिल्हा परिषदेअंतर्गत होणाऱ्या सर्व कामातील साहित्यांचा चाचणी अहवाल हा संबंधित कंत्राटदार आणून देतो. जिल्हा परिषदेचे अधिकारी त्याकडे पाहत देखील नाहीत. संबंधित कंत्राटदारांनी किती निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले व सदरहू काम कितीही निकृष्ट झाले तरी या अधिकाऱ्यांना काहीही फरक पडत नाही. सर्व अधिकाऱ्यांची टक्केवारी ठरलेली आहे. काम निकृष्ट झाले तरी संबंधित अधिकारी त्या कंत्राटदाराला जाब विचारु शकत नाहीत. सदरहू कामासाठी दिला जाणारा पैसा हा सर्वसामान्य जनतेचा आहे. त्या पैशाचा योग्य वापर करणे राज्याच्या दृष्टीने हितावह आहे. कितीही निकृष्ट दर्जाचे काम केले तरी संबंधित अधिकारी बिनधास्त पैसे देतात. यामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. अशा प्रकारची कामे होणे ही गंभीर बाब आहे. सदरहू कामाला समितीने प्रत्यक्ष भेट देणे आवश्यक आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, चाचणी अहवाल नसताना देखील संबंधित अधिकाऱ्याने सुरक्षा अनामत परत करणे, ही देखील गंभीर बाब आहे. अनामत रकमेतील काही रक्कम कपात केल्याची कारणे काय आहेत? सदरहू रक्कम कपात केल्याबाबतचा आक्षेप लेखापरिक्षकाने (ऑडिटरने) का काढलेला नाही.

याबाबत समितीस उत्तर देण्यात आले की, चाचणी अहवाल आल्याशिवाय सदरहू काम पूर्ण करता येत नाही. चाचणी अहवाल न आल्यामुळे सुरक्षा अनामत रकमेतून २ लाख रुपये कपात करण्यात आलेली होती. त्यामुळे सदर आक्षेप काढण्यात आलेला नाही.

समितीने अशी विचारणा केली की, सुरक्षा अनामत कशासाठी दिली जाते, सुरक्षा अनामत रक्कम केव्हा कपात केली जाते, चाचणी अहवालासाठी सुरक्षा अनामत मधील रक्कम कपात करण्यात आली आहे का, लेखा परिक्षण (ऑडिट) करीत असताना जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे लेखा परिक्षकासोबतच (ऑडिटर) असतात. मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि (ऑडिटर) लेखा परिक्षकामध्ये संगनमत झाले की, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याला सोडून देऊन संबंधित (डिपार्टमेंट) विभागावर आक्षेप नोंदवितात, (लोकल फंड) स्थानिक निधी संचालनालयाच्या आस्थापनेवर जे कर्मचारी अधिकारी असतात तेच कर्मचारी अधिकारी इकडे येतात. एकमेकांना वाचविण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी कोणतीही ॲक्शन घेत नाहीत. लेखा परिक्षकाने (ऑडिटर) सर्व बाबी का तपासलेल्या नाहीत, याबाबत समितीस उत्तर देण्यात आले की, खरे पहाता हा आक्षेप मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यावरच आहे.

समितीने मत व्यक्त केले की, एकाच मुद्यामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत आहे. पंचायती राज समिती येण्यापूर्वी दोषी अधिकाऱ्यावर आपण कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. सदर अनियमिततेला व भ्रष्टाचाराला आपला पाठिंबा आहे का, संबंधित खात्याची जबाबदारी वरिष्ठ अधिकाऱ्यावर असताना देखील ते कोणतीही जबाबदारी स्वीकारायला तयार नाहीत. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे त्यांच्या कामावर अजिबात लक्ष असल्याचे यावरुन दिसून येत नाही. प्रत्येक अधिकाऱ्यावर चौकशी सुरु आहे, चौकशी करण्यात येईल, चौकशी अहवाल पाठविलेला आहे अशीच उत्तरे येत आहेत. कोणत्याही अधिकाऱ्यावर ठोस कारवाई केल्याचे एकही प्रकरण दिसून येत नाही. सर्व अधिकाऱ्यांची चौकशीच सुरु आहे का, अधिकाऱ्यांची चौकशी पूर्ण करून त्या अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याचे एक तरी उदाहरण आहे का? कोणत्याही अधिकाऱ्याची चौकशी करणे म्हणजे त्या अधिकाऱ्याला वाचविण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. एका एका अधिकाऱ्याच्या चौकशीसाठी तीन ते चार वर्षाचा कालावधी घेतला जातो. तो पर्यंत तो अधिकारी सेवा निवृत्त होतो किंवा तोपर्यंत तो काही तरी उपाययोजना करतो आणि चौकशीतून दोषमुक्त निघतो.

समितीने अशी विचारणा केली की, याप्रकरणामध्ये अनियमितता झाल्याचे दिसत आहे. चाचणी अहवाल आल्यानंतर काम केल्याचे एकही प्रकरण लातूर जिल्ह्यामध्ये दिसून येत नाही. या ठिकाणी खोटी उत्तरे देण्यात आलेली आहेत. याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी. चाचणी अहवाल आल्यानंतर कोणतेही साहित्य तपासलेले नाही. असे असताना देयक अदा करण्यात आलेले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी देयक का दिले, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी कोण होते, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. पी. आर. वडकुते हे होते.

समितीने निदेश दिले की, श्री. पी. आर. वडकुते, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी, तसेच या प्रकरणासंदर्भात सखोल चौकशी करण्यात यावी. अशा प्रकारे भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर, जबाबदारीने काम न करणाऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता आहे. तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी व इतर संबंधित दोषींची सेवा पुस्तिकेत नोंद घेणे, वेतनवाढ रोखणे, कारणे दाखवा नोटीस (शोकॉज) देणे इत्यादी स्वरूपाच्या नियमात असलेल्या कार्यवाही करून एका महिन्याच्या आत अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

जाऊवाडी जोडरस्ता सुधारणा करणे ग्रा.मा.८६ कि.मी.००/०० ते ००/७०० च्या कामातील अनियिमितते प्रकरणी तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी व इतर संबंधित दोषी व्यक्तींची सेवा पुस्तिकेत नोंद घेणे, वेतनवाढ रोखणे, कारणे दाखवा नोटीस देणे इ. स्वरूपाच्या नियमानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

मौजे जाऊवाडी जोडरस्ता कि.मी. ००/०० ते ०/७०० रु. १५.०० लक्ष अंदाजित किमतीनुसार काम प्रस्तावित होते. या कामाची प्रशासकीय मान्यता जा.क्र.जिपला/ बां.कार्या-२/११२/१३/बांधकाम विभाग, जिल्हा परिषद लातूर दिनांक ७ सप्टेंबर, २०१३ देण्यात आलेली होती व तांत्रिक मान्यता जा.क्रं.जिपला/बां./कार्या-१/१४०/ १३ बांधकाम विभाग, जिल्हा परिषद लातूर दिनांक ७ सप्टेंबर,२०१३ रोजी देण्यात आलेली आहे.

सदरील काम दिनांक २६/२/२०१४ रोजी सुरुवात झालेली असून दिनांक २९/३/२०१४ रोजी पूर्ण झालेले आहे. कामाची प्रतवारी, गुणवत्ता चांगल्या दर्जाची असल्याने व प्रत्यक्ष कामावर वापरलेल्या साहित्याचाच चाचणी अहवाल घेतला असल्याने देयक पारीत करण्यात आलेले आहे. जाऊवाडी जोडरस्ता सुधारणा करणे ग्रा.मा.८६ कि.मी.००/०० ते ०/७०० च्या कामातील अनियिमिततेबाबत या कार्यालयातील तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. आर.एम.चौधरी, श्री.एस.एम.भाटसंगे, श्री. एस.बी.चव्हाण तत्कालीन उप अभियंता, स.ले.अ. श्री.एस.बी.चव्हाण, तत्कालीन कनिष्ठ अभियंता, श्री. पी.एम.गायकवाड तत्कालीन स.ले.अ. यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून त्यानुसार त्यांचेवर कार्यवाही अनुसरण्यात येत आहे. तथापि, श्री. पंजाबराव वडकुते, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी म.ना.से.(वेतन) नियम, १९८२ मधील २७(२)ए-२, अन्वये हे सेवा निवृत्त होवून चार वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने त्यांच्यावर कार्यवाही करता येत नाही. तसेच श्री. एम.ए.कंगळे वरिष्ठ सहायक (लेखा) हे मयत झाले आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (बांधकाम -३) :-** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जाऊवाडी जोडरस्ता कामातील अनियमिततेबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे का, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हे काम ७०० मीटरचे व १५ लाख रुपयांचे आहे. दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी त्याची कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) दिला होता. दिनांक २९ मार्च, २०१४ रोजी काम पूर्ण झाले आहे. तपासणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट) काम सुरु करण्याआधी यायला पाहिजे परंतु तो काम संपल्यानंतर प्राप्त झाला. दिनांक २९ मार्च, २०१४ रोजी काम झाले त्याच दिवशी अहवाल (रिपोर्ट) आला आणि मान्य केलेला आहे. संबंधीत अधिकाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

समितीने अशी विचारणा केली की, काम चांगल्या दर्जाचे झालेले आहे काय, काम कधी पूर्ण करण्यात आले व चाचणी अहवाल कधी आला. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, काम चांगल्या दर्जाचे झाले आहे. सदर ७०० मीटरचे काम दिनांक १५ मार्च, २०१४ रोजी पूर्ण झाले आणि दिनांक २९ मार्च, २०१४ तपासणी अहवाल आला. यावर समितीने अशी विचारणा केली की, रस्त्याच्या कामासाठी जे साहित्य वापरले जाते, ते आधी टेस्ट केले पाहिजे, तरच ते वापरता येते. टेस्ट रिपोर्ट चांगला, गुणवत्तेचाच येणार असे गृहीत धरून काम पूर्ण करण्यात आले काय, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, त्याबाबतची चौकशी सुरु आहे. त्यासाठी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. तपासणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट) आल्याशिवाय काम करायला पाहिजे नव्हते. परंतु असे का केले याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी व संबंधितांना विचारले. तेव्हा ते म्हणाले असे उत्तर देण्यात आले की, रस्ता खूप खराब होता आणि तपासणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट) डांबराचे घ्यायचे होते. पण डांबर भारत पेट्रालियमकडून घेतले होते. त्यामुळे त्या लोकांनी वाईट इंटेशनने काही केलेले नाही. सरकारी पद्धतीने डांबर मिळाल्यामुळे त्यांनी ते काम केलेले आहे. तरी ही त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्यावर कार्यवाही करण्याची सूचना जिल्हा परिषदेला दिलेली आहे.

समितीने अशी विचारणा केली की, समितीने त्या ठिकाणी कधी भेट दिली होती, समितीने भेट दिल्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस (शोकॉज इश्यु) किती दिवसात द्यायला पाहिजे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, समितीने त्याठिकाणी सप्टेंबर, २०१८ मध्ये भेट दिली होती. याबाबत सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ,ग्रामविकास विभाग यांनी अधिकची माहिती विदित केली की, हे काम सन २०१३-१४ चे आहे. जिल्हा परिषदेने दिनांक १२ जुलै, २०१९ रोजी संबंधितांना कारणे दाखवा (शोकॉज) नोटीस दिली आहे. कारणे दाखवा (शोकॉज) नोटीस लवकरात लवकर द्यायला पाहिजे होती परंतु एवढा विलंब का झाला हे आम्ही त्यांना विचारले नाही.

समितीने विचारणा केली की, मग या विषयावर लवकरात लवकर कारवाई होणे अपेक्षित होते परंतु समितीने साक्ष आयोजित केल्यानंतर नोटीस दिलेली आहे. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ,ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, समितीने ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर आपण लवकरात लवकर कारवाई करायला पाहिजे होती, असे आम्ही जिल्हापरिषदेला सांगितले होते. इतका विलंब का लागला याच्या खुलाश्यासहित संपूर्ण चौकशी करून अहवाल देण्यात यावा. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकची माहिती विदित केली की, दिनांक ११,१२ व १३ सप्टेंबर, २०१८ रोजी पंचायती राज समितीने भेट दिली होती. समितीने जे मुद्दे सांगितले त्याबाबत दोन महिन्यापूर्वी बैठक लावली होती त्याच्या अनुषंगाने कारणे दाखवा (शोकॉज) नोटीस दिलेली आहे. याबाबत एक आठवड्याच्या आत सदर माहिती समितीस अवगत करण्याबाबत आश्वासित केले. पुढे समितीने अशी विचारणा केली की, साक्ष लावल्यामुळे दिनांक १२ जुलै, २०१९ रोजी शोकॉज नोटीस दिली आहे. यामध्ये विलंब झालेला आहे त्याबाबत काय कारवाई केली आहे.

सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी विदित केले की, याबाबतचा खुलासा आम्ही मागवला आहे. एक आठवड्याच्या आत अहवाल देण्याचे त्यांनी कबूल केले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, मोठा अवधी दिल्यानंतरही चार दिवसाच्या आत नोटीस जारी करण्यात आली आहे. यावर तात्काळ कारवाई व्हायला पाहिजे होती. यामध्ये बराच

विलंब झाला आहे. ही शोकॉज नोटीस मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यायची होती तर यांनी विलंब का केला आहे, असे मत व्यक्त केले. समितीने अशी विचारणा केली की, साक्ष लावल्यानंतर या सर्व गोष्टी आधीच अद्ययावत व्हायला पाहिजे होत्या तरी त्या संदर्भात चौकशी केल्यावर त्या चौकशी अहवालामध्ये कोण दोषी आढळून आले आहेत त्यांची नावे समितीस अवगत करण्याबाबत सूचना दिली. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी विदित केले की, यामध्ये निश्चितच विलंब झालेला आहे. एक आठवड्याच्या आत ते माहिती देणार आहेत समितीने ती स्विकारावी अशी विनंती केली.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकची माहिती विदित केली की, दिनांक १२ जुलै, २०१९ रोजी ६ लोकांना कारणे दाखवा (शोकॉज) नोटीस दिलेली आहे. यामध्ये कार्यकारी अभियंता श्री.चौधरी आहेत ते सध्या औरंगाबाद येथे कार्यरत आहे. श्री.वडकुते हे मुख्य लेखा व वित्त अधिकारी आहेत ते सेवानिवृत्त झालेले आहेत आणि श्री.कंगळे हे सहाय्यक लेखा अधिकारी होते ते मयत झालेले आहेत.

समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता यांना फक्त ५ टक्के तपासणीचे अधिकार आहेत. उप अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांचे १०० टक्के तपासणीचे अधिकार आहेत.

सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी विदित केले की, या प्रकरणात विलंब झालेला आहे. संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

तदनंतर समितीने विचारणा केली की, समितीने दौऱ्याच्या वेळी संबंधितावर योग्य ती कारवाई करून अहवाल देण्याबाबत सूचना केली होती. सध्या त्यांच्या विरोधात कारवाई पूर्ण झाली आहे काय ,यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी विदित केले की, संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. तद्नंतर त्यांच्याकडून उत्तर येण्यास वेळ लागणार असल्यामुळे १५ दिवसांचा अवधी देण्यात यावा, अशी विनंती केली.

याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त करून असे निदेश दिले की, जी कारवाई ९ ते १० महिन्यात पूर्ण झालेली नाही. ती आता एक आठवड्यात कशी होईल, सदरहू प्रकरणी कारवाई करून समितीला १५ दिवसात अहवाल सादर करण्यात यावा.

**दिनांक १७ जुलै,२०१९ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

जाऊवाडी जोडरस्ता सुधारणा करणे ग्रा.मा.८६ कि.मी.००/०० ते ०७/७०० च्या कामातील अनियिमितते प्रकरणी तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी व इतर संबंधित दोषी व्यक्तींची सेवा पुस्तिकेत नोंद घेणे, वेतनवाढ रोखणे, कारणे दाखवा नोटीस देणे इ. स्वरूपाच्या नियमानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

जाऊवाडी जोडरस्ता सूधारणा करणे :- हे काम ७०० मीटरचे १५.०० लक्ष रूपयाचे आहे. दि.२६.०२.२०१४ ची कार्यरंभ आदेश असून दि.२९.०३.२०१४ ला काम पूर्ण झाले आहे. त्या कामाचा टेस्ट रिपोर्ट दि.२९.०३.२०१४ चा आहे. काम सूरू करण्याआधी सदर रिपोर्ट यायाला पाहिले परंतू तो काम संपल्यानंतर प्राप्त झाला. झालेल्या अनियमिततेबाबत काय कार्यवाही केली आहे. सदरहू प्रकरणी १५ दिवसाचे आत समितीला अहवाल सादर करावा.

कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, सहा.लेखाधिकारी (बांध) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सहा. लेखाधिकारी (अर्थ) हे प्रथम दर्शनी दोषी दिसतात. तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.वडकूते पी.आर.हे दि.३०.११.२०१४ रोजी सेवानिवृत्त होवून झालेला असल्याने संबंधीतावर अनियमितते बाबत दोषी ठरणार नाहीत. खालील (५) अधिकारी यांना

दि. १२.०७.२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

(१) श्री. चौधरी आर. एम. कार्यकारी अभियंता
(२) श्री. भाटसंगे एस. एम. उपअभियंता
(३) श्री. चव्हाण एम. डी. शाखा अभियंता
(४) श्री. चव्हाण एस. बी. सहा. लेखाधिकारी (बांध)
(५) श्री.गायकवाड पी .एम. सहा. लेखाधिकारी (अर्थ)

अ. क्र. १ व २ वरील श्री.चौधरी व श्री.भाटसंगे हे वर्ग-१ चे अधिकारी असल्यामुळे त्यांच्या विरूध्द कार्यवाही अनुसरणे बाबत या कार्यालयाचे पत्र क्र. ०१८/पिला/बांध/कार्या-३४८७/१९ दि.०५.०८.२०१९ अन्वये मा.सचिव, बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. अद्याप पर्यंत शासनाकडून अहवाल अप्राप्त आहे. मात्र अ.क्र. १ वरील श्री.चौधरी हे मयत झालेले आहेत व अ.क्र.२ वरील श्री.भाटसंगे हे सद्यस्थितीत सेवानिवृत्त झालेले आहेत.

अ. क्र. ३ वरील श्री.एम.डी.चव्हाण शाखा अभियंता यांची या कार्यालयाचे आदेश क्र.जिपला/बांध/कार्या-३/सीआर-४१/कावि-४८४ दिनांक ०९.०४.२०१९ नूसार एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आलेली आहे. तसेच श्री.चव्हाण हे दिनांक ३१.०१.२०२० स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले आहेत.

अ .क्र. ४ व ५ वरील श्री.एस.बी.चव्हाण व श्री.गायकवाड पी.एम.लेखाधिकारी बांधकाम व अर्थ विभाग यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येवून संबंधीताचे खुलासे घेवून या कार्यालयाचे पत्र क्र.०१८/जिपला/बांध/कार्या-३/सीआर/कावि-४८६ दि.०५.०८.२०१९ नूसार संबंधीतावर ठपका ठेवण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सोबत पत्राच्या छायांकित प्रती सादर करण्यात येत आहेत.

तरी कृपया अनुपालन स्विकृत व्हावे ही विनंती.

## अभिप्राय व शिफारशी

ग्रामीण रस्ते विकास व मजबूतीकरण या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जाऊवाडी जोडरस्ता या ७०० मिटर रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रूपये १४,९९,८२६/-इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. या रस्त्याच्या कामाचे कार्यारंभ आदेश सन २०१३ मध्ये काढण्यात आले असुन दि. २९/३/२०१४ रोजी काम पूर्ण करण्यात आले. या कामावर वापरलेल्या साहित्यांचा चाचणी अहवाल दि.२९/३/२०१४ रोजी प्राप्त झाला. म्हणजेच या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर साहित्यांचा चाचणी अहवाल प्राप्त झालेला आहे. तसेच प्रमाणक ४८ दि.१८/०६/२०१४ अन्वये चाचणी अहवाल नसताना सुरक्षा अनामत रक्कम कंत्राटदारास परत करण्यात आली आहे.

कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी त्या कामावर वापरल्या जाणाऱ्या साहित्यांचा चाचणी अहवाल काम सुरू करण्यापूर्वी प्राप्त होणे आवश्यक आहे. साहित्यांचा अहवाल चांगल्या गुणवत्तेचाच येणार असे गृहीत धरुन सदरहू रस्त्याचे काम सुरु करून पूर्ण करण्यात आले आहे.तसेच चाचणी अहवाल नसताना सुरक्षा अनामत रक्कम देखील कंत्राटदारास परत करण्यात आली आहे. अशा त्रुटी असतानाही कार्यकारी अभियंता,बांधकाम समितीस यासंदर्भातील चुकीची माहिती देऊन समितीची दिशाभूल करीत होते. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करून **सदरच्या कामात अनियमितता झालेली असल्याने याची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीस सादर करण्याचे निदेश समितीने दिले.**

या प्रकरणात अनियमितता झालेली असल्याने विभागीय सचिवांची साक्ष दि. १७ जुलै, २०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी समितीच्या निदर्शनास आले की समितीने लातूर जिल्ह्याला माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये भेट दिली होती त्यावेळेस **या प्रकरणातील अनियमितता करणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करून याबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीस सादर करण्याबाबत निदेश दिलेले असतानाही या प्रकरणावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. समितीने विभागीय सचिवांची साक्ष लावल्यानंतर चार दिवसांपूर्वी म्हणजेच** दि. १२ जुलै, २०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये श्री. चौधरी आर. एम. कार्यकारी अभियंता, श्री. भाटसंगे एस. एम. उपअभियंता, श्री. चव्हाण एस.बी. सहाय्यक लेखाधिकारी (बांध.), श्री. गायकवाड पी. एम. सहाय्यक लेखाधिकारी (अर्थ) यांना कारणे दाखवा नोटीस **देऊन कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.**

**सदरचा लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल हा सन २०१३-१४ या वर्षातील असून उपरोक्त अधिकारी कर्मचारी यांनी उक्त वर्षात या प्रकरणी अनियमितता केली असल्याचे दिसून येते असे असूनही सुमारे ५ ते ६ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतर उक्त दोषी कर्मचाऱ्यांना समिती जिल्हा दौऱ्यावर परिक्षणासाठी आली असतानाच्या पार्श्वभूमीवर संबंधितांना नोटीस देणे ही बाब अत्यंत गंभीर असून वरिष्ठांचे अशा अनियमिततेला समर्थनच असल्याचे समितीला प्रकर्षाने दिसून येते. या प्रकरणी प्रशासनाद्वारे दोषींना पाठीशी घालण्याचा प्रकार दिसून येतो. सदरची बाब पारदर्शी प्रशासनासाठी अत्यंत गंभीर आहे. लेखा आक्षेपात नमूद दोषींवर आरोप ठेऊनही त्यांना विलंबाने नोटीसा देणे व मोठ्या कालावधीसाठी कारवाईपासून अभय देणे म्हणजेच अशा दोषीत कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणे होय. यामुळे गैरव्यवहार किंवा अनियमितता**

**करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कोणीही काहीही करु शकणार नाही, ही भावना त्यांच्यात वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी अशा अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द देखील कारवाई करणे आवश्यक होते पण तशी कारवाई केली नाही. विलंबाने नोटीसा पाठविलेल्या अशा सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषीतांवर जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी तेथील रस्ते चांगल्या दर्जाचे असणे अत्यावश्यक आहे. या योजनांसाठी दिला जाणारा पैसा हा सर्वसामान्य जनतेचा आहे. या निधीचा योग्य विनियोग करण्याची जबाबदारी शासन म्हणून प्रत्येक अधिकाऱ्याची आहे. परंतु या प्रकरणात संबंधित कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले व सदरहू काम निकृष्ट झाले तरी त्यांच्यावर कारवाई होणार नसेल तर हा जनतेच्या पैशाचा अपव्यय होणार असल्याने व त्यामुळे संबंधित दोषी कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढणार असल्याने या प्रकरणात उशीराने कारवाई सुरू केल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून तातडीने कारवाई करावी व याबाबतचा अहवाल १५ दिवसांच्या आत समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले.**

त्यानुसार सादर करण्यात आलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता, सहा. लेखाधिकारी(बांध.) व सहा. लेखाधिकारी (अर्थ) यांना दिनांक १२ जुलै २०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. वडकूते पी.आर. हे दिनांक ३० नोव्हेंबर २०१४ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने ते दोषी ठरणार नाहीत. श्री. चौधरी व श्री. भाटसंगे हे वर्ग - १ चे अधिकारी असल्याने त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आला आहे. श्री. चौधरी हे मयत झाले असून श्री. भाटसंगे हे सद्यःस्थितीत सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच श्री. एम.डी. चव्हाण, शाखा अभियंता यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली असून ते दि. ३० जानेवारी २०२० रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले आहेत श्री. एस. बी. चव्हाण सहा. लेखाधिकारी (बांध) व श्री. गायकवाड पी. एम. सहा. लेखाधिकारी (अर्थ) यांचे खुलासे घेऊन त्यांच्यावर ठपका ठेवण्याची कारवाई करण्यात आली आहे.

**ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेअंतर्गत रस्त्यांची कामे उत्कृष्ट दर्जाची होण्यासाठी कामांचा दर्जा व गुणवत्ता ही शासनाने निर्गमित केलेल्या मानकांप्रमाणेच असावीत. यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ च्या नियम, ८७ अन्वये कामाची सुरूवात होण्यापूर्वी त्या कामावर वापरण्यात येणाऱ्या सर्व सहित्यांचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्या नंतरच काम सुरू करण्यात यावे व चाचणी अहवाल गुणवत्तापूर्ण प्राप्त झाल्याचे खात्री पटल्यावरच कंत्राटदारास अनामत रक्कम परत करण्यात यावी. याबाबतची कार्यपध्दती अवलंबण्याबाबत संबंधितांना सक्त सूचना देण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, लातूर

## मौजे वाघमारी तांडा (ता.जळकोट) येथील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा

## या कामातील अनियमितता

**परिच्छेद क्र. ३.६३२ (सन २०१३-२०१४)**

जिल्हा परिषद लातूर, सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक ३)- मौजे वाघमारी तांडा (ता.जळकोट) कोल्हापुरी बंधारा या कामावर निवड महात एकूण रक्कम रुपये १४,३२,४१५/- एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र६८०/वित्त- ९,दिनांक १९ मार्च, २०१२ मधील टीप १ नुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्विकारलेची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

(२) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली, १९८४ चे नियम २९६ (२) नुसार माहे फेब्रुवारी व मार्च महिन्यात कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यास प्रतिबंध आहे. असे असताना सदरील कामाचे कार्यारंभ आदेश माहे फेब्रुवारी मध्ये देऊन नियमांचे उल्लंघन करण्यात आलेले आहे.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली, १९८४ मधील परिशिष्ट क्रमांक १२ नियम १० नुसार निविदेतील प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आवश्यक आहे तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही.

(४) सदर निविदेतील विवरणपत्रामधील माहिती निविदाकारानी भरलेली नाही तसेच निविदाकराकडील उपलब्ध अवजारे, संयंत्रे, तांत्रिक कर्मचारी, मजूर इत्यादी बाबी त्याच्याकडे असल्याबाबत अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/ प्र.क्र.४७२/ वित्त-९ (३३) दिनांक ९ फेब्रुवारी २००९ मधील परिच्छेद क्रमांक ६ नुसार ज्या ग्रामपंचायतीकडे अवजारे यंत्रे नसतील वा भाडयाने घेणे शक्य नसतील तर अशा ग्रामपंचायतींनी कामे घेतल्यास सदरचे काम त्यांनी मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंते, सहकारी सेवा संस्था व स्थानिक मक्तेदाराकडून जाहीर निविदा मागवून कामे करून घ्यावीत असे नमुद आहे. तथापि, अशी साधन सामग्री किंवा अवजारे ग्रामपंचायती कडे असल्याची तसेच जाहीर निविदा मागवून कामे करून घेतल्याची कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

(६) सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५४ पान क्र १३ वर अभियंता यांनी नोंदविलेल्या मोजमापाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की बाब क्र.४ providing & laying m-१०० cement concrete & form metal (HT & piers mt no of ५ )च्या कामात अंकगणित गणना चुकीमुळे रक्कम परिणामात वाढ झालेली आहे त्यामुळे रक्कम रुपये ५३,३४८/- चे जादा प्रदान झालेले आहे. सदरील बाबीची ५% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी ८ घनमीटर चेक म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. कार्यकारी अभियंता यांनी अंकगणितीय गणना चुक असताना सदर बाबत ८ घनमीची फक्त तपासणी कशी केली आहे.

(७) महाराष्ट्र शासन राजपत्र विक्रीकर आयुक्त मुंबई यांची अधिसूचना दिनांक ४ एप्रिल, २०१२ नुसार मूल्यबर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून २% प्रमाणे मूल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा व मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्रादारांकडून ५% प्रमाणे मूल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा सदरील कामाचे देयकातून ५% प्रमाणे रक्कम रुपये ७१,६२१/- एवढा मूल्यवर्धित कर वसूल करणे आवश्यक असताना देयकातून रक्कम रूपये ४,८७५/- एवढा वसूल केला आहे. तरी देयकातून कमी कपात झालेली मूल्यवर्धित कराची रक्कम रूपये ६६,७४६/- संबधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १४७ अन्वये प्रत्येक करार नमुना ४८ मधील नोंदवहीत नोंदवून कंत्राटदाराला दिलेल्या रकमेची नोंद ही नोंदवहीत करणे आवश्यक असताना नमुना नंबर ४८ ठेवण्यात येवून कराराच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

(९) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक विकास -२०११ / प्र.क्र.२१७ / पं. रा ८ दिनांक १५ नोव्हेंबर २०११ मधील अनुक्रमाक ४ नुसार ग्रामपंचायत स्वतः काम करणार असल्यास व कंत्राटदार नेमणार नसल्यास खरेदी करावयाच्या मटेरियलच्या प्रत्येक बाबी जर साहित्याची किंमत रुपये एक लाखापेक्षा जास्त असल्यास खरेदी ई-निविदेव्दारे करणे आवश्यक आहे व त्या पेक्षा कमी किंमतीची सामुग्री किमान तीन कोटेशन मागवून व आय.एस.आय मार्क प्रतिची खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

(१०) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०००/ ३३/४४, दिनांक २२ डिसेंबर २००० नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणाऱ्या अभियंता यांनी मोजमापाचे नोंदी घेतल्यानंतर मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

(११) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम ६७ नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना क्रमांक २३ मध्ये घेणे आवश्यक असताना व नमुना क्रमांक २३ मध्ये कामाच्या प्रगतीच्या नोंदी घेणे आवश्यक असताना नमुना क्रमांक २३ मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

(१२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नंबर ६९ मध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना नमुना नंबर ६९ मध्ये नोदंवही ठेवण्यात आलेली नाही.

(१३) ग्रामपंचायतीस रक्कम मिळाल्या बाबत नमुना नंबर ७ ची सामान्य पावती घेण्यात आली नाही.

१४) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. लपायो-१००२/प्र.क्र. १५६/जल- ३ मुंबई दिनांक ५ मे २००३ अन्वये सुचित केल्याप्रमाणे साठा बंधारा काम पुर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्ती करीता ग्राम पंचायतीकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे परंतु विभागाकडून अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

(१५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम ८७ अन्वये कामासाठी वापरलेले साहित्य विनिर्देश प्रमाणे वापरले बाबत व साहित्य दर्जेदार असले बाबत चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतु चाचणी अहवाल संचिकेत आढळून आला नाही त्यामुळे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार बाबनिहाय दर्जेदार साहित्य वापर करून काम केल्याची खात्री करता आली नाही.

(१६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १८० नुसार अंतिम मोजमाप घेऊन रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमापावर लाल शाईने कर्ण रेषा मारावयास पाहिजे परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

(१७) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्ही पीएम १०९९/प्र.क्र.५४/०८, दिनांक २० मे १९९९ कामाची माहीती फलक बसविणे आवश्यक असताना नामफलक बसविण्यात आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्विकारल्याची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्याविषयी यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

(२) सदरील काम पावसाळयापुर्वी पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे कामाचे आदेश व कामाची निकड लक्षात घेता व सदरचे काम जून २०१३ पुर्वी करून घेणे आवश्यक असल्यामुळे कामाचे आदेश फेब्रुवारी मध्ये देण्यात आलेले असून सदर काम दिनांक २० मे २०१३ ला पुर्ण झालेले आहे.

(३) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

(४) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीकडे कर्मचारी/मजूर/औजारे उपलब्ध नव्हते तरी ग्राम पंचायतीने सयंत्रे भाडयाने घेऊन व रोजंदारीवर कुशल मजुर लावून काम पूर्ण केलेले आहे.

(५) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीकडे कर्मचारी/मजूर/ औजारे उपलब्ध नव्हते तरी ग्राम पंचायतीने सयंत्रे भाडयाने घेऊन व रोजंदारीवर कुशल मजूर लावून काम पुर्ण केलेले आहे.

(६) परिमाणात अंकगणितीय गणना चुकीची केल्यामुळे संबंधित तत्कालिन शाखा अभियंता यांच्या वेतनातुन कपात करून संबंधित लेखाशिर्षावर जमा करण्यात आली आहे

(७) सदरचे काम ग्राम पंचायतीना कामाचे आदेश देण्यात येऊन काम पूर्ण करून घेण्यात आले. मा. अप्पर विक्रीकर आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. दिनांक ४ जून २०१३ अन्वये ग्राम पंचायतीकडून मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करू नये अशा सुचना असल्याने कपात केलेली नाही.

(८) आक्षेपात नमुद करण्यात आले प्रमाणे सदरील कामाची नोंद नमुना नंबर ४८ मध्ये घेण्यात आलेली आहे.

(९) कामाच्या प्रगतीनुसार व आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करण्यात येऊन वापरण्यात आलेले आहे. यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

(१०) मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणा-या अभियंता यांनी मोजमापाच्या नोंदी घेतल्यानंतर मोजमाप पुस्तिकेत सद्यःस्थितीत दिनांकित स्वाक्षरी करण्यात आलेली आहे. यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

(११) आक्षेपात नमुद करण्यात आलेले प्रमाणे नमुना नं २३ मध्ये कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली आहे.

(१२) बांधकामाची नोंद नोंदवही नमुना नं. ६९ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

(१३) ग्राम पंचायतीस रक्कम मिळाल्याबाबत नमुना नं.७ ची सामान्य पावती प्राप्त करून घेण्यात आलेली आहे.

(१४) आक्षेपात नमुद केलेप्रमाणे ग्रामपंचायत हस्तांतरण प्रमाणपत्र सद्यःस्थितीत सोबत जोडण्यात आलेले आहे.

(१५) सदरील बाबतीत संबंधित उप अभियंता यांनी साहित्य दर्जेदार असलेबाबत व विनिर्देशाप्रमाणे साहित्य वापरले बाबत मोजमाप पुस्तिकेत प्रमाणित केलेले आहे.

(१६) आक्षेपात नमूद केलेप्रमाणे सद्यःस्थितीत लाल शाईने कर्णरेषा ओढण्यात आलेली आहे.

(१७) आक्षेपात नमूद करण्यात आले प्रमाणे नामफलक बसविण्यात आलेला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर,२०१८ रोजी साक्ष घेतली . साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,सदर काम दिनांक २० मे २०१३ रोजी पूर्ण केले आहे. तर कामाचे अंतिम देयक केव्हा अदा केले व रक्कम रुपये ५३,४४८/- शाखा अभियंता यांचेकडून केव्हा वसूल केले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की,(ऑडीट) लेखा परिक्षणानुसार ५३,४४८/- ही रक्कम वसूल करण्यास सांगितले होते, त्यानुसार (ज्युनिअर) उप अभियंता यांच्याकडून सदर रक्कम वसूल केली आहे.यावर समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये चूक कोणाची होती, लोकसहभागातून लोकवर्गणी जमा करण्यात आली होती काय, मोजमाप पुस्तिकेत चुकीच्या नोंदी घेतल्या होत्या काय, मोजमाप करण्याचे काम उप अभियंता यांच्याकडे असते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, उप अभियंता यांच्यास्तरावरून ५० टक्के कामाची तपासणी करण्यात येते. उप अभियंता यांनी १०० टक्के कामाची तपासणी करावयाची असते. मोजमाप पुस्तिकेत कामाची उंची, लांबी व रुंदी अशा सर्व बाबी नमूद केलेल्या असतात. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. समितीने अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता ५ टक्के कामाची तपासणी करतात . कामाची १०० टक्के तपासणी करण्याची जबाबदारी उप अभियंता यांची आहे. शाखा अभियंता किंवा उप अभियंता यापैकी ज्यांनी चूक केली त्यांच्याकडून वसुली (रिकव्हरी) झाली पाहिजे. संबंधितांवर जबाबदारी निश्चित (फिक्स) केली पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वेगवेगळ्या कामांबाबत वेगळी कार्यवाही करण्यात आलेली आहे. या प्रकरणात नियमाप्रमाणे वसुली करण्यात आलेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, पंचायत समितीचे कामकाज उप अभियंता यांच्याकडे असते. शाखा अभियंता यांच्याकडून रक्कम वसूल केली असे आपण सांगत आहात म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देण्यात येत आहे. ही बाब त्याच वेळी (ऑडीटर) लेखा परिक्षकांसमोर का सांगण्यात आली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्टीकरण दिले की, ही बाब आता लक्षात आल्यामुळे वसुली करण्यात आली आहे. शाखा अभियंता श्री. हशमी यांच्याकडून सदर रक्कम वसूल करण्यात आली आहे.

समितीने असे उदाहरण दिले की, शाळा तपासणी करताना काही चुकीचे आढळल्यास आपण शिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी संबंधित मुख्याध्यापक यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करतो.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी येथे चूक झालेली आहे, परंतु संबंधितांकडून रक्कम वसूल करण्यात आलेली आहे, असे समितीस सांगितले. यावर समितीने अशी विचारणा केली की, अपर विक्रीकर आयुक्त, नागपूर यांच्याकडून ग्राम पंचायतीकडून मूल्यवर्धित कराची रक्कम कपात करू नये अशा सूचना असल्याने कपात केलेली नाही. आयुक्त यांनी या सूचना कशाच्या आधारावर दिलेल्या आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अपर विक्रीकर आयुक्त नागपूर, यांनी जिल्हाधिकारी भंडारा, यांना ग्रामपंचायत विकास कामाच्या संदर्भात विक्रीकर कपात करू नये अशा सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार या प्रकरणात कार्यवाही करण्यात आली आहे

समितीने अशीही माहिती दिली की,जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत ग्रामपंचायतीकडून विक्रीकराची रक्कम कपात केली नाही याबाबत कॅगने आक्षेप घेतला होता. असे उत्तर आल्यानंतर याबाबत समिती सदस्यांनी शासनाकडे पाठपुरावा करून ग्रामपंचायतीच्या विकास कामाच्या संदर्भात विक्रीकराची रक्कम कपात करू नये असे (सर्क्युलर) परिपत्रक काढून घेतले आहे. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीला असे विदित केले की, विक्रीकर कपात करू नये असे दिनांक १२ मे २०१६ चे परिपत्रक आहे. ग्रामपंचायत एजन्सी असेल तर विक्रीकर कपात करू नये. असे परिपत्रकात नमूद केले आहे. समितीने अशीही विचारणा केली की, जेवढा निधी कापण्यात आला तेवढा निधी वसूल करण्यात येणार आहे काय जो विक्रीकर कापण्यात आला तो परत करणार आहात काय, कॅगच्या अहवालानुसार स्थानिक संदर्भ पाहून सूट दिली आहे. ग्रामीण भागात निविदा (टेंडर) न काढता थेट कार्यारंभ आदेश (डायरेक्ट वर्कऑर्डर) दिला जातो. अशा प्रकारे कंत्राट देऊन त्यांची नोंद घेतली जाते. सरपंच यांच्या नावाने चेक वटविला जातो. थेट कार्यारंभ आदेश (डायरेक्ट वर्क ऑर्डर) दिल्यामुळे विक्रीकर कपात करण्याची आवश्यकता नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ग्रामपंचायतीकडून नवीन करारनामा केला जातो. ५० हजार रुपयांपासून १५ लाख रुपयांची कामे असतील तर विक्रीकराची कपात करता येत नाही. ५० हजार रुपयांपासून बी-१ (टेंडर) निविदा काढण्यात येते. करार करताना ग्रामपंचायत एजन्सी असते व ग्रामपंचायतीला काम देण्यात यावे असे म्हटलेले आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ग्रामपंचायतीची कामे करताना ३३/३३/३४ याप्रमाणात केली जातात, यासाठी करारनाम्याची आवश्यकता आहे. ठेकेदार ग्रामपंचायतीसोबत करारनामा करतात. स्थानिक स्वराज्य संस्थांना विक्रीकर देय होत नाही. आता सीएसटीमुळे ग्रामपंचायतीला करारनामा करावा लागतो. या विषयावर ग्राम विकास विभागाचे उप सचिव यांना समितीला मार्गदर्शन करण्याबाबत सूचना दिली. ग्रामविकास विभागाचे उप सचिव यांनी समितीस माहिती दिली की, प्रत्येक उप सचिवांकडे वेगवेगळा पदभार आहे, समितीच्या सर्व शिफारशीबाबत संबंधितांशी कम्युनिकेशन करून ग्रामपंचायतीला डायरेक्शन देण्यात येत आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की,या विषयाचा पाठपुरावा सन २०१२ पासून केला जात आहे. तरी देखील शासनाकडून दखल घेतली जात नाही. पंचायत राज समितीने करारनामा करू नये असे सांगितले आहे. यावर विभागाने असे सांगितले की, करारनामा करण्यास आक्षेप घेण्यात आलेला आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, मौजे वाघमारी तांडा तालुका जळकोट कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा या कामात झालेली अनियमितता या विषयाबाबत सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली. अनियमितते संदर्भात ज्युनिअर इंजिनिअर यांच्यावर कारवाई केली आहे. कामाची १०० टक्के तपासणी उप अभियंता यांची असते. या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. अशा प्रकारची प्रकरणे पूर्ण राज्यात आहेत. विक्रीकर कापण्याच्या संदर्भात अनियमितता झालेली आहे. ग्रामपंचायतीमधील कामामध्ये विक्रीकर कपात करु नये यासंदर्भातील संपूर्ण चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा त्याचप्रमाणे या विषयाबाबत संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्याबाबत सूचित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

(१) मौ. वाघमारी तांडा ता.जळकोट कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा कामातील अनियिमितते प्रकरणी ग्रा.पं.मधील कामांमध्ये विक्रीकर कपात करू नये.

(२) यासंदर्भात दिनांक १२ मे २०१६ रोजीचे विक्रीकर विभागाचे परिपत्रक असताना ही विक्रीकराची कपात करण्यात आली आहे, याबाबतची संपूर्ण चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीसह चौकशी अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

मौ. वाघमारी तांडा-ता. जळकोट कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा या कामाचे प्रथम धावते देयक अदाईच्यावेळी मा. अप्पर विक्रीकर आयुक्त, नागपूर यांचे परिपत्रक क्र. दिनांक ४ जून २०१३ या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हते. त्यामुळे पहिल्या धावत्या देयकातून रुपये ४,८७५/- वसुली करून शासनखाती जमा केलेले आहेत. मात्र सदरचे परिपत्रक अंतिम देयक अदाई करते वेळेस उपलब्ध झाल्यामुळे उर्वरित विक्रीकराची रक्कम वसुली करण्यात आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :—**जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :—**जिल्हा परिषदेच्या कार्यवाहीस विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट,२०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मौ.वाघमारी तांडा, ता.जळकोट कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा कामातील अनियमितेसंदर्भात दिनांक १२ मे, २०१६ रोजीचे विक्रीकर विभागाचे परिपत्रक असताना विक्रीकराची कपात करण्यात आली. या प्रकरणी चौकशी केली आहे का, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले, यावर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, सदर कामाची प्रशासकीय मान्यता दिनांक २७/११/२०१२ रोजी झाली. दिनांक ३/१२/२०१२ रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली. त्याकरिता १७.३६ लाख रुपये अंदाजपत्रकीय रक्कम होती. तांत्रिक मान्यता १५.४८ लाख रुपयांची होती. दिनांक १६/२/२०१३ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात आला. दिनांक २०/५/२०१३ रोजी काम पूर्णत्वाचा दाखला मिळाला. माहे मार्च, २०१४ मध्ये कामाचे अंतिम देयक देण्यात आले. त्यामुळे यात सन २०१६ मधील परिपत्रकाचा प्रश्न येत नाही.

संचालक, स्थानिक निधि लेखा परिक्षा संचालनालय यांनी समितीस अशी माहिती दिली की, सदर परिच्छेदामध्ये दिनांक ४/४/२०१२ रोजीच्या परिपत्रकासंबंधी आक्षेप आहे. मूळ आक्षेप सन २०१६ च्या परिपत्रकानुसार आहे. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस विदित केले की, दिनांक ४/६/२०१३ रोजीचे परिपत्रक आल्यानंतर एक देयक अदा करण्यात आले. त्यावेळी विक्रीकर कपात करण्यात आला होता. परंतु या प्रकरणामध्ये दिनांक ३१/३/२०१३ रोजी पहिले व दुसरे देयक आणि दिनांक २९/३/२०१४ रोजी तिसरे देयक देण्यात आले. दिनांक ४/६/२०१३ रोजी परिपत्रक आल्यानंतर दिनांक २९/३/२०१४ रोजी त्यांनी विक्रीकर कपात केली. त्यामुळे या परिच्छेदामधील घेतलेले (ऑब्जेक्शन) आक्षेप उलट दिसत आहे. यावर संचालक,स्थानिक निधी यांनी स्पष्ट केले की, विक्रीकर आयुक्त यांची अधिसूचना दिनांक ४ एप्रिल २०१२ नुसार मुल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदारांकडून २ टक्केप्रमाणे आणि न नोंदणी झालेल्या कंत्राटदारांकडून ५ टक्क्यांप्रमाणे व्हॅट वसूल करण्यात यावा. त्याप्रमाणे वसुली झालेली आहे. त्यामुळे हा संदर्भ दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजीचा आहे. मूळ आक्षेपामध्ये सन २०१२ च्या परिपत्रकाचा उल्लेख आहे. समितीने असे स्पष्ट केले की, आक्षेप तो होता म्हणून त्यावेळी प्रश्न निघाला आहे. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस विदित केले की, या जिल्हा परिषदेला पहिल्यांदा ४ जून २०१३ रोजी कळले आणि त्यानंतर त्यांची कपात केली.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, **महाराष्ट्र शासन, राजपत्र,** विक्रीकर आयुक्त, मुंबई यांची अधिसूचना दिनांक ४.४.२०१२ नुसार मुल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून २ टक्के मुल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा व मुल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून ५ टक्के मुल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा. सदरील कामांची देयकातून ५ टक्केप्रमाणे रक्कम रुपये ७१,६२१/- एवढा मुल्यवर्धित कर वसूल करणे आवश्यक असताना देयकातून रक्कम रुपये ४८७५/- वसूल केली आहे. तरी देयकातून कमी कपात झालेली मुल्यवर्धित कराची रक्कम ६६,७४६/- रुपये संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. त्यावेळी जिल्हा परिषदेने समितीला असे उत्तर दिले होते की, सदरचे काम ग्रामपंचायतींना कामाचे आदेश देऊन काम पूर्ण करून घेण्यात आले. माननीय अपर विक्रीकर आयुक्त, नागपूर यांचे पत्र दिनांक ४.६.२०१३ अन्वये ग्रामपंचायतीकडून मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करु नये, अशा सूचना असल्यामुळे कपात केलेली नाही. यामध्ये शासनाची अधिसूचना असे म्हणते की जो शिल्लक राहिलेला मुल्यवर्धित कर रक्कम रुपये ६६,७४६/- वसूल करावा आणि इकडे हे पत्र कपात करु नका असे म्हणते. त्यामुळे यामध्ये परस्पर विरोधाभास (कॉन्ट्रॅडीक्शन) आहे.

यावर विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, यामध्ये भरपूर परस्पर विरोधाभास (कॉन्ट्रॅडीक्शन) आहे आक्षेपामध्ये दिसत आहे की, कपात करायला नको होती, इथे कपात केली आहे. त्यामुळे मूळ आक्षेप (ऑब्जेक्शन )काही तरी वेगळेच आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, अतिरिक्त विक्रीकर आयुक्तांचे परस्पर विरोधाभास (कॉन्ट्रॅडीक्शन) आहे. शासन अधिसूचना तर वसूल करावी असे म्हटले. आता आपण काय ग्राह्य धरावे, यावर विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, असे दोन प्रकारचे विषय आहेत. आपण जर १२ मे २०१६ चे परिपत्रक वाचले तर त्यामध्ये कंत्राटदार आणि पुरवठादार या दोघांमध्ये फरक केलेला आहे. ग्रामपंचायत जर मजूर लावत असेल आणि पुरवठादार असेल तर तर कपात करायची नाही आणि जेव्हा कंत्राटदार नेमला असेल तर तेव्हा कपात करायची. यामध्ये सुध्दा २ भाग आहेत. कंत्राटदार जीएसटीमध्ये नोंदणीकृत असेल तर २ टक्के आणि नोंदणीकृत नसेल तर ५ टक्के असे ते परिपत्रक आहे. मात्र हे मे २०१६ मध्ये स्पष्ट झाले. यामध्ये ज्या काही चुका झाल्या असे आपले म्हणणे असेल तर ते सन २०१३ मध्ये झाले आहे. आता आपण वसूल करु नये यासंबंधी चर्चा करीत आहोत आणि मुळ जे होते त्यानुसार वसूल करायला पाहिजे, एवढा फरक पडलेला आहे. जर वसुली करावी लागेल तर ती सन २०१६ च्या परिपत्रकाप्रमाणे करावी लागेल. कारण २०१२ मध्ये तेवढी स्पष्टता नसेल. ग्रामविकास विभागाचे परिपत्रक सन २०१६ मध्ये निघाले आहे. आता ते करावे लागेल की नाही किंवा तो पुरवठादार आहे किंवा नाही हे सर्व तपासून काम करावे लागेल. यावर समितीने अशी विचारणा केली की, अपर विक्रीकर आयुक्त यांनी जे पत्र दिले आहे ते कशाच्या आधारे दिले आहे त्याबद्दल त्यांच्याकडून चौकशी करून स्पष्टीकरण घ्यावे. यावर विभागीय सचिवांनी असे स्पष्ट केले की, विक्रीकर आयुक्त तर ॲथॉरिटी आहेत आणि त्यामुळे आपण त्यांना प्रश्न विचारु शकत नाही. कारण एका कामाचा मुद्दा नाही. त्यामध्ये सर्व गोष्टी समाविष्ट आहेत आणि ग्रामविकास विभाग त्यासाठी सक्षम नाही. हे वित्त विभागाने काम बघायला हवे. ग्रामविकास विभाग त्यासाठी ऑथराईज नाही. जीएसटी विभाग काही चूक करीत असेल तर त्याबाबत वित्त विभागाने चौकशी करायला हवी आणि त्याचा खुलासा केला पाहिजे. या दोन्ही परिपत्रकापैकी कोणते मानायचे याबाबत कार्यवाही करून ते जे सांगतील ते मान्य करावे व त्याप्रमाणे आपल्या स्तरावर कार्यवाही करा आणि समितीला अहवाल देण्याबाबत सूचना केली यावर विभागीय सचिवांनी होकारात्मक आश्वासन दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ या वर्षात मौजे वाघमारी तांडा (ता. जळकोट) येथील कोल्हापूरी बंधारा या कामासाठी रूपये १४ लाख ३२ हजार ४१५ इतका खर्च झालेला आहे. या कामाच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५४ पृष्ठ क्र.१३ वर नोंदविलेल्या मोजमापाची अंकगणितीय गणना चुकीमुळे रक्कम परिमाणात वाढ झाल्याने रूपये ५३,३४८/- इतकी जादा रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. सदरील बाबीची ५ टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी ८ घनमीटर तपासणी म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. तसेच मूल्यवर्धित कर अधिनियमानुसार या कामाच्या कंत्राटदाराच्या देयकातुन ५ % प्रमाणे रूपये ७१,६२१/- एवढा मुल्यवर्धित कर वसूल करणे आवश्यक असताना देयकातून रूपये ४,८७५/- इतकी रक्कम वसूल केलेली असल्याने कंत्राटदाराकडून रूपये ६६,७४६/- इतकी रक्कम वसूल करून शासनाच्या खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

याबाबत घेण्यात आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीत समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, रक्कम परिमाणात अंकगणितीय गणना चुकीची केल्यामुळे संबंधित तत्कालीन शाखा अभियंता यांच्या वेतनातून रूपये ५३,३४८/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून सदरच्या लेखाशिर्षावर जमा करण्यात आलेली आहे. १०० टक्के कामाची तपासणी करणे उप अभियंता यांची जबाबदारी असताना शाखा अभियंता यांच्यावर कारवाई करण्यात आलेली असल्याने याबाबत समितीने नापसंती व्यक्त करून मुल्यवर्धित कर वसूलीबाबत झालेल्या अनियमिततेची चौकशी करून संबंधीत दोषीवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश दिले.

या प्रकरणाबाबत घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी, असे निदर्शनास आणले की, '**महाराष्ट्र शासन, राजपत्र,** विक्रिकर आयुक्त, मुंबई यांच्या दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजीच्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धित कर अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून २ टक्के मुल्यवर्धित कर तर नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून ५ टक्के मुल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा अशी तरतूद आहे. तसेच अप्पर विक्रिकर आयुक्त, नागपूर यांच्या दिनांक ४ जून, २०१३ रोजीच्या पत्रान्वये ग्रामपंचायतीकडून मुल्यवर्धित कराची रक्कम वसूल करण्यात येऊ नये अशी सुचना असल्याने कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तथापि, सदरचे पत्र प्राप्त होण्यापूर्वी रूपये ४,८७५/- इतक्या मुल्यवर्धित कराची रक्कम वसूल करून शासन खाती जमा केलेली आहे' याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ४/४/२०१२ रोजीच्या राजपत्रानुसार मुल्यवर्धित कर नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून २ टक्के प्रमाणे व नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून ५ टक्के प्रमाणे वसूल करायचा आहे. अप्पर विक्रिकर आयुक्त, नागपूर यांच्या दिनांक ४/६/२०१३ रोजीच्या पत्रात नमुद केले आहे की, ग्रामपंचायतीकडून केलेल्या कामांवर मुल्यवर्धित कर वसुल करण्यात येऊ नये. या दोन्ही बाबींमध्ये विसंगती आढळून येत असून परस्पर विरोधाभास (Contradiction) निदर्शनास येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींनी मजुर लावून काम केले व पुरवठादार म्हणून असेल तर मुल्यवर्धित कराची कपात करावी किंवा कसे, अथवा ग्रामपंचायतींनी कंत्राटदार नेमून काम केले असेल तर कराची कपात करावी किंवा कसे याबाबतची स्पष्टता नाही. यास्तव वित्त विभागाने या बाबींचा सर्वोतोपर विचार करून मुल्यवर्धित कर कपातीसंदर्भातील कार्यपद्धती स्पष्ट होण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करून यासंदर्भातील सुचना संबंधितांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीस सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, लातूर

## मौजे मांजरी (ता.लातूर) येथील पाणी पुरवठा योजनेअंतर्गतच्या कामातील अनियमिततेबाबत.

**परिच्छेद क्रमांक - ३.७३५ (०६) (सन २०१३-२०१४)**

जिल्हा परिषद लातूर, सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्रमांक ६) मौजे मांजरी, ता. लातूर पाणीपुरवठा कामास सन २००७-२००८ या वित्तीय वर्षात मंजूरी मिळाली असून काम २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात पूर्ण झाल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

१. शासन परिपत्रक क्रमांक ग्रा.पा.धो.-१११/प्र.क्र.५०/पापु ०७, दिनांक २०/४/२०१२ च्या अनुक्रमांक ५ नुसार मंजुर कामाची मुदत ही जास्तीत जास्त ३ ते ६ महिन्याची असावी व त्यापेक्षा जास्त असल्यास तसा उल्लेख करावा असे स्पष्ट असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. कामास मुदतवाढ घेतल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

२. अध्यक्ष / सचिव पाणीपुरवठा समिती रामलिंग मुदगड यांनी कामाच्या विवरणपत्रा मधील माहिती भरलेली नाही.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५० नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करून त्याचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. नियमातील तरतूदी नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५३ (१) नुसार मान्यता प्राप्त विनिर्देशानुसार काटेकोरपणे बांधकाम पार पाडणे ही जबाबदारी सक्षम तांत्रिक अधिकारी यांची असताना देखील अंदाजपत्रकीय तरतूदी नुसार कामे पार न पाडता कमी जास्त बाबीचे करण्यात आले आहेत.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६४ मध्ये नमूद केल्या प्रमाणे मोजमाप पुस्तक हा अतिशय महत्वाचा अभिलेख असून, परिमाणांच्या सर्व हिशेबाचे आधार असतात, बांधकाम चटकन ओळखता यावे यासाठी मोजणी केलेल्या बांधकामाचा पूर्ण तपशिल आणि नाव मोजणी पुस्तकात देणे आवश्यक आहे. परंतू मूळ मोजमाप पुस्तिका लेखा परीक्षणास दर्शविली नाही.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६६ (अ) (३) नुसार मोजणी बाबतची प्रत्येक नोंद करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तक लिहिण्याची दक्षता घेण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १८० अन्वये मोजणी केलेल्या देयकाचे प्रदान करण्यात येतील, त्यावेळी तपशिलवार मोजणी असलेले पृष्ठ लाल शाईने कर्ण रेषा ओढून, खोडून टाकणे आवश्यक आहे. लेखा संहिता नियम ३७ (१) नुसार प्रत्येक देयकाची लेखा विभागाने छाननी करणे आवश्यक असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ३७ (२) नुसार पूर्तता केल्यानंतर देयके पारित करणे क्रमप्राप्त आहे. तथापि, नियमातील तरतूदी नुसार कार्यवाही न करता देयकाचे प्रदान करण्यात आलेले आहे.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ अन्वये कामासाठी वापरलेले साहित्य विनिर्देशाप्रमाणे वापरले बाबत व साहित्य दर्जेदार असले बाबत चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ६७ नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नं. २३ मध्ये घेणे आवश्यक असताना नमूना नं. २३ मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवणेत आलेली नाही.

९. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नं. ६९ मध्ये घेणे आवश्यक असताना, नमुना नंबर ६९ मध्ये नोंदवही ठेवणेत आलेली नाही.

१०. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-१०९९/प्र.क्र.५४/०८, दिनांक २०/५/१९९९ मधील परिच्छेद (ब) नुसार सर्व प्रकारच्या नविन आणि दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी नामफलक बसविण्याचे छायाचित्र आढळून आले नाही.

११. पाईपलाईन बांधकाम काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्ती करीता ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. परंतू अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

१२. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक-बीडीजी-२००५/ प्र.क्र.३२४/इमारती दिनांक ३/३/२००६ अन्वये मुल्यवर्धीतकर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडुन किंवा समितीकडून करार किंमतीच्या पाच टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

१३. महाराष्ट्र शासन उद्योग व कामगार विभाग परिपत्रक क्रमांक बीसीए/२००७/प्र.क्र.७८८ कामगार ७ अ, दिनांक २६/१०/२००९ नुसार १ टक्का कामगार कल्याण उपकर बांधकामाच्या एकूण मुल्यांकनाच्या (जमिनीचे मुल्य वगळून) वसूल करणे आवश्यक आहे. परंतु अशी कपात विभागाने केलेली नाही.

१४. आयकर अधिनियम, १९६१ चे कलम १९४ सी नुसार गुत्तेदाराचे देयकातून आयकराची रक्कम २.२४ टक्के प्रमाणे कपात करणे आवश्यक असताना आयकराची रक्कम देयकातून कपात केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) मौ. मांजरी ता. लातूर या गावासाठी भारत निर्माण कार्यक्रम सन २००८-०९ मध्ये पुरक पाणी पुरवठा योजने अंतर्गत सदरचे काम ग्राम पाणी पुरवठा समितीने केले आहे. सदरचे काम २००८-०९ मध्ये मंजूर झाल्यामुळे शासन परिपत्रक दिनांक २०/४/२०१२ हे या कामासाठी लागु होत नाही.

(२) सदरील योजना मंजूर करताना विहीत नमुन्यातील विवरणपत्र भरण्यात आलेले आहेत. त्याची छायांकित प्रत लेखा परिक्षणास सादर करण्यात येत आहे.

(३) आक्षेपात नमुद करण्यात आले प्रमाणे सदर योजनेचे सविस्तर सर्वेक्षण करून तपशिलवार, बाबनिहाय व उपांगनिहाय अंदाजपत्रक शाखा अभियंता व उपअभियंता यांनी तयार करून ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील तंत्र शाखेने परिनिरीक्षण करून या कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. ती लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

(४) सदर योजनेचे तपशिलवार अंदाजपत्रक मंजूर झाले नंतर तत्कालीन प्रचलित कार्यपद्धती नुसार या योजनेचे काम ग्राम पंचायत अंतर्गत स्थापन केलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात आले आहे. ग्रामस्थांची मागणी व स्थानिक भौगोलीक परिस्थितीच्या अनुषंगाने हे काम सक्षम तांत्रिक अधिकारी यांच्या देखरेखीखाली पुर्ण करण्यात येवून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे. स्थानिक भौगोलीक परिस्थिती व ग्रामस्थांची मागणी विचारात घेवून अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये थोडाफार फेरबदल झालेला आहे.

(५) या कामाच्या मोजमाप पुस्तीकेमध्ये उपांग निहाय व काम निहाय सविस्तर मोजमापे आवश्यक त्या नकाशासह नोंदविण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत मुळ मोजमाप पुस्तीका ग्राम पंचायत मांजरीकडून प्राप्त करून घेण्यात आलेली असून लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

(६) सदरील योजनेच्या प्रत्यक्ष झालेल्या कामाप्रमाणे सविस्तर अंतिम मोजमापे घेवूनच मोजमाप पुस्तीका लिहीण्याची दक्षता घेण्यात आलेली आहे. मोजमाप पुस्तीकेत नोंद मोजमापाची तांत्रिक तपासणी उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा, विभागीय कार्यालयातील सक्षम तांत्रिक अधिकारी उपअभियंता यांनी तपासणी करुन व लेखा शाखेने छाननी करून देयके पारत करण्यात आलेली असून लाल शाईने कर्ण रेषा मारुन खोडून टाकलेले आहे.

(७) सदर योजनेवर वापरण्यात आलेल्या साहित्याची तपासणी प्रचलित निकषा प्रमाणे प्रयोगशाळे मार्फत करण्यात आलेली आहे.

(८) आक्षेपात नमुद केले नुसार नमुना नं. २३ वर कामाच्या प्रगतीची नोंद घेण्यात आलेली असून लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

(९) म.जि.प. व पं.स. लेखा संहिता, १९६८ चे नियम १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नं.६९ मध्ये घेण्यात आलेली असुन लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

(१०) मौ. मांजरी ता. लातूर येथील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे सविस्तर माहितीचे नामफलक लावण्यात आलेले आहे.

(११) सदरची योजना ग्राम पंचायत मांजरीकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

(१२) सदरील पाणीपुरवठा योजनेचे काम ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने केले असल्याने वसुली करण्यात आलेली नाही. त्यासाठी मा. अप्पर आयुक्त (विक्रीकर) नागपूर क्षेत्र नागपूर यांनी त्यांचे पत्र दिनांक ४/६/२०१३ अन्वये जे काम ग्राम पंचायत/समितीने केलेली आहेत त्यासाठी अशा प्रकारच्या कपाती करण्याची आवश्यकता नसल्याचे कळविल्यामुळे कपात करण्यात आलेली नाही.

(१३) सदरचे काम हे शासन निर्णयापूर्वीच मंजूर झालेले असल्याने व सदरचे काम ग्रामीण पाणीपुरवठा समितीने केले असल्यामुळे कपात करण्यात आलेली नाही.

(१४) मा. महालेखापरीक्षक व भारताचे नियंत्रक यांचा दिनांक ३१ मार्च, २००७ चा वार्षिक अहवालानुसार सदरचे काम ग्रामपंचायती अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने केले असल्यामुळे कपात करण्यात आलेल नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर, २०१९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरिक्षणाच्या वेळी कामाची मूळ मोजमापपुस्तिका व साहित्यांचा चाचणी अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहेत ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, यासंदर्भात चाचणी अहवाल आहे. यावर समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, नंतरचा चाचणी अहवाल आहे. असे होणार नाही याची काळजी घ्यावी. सदर बाबतीत विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

मौ. मांजरी ता.लातूर पाणीपुरवठा कामातील अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

प्रस्तुत प्रकरणी नमूद करण्यात आल्याप्रमाणे सखोल चौकशी केली असता मौ. मांजरी. ता. लातूर येथील पाणीपुरवठ्याचे काम भारत निर्माण योजनेअंतर्गत असून या कामातील मोजमाप पुस्तिका अध्यक्ष व सचिव ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडे असल्यामुळे लेखापरिक्षणाच्यावेळी पाठपुरावा करून देखील त्यांनी उपलब्ध करून दिलेली नव्हती. तथापि, संचिकेसोबत मोजमाप पुस्तिकेची छायांकित प्रत उपलब्ध होती नंतर पाठपुरावा करून मूळ मोजमाप पुस्तिका समितीकडून उपलब्ध करून घेण्यात आली असून मूळ मोजमाप पुस्तिका व त्या त्या वेळचे चाचणी अहवाल पाहणीसाठी सध्या उपलब्ध आहेत.

वरील सर्व बाबीवरून साहित्याचे (Testing Report) पाईप (Testing Report) पाणी आवक Testing Report हे सर्व वेळच्या वेळी केले आहेत सोबत सर्व Testing Report संलग्न करण्यात येत आहेत या प्रकरणी कोणतीही अनियिमितता झालेली दिसून आली नाही.

सदर योजना सद्या आर्थिक दृष्ट्या पूर्ण झाली असून कोणत्याही प्रकारची वसुली नाही या योजनेवर कोणतीही तक्रार नसून सद्या गावाला या योजनेतून सुरळीतपणे पाणीपुरवठा सुरु आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :—** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :—** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मौजे मांजरी, ता.लातूर पाणीपुरवठा योजनेच्या कामातील अनियमितता प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितावर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा, असे समितीने कळविले होते. त्यानुसार चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले आणि संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

यावर अपर मुख्य सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीला पुढीलप्रमाणे खुलासा केला की, सदर विषय मौजे मांजरी, ता.लातूर येथील पाणीपुरवठा योजनेसंदर्भात आहे. सदर योजनेला दिनांक २५ जानेवारी २००८ रोजी प्रथम प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. समितीने भेट दिली त्यावेळी मूळ मोजमाप पुस्तिका उपलब्ध नव्हती. त्या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. दिनांक १३ जुलै २०१९ रोजी लातूर जिल्हा परिषदेने शासनाकडे अहवाल सादर केला होता. आम्ही तो अहवाल समितीकडे सादर केलेला आहे. समितीने जे मुद्दे उपस्थित केले होते त्या संदर्भात त्यांनी सविस्तर स्पष्टीकरण दिलेले आहे. सन २००८ मध्ये भारत निर्माण योजना राबविण्यात येत होती. आता जल जीवन मिशन योजना राबविण्यात येते. सन २००८ मध्ये भारत निर्माण योजनेतून ही योजना हाती घेण्यात आली होती. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत त्याची अंमलबजावणी करण्यात येत होती. समितीने भेट दिली त्यावेळी मोजमाप पुस्तिका उपलब्ध नव्हती. त्यावेळी अध्यक्ष व सरपंच ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती नव्हते, त्यामुळे मोजमाप पुस्तिका उपलब्ध झाली नसावी. परंतु, नंतर मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आली. समितीने जे मुद्दे उपस्थित केले होते त्या प्रमाणे नोंदी घेण्यात आलेल्या आहेत किंवा नाही हे सुद्धा तपासण्यात आले. दिनांक १२ जुलै, २०१३ रोजी योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आली होती. जो अहवाल सादर केलेला आहे त्यावरून ती योजना सुरू असून कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याचे दिसून येते. जे काम करण्यात आले त्याचे चाचणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट)म्हणजे मटेरिअलचे टेस्ट रिपोर्ट, पम्पिंग मशीन इत्यादी त्यांनी आमच्याकडे सादर केले होते. जो अहवाल सादर केलेला आहे तो योग्य आहे. चाचणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट) मूळ मोजमाप पुस्तिका सुद्धा उपलब्ध झालेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सन २००८ मध्ये भारत निर्माण योजनेतून हे काम हाती घेण्यात आले होते. त्यावेळी गावातून समिती नियुक्त करून त्यांच्या व आपल्या तांत्रिक लोकांच्या देखभालीनुसार काम केले जात होते. तसेच जो अहवाल सादर करण्यात आला त्यावरून आपले समाधान झालेले आहे काय, अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, ती उप समिती होती आणि तीच समिती काम करीत होती. आम्ही समितीकडे तसा रिपोर्ट दिलेला आहे.

समितीने विचारणा केली की, समितीने भेट दिली त्यावेळी मूळ मोजमाप पुस्तिका उपलब्ध नव्हती. योजनेची देखभाल करणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य असते. मूळ मोजमाप पुस्तिका मिनिट टू मिनिट असली पाहिजे. त्यावेळी मोजमाप पुस्तिका उपलब्ध नव्हती. आता काम पूर्ण झालेले आहे असे म्हणून या विषयाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. मोजमाप पुस्तिका डे टू डे अपडेट असलीच पाहिजे. त्यावर जिल्हा परिषदेच्या यंत्रणेचे नियंत्रण असलेच पाहिजे. मोजमाप पुस्तिका अपडेट असणे आवश्यक आहे. त्यावेळी मोजमाप पुस्तिका दाखविण्यात आली नाही हा मुद्दा आहे.

अपर मुख्य सचिव यांनी समितीच्या मताला सहमती दर्शवित विदित केले की, त्यावेळी एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड केली जात होती आणि ते अध्यक्ष असायचे. आता ग्रामविकास विभागाने त्यामध्ये सुधारणा केलेली आहे. आता सरपंच अध्यक्ष असतात. तसेच समितीने भेट दिली त्यावेळी मोजमाप पुस्तिका उपलब्ध नव्हती. परंतु, त्यानंतर मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आली आणि लेखा शाखेकडून त्याची छाननी सुद्धा करण्यात आली आहे. यानंतर समितीने मत व्यक्त करून पुढीलप्रमाणे निदर्शनास आणून दिले की, मोजमाप पुस्तिका अनेक ठिकाणी महिन्या दोन महिन्यानंतर पूर्ण केली जाते. पाणीपुरवठा विभागाचे संबंधित अभियंता त्या योजनेची प्रत्यक्ष पाहणी करीत नाहीत. अनेक योजना अशा आहेत की, पाण्याची टाकी बांधण्यात आली, परंतु पाईप लाईन टाकण्यात आली नाही. पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आली, परंतु पाण्याचा स्त्रोतच नव्हता. त्यामुळे आता योजनेत बदल करण्यात आलेला आहे. पाण्याचा स्त्रोत नाही अशा गोष्टी घडलेल्या आहेत. पूर्वी भारत निर्माण योजना होती. आता जल जीवन मिशन योजना असा बदल करण्यात आलेला आहे. संबंधित अधिकारी योजनेचा प्रत्यक्ष आढावा घेत नाहीत. शासनाला जल जीवन मिशन योजना का राबवावी लागत आहे ? शासनाने योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिला. समित्यांनी काय केले या विषयी जास्त बोलणे योग्य होणार नाही. अनेक ठिकाणी समित्यांनी बेजबाबदारपणे काम केले. ज्या ठिकाणी योजना पूर्ण झाली तेथे पाण्याचा टँकर सुद्धा पुरविता येत नाही. मूळ मुद्दा असा आहे की, संबंधित अधिकारी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करीत नाहीत. त्यामुळे मोजमाप पुस्तिका ठेवली जात नाही आणि कोणी विचारतही नाही. त्यामुळे हा प्रकार झालेला आहे, असे समितीचे मत आहे.

यानंतर समितीने अपर मुख्य सचिव यांना पुढीलप्रमाणे निर्देशित केले की, आता जल जीवन मिशन योजना राबविली जाते. पूर्वी भारत निर्माण, महाजल, जल स्वराज्य योजना राबविण्यात येत होती. त्या समितीवर गावातील व्यक्तीची अध्यक्ष, सचिव म्हणून निवड केली जात होती. अधिकारी तांत्रिक बाबीवर देखरेख ठेवत होते. संपूर्ण प्रोसेस स्थानिक समिती व खाजगी टीएमसी यांच्या मार्फत राबविण्यात येत होती. ज्या ठिकाणी पाण्याचा स्त्रोत आहे तेथे विहीर खोदली जाते. परंतु, विहिरीला पाणी असेल तरच पुढील प्रोसेस केली पाहिजे. म्हणजे पाण्याचा स्त्रोत असेल तरच पुढील प्रोसेस पूर्ण करावयास पाहिजे. परंतु, असेही निदर्शनास आलेले आहे की, पाणी नसताना ठेकेदार टँकरने पाणी टाकतो आणि त्यानंतर पाईप लाईन, पाण्याची टाकी बांधणे इत्यादी कामे केली जातात. आता आपण त्यामध्ये सुधारणा करून नवीन योजना कार्यान्वित करीत आहोत. पूर्वी काही योजना कॉंट्रॅक्टर व अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे चुकीच्या पद्धतीने राबविण्यात आलेल्या आहेत. भविष्यात असे घडता कामा नये. काही ठिकाणी कंत्राटदारांनी विहिरीमध्ये टँकरने पाणी टाकले व योजना पूर्ण केली. याकरिता कायमस्वरूपी पाण्याचा सोर्स कशाप्रकारे उपलब्ध होईल याचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच अशा योजना राबवित असताना त्यात अडचणी निर्माण होता कामा नये. अशा प्रकारे खालील स्तरावरील अधिकाऱ्यांना सूचना देऊन चुकीच्या पद्धतीने कामे होणार नाहीत याची दक्षता घेणे गरजेचे आहे. समितीला त्याचवेळी एम.बी. रेकॉर्ड दाखविणे आवश्यक होते. त्याकरिता जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली हा मूळ विषय आहे. भविष्यात अशा योजना राबवित असताना लोकांना कायमस्वरूपी पाणी कसे मिळू शकेल याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अनियमितता झाली असल्यामुळे त्याबाबत आपण स्वतः चौकशी करावी. त्यात जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करून तसा अहवाल समितीकडे सादर करावा. यावर अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीला कारवाई करून अहवाल सादर करण्याबाबत होकारात्मक संमती दर्शविली.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदर समितीवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी कोणाची होती, गावामध्ये अनेक लोकांनी मागणी केल्यामुळे अशा समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. गावांमधील लोकांनी पुढाकार घेतल्यास चांगल्या प्रकारे योजना होऊ शकतील. जेणेकरून गावांना चांगल्या प्रकारचा पाणीपुरवठा होऊ शकेल. परंतु समिती कार्यरत असताना जेवढ्या योजना फेल झाल्या तेवढ्या योजना त्यापूर्वी फेल झाल्या नाहीत व नंतरही होणार नाही. याचा अर्थ योजनांवरील निधी फक्त खर्च करण्यासाठी आणला असे चित्र निर्माण करण्यात आले. त्यामुळे भारत निर्माण योजना किंवा इतर योजना असो त्या संदर्भात पुन्हा चौकशी करून त्यातून काही निष्पन्न होणार नाही. याउलट त्या योजना दुरुस्त करण्यासाठी काही उपाययोजना केली पाहिजे. त्यात अपूर्ण विहिरी, पाण्याच्या टाक्या, पाईपलाईन इत्यादी कामे पूर्ण करून त्यांचा आपल्याला कशाप्रकारे उपयोग करता येतील याचा आपण विचार करावा असे समितीला वाटते.

समितीने असेही निदर्शनास आणून दिले की, अनेक ठिकाणी योजना अपूर्णावस्थेत आहे. अनेक ठिकाणी विहिर झाली आहे, पाणी नाही. पाईपलाईन झाली असताना पाण्याची टाकी उपलब्ध नाही. रेकॉर्डवर पूर्ण योजना झाल्या असल्या तरी तेथे अनेक बाबी अपूर्ण आहेत. त्यामुळे त्या योजना पूर्ववत कशाप्रकारे सुरू करता येतील, हा मूळ विषय आहे. त्या संदर्भात आपण कार्यवाही करावी. यात वैयक्तिक गावांच्या योजना, प्रादेशिक योजनांमध्ये तीच अडचण आहे. मागील अपूर्ण योजना पूर्ण करून कार्यान्वित करण्यासाठी आपण काम करीत आहोत. यावर अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीने जी सूचना केली आहे. त्यानुसार आम्ही संबंधितांना सूचना देऊ असे समितीला आश्वासन दिले.

यानंतर ग्रामीण भागातील पाणीपुरवठा या महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने समितीने या योजनेसंदर्भात कोल्हापूर पंचायत समिती येथे भेट दिली असता तेथे आढळून आलेल्या त्रुटी सचिवांच्या निदर्शनास आणून दिल्या की, तेथे २ वर्षांपासून निविदा काढण्यात आली. कंत्राटदाराने अनेक ठिकाणी फक्त पाईपलाईनचे काम केलेले आहे. त्या व्यतिरिक्त तेथे पाण्याची टाकी नाही. आता तेथील पुढील काम थांबलेली आहेत. ही बाब गंभीर आहे. हुपरी शहरामध्ये कंत्राटदाराने टाकी पूर्ण करण्यापूर्वीच पाईपलाईनचे काम केले व त्याचे बिल घेतले. शिरोळा आणि पन्हाळा तालुक्यांमध्ये अनेक योजनांमध्ये ३० ते ४० टक्के काम करून बिले घेण्यात आली. त्यानंतर कंत्राटदार काम करीत नाहीत. या संदर्भात त्यांच्यावर कारवाई देखील केली जात नाही. ही बाब गंभीर आहे. त्यामुळे जिल्हानिहाय किती निविदा काढण्यात आल्या, त्यापैकी किती कामे पूर्ण झाली, किती कामे अपूर्ण आहेत, कामे थांबण्याची कारणे काय आहेत, या संदर्भात कंत्राटदारावर कारवाई करण्यात आली आहे का ? याबाबत विभागाने आढावा घेणे अत्यावश्यक आहे. यावर अपर मुख्य सचिव यांनी होकारात्मक संमती दर्शविली. समितीने विचारणा केली की, सोर्सला पाणी नसताना कंत्राटदारांनी पाईपलाईनची कामे केल्याबाबत समितीने मुद्दा उपस्थित केला आहे. भविष्यात सोर्सला पाणी लागले तरच पुढील कामे करण्यासाठी कंत्राटदारांना परवानगी द्यावी. अन्यथा ज्या कामांमध्ये पैसे मिळतात तेवढीच कामे कंत्राटदारांकडून केली जातात. त्यानंतर सोर्सला पाणी न लागल्यामुळे पुढील कामे अर्धवट राहतात. परिणामी गावाचे नुकसान होते. या संदर्भात विभागाकडून स्पष्टपणे सूचना देणे आवश्यक आहे.

यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, अशा प्रकारच्या सूचना दिल्याच जातात. तरी सुद्धा अधिक चांगल्या प्रकारे सूचना देऊन त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे करता येईल यादृष्टीने पुन्हा संबंधितांना सूचना दिल्या जातील. यावर समितीने मत व्यक्त केले की, जलजीवन मिशन अंतर्गत असलेल्या समित्यांवर सरपंच अध्यक्ष म्हणून काम करतात. गावात चांगली कामे होत असल्यास विरोधक त्याला विरोध करीत असतात. फक्त १० ते १५ टक्के गावांमध्ये अशा योजनांना सपोर्ट केला जातो. सदर योजना चांगली आहे. त्यात प्रामाणिकपणे कामे केल्यास १०० टक्के चांगले काम होऊ शकते. परंतु गावामध्ये राजकारण होत असते. त्यामुळे एखाद्या वेळी समितीवरील अध्यक्ष असलेले सरपंच बदलल्यास त्या योजनेमध्ये अडथळे निर्माण होतात. ही बाब विचारात घेता सदर योजनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाची त्यात भूमिका असावी. याकरिता पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेमधील अधिकारी त्यात समाविष्ट असणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून योजनेला खीळ न बसता ती यशस्वीपणे पूर्ण होऊ शकेल. अनेक वेळा गावामध्ये राजकारण केले जाते व त्या माध्यमातून योजनांमध्ये खीळ घालण्याचा प्रयत्न केला जातो. ही बाब प्रशासन स्तरावर निदर्शनास आल्यास त्यात प्रशासनाला अधिकार असला पाहिजे. अनेक वेळा चुकीच्या तक्रारी केल्यामुळे योजना पूर्ण होत नाहीत, त्यात अडथळे येतात. कामे प्रलंबित राहतात. त्यामुळे मूळ हेतू सफल होत नाही. योजना वेळेवर यशस्वीपणे पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर योजनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून आपल्याला काही कार्यवाही करता येईल का ? एखाद्या कामाबाबत तक्रार केल्यास त्यात चौकशी करून काही चुका असल्यास त्यात सुधारणा करणे. तसेच क्वॉलिटीचे काम असल्यास ते पूर्ववत सुरू करण्यासाठी आपल्या स्तरावरून सूचना देणे आवश्यक आहे. समितीला असे वाटते की, सदर समितीमध्ये ग्रामसेवकाचा देखील समावेश करणे अत्यावश्यक आहे. ग्रामसेवक हा जबाबदार राहू शकतो.

यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, समितीचे म्हणणे बरोबर आहे. त्या काळात सदर योजनेबाबत अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. सदर समितीकडे अमर्याद अधिकार होते. नंतर ते काढून टाकण्यात आले. ग्रामविकास विभागामधील सर्व योजना तसेच पंधराव्या वित्त आयोगातून प्राप्त होणाऱ्या निधीतून सर्वात जास्त निधी त्यांच्याकरिता असतो. त्यात त्या प्रत्येकाला अधिकार देण्यात आलेले असून कमाल खर्च करण्याचे आर्थिक अधिकार १५ लाख रुपयांपर्यंत आहेत. त्यापूर्वी समितीमार्फत १ कोटी रुपयांपर्यंतच्या योजना घेतल्या जात होत्या. त्यामुळे पूर्वी चुका झाल्या होत्या. आता त्या होणार नाहीत. तसेच त्यांनी १५ लाख रुपयांपेक्षा जास्त कामे केली तर त्यावर उप अभियंता, कनिष्ठ अभियंता यांनी सुपरव्हीजन करावे अशा आम्ही सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचना पुन्हा दिल्या जातील. आता सदर समित्यांमध्ये अध्यक्षपदी सरपंच व सचिव पदावर ग्रामसेवक काम करीत असतात. तसेच त्याकरिता ग्राममपंचायतीचे कोड लागू आहेत. त्यामुळे आता तसा प्रश्न निर्माण होणार नाही.

यावर समितीने सर्व योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविल्या जात असल्यामुळे त्यात अधिकाऱ्यांची देखील तेवढीच जबाबदारी आहे. सदर योजना पूर्णतः ग्रामीण भागांमध्ये राबविल्या जातात. त्यामुळे सरपंच, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, कार्यकारी अभियंता, उप अभियंता आणि ग्रामसेवक यांची समिती करावी. तसेच समितीकडून योजना राबविली न गेल्यास किंवा त्यात काही चूक झाल्यास वरील सर्वांना दोषी धरावे. जेणेकरून जबाबदारीचे स्वरूप प्राप्त होईल. त्यामुळे योजना चांगल्या प्रकारे पूर्ण होण्यास मदत होईल. सध्या समितीचे अध्यक्ष म्हणून सरपंच कागदोपत्री सह्या करतात. परंतु त्यांना पूर्ण माहिती नसते. तसेच योजना पूर्णपणे राबविल्या न गेल्यामुळे पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदांच्या बैठकीमध्ये विचारणा का केली जात नाही ? वरीलप्रमाणे समिती तयार करून जबाबदारी निश्चित केल्यास योजनांची कामे व्यवस्थितपणे मार्गी लागू शकतील.

पुढे समितीने तेलंगणा राज्याचे उदाहरण देत विदित केले की, तेलंगणा राज्यात ग्लोबल टेंडर मागविण्याचा पॅटर्न वापरला जात आहे. त्यात सरपंच, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद यांचा समावेश नाही. त्यात कोणताही राजकीय हस्तक्षेप केला जात नाही. अशाप्रकारे कार्यवाही केल्यास महाराष्ट्रातील २८,७१२ ग्रामपंचायतींमध्ये पिण्याचे पाणी उत्कृष्टपणे देता येऊ शकेल. या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यास ते योग्य होईल. तेलंगणामधील काही जिल्ह्यांमध्ये हा पॅटर्न यशस्वी झाला आहे. याबाबत विभागाने विचार करावा अशी समितीची सूचना आहे. तसेच या अनुषंगाने आपल्याला शासन स्तरावर काही निर्णय घेता येतो किंवा कसे ? याबाबत तपासणी करावी. तसेच जलजीवन मिशनमध्ये लोकवर्गणीचा सहभाग असतो. आता त्यात ग्रामपंचायतीकडून एवढा निधी दिला जाऊ शकत नाही. समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार या संदर्भात आपल्याला काही सुधारणा करता आल्यास त्या कराव्यात व त्यानुसार खालच्या स्तरावर सूचना द्याव्यात व वित्त आयोगातून लोकवर्गणी भरण्याची अनुमती दिल्यास कंत्राटदाराकडून चुकीची कामे होणार नाहीत. यावर अप्पर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, एक कोटी रुपयांची योजना असल्यास त्याकरिता ९० लाख रुपयांचा निधी बजेटमधून दिला जात होता व १० लाख रुपये लोकवर्गणी असायची. आता एक कोटी रुपयांची योजना असल्यास त्याकरिता बजेटमधून एक कोटी रुपये देणार आहोत त्या व्यतिरिक्त १० लाख रुपये लोकवर्गणी असणार आहे. अशाप्रकारे आता १०० टक्क्यांऐवजी ११० टक्के निधी राहणार आहे, हा त्यातील महत्त्वाचा बदल आहे. त्यामुळे लोकवर्गणी जमा झाली नाही तरी योजना रखडणार नाही.

यावर समितीने ११० टक्क्यांची त्याकरिता गरज का आहे ? असा प्रश्न विचारला असता अपर मुख्य सचिव यांनी विदित केले की, ज्याप्रमाणे सदर समित्यांकडून कामे काढून घेतली होती. त्याप्रमाणे सन २०१५ मध्ये लोकवर्गणी न घेण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी आपल्या राज्यात अनेक अडचणी आल्या. या संदर्भात केंद्र शासनाकडे सर्व माहिती देण्यात आली होती. या बाबतीत त्यांचे असे म्हणणे होते की, अशा सर्व योजनांवर मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च करीत असतो व तो मेंटेन केला जात नाही. आता त्यांचे असे म्हणणे आहे की, तुम्ही लोकवर्गणी जमा करून राज्य किंवा केंद्र शासनाकडे जमा न करता ती लोकवर्गणी गावातील ग्रामपंचायतीच्या निधीमध्ये ठेवावी. तेथे ती रक्कम मेंटेन करावी. त्यामुळे हा उद्देश चांगला आहे. हा नवीन पॅटर्न असून त्यामुळे योजना रखडली जाणार नाही. त्यामुळे आता कंत्राटदारांकडून होत असलेले चुकीचे प्रकार यापुढे होणार नाहीत. यावर समितीने प्रश्न विचारला की, कंत्राटदाराकडून ३ वर्षे योजना सुरू ठेवण्याची अट त्यात आपल्याला समाविष्ट करता येईल का? यावर अपर मुख्य सचिव यांनी असे उत्तर दिले, सध्या एक वर्षाचा कालावधी आहे.

यावर समितीने विचारणा केली की, एनएचआयमध्ये रस्ते तयार केले जात असून त्यात कंत्राटदारांकडून रस्ते मेंटेन करण्यासाठी ५ ते १० वर्षांची जबाबदारी देण्यात आली आहे. त्याप्रमाणे सदर योजनेकरिता ११० टक्के तरतूद केली जात असल्यामुळे कंत्राटदाराकडे सदर योजना ३ किंवा ५ वर्षे मेंटेन करण्यासाठी देण्यास काही हरकत नाही.

यावर अपर मुख्य सचिव यांनी विदित केले की, समितीने जी सूचना केली आहे त्याबाबत आम्ही विचार करू परंतु आज निविदा काढल्यानंतर ती भांडवली किंमतीवर लोड होणार. त्यानंतर पुढील वर्षीच्या बजेटमधून निधी दिला जाईल. अशाप्रकारे ५०-५० टक्के जलजीवन मिशनमध्ये पॅटर्न नाही. परिणामी त्याचा आर्थिक भार राज्यावर पडेल. हा धोरणात्मक मुद्दा आहे. तसेच मेंटेनन्सचा विचार केल्यास त्याची रक्कम निविदेवर लोड होणार असल्यामुळे त्यांच्याकडून जास्त रक्कम मागितली जाईल. यावर समितीने मत व्यक्त केले की, आपण १० टक्के जास्त तरतूद करीत असल्यामुळे त्यातून योजना मेंटेन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे देण्याऐवजी कंत्राटदाराकडे ठेवावी असे समितीला वाटते. पुढे समितीने सचिवांना निदेशित केले की, इतर विभागांमधील योजना कशाप्रकारे मेंटेन केल्या जातात ही बाब तपासून घ्यावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. यावर अपर मुख्य सचिवांनी समितीला विदित केले की, योजना मेंटेन करण्याची जबाबदारी कंत्राटदाराकडे दिल्यास निविदेची रक्कम जास्त होईल. सदर बाब तपासून घेऊ असे समितीला आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

मौजे मांजरी, ता. लातूर येथील पाणीपुरवठ्याचे काम भारत निर्माण योंजनेअंतर्गत करण्यात आले असून या कामाच्या बांधकामाचा पूर्ण तपशील व सर्व हिशोबांचे आधार असलेली मोजमाप पुस्तिका व या कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य विनिर्देशाप्रमाणे वापरले बाबत व साहित्य दर्जेदार असलेबाबत चाचणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. याबाबतची चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

त्यानुसार या प्रकरणाबाबत जिल्हापरिषदेकडून सादर करण्यात आलेल्या माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, मूळ मोजमाप पुस्तिका व त्यावेळचे साहित्य चाचणी अहवाल उपलब्ध आहेत. सदर योजना पूर्ण झाली असून या योजनेबाबत कोणतीही तक्रार नसून सद्यस्थितीत या योजनतून सुरळीतपणे पाणीपुरवठा सुरू आहे. या प्रकरणाची तपासणी केली असता त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आलेली नाही. सदर माहितीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग व ग्रामविकास विभागाने सहमती दर्शवली आहे.

या महत्त्वाच्या विषयाबाबत घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी विदित केले की, मौजे मांजरी (ता. लातूर) येथील पाणीपुरवठा योजना भारत निर्माण योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आली असून ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. या कामातील चाचणी अहवाल प्राप्त आहेत. या सर्व अहवालावरून कामाची गुणवत्ता व काम योग्य प्रकारे पूर्ण झाले असल्याचे स्पष्ट झाले आहे. विभागाकडून सादर करण्यात आलेली माहिती व साक्षीत देण्यात आलेली माहिती यावर समिती समाधान व्यक्त करत आहे.

**ग्रामीण भागातील पाणीपुरवठा या महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने समितीने या योजनेसंदर्भातील अनेक त्रुटी सचिवांच्या निदर्शनास आणल्या 'काही ठिकाणी पाण्याची टाकी बांधण्यात आली परंतु पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही, काही ठिकाणी पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली असून काम पूर्ण करण्यात आले आहे पण पाण्याचा स्त्रोतच नाही, काही ठिकाणी विहिरीला पाण्याचा स्त्रोत नसताना टँकरने पाणी टाकले जाते आणि त्यानंतर पाईपलाईन व पाण्याची**

टाकी बांधणे इत्यादी कामे केली जातात. अधिकारी प्रत्यक्षपणे या योजनेचा आढावा घेत नसल्याने योजना यशस्वीपणे राबवली जात नाही. त्यामुळे यावर खर्च केलेल्या निधीचा अपव्यय होत आहे'. अशाप्रकारे ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजना चुकीच्या पद्धतीने राबविण्यात येत आहे.

यास्तव भविष्यात पाणीपुरवठा योजना राबविताना ग्रामीण भागातील लोकांना बारा महिने शाश्वत पाणीस्त्रोत उपलब्ध राहिल अशा दृष्टीकोनातून योजना राबविण्यात याव्यात. ज्या ठिकाणी पाण्याचा स्त्रोत आहे त्याच ठिकाणी विहिर खोदून या कामाची तपासणी करून त्यानुसार पाण्याचा स्त्रोत उपलब्ध असेल तरच पुढील पाईपलाईन व पाण्याची टाकी बांधावी. तसेच सद्य:स्थितीत ज्या पाणीपुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत आहेत त्यास निधी उपलब्ध करून सदरच्या योजना तातडीने पूर्ण करण्यात याव्यात. तसेच या योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत ऐवजी कामाच्या निविदेमध्ये अट टाकून कंत्राटदाराकडेच तीन ते पाच वर्षांसाठी देता येईल का याची तपासणी करून त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबत पिण्याच्या पाण्याच्या योजना राबविताना या अगोदरचे विविध आक्षेप विचारात घेऊन योजना स्वयंस्पष्ट व निधीचा विनीयोग उत्तम प्रकारे होण्यासाठी तसेच त्यात कोणत्याही प्रकारे गैरव्यवहारास वाव राहणार नाही याची दक्षता घेऊन पाणीपुरवठ्याच्या योजना राबविण्याबाबत तसेच उक्त योजनांची देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत एक निश्चित धोरण आखण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, लातूर

## स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतिगृहांच्या अनुदान प्रदानातील नियमबाह्यतेबाबत.

**परिच्छेद क्रमांक ३.१०३१ (सन २०१३-२०१४)**

जिल्हा परिषद लातूर, सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक १०) याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.एच. १०९७/प्र.क्र.१०७/मा.व.क.-४, दिनांक १६/०३/१९९८ मधील अटी व शर्ती नुसार सहपत्र जोडपत्र अ मधील परिच्छेद ८ अनुदानाचे निर्धारण मधील तरतुदी नुसार लेखापरिक्षा अहवाल (सनदी लेखापाल) समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांना ऑक्टोबर अखेर पर्यंत स्वंयसेवी संस्थेने सादर करणे बंधनकारक आहे. वसंतराव नाईक वसतीगृह सोमनाथपुर, तालुका उदगीर यांनी समाज कल्याण अधिकारी यांचे आवक नोंदी क्रमांक १०२६३ दिनांक ४/१२/२०१२ रोजी विलंबाने सादर केलेला आहे संस्थेने मुदतीत अहवाल सादर न केल्यामुळे ५ टक्के दंडाची रक्कम रुपये १४,४००/- दंडात्मक कार्यवाही म्हणुन वसुल करणे आवश्यक आहे.

२. राममाता मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह चिंचोली तालुका जळकोट सदरील संस्थेने लेखापरीक्षा अहवाल अ.क्र.१८०७, दिनांक ४/३/२०१४ विलंबाने सादर केला आहे. ५% दंडाची रक्कम रुपये १०,८००/- वसूल करणे आवश्यक आहे. तसेच यशोधरा मुलीचे वसतिगृह अहमदपूर यांनी लेखापरीक्षा अहवाल अ.क्र. ८८४२, दिनांक १२/१२/२०१३ विलंबाने सादर केला आहे. ५% दंडाची रक्कम रुपये १०,८००/- वसूल करणे आवश्यक आहे. तसेच तीन भेटी नसताना केवळ समाजकल्याण अधिकारी यांची दिनांक १२/३/२०१४ च्या भेटीवर अनुदान निर्धारण कसे केले.

३. महाराष्ट्र शासन, समाजकल्याण सांस्कृतिक, क्रिडा विभाग, मुंबई शासन निर्णय क्रमांक बी.सी. एच/प्र.क्र.१०७/मावक४, दिनांक १६/३/१९९८ **(परिशिष्ट क्रमांक - ७)** अन्वये वसतीगृहास रुपये १०,०००/- सुरक्षा ठेव बँकेत ठेवणे आवश्यक असतांना तशा ठेवी बँकेत ठेवल्याबाबत संबंधीत वसतीगृहाच्या छायांकित प्रती संचिकेसोबत जोडण्यात आलेल्या नाहीत.

४. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असतांना सदर विद्यार्थी मागासवर्गीय असल्याबाबत शाळेच्या मुख्याध्यापकाचे बोनाफाईड प्रमाणपत्र अथवा उपविभागीय दंडाधिकारी यांचे स्वाक्षरी असल्याचे मागास वर्गीयांचे प्रमाणपत्र संचिकेत आढळुन आले नाही. त्यामुळे खरोखरच मागास वर्गीय विद्यार्थ्यांनांच वसतीगृहात प्रवेश दिल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही.

५. दंडाची रक्कम ७६,०००/- देय अनुदानातुन कपात करणे आवश्यक आहे. वसतीगृहाच्या समाजकल्याण निरीक्षक यांच्या अहवालाच्या अवलोकन केले असता उणिवा बाबत स्पष्ट अभिप्राय नाहीत. ते मोघम स्वरुपाचे देण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष उणिवांचे निश्चीता लक्षात घेवुन दंडाची रक्कम आकारणी बाबत संदिग्धता दिसुन येते. सन २०१३-१४ मध्ये रक्कम रुपये ६,५६,२६,८४३/- ची तरतुद प्राप्त असुन त्यापैकी रुपये ६,४१,७२,२३५/- चा खर्च झालेला आहे. उर्वरीत अखर्चित रक्कम रुपये १४,५४,६०८/- च्या खर्चासाठी मान्यता प्रदान करून घ्यावे अथवा शासन खाती संबंधीत लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) शासन निर्णय दिनांक १६/३/१९९८ मधील तरतूदी नुसार अनुदानासाठी सनदी लेखापाल यांचा अहवाल ऑक्टोबर पर्यन्त सादर करणे आवश्यक आहे. तथापी वसंतराव नाईक वसतिगृह सोमनाथपूर ता. उदगीर यांनी प्रस्ताव दिनांक ४/१२/२०१२ म्हणजे विलंबाने सादर केला आहे. म्हणून आक्षेपात नमुद ५% दंड रक्कम रुपये १४,४००/- वसूल केला आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १६/०३/१९९८ मधील तरतूदी नुसार अनुदानासाठी सनदी लेखापाल यांचा अहवाल ऑक्टोबर पर्यन्त सादर करणे आवश्यक आहे. तथापी रामा माता मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह चिंचोली ता. जळकोट यांनी प्रस्ताव दिनांक ०४/०३/२०१४ म्हणजे विलंबाने सादर केला आहे व यशोधरा मुलीचे वसतिगृह अहमदपूर यांनी दिनांक १२/१२/२०१३ म्हणजे विलंबाने सादर केला आहे. म्हणून आक्षेपात नमूद ५% दंड म्हणून अनुक्रमे रक्कम रुपये १०,८००/- व १०,८००/- वसूल केला

आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १६/०३/१९९८ मधील तरतूदीनुसार एखाद्या वसतिगृहास तीन भेटी झाल्या नसल्यास प्रत्यक्ष उपस्थितीच्या सरासरीनुसार अनुदान मान्यता प्रस्तावीत करता येते. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) वसतिगृह मंजूरीच्या वेळेस रक्कम रुपये १०,०००/- सुरक्षा ठेव घेवूनच मंजूरी प्रदान केली जाते. तसेच सुरक्षा ठेव ठेवणे बाबत संबंधीत वसतीगृहांना सुचना दिलेल्या आहेत. त्याबाबत खबरदारी घेण्यात येत आहे.

(४) वसतिगृह तपासणीचे वेळी सर्व प्रवेशित विद्यार्थ्याचे मुळ जातीचे प्रमाणपत्र, बोनाफाईड तपासले जाते. देयकाच्या संचिकेसोबत जोडण्यात आलेल्या यादीवर जातीचा उल्लेख असतो. तथापी सदर यादी मुख्याध्यापक व अधिक्षक यांनी तपासणी करुनच प्रमाणीत केलेले असते.

(५) दंडाची रक्कम रुपये ७६,०००/- वसूल केले असून चलन झेरॉक्स संलग्न करण्यात येते. सद्यस्थितीत कार्यरत निरीक्षक यांना अहवालात स्पष्ट अभिप्राय देणे बाबत सुचित केले आहे. तसेच सदर योजनेवर प्रत्यक्षात सन २०१३-१४ मध्ये रक्कम रुपये २,६९,३८७/- एवढी सन २०१२-१३ ची अखर्चित व सन २०१३-१४ मध्ये रक्कम रूपये ४०,५०,०००/- एवढी तरतूद प्राप्त असून एकूण रुपये ४३,१९,३८७/- तरतूद उपलब्ध झाली व प्रत्यक्ष खर्च मात्र रुपये २७,७४,९१३/- झाला व शिल्लक रुपये १५,४४,४७४/- पुढील वर्षी शासन निर्णय दिनांक ०६ जून, २००८ नुसार खर्च करण्यास मान्यता घेतली.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतीगृहांच्या सहाय्यक अनुदान प्रदानातील नियमबाह्यतेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, मागासवर्गीय वसतीगृहांनी विलंबाने अहवाल दिल्यामुळे दिनांक १६.०३.१९८८ नुसार दंड आकारण्यात येतो. याबाबत नियमानुसार दंड लावलेला असून ७६ हजार रूपये वसुली झालेली आहेत. तसेच दिनांक १६.०३.२०१८ च्या निर्णयानुसार वसतीगृहाच्या खात्यावर किमान १० हजार रूपये शिल्लक असायला पाहिजे. जेणेकरून काही अपरिहार्य कारणास्तव वेळेत अनुदान प्राप्त न झाल्यास त्यांना त्या रकमेतून साहित्याची खरेदी करणे शक्य होईल. त्यांचे कॅशबूक चेक केले असून १० हजार रूपये त्यांच्या खात्यामध्ये जमा आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, पुंडलीक निवासी विद्यालय, अजनी याबाबतचे निवेदन समितीला प्राप्त झालेले आहे. याबाबत वारंवार तक्रारी येऊनही तुम्ही काहीच काम केलेले नाही. शाळेचे मुख्याध्यापक आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याविरूद्ध श्री. इस्माईल शेख यांनी तक्रार दिलेली आहे. सदरहू तक्रार आपल्याकडे देत आहे. या तक्रारीची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी विदित केले की, समितीच्या सूचनेप्रमाणे तक्रार तपासून कार्यवाही करण्यात येईल, तसेच समितीला याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत आश्वासित केले. समितीने काही दिवसांपूर्वी भंडारा जिल्ह्याला भेट दिली होती. तेथे समितीच्या निदर्शनास आढळून आलेल्या बाबीसंदर्भात पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले की, तेथे अतिशय अमानवी पद्धतीने काही मुख्याध्यापक वावरत असल्याच्या समितीकडे तक्रारी प्राप्त झाल्या. जिल्हा समाज कल्याण अधिकारी केवळ पाकिटे घेण्यासाठी तेथे जातात. निवासी शाळांवर, संस्थेंवर जाऊन सखोल चौकशी करीत नाहीत. विद्यार्थ्यांची, विद्यार्थीनींची विचारपूस करीत नाहीत, त्यांना काही त्रास आहे काय, त्यांना सर्व सोयीसुविधा मिळतात काय याची चौकशी करीत नाहीत. ज्या गोरगरीब कुटुंबांची एका वेळेसच्या जेवणाची व्यवस्था होऊ शकत नाही, असे कुटुंबीय आपल्या पाल्यांना वसतीगृहामध्ये पाठवितात. समितीला भंडारा जिल्ह्यामध्ये एका वसतीगृहात ७० मुलांकरिता केवळ एक शौचालय असल्याचे आढळून आले. ही अतिशय भयावह परिस्थिती आहे. त्याच वसतीगृहाच्याच वर असलेले व्यवस्थापक, मुख्याध्यापक यांचे घर अतिशय चांगले असल्याचे पहायला मिळाले. असे व्हायला नको. लातूर जिल्ह्यातील वसतीगृहांची व्यवस्था अतिशय चांगली असायला पाहिजे, विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार मिळायला पाहिजे, त्यांना शासन पुरवित असलेल्या सर्व सोयीसुविधा मिळाल्या पाहिजे, याकरिता समाज कल्याण अधिकाऱ्यांनी अगदी काळजीपूर्वक लक्ष द्यावे. समाज कल्याण अधिकारी आरक्षित लोकांना नियमानुसार आरक्षण देत नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित केली पाहिजे. मागासवर्गीय वसतिगृहाच्या संदर्भात प्रत्येक ठिकाणी बरीच अनियमितता आढळून आलेली आहे. तेथील स्वच्छता बरोबर नाही.वसतिगृहे गळकी असतात. एका विद्यार्थ्याला मापदंडानुसार किती जागा पाहिजे तेवढ्या जागेची व्यवस्था केली आहे काय अशी विचारणा केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यांनी या पदाचा पदभार स्विकारल्यापासून १० ते १२ वसतिगृहांनी भेटी दिल्या असून काही वसतिगृहे रद्द करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

समितीने अशी विचारणा केली की, ज्या वसतिगृहाचे प्रस्ताव रद्द करण्यासाठी सादर केले आहेत. त्याची एक प्रत समितीला सादर करावी. तसेच वच्छलाबाई मुलींचे वसतिगृहाचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय तसेच संत पुंडलिक महाराज

वसतिगृह, अजनी या वसतिगृहाबाबत गेल्या ७-८ वर्षापासून मागणी करीत आहे, त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे. यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीला विदित केले की, जिल्हा परिषदेमार्फत वसतिगृहास भेट दिलेली आहे. संबंधित वसतिगृहाची चौकशी सुरु आहे. त्यासंदर्भात सुनावणी झाली आहे. सदर प्रकरणाची तपासणी करून निर्णय घेण्यात येईल. वसतिगृहात लाईटची व्यवस्था नव्हती, इतर सोईसुविधा नव्हत्या.

समितीने असे निदेश दिले की, वसतिगृहामध्ये गरीब व आदिवासी लोकांची मुले राहतात त्या ठिकाणी निवासासाठी मुबलक जागा असावी, स्वच्छता असावी, खेळाचे मैदान असावे. शौचालयाची व्यवस्था असावी. यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीला विदित केले की, १० मुलांसाठी संडास बाथरुमची आवश्यकता आहे, ती व्यवस्था तेथे आहे. वसतिगृह व शाळा वेगळी आहे समितीने वर्धा जिल्ह्यातील उदाहरण देत निदर्शनास आणून देण्यात आले की,वर्धा जिल्ह्यास भेट दिली असता तेथील वसतिगृह अतिशय सुंदर होते. वर्धा येथील वसतीगृहाला मिळणाऱ्या शासकीय निधीतून सुविधा देऊ शकतात तर इतर वसतिगृह सुविधा का देऊ शकत नाही. अशा बेजबाबदार व्यक्तींवर गुन्हे दाखल केले पाहिजेत. यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीला विदित केले की, ज्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे, त्यांची मुले वसतिगृहात राहतात. मागासवर्गीय मुलांना ग्रंथालयासह शिक्षणाच्या सर्व सोई उपलब्ध झाल्या पाहिजेत. शासनाकडून निधी खर्च केला जातो. जेथे अनियमितता आढळून आली त्यासंदर्भात तातडीने कारवाई करण्यात आली आहे.

यानंतर पंचायत समिती उदगीर ता.लातूर तालुक्यातील वसतीगृहास भेट दिल्याचे दिसत नाही अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी विदित केले की, उदगीर तालुक्यातील वसतिगृह बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासंदर्भातील सुनावणी आयुक्त कार्यालयात सुरु आहे. यासंबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, मुलींना सोई सुविधा दिल्या पाहिजेत, यासंदर्भात आयुक्त कार्यालयात सुनावणी घेण्यात येत आहे. यावर ७० ते ८० वसतिगृहांना भेटी दिल्या असून दोन वसतिगृहांबाबत तक्रारी असल्यामुळे सदर दोन्ही वसतिगृह बंद करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. असे समाजकल्याण अधिकारी यांनी उत्तर दिले . समितीस मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, इतर वसतिगृहांमध्ये भेटी देतांना काही त्रुटी आढळून आल्या आहेत काय त्यांचे निराकरण कशाप्रकारे करण्यात आले आहे. यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीला विदित केले की, ज्या तक्रारी होत्या त्याबाबत कंत्राटदारांना बोलावून समक्ष सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे त्रुटींचे निराकरण करण्यात आले.

तदनंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतिगृहाच्या सहाय्यक अनुदान प्रदानातील नियबाहयतेबाबत हा मुद्दा होता. शासनाकडून वसतिगृहांसाठी वेळोवेळी निधी देण्यात येतो. त्यातून गरीब व आदिवासी मुलांना सोई सुविधा उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत. शासनाचा निधी कोणीही फुकट लाटू नये. अहवाल वर्षात वसतिगृहाच्या अनुदान प्रदानाबाबत अनियमितता झालेली आहे. यासंदर्भात संबंधितांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वसतिगृहांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी त्याअनुषंगाने अहवाल तयार करून संबंधित दोषी आढळल्यास कारवाईसह अहवाल समितीला सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक संमती दर्शविली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतीगृहांच्या सहाय्य अनुदान प्रदानातील अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

दिनांक १६ मार्च,१९९८ (परिशिष्ट क्रमांक-७) च्या शासन निर्णयानुसार सनदी लेखापालाचे परिक्षण अहवाल विहित मुदतीत सादर न केल्यामुळे संबंधित संस्थेवर दंडात्मक कार्यवाही करून रुपये ७६,०००/- इतका दंड शासन नियमाप्रमाणे वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आलेला आहे. सोबत चलनाच्या प्रती जोडलेल्या आहेत तसेच यापुढे अशा अनियमितता/नियमाबाह्यता होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :**—जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायत राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांनी स्वंयसेवी संस्थानी चालविलेल्या मागासवर्गीय वसतीगृहांच्या सहाय्य अनुदान प्रदानातील नियमबाह्यतेबाबत माहिती देताना सांगितले की, वसंतराव नाईक वसतिगृह सोमनाथपूर तालुका उदगीर यांनी लेखा परीक्षणाचा अहवाल ऑक्टोबर पर्यंत सादर करणे आवश्यक होता पण तो करण्यात आलेला नाही. त्यामुळे ५ टक्के दंडाची रक्कम वसूल करावी, अशी सूचना देण्यात आली होती. त्याप्रमाणे ५ टक्के प्रमाणे १४४०० रुपये दंडाची रक्कम वसूल केलेली आहे. चलनाची प्रत सोबत जोडलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, स्वयंसेवी संस्थानी चालविलेल्या मागासवर्गीय वसतीगृहांच्या सहाय्य अनुदान प्रदानामध्ये अनियमितता झालेली आहे. सदरहू अनुदान हे कोणत्या वर्षातील होते व त्यांनी सनदी लेखापालाकडून कोणत्या वर्षी तपासणी करून घेणे आवश्यक होते, तसेच सनदी लेखापालाकडून सदरहू संस्थेचे लेखा परीक्षण केव्हा केलेले आहे, यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीला विदित केले की, लेखा परीक्षण दोन महिने उशिरा केलेले आहे अनुदान सन २०१३-१४ मधील होते.

यावर समितीने विचारणा केली की, दोन महिने उशीर झालेला आहे, सदर माहिती योग्य तपासून घ्यावी. आपल्या मागील अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवू नका. मंत्री महोदयांची ब्रिफिंग चुकू शकते, तसे सचिव महोदयांचे देखील ब्रिफिंग चुकू शकते. तसेच फक्त दोन महिन्यांच्या विलंबासाठी ७६ हजार रुपयांचा दंड आकारलेला आहे काय, यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीला उत्तर दिले की, सदर प्रकरणी ७६ हजार रुपयांचा दंड आकारला नसून तो १४४०० रुपयांचा आकारलेला आहे. सदरहू रक्कम ही अनेक प्रकरणांतील आहे. वसंतराव नाईक वसतीगृहांकडून १४४०० रुपयांची वसुली केली. रमा माता मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह चिंचोली यांच्याकडून १०८०० रुपयांची वसुली केलेली आहे. अशा प्रकारे सर्व वसतिगृहांची एकूण वसुली ही ७६ हजार रुपयांची झालेली आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, मागासवर्गीय असल्याबाबतचे बोनाफाईड व मागासवर्गीय प्रमाणपत्र हे त्यांच्या संचितेमध्ये आढळून आलेले नाहीत. पुढे समितीने असेही निदेर्शनास आणून दिले की, समितीने काही वसतिगृहांना भेटी दिल्या, त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वसतिगृहांना नियमित भेटी द्याव्यात, असे सांगण्यात आले होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले की, समितीच्या सूचनेप्रमाणे कॅम्प तयार करून जिल्ह्यातील वसतिगृहांना भेटी दिलेल्या आहेत.

यावर समितीस मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, समितीच्या सूचनेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आतापर्यंत जिल्ह्यातील किती वसतिगृहांना भेटी दिलेल्या आहेत. भेटी दरम्यान आपणास काय आढळून आले आहे,यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, आठ ते दहा दिव्यांगांच्या वसतिगृहांना भेटी दिलेल्या आहेत. भेटी दरम्यान वसतिगृहांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव आढळून आलेला आहे. उदाहरणार्थ, स्वच्छतागृहामध्ये लाईटची सोय नाही. काही वसतीगृहांमध्ये विद्यार्थी संख्या कमी आहे.

समितीने जालना जिल्ह्यातील उदाहरणासहित सचिवांना निदर्शनास आणुन दिले की, जालना जिल्ह्यातील काही वसतिगृहांना समितीने भेट दिली होती. त्यावेळी असे आढळून आले की, सदरहू वसतिगृहामध्ये १०० विद्यार्थ्यांची मंजुरी होती. परंतु तेथे फक्त २५ विद्यार्थी आढळून आले. संबंधित वसतिगृह चालक हा १०० विद्यार्थ्यांचे अनुदान घेत आहे. दुसरी बाब अशी की, त्या विद्यार्थ्यांना जेवणासाठी त्यांनी एका छोट्या पातेल्यामध्ये डाळ शिजवली होती व आठ ते दहा जणांना पुरेल इतक्या चपात्या तयार करण्यात आल्या होत्या. स्वच्छता गृह तिसऱ्या मजल्यावर होते, स्वच्छता गृहामध्ये लाईट नाही हे पण समजू शकतो. पण किमान त्या विद्यार्थ्यांना पोटभर जेवणाची सोय करणे आवश्यक होते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अमानवी वागणूक देत आहेत. या समितीने राज्यातील जेवढ्या मागासवर्गीय वसतिगृहांना भेटी दिल्या त्यातील एकाही वसतिगृहांमध्ये आवश्यक सोयी आढळून आलेल्या नाहीत. विधिमंडळाची समिती येणार असल्याची माहिती असून देखील त्यांनी कोणत्याही प्रकारची व्यवस्था केली नव्हती, एरव्ही तर किती अमानवी वागणूक दिली जात असेल. समिती भेट देणार असल्याची माहिती संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांना माहिती

असून देखील वसतिगृहांमध्ये एवढी वाईट परिस्थिती आहे. स्वतःच्या पैशाने मुलांना शिकविण्याची सोय होत नाही म्हणून ती व्यक्ती स्वतःच्या मुलाला वसतिगृहामध्ये ठेवतात. त्या ठिकाणी जर अशी अमानवी वागणूक मिळत असेल तर संबंधित व्यक्तींवर कडक कारवाई केली पाहिजे. अशा प्रकारची वागणूक देऊन देखील ते अनुदान वाढविण्याची मागणी कशी काय करु शकतात, समितीने तक्रार करून देखील अशा वसतिगृहांच्या मान्यता रद्द केलेल्या नाहीत. समितीने १५ जिल्ह्यांना भेटी दिलेल्या आहेत. त्यावेळी प्रत्येक जिल्ह्यातील अनेक वसतिगृहांना समितीने भेटी देऊन वसतिगृहांवर कारवाईची सूचना केली होती. पण त्यातील कोणत्याही वसतिगृहांवर कडक कारवाई करण्यात आलेली नाही. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग यांनी विदित केले की, सचिवालयाकडून सर्व वसतिगृहांची माहिती घेऊन त्या वसतिगृहावर मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.

तद्नंतर समितीने मत व्यक्त करून पुढीलप्रमाणे निदर्शनास आणून दिले की, आपण सर्व माहिती तपासून घ्यावी. लातूर येथे भेट दिली त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व वसतीगृहांना भेटी द्याव्यात, अशी सूचना केली होती. त्याचे कारण असे की, सदरहू वसतिगृहामध्ये फक्त गरिबांची व मागासवर्गीयांची मुले शिकतात. त्या विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांकडे आवश्यक पैसे असते तर त्यांनी त्यांच्या मुलांचा खाजगी शाळेमध्ये प्रवेश घेतला असता. अशा गरिबांच्या मुलांना अमानवी वागणूक दिली जात असेल तर ही बाब योग्य नाही. त्या मुलांना वेळेवर जेवण देखील दिले जात नाही. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आपण सर्व सामन्य कुटुंबातून आलेलो आहेत. आपणास सर्व परिस्थितीची जाण आहे. पुढे समितीने उदाहरण देत विदित केले की, वाशिम व पवणी येथील वसतीगृहांना भेट दिली असता असे निदर्शनास आले की, त्या ठिकाणी ५० मुलींसाठी एकच स्वच्छता गृह होते. राज्यातील अशा प्रकारचे वसतीगृहांची तपासणी करण्यासाठी उच्चस्तरीय पथक नेमण्यात यावे. राज्यातील सर्व मागासवर्गीय वसतिगृहांमध्ये अशाच प्रकारची परिस्थिती आढळून आलेली आहे. त्यामुळे सचिव महोदयांनी राज्य स्तरावर एक विशेष पथक स्थापन करावे. राज्यातील वसतिगृहांची या पथकाद्वारे तपासणी केली तर सर्व अडचणी दूर होतील. त्यामुळे अशा प्रकारचे एक तत्काळ पथक नेमण्यात यावे, त्या पथकाच्या माध्यमातून राज्यातील सर्व वसतिगृहांची तपासणी करावी व संबंधित दोषी वसतिगृहांवर कडक कारवाई करून कारवाईसह तपासणीचा अहवाल समितीला सादर करावा, अशी समितीची सूचना आहे. पुढील आठ दिवसांमध्ये सदरहू पथक नेमून त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीच्या वेळी समितीला सादर करावा. या पथकामध्ये आयएएस अधिकारी नेमण्यात यावेत. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग यांनी समितीला अहवाल सादर करण्याचे आश्वासन देवून विदित केले की, या पथकासाठी आयएएस अधिकारी उपलब्ध होऊ शकणार नाहीत. पण यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल. यावर समितीने समाधान व्यक्त करून सूचना दिल्या आहेत की, सदरहू पथकाद्वारे राज्यातील सर्व वसतिगृहांची पारदर्शक तपासणी करावी. जेणेकरुन राज्यातील मागासवर्गीय मुला-मुलींवर यापुढे अन्याय होणार नाहीत, अशा प्रकारे अधिकारी सदरहू पथकामध्ये नेमण्यात यावेत. सदरहू पथक कोणत्या जिल्ह्यामध्ये पाठविण्यात येत आहे, याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग यांनी समितीला माहिती सादर करण्याबाबत होकारात्मक संमती दर्शविली आहे.

तद्नंतर समितीने जालना जिल्हास भेट दिली असता भेटीदरम्यान आढळून आलेल्या बाबीसंदर्भात निदर्शनास आलेले उदाहरण देत विदित केले की, १०० विद्यार्थ्यांचे अन्न शिजविण्याऐवजी ३५ विद्यार्थ्यांचे अन्न शिजवित आहेत. किमान ३५ विद्यार्थ्यांचे अन्न चांगल्या प्रकारे शिजविणे आवश्यक आहे. अशा प्रकारची अमानवी वागणूक देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. अशा दोषी वसतिगृह चालकांवर कडक कारवाई करण्यासाठी नवीन उच्चस्तरीय पथक स्थापन करण्यात येत आहे. या पथकामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा देखील समावेश असेल. दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात येईल. असे निदेश देत पुढीलप्रमाणे सूचना केली की, सदरहू पथकाचे नियम काय आहेत ते दिले पाहिजे. जिल्ह्यातील समाज कल्याण अधिकारी यांनी संबंधित वसतिगृहाला प्रथम भेट दिली पाहिजे. कारण संबंधित निरीक्षकांच्या टिप्पणीमध्ये वसतिगृह व्यवस्थित सुरु आहे, अशी माहिती दिल्यामुळेच अनुदान दिले जात आहे. त्यामुळे प्रथम निरीक्षकांवरच कारवाई करणे आवश्यक आहे. जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांने किती वसतिगृहांना भेटी देणे आवश्यक आहे व निरीक्षकांनी किती वसतिगृहांना भेटी देणे आवश्यक आहे. विशेष पथकाद्वारे राज्यातील सर्व वसतिगृहांची तपासणी करण्यात यावी. त्या पथकाला अशी सूचना करणे आवश्यक आहे की, आपण तपासलेल्या वसतिगृहांची पुन्हा उलट तपासणी केली जाणार आहे. यामध्ये काही दोष आढळून आले तर विशेष पथकातील अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट सांगितले तरच विशेष पथक विशेष काम करु शकेल. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग यांनी समितीला आश्वासित केले की, तपासणी केलेल्या एकूण वसतिगृहांपैकी ५ टक्के वसतिगृहांची उलट तपासणी करण्यात येईल.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना केली की, अशा प्रकारची कार्यवाही केली तर शासन मागासवर्गीयासाठी विशेष कार्य करीत आहे, असे दिसून येईल. विशेष पथक स्थापन केल्यानंतर लातूर जिल्ह्यापासून तपासणीची सुरुवात करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीकडून मिळालेल्या सूचनांबाबत कार्यवाही करण्याबाबत विदित केले की, पूर्वी वसतिगृह तपासणीसाठी गेल्यानंतर कागदावरच लिहिले जात होते की, दोन बाथरुम आहेत. पण प्रत्यक्ष किती बाथरुम आहेत हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना माहिती राहत नव्हते. त्यामुळे यावर्षी जिल्हा परिषदेने एक ॲप विकसित केलेले आहे. संबंधित अधिकारी भेट देण्यासाठी गेल्यानंतर प्रथम हजेरी लावतील व प्रत्यक्ष बाथरुमची फोटो काढून ॲपवर पाठवतील. या सर्व प्रक्रियेस अजून दीड महिन्यांचा कालावधी लागेल. त्यानंतर त्यासंदर्भातील सर्व माहिती समितीला सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

**दिनांक १७ जुलै,२०१९ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

वसतिगृहाच्या तपासणी करीता नवीन उच्चस्तरीय तपासणी पथक स्थापन करावे. या पथकामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा देखील समावेश असेल. तपासणी केलेल्या एकूण वसतीगृहापैकी ५ टक्के वसतिगृहाची उलट तपासणी करून केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर अंतर्गत एकूण ११० अनुदानित वसतिगृहाची अचानक तपासणी दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तपासणी आदेश दिनांक २१ ऑगस्ट २०१९ नुसार ठरवून दिलेल्या पथकान्वये तपासणी केलेली आहे. तपासणी मध्ये आढळून आलेल्या क श्रेणी मधील ०८ वसतिगृहे व बंद असलेली एकूण ११ वसतिगृहे असे एकूण १९ वसतिगृहाची सूनावणी दिनांक ५ सप्टेंबर २०१९ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात घेण्यात आली. सूनावणीमध्ये क श्रेणीतील महात्मा ज्योतीबा फुले विद्यार्थी वतिगृह, वलांडी ता.देवणी व बंद असलेल्या वसतिृहातील यशवंत वसतिगृह वायगाव, ता.अहमदपूर व महात्मा फुले वसतिगृह, रापका हे वसतिगृह वगळून इतर १६ वसतिगृहे बंद करणे बाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर तपासणी अहवाल व सुनावणीचे इतिवृत्त मा.आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे ०१ यांना या कार्यालयाचे पत्र क्र. सकवि/जिपला/अ तपासणी/क वर्ग/बंद अनु.वसतिगृह/सुनावणी/इतिवृत्त /२०१९-२०/१५६०, दि. ११ सप्टेंबर २०१९ अन्वये सादर केलेला आहे

## अभिप्राय व शिफारशी

मागासवर्गीय वसतिगृह चालविणाऱ्या स्वंयसेवी संस्थांनी दिनांक १६ मार्च १९९८ परिशिष्ट क्रमांक-७ रोजीच्या शासन निर्णयान्वये लेखापरिक्षा अहवाल (सनदी लेखापाल) समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांना माहे ऑक्टोबर अखेर पर्यंत सादर करणे बंधनकारक असताना वसंतराव नाईक वसतिगृह सोमनाथपुर, ता. उदगीर यांनी ४ डिसेंबर २०१२ रोजी, रामा माता मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह चिंचोली, ता.जळकोट यांनी दिनांक ४ मार्च २०१४ व यशोधरा मुलींचे वसतिगृह अहमदपूर यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी विलंबाने प्रस्ताव सादर केले आहेत. या वसतिगृहांकडून ५ टक्के दंडाची रक्कम यानुसार अनुक्रमे रूपये १४,४००/-, रुपये १०,८०० /- व रुपये १०,८००/- ही रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच सनदी लेखापालाचे परिक्षण अहवाल विहित मुदतीत सादर न केल्यामुळे संबंधित संस्थांवर दंडात्मक कारवाई करून एकूण रूपये ७६,०००/- इतका दंड शासन नियमाप्रमाणे वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आलेला आहे.

राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या उदात्त उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता त्यांना वसतिगृहांच्या सोयी व शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी शासन कोट्यवधी रूपयांचा निधी खर्च करीत असते. राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचे संचालन करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व जिल्हा परिषदांच्या समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती व नियम वेळोवेळी शासनाने विहित केलेले असतानाही त्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याने या योजनांची फलनिष्पती पुर्ण होत नाही. यासाठी स्वयंसेवी संस्था यांचा प्रमाणिकपणा आणि विभागाच्या अधिकाऱ्यांची कर्तव्यदक्षता व सचोटी देखील तितकीच महत्वाची आहे.

समितीने राज्यातील अनेक जिल्ह्यांना भेटी दिल्या असून तेथील वसतिगृहांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, शासनाकडून मोठ्या प्रमाणात वसतिगृहांसाठी निधी देण्यात येत असतानाही मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पद्धतीचा आहार दिला जात नाही. वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेशा प्रमाणात स्वच्छतागृहांची सोय केलेली नसते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अमानवी स्वरूपाची वागणूक देण्यात येते. सर्वच मागासवर्गीय वसतिगृहांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव आढळून आलेला आहे.

समितीने दिलेल्या निदेशानुसार समाजकल्याण विभाग जिल्हापरिषद, लातूर अंतर्गत एकुण ११० अनुदानित वसतीगृहांची अचानक तपासणी ठरवून दिलेल्या पथकाद्वारे दि.१९ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आली. त्रुटी आढळलेल्या १९ वसतिगृहांची सुनावणी दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात घेण्यात आली. **त्यापैकी १६ वसतिगृह बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर तपासणी अहवाल व सुनावणीचे इतिवृत्त आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर करण्यात आले. या केलेल्या कारवाईबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

**राज्यातील संस्थाचालक, कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर वचक निर्माण व्हावा, त्यान्वये मागासवर्गीय योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होऊन वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध होण्यास विद्यार्थ्यांची शारिरीक व शैक्षणिक उन्नती होऊन योजनांची फलनिष्पत्ती व्हावी, यासाठी या वसतिगृहांची तपासणी करण्याकरीता राज्यस्तरावर एक विशेष पथक स्थापन करण्यात यावे. त्या पथकाच्या माध्यमातून सर्व वसतिगृहांची तपासणी करण्यात यावी व दोषीतांवर कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस कारीत आहे.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, लातूर

## थकित आगाऊ रक्कमांबाबत (थकित अग्रिम)

**परिच्छेद क्रमांक :- ४.७९७/३३ व ४.७९७/४७ (सन २०१३-२०१४)**

पंचायत समित्यांनी योजना, बांधकामे वगैरेसाठी ठेकेदार/ अधिकारी यांना वर्षामध्ये देण्यात आलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली त्याच वर्षी करणे आवश्यक आहे. शिवाय मागील आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली केल्यानंतरच पुढील कामाकरिता आगाऊ रक्कम देणे आवश्यक आहे. परंतु सन २०१३-२०१४ चे लेखापरीक्षण करताना असे आढळून आले आहे की, काही पंचायत समित्यांमध्ये १९६३ पासून दिलेल्या अग्रिमांचे समायोजन / वसुली करणे बाकी आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम क्रमांक २१० (ब) च्या उपबंधाकडे दुर्लक्ष करून आगाऊ रकमांचे जुजबी हिशोब ठेवण्यात आले आहेत. थकीत असलेल्या अग्रिम रकमांचे त्वरेने समायोजन / वसुली करणे आवश्यक आहे.

उदाहरणादाखल खालील पंचायत समित्यांचा बाबतीत खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा ३१ मार्च, २०१४ अखेर रुपये ३,१९,६७,०२०/- समायोजनाअभावी थकीत होत्या.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २४ | लातूर | औसा | ३३ | २१,१३,४३१/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :**

आक्षेपात नमुद केल्यानुसार समायोजना अभावी थकित अग्रीमाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**थकित अग्रामाचा तपशिल.**

| अ.क्र. | प्र.क्र./दिनांक | रक्कम | तपशिल | अग्रीम-तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | १३८<br>०९/१२/९८ | ९८,०००/- | मानव विकास संस्था काटगाव | शौचालय बांधकाम |
| २. | १३९<br>०९/१२/९८ | १,२५,०००/- | मानव विकास संस्था काटगाव | |
| ३. | १९७<br>०९/०१/९९ | २,५०,०००/- | मानव विकास संस्था काटगाव | |
| ४. | २६३<br>१०/१२/९९ | ५,००,०००/- | मानव विकास संस्था काटगाव | |
| ५. | १८६<br>१५/१२/९८ | २,५०,०००/- | शिवसागर ग्रा.वि.संस्था | |
| ६. | १७४<br>०९/१२/९८ | २,५०,०००/- | शिवसागर ग्रा.वि.संस्था | |
| ७. | ८८<br>१३/०५/१० | १,५०,०००/- | श्री. डी. एस. मोरे के.मातोळा | |
| ८. | २०२<br>३०/१२/१० | १,२०,०००/- | श्री. एच .ए. पाटील खरोसा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | १०८<br>२५/११/११ | ४०,४३१/- | श्री. एस. बी. माने. किल्लारी | वैद्यकीय अग्रीम |
| १०. | ७९<br>२/०२/१६ | १,५०,०००/- | श्री. गवळी | |
| ११. | ०४<br>०२/०५/१३ | ३०,०००/- | श्री. डी. बी. रुकमे | |
| १२. | १०९<br>०९/०७/१३ | १,५०,०००/- | श्री ढालाईत | |
| १३. | एकूण | २१,१३,४३१/- | | |

उक्त नमुद अग्रीम रक्कम रुपये २१,१३,४३१/- पैकी खालील नमुद प्रमाणे रक्कम रुपये ५,१२,४३१/- इतकी अग्रीमाची वसुली करण्यात आली आहे.

**अग्रीम वसुल झालेली यादी**

| अ.क्र. | प्र.क्र./ दिनांक | रक्कम | तपशिल | अग्रीम तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | ८८<br>१३/०५/१० | १,५०,०००/- | श्री .डी. एस. मोरे<br>मातोळा | वैद्यकीय अग्रीम |
| २. | २०२<br>३०/१२/१० | १,२०,०००/- | श्री. एच. ए. पाटील<br>खरोसा | |
| ३. | १०८<br>२५/११/११ | ४०,४३१/- | श्री. एस. बी. माने<br>किल्लारी | |
| ४. | चलन<br>०१/०२/१६ | ९८,४००/- | श्री. गवळी | |
| ५. | ३६<br>१२/०७/१६ | ५१,६००/- | श्री. गवळी | |
| ६. | प्र.क्र.१०<br>०३/०३/१५ | ३०,०००/- | श्री. डी. बी. रुकमे | |
| ७. | चलन<br>२९/०९/१७ | ४,०००/- | श्री. ढालाईत | |
| ८. | चलन<br>३०/०६/१८ | १८,०००/- | श्री. ढालाईत | |
| | एकूण | ५,१२,४३१/- | | |

**प्रलंबित अग्रीम**

| अ.क्र. | प्र.क्र./ दिनांक | रक्कम | कोणाला दिले | अग्रीम तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १३८<br>०९/१२/९८ | ९८,०००/- | मानव विकास संस्था काटगाव | शौचालय बांधकाम |
| २ | १३९<br>०९/१२/९८ | १,२५,०००/- | मानव विकास संस्था काटगाव | शौचालय बांधकाम |
| ३ | १९७<br>०९/०१/९९ | २५,००,००/- | मानव विकास संस्था काटगाव | शौचालय बांधकाम |

| अ.क्र. | प्र.क्र./ दिनांक | रक्कम | कोणाला दिले | अग्रीम तपशिल |
|---|---|---|---|---|
| ४ | २६३<br>१०/१२/९९ | ५,००,०००/- | मानव विकास संस्था काटगाव | शौचालय बांधकाम |
| ५ | १८६<br>१५/१२/९८ | २५,००,००/- | शिवसागर ग्रा.वि. संस्था | शौचालय बांधकाम |
| ६ | १७४<br>०९/१२/९८ | २,५०,०००/- | शिवसागर ग्रा.वि. संस्था | शौचालय बांधकाम |
| ७ | १०९<br>०९/१२/९८ | १,२८,०००/- | ढालाईत | वैदयकीय अग्रीम |
| एकूण | | १६,०१,०००/- | | |

तसेच थकित अग्रीम पैकी अग्रीम वसुल न झालेल्या वर नमुद अ.क्र.१ ते ६ वरील अग्रीम रक्कमाच्या संदर्भात खालील प्रमाणे तपशिल सादर करण्यात येत आहे.

मानव विकास संस्था काटगाव व शिवसागर ग्रामीण विकास संस्था यांना शौचालय बांधकामासाठी अग्रीम देण्यात आलेले होते. मात्र संबंधित संस्थेने अग्रीम घेतल्यानंतर काम पुर्ण केलेले नसल्यामुळे, व अग्रीमाचे समायोजन न केल्याने संबंधित संस्थे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यांच्या विरुध्द न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केलेले होते. सदर प्रकरणामध्ये या कार्यालया विरुध्द निकाल लागला. त्यामुळे सदर निर्णया विरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय लातूर यांच्या न्यायालयात अपिल केलेले आहे. त्याचा न्यायप्रविष्ट अपिल क्र. ७०/२०१७ आहे. मानव विकास संस्था, काटगांव यांचे ७५०/२००० दिनांक २६/१२/२००० अन्वये सी. जे. एम. कोर्ट, लातूर येथे प्रकरण चालू असून संबंधित संस्थेत न्यायालयाकडून वॉरंट जारी करण्यात आले होते. संबंधित संस्थेचे चेअरमन फरार असल्याने वॉरंट तामील होवू शकले नाही. न्यायालयाचे कागदपत्राची छायांकित प्रत संलग्न केलेली आहे. तसेच अ.क्र. ७ वरील वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(२) एका वर्षापेक्षा जास्त कालावधी पासुन प्रलंबित राहिलेल्या अग्रीमाचे कारणासह वार्षिक विवरण पत्र दर वर्षी १५ मे पर्यंत पाठविणे आवश्यक होते. तसेच स्थानिक निधी लेखाच्या वार्षीक तपासणी मध्ये प्रलंबित अग्रीमाचा तपशिल देण्यात येतो. तथापी सदरील अहवाल मा. सहसंचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबाद यांना सादर केलेला नाही. यापुढे नियमित अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात येईल.

**(१) परिच्छेद क्रमांक ४.७९७ /४७ (सन २०१३-२०१४)**

**थकलेल्या आगाऊ रकमा (थकीत अग्रिम)**

पंचायत समित्यांनी योजना, बांधकामे वगैरेसाठी ठेकेदार /अधिकारी यांना वर्षामध्ये देण्यात आलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/ वसुली त्याच वर्षी करणे आवश्यक आहे. शिवाय मागील आगाऊ रकमांचे समायोजन / वसुली केल्यानंतरच पुढील कामाकरीता आगाऊ रक्कम देणे आवश्यक आहे. परंतु सन २०१३-२०१४ चे लेखापरीक्षण करताना असे आढळून आले की, काही पंचायत समित्यांमध्ये १९६३ पासून दिलेल्या अग्रिमांचे समायोजन / वसुली करणे बाकी आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम क्रमांक २१० (ब) च्या उपबंधाकडे दुर्लक्ष करून आगाऊ रकमांचे जुजबी हिशोब ठेवण्यात आले आहेत. थकीत असलेल्या अग्रिम रकमांचे त्वरेने समायोजन / वसुली करणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल खालील पंचायत समित्यांच्या बाबतीत खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा ३१ मार्च, २०१४ अखेर रुपये ३,१९,६७,०२०/- समायोजना अभावी थकीत होत्या.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| २५ | लातूर | रेणापूर | ४७ | ८,८९,५७९/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

आक्षेपात नमुद केल्यानुसार सन २०१३-१४ चे लेखा परिक्षणाचे वेळी गटविकास अधिकारी पंचायत समिती रेणापूर यांनी दिलेल्या अग्रीमापैकी एकूण रुपये ८,८९,५७९/- चे कर्मचारी वैद्यकीय अग्रीम प्रलंबीत होते तेव्हा सदर अग्रीमापैकी खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अग्रीम वसुली (समायोजन) करण्यात आलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

**कर्मचारी वैद्यकीय अग्रीम वसुली तक्ता**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | देण्यात आलेले अग्रीम रक्कम | वसुल अग्रीम | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
| १. | श्री.तेलंग सुदाम गणपतराव, स.शि.प्रा.शा. रामवाडी | १,५०,०००/- | १९ | ०७/०८/१५ | १५,०००/- |
| | | | १३ | ०६/१०/१५ | १५,०००/- |
| | | | ३३ | ०८/१०/१५ | १५,०००/- |
| | | | १७ | ०२/११/१५ | १५,०००/- |
| | | | १८ | ०२/१२/१५ | १५,०००/- |
| | | | १५ | ०६/०१/१६ | १५,०००/- |
| | | | २४ | ०२/०२/१६ | १५,०००/- |
| | | | २७ | ०५/०३/१६ | १५,०००/- |
| | | | १४ | ११/०४/१६ | १५,०००/- |
| | | | ११ | ०२/०५/१६ | १५,०००/- |
| | | | | **एकूण** | **१,५०,०००/-** |
| २. | श्री.अकनगिरे एस.जी.मु.अ. प्रा.आ. घनसरगांव | १,५०,०००/- | ६४ | २७/८/१५ | १,५०,०००/- |
| | | | | **एकूण** | **१,५०,०००/-** |
| ३. | श्री. इगे दतात्रय नारायण स.शि केंप्राशा कामखेडा | १,५०,०००/- | चलन | १६/१२/१५ | १०,०००/- |
| | | | चलन | १५/०१/१६ | १०,०००/- |
| | | | चलन | १५/०२/१६ | १०,०००/- |
| | | | २९ | १३/०७/१६ | १,२०,०००/- |
| | | | | **एकूण** | **१,५०,०००/-** |
| ४. | श्री.भोसले अशोक गणपतराव प्रशाला पानगाव | १,५०,०००/- | ग्रँट मेडिकल फाउंडेशन पुणे रक्कम परत किर्दीवर जमा पेज क्र. २० दिनांक २७/०५/१४ | २७/०५/१४ | १,५०,००० |
| ५. | श्री.जाधव पी.एस. विस्तार अधिकारी (आरोग्य) | १,५०,०००/- | ६८ | १२/०९/१४ | १,५०,०००/- |
| ६. | श्रीमती जाधव एम.पी. पर्यवेक्षीका आय.सी.डीएस. खरोळा | ४७,१९०/- | ०८ | ०९/०२/१५ | ४७,१९०/- |
| | | | | **एकूण वसुली रुपये** | **७,९७,१९०/-** |

आक्षेपात नमुद प्रलंबीत अग्रीम रूपये ८,८९,५७९ पैकी वरील प्रमाणे रूपये ७,९७,१९० ची वसुली करण्यात आलेली असून उर्वरीत प्रलंबीत अग्रीम रूपये ९२,३८९ हे मयत सहशिक्षक प्रा.शा अरजखेडा श्री.नान्नजकर भारत रामकृष्ण यांचे असुन त्यांचे कुटूंब निवृती वेतनामधून सदरची वसुली करणेबाबत या कार्यालयाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना पत्र क्रमांक ५५४ दिनांक २२/०८/१६, क्रमांक ९४७ दिनांक २९/८/२०१६, क्रमांक ४३३ दिनांक २१/७/२०१७, क्रमांक ३०४ दिनांक २२/१२/२०१७ व क्रमांक ३३६ दिनांक २८/६/२०१८ अन्वये कळविण्यात आलेले असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १२ सप्टेंबर,२०१८ रोजी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी औस -रेणापूर थकलेल्या आगाऊ रकमा (थकित अग्रिम) येथील पंचायत समित्यांनी योजना, बांधकामे वगैरेसाठी ठेकेदार/अधिकारी यांना देण्यात आलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली त्याच वर्षी करणे आवश्यक होती परंतू सदर आगाऊ रकमा समायोजनाअभावी थकीत राहिल्याबाबत समितीने विचारणा केली असता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, यामध्ये दोन मुद्दे आहेत, मानव विकास संस्था कांटगाव व शिवसागर ग्रामविकास संस्था यांना शौचालय बांधकामासाठी अग्रीम रक्कम देण्यात आली होती. त्यांनी काम न केल्यामुळे जिल्हा परिषद कोर्टात गेली होती. ती केस आपण खालच्या कोर्टात हरलो व आता जिल्हा परिषदेने सेशन कोर्टात अपील केले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, अग्रीम रक्कम कशासाठी देण्यात आली होती. जो सक्षम प्राधिकारी आहे त्यांनी यामध्ये मनमानी कारभार केलेला आहे. ठेकेदाराची (बीले) देयकांची रक्कम आगाऊ(ॲडव्हांन्स) देण्यात येते काय, ग्रामपंचायतीचे काम देतांना त्यांनी आर्थिक स्थिती (फायनन्सिअल पोजिशन) का पाहिली जात नाही. ग्रामपंचायतीला पैसे न देता तेवढे काम करण्याची त्यांची तयारी आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. शौचालय बांधकामासाठी अग्रीम रक्कम(ॲडव्हांस) दिले व त्यांनी कामे केली नाहीत. अग्रीम (ॲडव्हांस) रक्कम देणाऱ्या तत्कालीन सक्षम प्राधिकाऱ्यांकडून हा निधी वसूल केला पाहिजे. आपण कोर्टात केस टाकली, प्रशासनाचा वेळ व पैसा त्यामुळे वाया जात आहे. ज्या अधिकाऱ्यांनी अनधिकृतपणे आगाऊ (ॲडव्हांस) रक्कम दिली त्यांच्याकडून निधी वसूल केला पाहिजे.

तदनंतर समितीने अशीही विचारणा केली की, मानव विकास संस्था व शिवसागर ग्रामविकास संस्था यांना शौचालय बांधकामासाठी जो अग्रीम (ॲडव्हांस) निधी दिला त्यातून त्यांनी शौचालयांची बांधकामे केली नाहीत. अशा परिस्थितीत करारनामे कसे केले, अग्रीम (ॲडव्हांस) रकमा कशा प्रकारे दिल्या. कोण अधिकारी यामध्ये दोषी आहे, काम झाले किंवा नाही झाले, यासंदर्भातील सखोल चौकशी करावी. संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढील निदेश दिले की, जो करारनामा केला त्यामध्ये अटी व शर्तींचे कोणी उल्लंघन केले त्यांच्याकडून वसुली केली पाहिजे. त्यासंदर्भात तपासणी करून घ्यावी. वसुली व कारवाई करून समितीला सदर अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

मानव विकास संस्था काटगांव व शिवसागर ग्रामविकास संस्था यांना शौचालय बांधकामासाठी देण्यात आलेल्या अग्रिम निधीतून शौचालयाची बांधकामे न केल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून व त्यांचेकडून वसूली करून त्यांचेविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा तसेच या प्रकरणी जिल्हा परिषदेने दाखल केलेल्या अपिल अर्जाची न्यायालयात सद्य:स्थिती काय आहे.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागामध्ये शौचालय बांधकाम करणेसाठी सन १९९७-९८ मध्ये खालीलप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार मानव विकास संस्था काटगांव व शिवसागर ग्रा.वि.बहुउद्देशिय सेवा भावी संस्था लातूर यांना अग्रीम रूपये १४,७३,००० देण्यात आलेले असून सदरचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

| मु.का.अ.यांचे आदेश क्र.व दि. | प्र.क्र./दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| आदेश क्र.६७,दि.२९/०१/१९९९ | १३८ /०९/१२/९८ | ९८,००० | मानव विकास संस्था सं.काटगाव |
| | १३९ /०९/१२/९८ | १,२५,००० | मानव विकास संस्था सं.काटगाव |
| | १९७ /०९/१२/९८ | २,५०,००० | मानव विकास संस्था सं.काटगाव |
| | २६३ /१०/१२/९८ | ५,००,००० | मानव विकास संस्था सं.काटगाव |
| आदेश क्र.६१,दि.२९/०१/१९९९ | १८६/ १५/१२/९८ | २,५०,०००- | शिवसागर ग्रा.वि.बहुउद्देशिय सेवा भावी संस्था लातूर |
| | १७४/ ०९/१२/९८ | २,५०,००० | शिवसागर ग्रा.वि.बहुउद्देशिय सेवा भावी संस्था लातूर |
| | एकूण | १४,७३,००० | |

सदर योजना राबवित असताना शौचालयाचे कामासाठी उक्त दोन्ही संस्थेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उक्त आदेशानुसार या कार्यालयाने अग्रीम दिल्यानंतर संबंधित संस्थेने काम न केल्यामुळे दोन्ही संस्थांना या कार्यालयाकडून वेळोवेळी पत्रव्यवहार व नोटीसा देवून काम करणेबाबत कळविण्यात आलेले असतानाही सदर संस्थांनी काम केलेले नाही त्याअनुषंगाने अपहारीत रक्कम भरणा करणेबाबत कळवूनही मानव विकास संस्था सं.काटगाव व शिवसागर ग्रा.वि.बहूउद्देशिय सेवा भावी संस्था लातूर यानी अपहारीत रक्कम भरणा केलेली नाही.

त्या अनुषंगाने मानव विकास संस्था काटगांव यांचे विरूध्द पोलीस स्टेशन औसा येथे दिनांक ३०/०४/२००० रोजी एफआरआर क्र. ६१/२००० नुसार भांदवि कलम-४२०,४०६ नुसार या कार्यालयामार्फत गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने शिवसागर ग्रा.वि.बहूउद्देशिय सेवा भावी संस्था लातूर यांचे विरुध्द कोर्ट केस क्र. ७४९/२००० हे प्रकरण न्यायालयामध्ये सुरु होते सदर न्यायालयाने आपल्या कार्यालयाविरुध्द निकाल दिल्याने सदर निर्णयाविरुध्द वरिष्ट न्यायालयामध्ये अपिल केलेले आहे त्याचा केस M-७०/२०१७ अन्वये दिनांक २१/१२/२०१७ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय लातूर येथील न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. तेव्हा सदर दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :—** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट,२०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, थकीत आगाऊ रकमांची वसुली झालेली आहे काय, मानव विकास संस्था काटगांव व शिवसागर ग्रामविकास संस्था यांना शौचालय बांधकामासाठी अग्रीम देण्यात आला होता. अग्रीम निधीतून शौचालयाची बांधकामे न केल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली काय आणि चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे काय, संबंधित संस्थांविरुद्ध एफआयआर दाखल केला होता, त्यांच्या बाजूने निकाल लागला, त्यानंतर आपण अपील दाखल केले असे लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस खुलासा केला की, सन १९९९ मध्ये दोन संस्थांना अग्रीम (ॲडव्हान्स) देण्यात आला होता. पंचायती राज समितीने दौऱ्याच्या वेळी ही बाब निदर्शनास आणून दिली होती. परंतु, त्यापुर्वी दोन्ही प्रकरणात पोलीस केस दाखल करण्यात आली होती. दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट असताना लोअर कोर्टात एका प्रकरणात त्यांच्या बाजूने निकाल लागला. आता एक प्रकरण प्रलंबित आहे. त्यांच्या बाजूने निकाल कसा काय लागला या विषयी चौकशी करावी असे विभागाकडून अधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे. ही केस क्लीअर आहे. विभागाने यापुर्वी अग्रीम (ॲडव्हान्स) दिलेला आहे. परंतु, त्यांनी काम केलेले नाही. विभागाकडून पोलीस केस करून पैसे परत करण्याची मागणी करीत आहे. कोर्टात त्यांच्या बाजूने निकाल कसा काय लागला हा मुद्दा आहे. कदाचित विभागाकडून वतीने कोर्टात कोणी उपस्थित राहिले किंवा नाही हे बघावे लागेल. मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत असणारे अधिकारी नवीन आहेत. विभागाकडून या दोन्ही प्रकरणाची पुन्हा सखोल चौकशी करण्यात येईल आणि अग्रीमाची (ॲडव्हान्स) रक्कम कशी वसूल करता येईल, संबंधित दोन्ही संस्थांवर कशी कारवाई होईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल या संदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-१४ चे लेखापरीक्षण करताना लातूर जिल्हयातील औसा पंचायत समितीने दिलेल्या अग्रिमांचे समायोजन/वसुली करणे बाकी आहे. यामध्ये मानव विकास संस्था काटगाव यांना रू. ९,७३,००० व शिवसागर ग्रा. वि. बहुद्देशिय सेवा भावी संस्था लातूर यांना रू. ५,००,००० असे एकूण रूपये १४,७३,००० इतकी रक्कम शौचालय बांधकामासाठी अग्रीम म्हणून देण्यात आली होती. मात्र संबंधित संस्थेने अग्रीम घेतल्यानंतर काम पूर्ण केलेले नाही. याप्रकरणांबाबत पोलिस स्टेशन मध्ये गुन्हयांची नोंद करण्यात आली असून दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

वास्तविक कोणतेही काम ठेकेदाराकडे देताना त्याची आर्थिक स्थिती व काम करण्याची योग्यता याबाबतची पडताळणी करूनच अग्रीम अदा करणे आवश्यक होते. त्यामुळे याप्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी व त्यांच्याकडून तातडीने रक्कम वसूली करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले.

**या प्रकरणाबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, 'कनिष्ठ न्यायालयात एका प्रकरणात जिल्हा परिषदेच्या विरूध्द निकाल लागला असून एक प्रकरण प्रलंबित आहे'. या प्रकरणांमध्ये अग्रिम दिलेले असताना काम पूर्ण केलेले नाही असे असताना निकाल कंत्राटदाराच्या बाजूने का लागला, न्यायालयात अधिकारी उपस्थित राहिले किंवा नाही हे तपासून या दोन्ही प्रकरणांची पुन्हा चौकशी करण्यात येईल. या संस्थांकडून अग्रिमाची रक्कम वसूल करण्यासह त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत प्रयत्न करून यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यात येईल असे सचिवांनी समितीस आश्वासित केले. याबाबत समितीने संमती दर्शवून या प्रकरणांबाबत सचिवांनी समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे या प्रकरणाची फेर चौकशी करावी तसेच त्यात दोषी आढळणाऱ्या संबंधीताविरूध्द कठोर कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**भविष्यकाळात जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी योजना व बांधकामे इत्यादींसाठी कामे देताना कंत्राटदाराची आर्थिक स्थिती व त्याची काम करण्याची योग्यता याबाबतची पडताळणी करूनच नियमाप्रमाणे देय असलेला अग्रीम अदा करावे. तसेच संबंधित कंत्राटदारांना देण्यात आलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली त्याचवर्षी करण्याची दक्षता घेण्यात यावी तसेच प्रलंबित असलेली अग्रीमाची वसुली संबंधीताकडून तातडीने वसुली करण्यासंदर्भात कडक स्वरूपाची कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, लातूर

## प्रमाणकांवर रक्कम प्राप्त झाल्याबाबतच्या स्वाक्षऱ्या नसल्याबाबत.

**परिच्छेद क्र. ५.७१ (सन २०१३-२०१४)**

ग्रामपंचायत पिंपरी अंबा, तालुका लातुर, जिल्हा लातूर, सन २०१०-११ ते २०११-१२ (परिच्छेद क्र. १०)- ग्रामपंचायतीतील ९ खर्चाची प्रमाणके रक्कम रुपये १,४७,०००/- या वर रक्कम प्राप्त करणा-या दुकानदारांच्या तसेच मजुरांच्या रक्कम प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना प्रमाणकावर रक्कम प्राप्त झाल्याबाबत स्वाक्ष-या नसल्याने दिसुन आले. स्वाक्ष-या घेऊन खात्री पटविणे आवश्यक आहे. अन्यथा रक्कम रुपये १,४७,०००/- वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

लेखा आक्षेपात नमुद केलेप्रमाणे ग्रामसेवकांनी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकावर रकमा प्राप्त करणाऱ्या दुकानदाराच्या / मजुरांच्या रकमा प्राप्त झालेबाबत स्वाक्षऱ्या घेणे अनावधानाने राहुन गेले होते. परंतु लेखा परिक्षणात नमुद केले प्रमाणे प्रमाणकावर दुकानदारांच्या / मजुरांच्या रकमा प्राप्त झालेबाबत स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या आहेत. व त्याबाबत कोणतीही अनियमीतता झालेली नाही.

तरी कृपया आक्षेपाचे अनुषंगाने अनुपालन मान्य करण्यात येवुन सदरील आक्षेप निकाली काढण्यात यावा ही विनंती.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मस्टरवर एकाही मजूराची रक्कम मिळालेबाबत स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाहीत. सबब रक्कम रुपये ७६०००/- चा अपहार झालेला आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मस्टरवर मजुरांच्या सह्या नंतर करून घेण्यात आल्या आहेत. समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदर्शनास आणून देत मत व्यक्त केले की, मस्टरवर नंतर सह्या करून घेणे हे कितपत योग्य आहे, ज्यावेळी काम केले त्याचवेळी सह्या घेणे अपेक्षित आहे. त्यावेळी जे मजूर कामावार होते त्यांच्या सह्या त्याचवेळी घ्यायला पाहिजे होत्या. नंतर सह्या करून घेणे कितपत योग्य आहे. यामध्ये जे मजूर हजर नाहीत त्यांना पेमेंट दिले गेले असावे. हे चुकीचे काम केलेले आहे. मजूर कामावर हजर असला तरी मजूराला एक रुपया देखील जास्त रक्कम देत नाही. त्याच्या कामाच्या मोजमापाप्रमाणे त्यांना मजूरी देण्यात येते. अशा प्रकारे चुकीचे पेमेंट काढीत आहात. आपण सीआरमध्ये नोंदी कशाच्या आधारे घेतात. खातेप्रमुखांनी काम पूर्ण केल्याचे दाखविले आहे. फक्त एमआरईजीएसच्या कामावरील गरीब मजूराचे इमानदारीने मोजमाप होते. २०३ रुपये त्यांची स्टॅण्डर्ड मजूरी आहे ती त्यांना देण्यात येत नाही. कामावर हजर राहिल्यावर कामाचे मोजमाप केल्यावर त्यांना त्यानुसार मजुरी देण्यात येते.

तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निर्देश दिले की, या प्रकरणात प्रत्यक्षात काम झालेले नाही, फक्त सह्या करण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे ही रक्कम संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावी. या प्रकरणात कोणतेही काम झालेले नाही, फक्त दुसऱ्या मजुरांच्या सह्या घेऊन पेमेंट उचलण्याचे काम करण्यात आले आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करावी जे संबंधित अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी करून कारवाईसह अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली:—**

पिंपरी (अंबा) ता.लातूर येथे मस्टरवर (हजेरीपटावर) एकाही मजूराची रक्कम मिळणेबाबत स्वाक्षरी घेण्यात आलेली नसून रुपये ७६०००/- एवढ्या रक्कमेचा अपहार झाल्याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मजुरांच्या सह्या नंतर करून देण्यात आल्या असे समितीस सांगणे नियमानुसार आयोजित आहे काय असल्यास, संबंधितांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

पिंपरी (अंबा) ता.लातूर येथील कामावरील हजेरी पटावर मजूराची स्वाक्षरी न घेतल्याने रुपये ७६००० अपहार झाले प्रकरणी या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस दिनांक १९/०९/२०१८ अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. संबंधित ग्रामसेवक यांनी दिनांक २३/०९/२०१८ रोजी सादर केलेला खुलासा समाधानकारक व वस्तुनिष्ठ स्वरूपाचा नसल्याचे निदर्शनास आल्याने या कार्यालयाचे आदेश क्र.जाक्र. पंसला/ग्रापवि/कार्या-२/ कावि-११८/२०१८ दिनांक ०१/१०/२०१८ अन्वये संबंधित ग्रामसेवकाची एक वर्षाची वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :—** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी सामितीने अशी विचारणा केली की, संबंधित ग्रामसेवकाची एक वर्षाची वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आले आहे. ही शिक्षा पुरेशी आहे काय? यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस खुलासा केला की, परिच्छेद क्र.५.७१/१० मध्ये ७,६०० रुपयांचा अपहार झालेला नसून ७६ हजार रुपयांचा अपहार झालेला आहे. मी समितीला मूळ परिच्छेद वाचून दाखविते "ग्रामपंचायत पिंपरी (अंबा), ता.लातूर ग्रामपंचायतीतील ९ खर्चांची प्रमाणके रक्कम रुपये १ लाख ४७ हजार यावर रकमा प्राप्त करणाऱ्या दुकानदारांच्या तसेच मजुरांच्या रकमा प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना प्रमाणकावर रक्कम प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षऱ्या नसल्याचे दिसून आले. त्यामुळे स्वाक्षरी घेऊन खात्री करावी." एकूण १ लाख ४७ हजार रुपये वसूल करणे आवश्यक आहेत. परंतु जो अपहार सिद्ध झाला तो ७६ हजार रुपये आहे. मूळ परिच्छेदासोबत प्रमाणकार स्वाक्षऱ्या नसल्याचे अॅनेक्सचर आहे. यावर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीला दिलेल्या खुलाश्याबाबत सहमती दर्शवून अधिकची माहिती विदित केली की, ती रक्कम ७,६०० रुपये नसून ७६ हजार रुपये आहे. समितीकडून जी प्रश्नावली पाठविण्यात आली त्यामध्ये ७,६०० रुपये नमूद केले आहे.

समितीकडून पाठविण्यात आलेल्या प्रश्नावली मध्ये टंकलेखनाच्या चुकीने ७६०० रुपये दर्शविण्यात आलेली असली तरी ७६०० रुपये असोत किंवा ७६ हजार रुपये असोत, कायद्यानुसार तो गुन्हाच आहे. शासकीय रकमेचा अपहार होत असेल तर ते चुकीचे आहे असे समितीने मत व्यक्त केले असता, अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, या प्रकरणात अपहार झालेला नाही. ७६ हजार रुपयांच्या पेमेंट पुस्तिकेवर मजुरांची स्वाक्षरी नव्हती, नंतर स्वाक्षरी घेण्यात आली असे लेखी उत्तर आहे. यावर समितीने मत व्यक्त करून प्रश्न उपस्थित केला की, आपण मजुरांची स्वाक्षरी घेऊन पेमेंट देतो. ग्रामसेवकांनी परस्पर बँक खात्यातून रक्कम काढून ती स्वतः जवळ ठेवली असेल तर ते सुद्धा चुकीचे आहे. त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे? समितीने विचारलेल्या प्रश्नास अपर मुख्य सचिव यांनी उत्तर दिले की, चूक झाली म्हणून त्यांची कायम स्वरुपी एक वेतनवाढ थांबविण्यात आली. याला अपहार म्हणता येईल.

तद्नंतर समितीने नाराजी व्यक्त करीत निदेश दिले की, मजुरांची स्वाक्षरी न घेता पेमेंट काढण्यात आले ही चूक आहे. त्यामुळे संबंधितावर कारवाई करावयास पाहिजे होती. चौकशीत काय निष्पन्न झाले? एक वेतनवाढ थांबविणे योग्य वाटत नाही. अशा प्रकारे मजुरांच्या पेमेंटची रक्कम स्वतः जवळ ठेवणे बरोबर नाही. संबंधीत ग्रामसेवकाला निलंबित करून समितीला अहवाल सादर करण्यात यावा.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१०-११ ते २०११-१२ मध्ये. पिंपरी (अंबा) (ता. जि.लातूर) ग्रामपंचायतीतील ९ खर्चाची प्रमाणके रूपये १,४७,०००यावर रक्कम प्राप्त करणाऱ्या दुकानदारांच्या व मजुरांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाहीत. हजेरीपटावर मजुरांच्या स्वाक्षरी नंतर घेण्यात आल्या आहेत. या प्रकरणामध्ये रूपये ७६,००० इतक्या रकमेचा अपहार झालेला आहे.

वास्तविक हजेरीपटावर मजुरांच्या स्वाक्षऱ्या नंतर घेणे निश्चितच चुकीचे असून ज्यावेळी काम केले त्याचवेळी त्यांची स्वाक्षरी घेणे अपेक्षित आहे. मजुर कामावर हजर असताना त्यांच्या कामाच्या मोजमापाप्रमाणे मजुरी देण्यात येते. मजुरांना एक रूपयाही

जास्तीचा देण्यात येत नाही. या अपहाराच्या प्रकरणात प्रत्यक्षात काम झालेलेच नसून फक्त स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या आहेत; असे समितीचे मत असल्याने याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून वसुलीबाबतची कारवाई करावी व याबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले.

या प्रकरणाबाबत विभागीय सचिवांच्या घेण्यात आलेल्या साक्षीमध्ये सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले की, या अपहार प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून याप्रकरणातील संबंधित ग्रामसेवक यांनी दिनांक २३/०९/२०१८ रोजी सादर केलेला खुलासा समाधानकारक व वस्तुनिष्ठ स्वरूपाचा नसल्याने त्यांची एक वर्षाची वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आली आहे.

**कामावर असलेल्या मजूरांची उपस्थिती व कामाच्या मोजमापाप्रमाणे त्यांना मजूरी देण्यात येते; असे असताना या प्रकरणात मजूरांच्या रकमा प्राप्त झाल्याबाबत प्रमाणकावर स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. यामध्ये मजूरांच्या मजूरीच्या रकमेचा अपहार झालेला असल्याने सदरहू बाब निश्चितच गंभीर स्वरूपाची आहे. या गैरव्यवहारातील संबंधित ग्रामसेवकाची नुसती तात्पुरती अथवा कायमस्वरूपी वेतनवाढ थांबविणे योग्य होणार नाही असे समितीचे मत असल्याने या ग्रामसेवकावर कठोर कारवाई करणे आवश्यक होते समितीच्या निदेशानुसार चौकशी अधिकाऱ्यांने कारवाई केली नसल्याने या प्रकरणी फेर चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, लातूर

## जळकोट ग्रामपंचायतीत बनावट स्वाक्षरी करून केलेली अनियमितता.

**परिच्छेद क्र. ५.७२ (सन २०१३-२०१४)**

| अ.क्र. | नियम बाहय बाबींचे स्वरुप | जिल्हयाचे नांव | पं. स. चे नाव | ग्रा. प. चे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| ६. | निनावी नोंदविलेल्या खर्चाबाबत | लातुर | जळकोट | जळकोट | १५<br>२०११-१२ | २१,५००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

ग्रामपंचायत जळकोट यांनी सन २०११-१२ च्या लेखा परीक्षणात ग्रामपंचायतीने नोंदविलेला निवासी खर्च रुपये २१,५००/- एवढा संबंधित ग्रामपंचायतीकडुन वसुल करून ग्रामनिधी खात्यावर पावती क्र. ४८६७७१ दिनांक ८ मार्च, २०१६ अन्वये भरणा करण्यात आलेला आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जळकोट ग्रामपंचायतीतील अनियमिततेसंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ग्रामपंचायत जळकोट यांनी सन २०११-१२ च्या लेखा परीक्षणात ग्रामपंचायतीने नोंदविलेला निनावी खर्च रुपये २१,५०० संबंधित ग्रामपंचायतीकडून वसूल केलेला आहे. यावर समितीने संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत निदेश दिले. तदनंतर समितीने अशी विचारणा केली की, श्री.पी.पी. गायकवाड, ग्रामसेवक यांनी आस्था, शिवनखेडा ता.चाकूर येथील, महिला सरपंच यांच्या बनावट सह्या करून पैसे उचलल्याच्या तक्रारीवरून भारतीय दंड विधान संहिता कलम ४२० अन्वये चाकूर पोलीस स्टेशन येथे सन २००२ मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे. श्री. गायकवाड हे आजपर्यंत ज्या ज्या ग्रामपंचायतीचा पदभार घेतात. तेथे तेथे ते वादग्रस्त ठरले आहेत. अशा सर्वच ठिकाणी त्यांनी अशांतता निर्माण केली आहे. भ्रष्टाचार व गैरव्यवहार करून मोठ्या प्रमाणात मालमत्ता जमा केलेली आहे. श्री.पी.पी.गायकवाड हे पूर्वी चाकूर तालुक्यात आस्था व शिवनखेड येथे ग्रामसेवक होते. अशिक्षित महिला सरपंच यांचा फायदा घेऊन त्यांनी गैरव्यहार केला. सदर ग्रामसेवकावर ४२० चा गुन्हा दाखल झालेला आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणती कारवाई केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येईल असे आश्वासन समितीला देण्यात आले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली:-**

सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणात जळकोट ग्रामपंचायतमधील तत्कालीन ग्रामसेवक श्री. गायकवाड पी.पी. यांनी आष्टा शिवणखेड ता. चाकूर येथील महिला सरपंच यांच्या बनावट सह्या करून पैसे उचलल्या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास, चौकशीनुसार संबंधित ग्रामसेवकाविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

श्री. गायकवाड पी. पी. ग्रामसेवक मौजे आष्टा, ता.चाकुर यांनी सरपंच यांच्या बनावट सह्या करून पैसे उचलल्याप्रकरणी चौकशी करण्यात येऊन संबंधितांस सेवेतून निलंबित करण्यात आले होते. संबंधितावर सदर प्रकरणी पोलीस गुन्हा १३८/०२, दिनांक

०१/११/२००२ ओ.पी.नळेगांव त्याच प्रमाणे पोलीस गुन्हा १०६/२००२ दिनांक १४/०९/२००२ दाखल करण्यात आलेला आहे व संबंधिताची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती स्थगित करण्याची शास्ती देण्यात आली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय (आस्था-७) –** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०११-१२ च्या लेखा परीक्षणात जळकोट ग्राम पंचायत मधील तत्कालीन ग्रामसेवक श्री. गायकवाड पी.पी. यांनी आष्टा शिवणखेड ता.चाकूर येथील महिला सरपंच यांच्या बनावट सह्या करून पैसे उचलल्या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय? बनावट स्वाक्षरी केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, श्री. पी.पी.गायकवाड, ग्रामसेवक यांनी सरपंच यांच्या बनावट सह्या घेतल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले. सन २००२ मध्ये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केली. विभागीय चौकशीत अंशतः गुन्हा सिद्ध झालेला आहे. त्या अनुषंगाने त्यांची एक वेतनवाढ थांबविण्यात आली. स्वाक्षऱ्या खोट्या आहेत का खऱ्या आहेत हे दिवाणी न्यायालय ठरविते, तो त्यांचा अधिकार आहे. कोर्टाने त्यांना दोष मुक्त केले आहे. अद्याप कोर्टाचा आदेश आलेला नाही. कोर्टाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर समितीला माहिती देण्यात येईल. तदनंतर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अधिकची माहिती विदित केली की, कोर्टाने असा निष्कर्ष काढलेला आहे की, त्यांनी खोट्या स्वाक्षऱ्या केल्या नव्हत्या. ग्रामसेवक व सरपंच यांच्या वादामुळे काही झाले असावे. यावर समितीने विचारणा केली की, जास्तीत जास्त शिक्षेची तरतूद किती आहे, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केली की, विभागीय चौकशी झाली तर आपण संबंधिताला बडतर्फ सुद्धा करू शकतो. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अनेक ठिकाणी अशी प्रकरणे निदर्शनास येतात. भ्रष्टाचार व अनियमितता झाल्यानंतर चौकशी करून संबंधितावर कारवाई केली जाते. काही प्रकरणात संबंधित लोक कोर्टात जातात. विभागाच्या वतीने कोर्टात योग्य बाजू मांडली गेली पाहिजे. तसेच, पाठपुरावा करताना वेळोवेळी कोर्टात गैरहजर राहिल्यामुळे संबंधिताला पाठीशी घातल्यासारखे किंवा समर्थन केल्यासारखे वाटते. चूक असेल तर संबंधितावर कारवाई केली पाहिजे. ग्रामसेवक, विस्तार अधिकारी मालक असल्याप्रमाणे वागतात. ग्रामसेवक जवळचा असेल तर त्याप्रमाणे चौकशी केली जाते अशी सुद्धा काही प्रकरणे आहेत. असे प्रकार निदर्शनास आल्यानंतर जो अधिकारी संबंधित व्यक्तीला पाठीशी घालतो त्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे. कोर्टात अशी प्रकरणे प्रलंबित असतील तर ती लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने आपण स्थानिक स्तरावर सूचना द्याव्यात. दोषी व्यक्तीला जास्तीत जास्त शिक्षा कशी होईल हे बघितले पाहिजे. ग्रामसेवक, विस्तार अधिकारी जाणिवपूर्वक चुका करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. काही अधिकारी नियमित चुका करीत असतील तर वेळ प्रसंगी त्यांना सेवेतून बडतर्फ केले पाहिजे. स्थानिक स्तरावर तशा सूचना देण्याबाबत समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

ग्रामपंचायत जळकोट यांनी सन २०११-१२ या वर्षात रूपये २१,५०० इतकी रक्कम निनावी खर्च म्हणून नोंदविलेली होती. श्री. पी. पी. गायकवाड, ग्रामसेवक यांनी आष्टा शिवणखेड, ता. चाकूर येथील महिला सरपंच यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून पैसे उचल्याच्या तक्रारीवरून त्यांच्यावर कलम ४२० अन्वये पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. या विषयासंदर्भात अधिकची माहिती घेण्यासाठी दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत निनावी खर्च रूपये २१,५०० संबंधित ग्रामपंचायतीकडून वसूल करून ग्रामनिधी खात्यामध्ये भरणा करण्यात आलेला आहे. श्री. गायकवाड यांच्या तक्रारीबाबत चौकशी करून कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी समितीस आश्वासित केले.

या विषयासंदर्भात झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले की, श्री. गायकवाड, ग्रामसेवक यांची बनावट सह्या करून पैसे उचलल्याप्रकरणी चौकशी करून त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या विभागीय चौकशीत अंशतः गुन्हा सिध्द झालेला असल्याने त्यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती स्थगित करण्याची शास्ती देण्यात आली आहे. श्री. गायकवाड यांना न्यायालयाने दोषमुक्त केले आहे तथापि, याबाबतचे आदेश अद्याप प्राप्त झालेले नाही. आदेश प्राप्त होताच समितीला माहिती सादर करण्यात येईल.

अनियमितता झाल्यानंतर चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येते परंतु काही प्रकरणात न्यायालयात गेलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांबाबत विभागाच्यावतीने योग्य बाजू मांडली जात नाही. न्यायालयात गैरहजर राहिल्यामुळे संबंधित गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याला पाठीशी घातल्यासारखे किंवा समर्थन केल्यासारखे ठरते. चूक असेल तर संबंधित दोषींवर कारवाई झालीच पाहिजे परंतु गैरव्यवहार करणारे अधिकारी/कर्मचारी यांना पाठीशी घालत त्यांना अवैधपणे संरक्षण चौकशी अधिकाऱ्यांकडून तसेच सादरकर्ते अधिकाऱ्यांकडून दिले जाते, यात अनेक उणीवा ठेवल्या जातात व निष्पक्षपणे चौकशी अधिकाऱ्यांकडून योग्य प्रकारे चौकशी करण्यात येत नाही. त्यामुळे चौकशी अधिकारी नेमताना त्यांच्यात सचोटी व कर्तव्य पाळणारा असेल अशाच अधिकाऱ्यांना चौकशी अधिकारी नेमावेत व त्यादृष्टीने शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा, असे समितीचे मत आहे. तसेच दोषी व्यक्तीला जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी न्यायालयात प्रलंबित असलेली अशी प्रकरणे चांगल्याप्रकारे शासनाची न्यायालयासमोर बाजु मांडून लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, लातूर

## लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याबाबत.

**परिच्छेद क्रमांक. - ३.६३४ (१६) व ३.७३४ (०५) (सन २०१३-२०१४)**

**(१) परिच्छेद क्रमांक. - ३.६३४ (१६) (सन २०१३-२०१४)**

**मौ. केकतसिदंगी तालुका जळकोट कोल्हापुरी कामातील अनियमिततेबाबत.**

जिल्हा परिषद, लातूर, सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक १६) मौजे केकतसिंदगी तालुका जळकोट कोल्हापुरी बंधारा बांधकामावर रक्कम रुपये १३,३०,१५४ एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९, दिनांक १९/०३/२०१३ मधील टीप १ नुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्विकारलेची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समिती च्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे परंतू अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

२. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली, १९८४ चे नियम २९६ (२) नुसार माहे फेब्रुवारी व मार्च महिन्यात कामाचे कार्यरंभ आदेश निर्गमित करण्यास प्रतिबंध आहे. असे असताना सदरील कामाचे आदेश माहे फेब्रुवारी मध्ये देऊन नियमाचे उल्लंघन करण्यात आलेले आहे.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४७ नुसार प्रत्येक करार नमुना नंबर ४८ मधील नोंदवहीत नोंदवून कंत्राटदारास दिलेल्या रकमेची नोंदही नोंदवहीमध्ये करणे आवश्यक असताना नमुना नंबर ४८ मध्ये कराराच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

४. महाराष्ट्र शासन राजपत्र विक्रीकर आयुक्त, मुंबई यांची अधिसूचना दिनांक ४ एप्रिल २०१२ नुसार मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून २% प्रमाणे मूल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा व मुल्यवर्धीत कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून ५% प्रमाणे मुल्यवर्धीत कर वसूल करण्यात यावा. सदरील कामाचे देयकातून मूल्यवर्धित कराची रक्कम ५% प्रमाणे रक्कम रुपये ६६,५०८ वसूल करणे आवश्यक असताना देयकातून रक्कम रुपये ३,६१५ वसूल केली हे तरी कमी वसूल केलेली रक्कम रुपये ६२,८९३ संबंधित कंत्राटदाराकडून वसूल शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

५. सदर निविदेतील विवरणपत्रामधील माहिती निविदाकारानी भरलेली नाही. त्यामुळे निविदाराकडील उपलब्ध अवजारे, संयंत्रे तांत्रिक कर्मचारी, मजूर इत्यादी बाबी त्यांच्याकडे असल्याची लेखापरीक्षणात खात्री न करता स्वीकारलेली आहे.

६. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र. ४७२/वित्त-९,(३३) दिनांक ०९/०२/२००९ मधील परिच्छेद क्रमांक ६ नुसार ज्या ग्रामपंचायतीकडे अवजारे, यंत्रे नसतील वा भाडयाने घेणे शक्य नसतील तर अशा ग्रामपंचायतीनी कामे घेतल्यास सदरचे काम त्यांनी मजूर सहकारी संस्था,सुशिक्षित रोजगार अभियंते, सहकारी सेवा संस्था व स्थानिक मक्तेदाराकडून जाहीर निविदा मागवून कामे करून घ्यावीत असे नमूद असताना अशी साधन सामग्री किंवा अवजारे ग्राम ही पंचायतीकडे असल्याची तसेच जाहीर निविदा मागवून कामे करून घेतल्याची कोणतेही अभिलेखे संचिकेत आढळून आली नाहीत.

७. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली, १९८४ मधील परिशिष्ट क्रमांक १२ नियम १० नुसार निविदेतील प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

८. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ६७ नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर २३ मध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना नमुना नंबर २३ मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

९. महाराष्ट शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०००/४४/३३, दिनांक २२/१२/२००० नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेण्याऱ्या अभियंता यांनी मोजमापाच्या नोंदी घेतल्या नंतर मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे परंतू अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

१०. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक विकास-२०११/प्र.क्र. २१७/पंरा-८, दिनांक १५ नोव्हेंबर २०११ मधील अनुक्रमांक ४ नुसार ग्रामपंचायत स्वतः काम करणार असल्यास व कंत्राटदार नेमणार नसल्यास खरेदी करावयाच्या मटेरियलच्या प्रत्येक बाबी जर साहित्याची किंमत रुपये एक लाखा पेक्षा जास्त असल्यास खरेदी ई-निविदेद्वारे करावी व त्यापेक्षा कमी किंमतीची सामुग्री किमान तीन कोटेशन मागवून व आय.एस.आय. मार्क प्रतीची खरेदी करावी तथापी अशी कार्यवाही केल्याबाबत अभिलेंखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

११. ग्रामपंचायतीस रक्कम प्राप्त झाले बाबत नमुना नंबर ७ ची सामान्य पावती घेण्यात आली आहे.

१२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६७ चे नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नंबर ६९ मध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना नमुना नंबर ६९ मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

१३. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० पृष्ठ क्रमांक १० वर बाब क्रमांक ९ मधील वेअर कामात शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत मोजमापे नोंदवून सदरील कामावर १.३१ मेट्रिक टन स्टील चा वापर करून त्या नुसार प्रथम देयकास रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. अंतिम देयकात मोजमाप पुस्तक क्रमांक १४६० पृष्ठ क्रमांक १८ वर १.३१ मेट्रिक टन स्टीलची नोंद घेतली आहे. ती बरोबर आहे शाखा अभियंता यांनी वाढीव परिमाणा ची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० मध्ये न नोंदविता दुसरी मोजमाप पुस्तिका क्रमांक१४५६ पृष्ठ क्र. २५ वरील परिमाण ०.५९२ मेट्रिक टन स्टीलची वाढ मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० पृष्ठ क्रमांक १८ वर नोंद दर्शविली म्हणजेच १३१ मे. टन + ०.५९२ मे. टन = १.९०२ मे. टन चे काम दर्शवून त्यानुसार रक्कम प्रदान करण्यात आलेली. मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० मध्ये मोजमापे घेऊन त्यानुसार ०.५९२ मेट्रिक टन परिमाणाची वाढ न नोंदविता दुसरी मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० मधील परिमाण ०.५९२ मे. टन स्टीलची नोंद नोंदविण्यात आली. लेखापरीक्षणाचे वेळी मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५६ पहावयास मिळाली नाही त्यामुळे परिमाण ०.५९२ मे. टन स्टील वापराबाबत खात्री करता आली नाही. सदरील कामात दर्शविलेला खर्च रुपये ३३,४८७/- नियमबाह्य आहे.

१४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १८० नुसार अंतिम मोजमाप घेवून रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमापावर लाल शाईने कर्ण रेषा मारावयास पाहिजे परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

१५. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-१०९९/प्र.क.५४/०८,दिनांक २०/०५/१९९९ कामाचा माहिती फलक बसवणे आवश्यक असताना नामफलक बसविण्याचे छायाचित्र आढळुन आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्विकारलेची माहिती पुढील स्थायी समिती विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्याविषयी यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

(२) सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करून सन २०१३-१४ च्या पावसाळ्यात पाणी आडविण्याच्या उद्देशाने कामाचे आदेश देवून काम पूर्ण करून घेण्यात आलेले आहे.

(३) आक्षेपात नमूद करण्यात आल्याप्रमाणे सदरील कामाची नोंद नमूना नं. ४८ मध्ये सद्यस्थितीत घेण्यात आलेली आहे.

(४) सदरचे काम ग्रामपंचायतींना कामाचे आदेश देण्यात येवून काम पूर्णकरुन घेण्यात आले. मा. अप्पर विक्रीकर आयुक्त, नागपूर यांचे पत्रक दिनांक ४/६/२०१३ अन्वये ग्रामपंचायतीकडून मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करून नये अशा सूचना असल्याने कपात केलेली नाही.

(५) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीकडे कर्मचारी/ मजूर/ औजारे उपलब्ध नव्हते तरी परंतू ग्राम पंचायतीने सयंत्रे भाडयाने घेवून रोजंदारीवर कुशल मजूर लावून काम पूर्ण केलेले आहे.

(६) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीकडे कर्मचारी/ मजूर/ औजारे उपलब्ध नव्हते तरी परंतू ग्राम पंचायतीने सयंत्रे भाडयाने घेवून रोजंदारीवर कुशल मजूर लावून काम पूर्ण केलेले आहे.

(७) आक्षेपात नमुद करण्यात आल्याप्रमाणे प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. ते लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

(८) आक्षेपात नमुद करण्यात आल्याप्रमाणे नमुना नं. २३ मध्ये कामाची प्रगतीची नोंदवहीत नोंद घेण्यात आलेली आहे.

(९) मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणाऱ्या अभियंता यांनी मोजमापाची नोंदी घेतल्यानंतर मोजमाप पुस्तिकेत सद्यस्थितीत दिनांकीत स्वाक्षरी करण्यात आलेली आहे. यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

(१०) कामाच्या प्रगतीनुसार व आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करण्यात येवून वापरण्यात आलेले आहेत. यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

(११) ग्रामपंचायतीस रक्कम मिळाल्याबाबत नमूना नं.७ ची सामान्य पावती प्राप्त करून घेण्यात आली आहे. छायांकित प्रत अवलोकनार्थ सोबत सादर करण्यात येत आहे.

(१२) आक्षेपात नमुद केलेप्रमाणे नमूना नं. ६९ मध्ये नोंद घेण्यात आली आहे.

(१३) परिमाणात अंकगणितीय गणना चुकीची केल्यामुळे संबंधित तत्कालीन शाखा अभियंता यांच्या वेतनातून रुपये ३३,४८७ इतकी रक्कम कपात करण्यात आलेली आहे.

(१४) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे सद्यस्थितीत लाल शाईने कर्ण रेषा ओढण्यात आलेली आहे.

(१५) आक्षेपात नमुद करण्यात आले प्रमाणे नामफलक बसविण्यात आला आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.७३४ (५) (सन २०१३-२०१४)**

**धवेली तालुका रेणापूर पाणीपुरवठा कामातील अनियमितताबाबत...**

जिल्हा परिषद लातूर, सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्रमांक ५) धवेली तालुका रेणापूर पाणीपुरवठा या कामास सन २००७-२००८ या वित्तीय वर्षात मंजूरी मिळून हे काम २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात पूर्ण झाल्याचे दिसून आले सदरील कामावर रक्कम रूपये ३४,१८,१५८ खर्च झाला असून कामाचे अंतिम देयकाचे प्रदान झालेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) शासन परिपत्रक क्रमांक ग्रा.पा.धो.१११/प्र.क्र.५०/पापु ०७, दिनांक २०/०४/२०१२ च्या अनुक्रमांक ५ नुसार मंजूर कामाची मुदत ही जास्तीत जास्त ३ ते ६ महिन्यांची असावी व त्यापेक्षा जास्त कालावधीत लागत असल्यास तसा उल्लेख करावा असे स्पष्ट असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. कामास मुदतवाढ घेतल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

(२) अध्यक्ष/सचिव पाणीपुरवठा समिती धवेली यांनी कामाच्या विवरण पत्रामधील माहिती समितीने भरलेली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १५० नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करून त्यांचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. नियमातील तरतूदी नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५३(१) नुसार मान्यता प्राप्त विनिर्देशानुसार काटेकोरपणे बांधकाम पार पाडणे ही जबाबदारी सक्षम तांत्रिक अधिकारी यांची असताना देखील अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार कामे पार न पाडता कमी जास्त बाबीचे करण्यात आले आहेत.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मोजमाप पुस्तक हा अतिशय महत्वाचा अभिलेख असून परिमाणांच्या सर्व हिशेबाचे आधार असतात. बांधकाम चटकन ओळखता यावे यासाठी मोजणी केलेल्या बांधकामाचा पूर्ण तपशिल आणि नाव मोजणी पुस्तकात देणे आवश्यक आहे. परंतु मूळ मोजमाप पुस्तिका लेखा परिक्षणास दर्शविली नाही.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६६ (अ)(३) नुसार मोजणी बाबतची प्रत्येक नोंद करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १८० अन्वये मोजणी केलेल्या देयकाचे प्रदान करण्यात येतील. त्यावेळी तपशिलवार मोजणी असलेले पृष्ठ लाल शाईने कर्ण रेषा ओढून, खोडून टाकणे आवश्यक आहे. लेखा संहिता नियम ३७(१) नुसार प्रत्येक देयकाची लेखा विभागाने छाननी करणे आवश्यक असून, ३७(२) नुसार पूर्तता केल्यानंतर देयके पारित करणे क्रमप्राप्त आहे. तथापि नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही न करता देयकाचे प्रदान करण्यात आलेले आहे.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ अन्वये कामासाठी वापरलेले साहित्य विनिर्देशाप्रमाणे वापरलेबाबत व साहित्य दर्जेदार असले बाबत चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ६७ नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नं. २३ मध्ये घेणे आवश्यक असताना नमुना नं.२३ मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवणेत आलेली नाही.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नं.६९ मध्ये घेणे आवश्यक असताना, नमुना नंबर ६९ मध्ये नोंदवही ठेवणेत आलेली नाही.

(१०) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-१०९९/प्र.क्र.५४/०८, दिनांक २०/०५/१९९९ मधील परिच्छेद (ब) नुसार सर्व प्रकारच्या नविन आणि दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी ५ नामफलक बसविल्याचे छायाचित्र आढळून आले नाही.

(११) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक-बीडीजी-२००५/ प्र.क्र.३२४/इमारती-२, दिनांक ०३/०३/२००६ अन्वये मुल्यवर्धीत कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून किंवा समितीकडून करार किंमतीच्या पाच टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

(१२) महाराष्ट्र शासन उद्योग व कामगार विभाग परिपत्रक क्रमांक बीसीए/२००७/प्र.क्र.७८८ कामगार ७अ, दिनांक २६/१०/२००९ नुसार १ टक्का कामगार कल्याण उपकर बांधकामाच्या एकूण मुल्यांकनाच्या (जमिनी चे मुल्य वगळून) वसूल करणे आवश्यक आहे. परंतू अशी कपात विभागाने केलेली नाही.

(१३) उपरोक्त पाणीपुरवठा कामावर पाणीपुरवठा समितीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २५ नुसार रक्कम रूपये १,०००/-वरील प्रदान धनादेशद्वारे करणे आवश्यक असताना ते रोखीने करण्यात आले आहे.

(१४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास १०९८/प्र.क्र.२९/९८, दिनांक १९/८/१९९८ अन्वये कामावर असलेल्या कामगाराचा १ टक्के रक्कमेचा विमा कामास सुरवात करणे पूर्वी उतरविणेबाबत कार्यवाही न करता संबंधिताचे प्रथम व अंतिम देयकातून रक्कम वसूल केलली दिसून आली नाही. त्यामुळे विमा उतरविणेचा उद्देश सफल होऊ शकला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदरचे काम सन २००८-२००९ चे असल्याने शासन परिपत्रक लागू होत नाही. तथापि सदर योजनेचे काम अध्यक्ष / सचिव पा.पु.व. स्वच्छता समितीमार्फत करण्यात आले आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भारत निर्माण योजनेसाठी हप्ता वितरणानंतर झालेल्या कामाचे मूल्यांकन करून निधी मागणी करणे व आवश्यक असणारे ठराव व कागदपत्रे सादर केल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार कामे करण्यात आली आहेत. सदर कामामध्ये दरसुचीतील वाढ व इतर तांत्रिकबाबीत बदल झाल्यामुळे सुधारित मान्यता दिनांक १७/०३/२०११ अन्वये सादर करण्यात आली तत्पुर्वी १५% च्या मर्यादेत जलव्यवस्थापन समितीस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार असल्यामुळे १६/७/२०१० रोजी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. त्यामुळे विलंब झालेला आहे. या योजनेस जिल्हा परिषदेने तांत्रिक सेवा पुरवठादार म्हणून काम केले आहे. अध्यक्ष/सचिव पाणीपुरवठा समितीने स्वतः काम करत असल्यामुळे मुदतवाढ देण्यात आलेली नाही.

(२) अध्यक्ष/सचिव पाणीपुरवठा समिती, धवेली यांनी कामाच्या विवरणपत्रातील माहिती भरून घेण्यात आलेली आहे.

(३) सदर कामास तांत्रिक मंजूरी देण्यापुर्वी तपशीलवार नकाशे व अंदाजपत्रक तयार करून उप अभियंता व शाखा अभियंता

यांच्या संयुक्त स्वाक्षरीने अंदाजपत्रक सादर केलेले आहे व तद्नंतर तंत्रशाखेतून परिनिरीक्षण करूनच तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली आहे.

(४) मूळ मंजूर अंदाजपत्रकानुसार काम करण्यात आलेले असून प्रत्यक्ष आवश्यकतेनुसार काम करीत असताना काही बाबीमध्ये आवश्यक तांत्रिक बदल झाल्यामुळे कमी जास्त खर्च झालेला असून त्याचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करून त्यास शासनाकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

(५) योजनेच्या चालू कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत कामाच्या प्रगतीनुसार घेण्यात आलेल्या आहत. सदर कामाची मोजमाप पुस्तिका स्वतंत्र ठेवण्यात आलेली असून मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध आहे.

(६) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे मोजमापाच्या प्रत्येक नोंदी मोजमाप पुस्तिकेत घेण्यात आलेल्या आहेत व लाल शाईने कर्णरेषा ओढण्यात आलेली आहे. सदरच्या देयकाची छाननी लेखा विभागाने केलेली आहे.

(७) योजनेच्या कामासाठी वापरलेल्या सर्व साहित्याची गुणवत्तेबाबत आवश्यक चाचणी घेण्यात आली असून त्याचा अहवाल प्राप्त करून घेण्यात आलेला आहे.

(८) सदर कामाची नोंद नमुना नं.२३ मध्ये घेण्यात आलेली आहे. सध्या लेखापरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

(९) सदर कामाची नोंद नमुना नं.६९ मध्ये घेण्यात आलेली आहे. सध्या लेखापरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

(१०) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे योजनेच्या ठिकाणी नामफलक बसविण्यात आलेला आहे.

(११) सदर पा.पु.योजनेचे काम ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने केलेले असल्याने वसुली करण्यात आली नाही. त्यासाठी मा.अप्पर विक्रीकर आयुक्त, नागपूर क्षेत्र, नागपूर यांनी त्यांचे पत्र दिनांक ४ जून २०१३ अन्वये जे काम ग्रा.पं.समितीने केलेली आहेत, त्यासाठी अशा प्रकारच्या कपाती करण्याची आवश्यकता नसल्याचे कळविल्यामुळे कपात केलेली नाही.

(१२) सदरचे काम या शासन निर्णयापूर्वीच मंजूर झालेले असल्याने व ग्रामीण पाणी पुरवठा समितीने काम केलेले असल्याने कपात केलेली नाही.

(१३) सदर रक्कम रुपये १,०००/-वरील अदाई धनादेशाव्दारे बंधनकारक असताना रोखीने व्यवहार केल्यामुळे क्षमापण मिळणेसाठी समितीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.एसआय ३०४/२०१०, दिनांक ८ सप्टेंबर, २०१० अन्वये शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

(१४) सदर पा.पु.योजनेचे अंदाजपत्रक सन २००७-०८ च्या दरसुचीने करण्यात आले आहे. सन २००७-०८ च्या दरसुचीत विमा रक्कमेचा समावेश दरसूचीच्या पृथकरणामध्ये करण्यात आला नव्हता. त्यामुळे विमा रक्कमेचा समावेश मंजूर दरामध्ये नसल्याने विमा उतरविण्यात आला नाही. त्यामुळे वसुली केलेली नाही.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० सप्टेंबर, २०१९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५६ लेखापरीक्षणावेळी सादर न करण्याची कारणे काय? सदर नोंदवहीमध्ये ०.५९२ मे.टन स्टीलची नोंद नोंदविलेली आहे काय? वास्तविक एका कामासाठी एकच मोजमाप पुस्तिका ठेवण्याबाबत आदेश असताना कामाची मापे दोन मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्याची काय कारणे आहेत ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, यामध्ये दोन मोजमाप पुस्तिका आहेत, मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० व मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५६. मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५६ वरील परिणाम ०.५९२ मे.टन स्टीलची वाढ मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० च्या पान क्रमांक १८ वर नोंदविण्यात आलेली आहे. तत्कालीन शाखा अभियंता यांनी अंकगणितीय गणना चुकीची केल्यामुळे त्यांच्या वेतनातून ३३,४८७ रुपये वसूल करण्यात आले आहेत.

समितीने विचारणा केली की, ते पंचायत समितीचे शाखा अभियंता आहेत की उप विभागीय कार्यालयाचे शाखा अभियंता आहेत ? कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग यांनी समितीस विदित केले की, ते उप विभागीय कार्यालयाचे शाखा अभियंता आहेत. उप अभियंता व शाखा अभियंता ही एकच व्यक्ती आहे. उप अभियंता पदाचा कार्यभार दिला होता. यावर समितीने विचारणा केली की, तुम्ही शाखा अभियंता म्हणून कारवाई केली. तुम्ही दोघेही जबाबदार आहेत म्हणून कारवाई केली नाही. एमबी दाखविली

नाही, असा प्रश्न आहे. हे उप अभियंत्यांच्या अखत्यारित आहे. त्यांच्या लक्षात आले असते तर त्यांनी शाखा अभियंत्यांवर कारवाई केली असती. उप अभियंत्यांपासून सुटले, कार्यकारी अभियंत्यांपासून सुटले, अतिरिक्त सीईओंपासून सुटले आणि ऑडिटरच्या हाती आले. सर्व लोक जबाबदार आहेत. तुम्ही आपापल्या वरच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविणार नाही तोपर्यंत काही होणार नाही. शाखा अभियंत्यांच्या वर उप अभियंता आहेत, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी, मग भविष्यात अशा घटना घडणार नाहीत. यावर कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, शाखा अभियंत्यांच्या ताब्यात मोजमाप पुस्तिका असते. काम सुरू झाल्यावर मोजमाप पुस्तिका शाखा अभियंत्यांना दिली जाते, त्यांनी रेकॉर्डिंग करून पुन्हा उप विभागीय कार्यालयाला ती जमा करायची असते. या प्रकरणात उप अभियंता व शाखा अभियंता दोन्ही एकच व्यक्ती आहे. उप अभियंता जबाबदार आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, कस्टोडिअन जबाबदार आहेत, चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी. उप विभागीय कार्यालयाने काय कार्यवाही केली? ऑडिटरने आक्षेप घेतला आहे की, मोजमाप पुस्तिका देण्याची जबाबदारी कोणाची आहे? उप अभियंत्यांची जबाबदारी होती. उप विभागीय कार्यालयाच्या तपासणीसाठी ऑडिटर येणार आहेत या संदर्भातील पत्र कोणाच्या नावे होते ? यावर कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, या प्रकरणात शाखा अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिका उप विभागीय कार्यालयाला जमा केली नसल्यामुळे शाखा अभियंत्यांवर कारवाई केली आहे. यासंदर्भातील पत्र उप अभियंत्यांच्या नावे होते.

समितीने विचारणा केली की, सदर प्रकरणी कनिष्ठ अभियंता जबाबदार आहेतच, मात्र उप अभियंत्यांच्या अधिकारात सर्व कामे होती, त्यामुळे तेही जबाबदार आहेत. तुम्ही या प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर तत्काळ कारवाई करावी. नोंदवही पुस्तिका दाखविली नाही हाही एक विषय आहे, तत्संदर्भात नियम ७ प्रमाणे कारवाई करण्यात यावी. आपण अशाप्रकारे सर्व प्रशासकीय कार्यवाही करून समितीला अहवाल सादर करावा तसेच आपण या प्रकरणी वसुली केली आहे का ? यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस सदर प्रकरणी वसुली केली आहे असे उत्तर दिले.

यानंतर समितीने धवेली तालुका रेणापूर पाणीपुरवठा कामातील अनियमिततेबाबत विचारणा केली की, रोखीने रक्कम अदा केली आहे आणि लेखापरीक्षणाच्या वेळी मूळ मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी सादर केलेली नाही. लेखापरीक्षणासाठी सादर न केल्याबाबत नियम ७ प्रमाणे कारवाई करावी. रोखीने किती रक्कम अदा करायची आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, एक हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम असेल तर धनादेशाने द्यावी लागते. चूक झाली आहे. शासनाकडे सन २०१० मध्ये क्षमा मागितली आहे.

समितीने मत व्यक्त करीत विदित केले की, आठ वर्षांपासून प्रलंबित प्रकरण आहे. सदर प्रकरणाबाबत नोंद घेऊन कळवितो, असे ग्रामविकास विभागाने सांगितले आहे. या संदर्भात कोणती कार्यवाही करता, तसेच ती प्रकरणे प्रलंबित का ठेवता ? आपण यावर ताबडतोब कार्यवाही केली पाहिजे. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला उत्तर दिले की, जिल्हा परिषदेकडून पाठपुरावा (फॉलोअप) झाला असता तर असे राहिले नसते. यावर समितीने उप सचिव, ग्रामविकास विभाग यांना याची नोंद घेण्याबाबत दाखवून विचारणा केली की, विलंब कोणत्या स्तरावर झाला आहे ते पहावे, ज्या स्तरावर विलंब झाला असेल त्या संबंधितांचे खुलासे मागवावे आणि या संदर्भातील अहवाल समितीला पाठवावा. यावर उप सचिव (ग्रामविकास विभाग) यांनी समितीला होकरात्मक आश्वासन दिले. यावर समितीने निदेश दिले की, सदर प्रकरणी पाठपुरावा (फॉलोअप) घेऊन ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे. कागदपत्रे न दाखविण्याचा विषय आहे. नियम ७ प्रमाणे कारवाई करावी. सदर प्रकरणी कार्यवाही करून समितीला अहवाल सादर करावा.

समितीने अशीही विचारणा केली की, सदर काम पूर्ण झालेले आहे का, पाणीपुरवठा सुरू झाला आहे का? यावर कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग यांनी उत्तर दिले की, ते काम पूर्ण झाले असून योजना हस्तांतरित होऊन नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे. भारत निर्माण योजनेचे काम होते. काही अंशी त्यांच्याकडूनही कामामध्ये विलंब झालेला आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेचा विषय होता. यावर समितीने अशीही विचारणा केली की, शासनावर भूर्दंड पडला आहे. त्याबाबत आपले काय मत आहे, वसुली केली आहे का ? यावर कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग यांनी उत्तर दिले की, शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता घेतली आहे.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, सर्व परिच्छेदांत विम्याचा विषय आहे. अगोदर विमा उतरविला पाहिजे होता. मात्र तसे केलेले नाही. आपण मोजमाप पुस्तिकेमध्ये एक टक्का कापून घेतला आहे. काम झाल्यावर विमा काढत आहात, तुम्ही ते कशाच्या आधारे काढत आहात ? मजुराला अपघात झाला तर क्लेम मिळाला पाहिजे हा त्या मागचा उद्देश आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रक काढून दक्षता घेण्यात येईल असे समितीला आश्वासन दिले. यासंदर्भात समितीने विचारणा केली

की, काम झाल्यावर पैसे भरून काय उपयोग आहे ? आपण पहिल्यांदा विम्याची रक्कम कपात करावी. वर्क ऑर्डर झाल्यावर विमा काढलाच पाहिजे. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, कंत्राटदाराने पैसे भरले नाहीत तर पहिल्या देयकातून कपात करून रक्कम जमा केली पाहिजे. आता आपण कंत्राटदारांना कामे देताना विमा रक्कम कापल्यानंतरच वर्क ऑर्डर देत आहोत.

पुढे समितीने संबंधित अधिकाऱ्यांना सदर कामातील त्रुटी निदर्शनास आणून पुढीलप्रमाणे निदेश दिले की, सदर काम झाल्यावर विम्याचे पैसे भरुन उपयोगाचे नाही. गरज नसताना पैसे विमा कंपन्यांना चालले आहेत. विम्या कंपन्या सक्षम होत आहेत. मात्र परिणामी अप्रिय घटना घडली तर क्लेम मिळत नाही. काम सुरू होण्याच्या अगोदर विमा काढला पाहिजे. आपण दक्षता घ्यावी. रोखीने पैसे दिले जात आहेत, ते चुकीचे आहे, आपण तत्संदर्भातही परिपत्रक काढावे. लेखापरीक्षाणासाठी कागदपत्रे सादर न केल्याबाबत नियम ७ प्रमाणे कारवाई करण्यात यावी. कार्यवाही करून तसा अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली:—**

मौ.केकतसिंदगी ता.जळकोट कोल्हापूरी कामातील अनियमितता तसेच ग्रामीण पाणीपुरवठा धवेली ता. रेणापुर पाणीपुरवठा कामातील अनियमितता प्रकरणी संबंधितांविरुध्द चौकशी करून नोंदवही पुस्तिका न दाखविल्याप्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३०, च्या कलम ७ नुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

मौ. केकतसिंदगी ता.जळकोट कोल्हापूरी बंधारा कामातील व ग्रामीण पाणी पुरवठा धवेली ता. रेणापुर पाणी पुरवठा कामातील अनियिमितता प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आलेली आहे. नोंदवही पुस्तिका न दाखवल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्‍चित करून संबंधितांकडून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कारवाई करून प्रकरणनिहाय रुपये २५०००/- दंडाची रक्कम व्हावचर नंबर ६६१९२०७ दिनांक १५ जुलै २०१९ अन्वये एकूण रक्कम रुपये ५०,०००/- वसूल करण्यात आली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय (वित्त ७) :**

(१) महाराष्ट्र स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कार्यवाही जि.प. स्तरावर करण्यात येते.

(२) महालेखापाल व स्थानिक निधी लेखापरीक्षण सुरू असताना त्यांना लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना या विभागाच्या परिपत्रक क्र. लेखाप-२०१३/८७/९३/ वित्त -८ दिनांक ११ फेब्रुवारी २०१३ व परिपत्रक क्र. पंरास-२०१५/प्रक्र. २८/वित्त-७ दिनांक ३० मार्च २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायत राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मौजे केकतसिंदगी, ता. जळकोट, येथील कोल्हापुरी कामातील अनियमितता तसेच ग्रामीण पाणी पुरवठा धवेली, ता. रेणापूर, पाणी पुरवठा कामातील अनियमितता प्रकरणी संबंधितांविरुध्द चौकशी करून नोंदवही पुस्तिका न दाखविल्याप्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले होते. यावर विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करून त्यांच्याकडून प्रत्येकी २५ हजार याप्रमाणे ५० हजार रुपये इतका दंड वसूल केलेला आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

मौजे केकतसिंदगी (ता. जळकोट), येथील कोल्हापूरी पद्धतीच्या बंधारा बांधकामासाठी रुपये १३,३०,२५४/- इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. सदरील कामाच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० मधील पृष्ठ क्रमांक १८ वर १.३१ मेट्रिक टन स्टीलची नोंद घेतली असताना दुसरी मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५६ मधील पृष्ठ क्र.२५ वरील परिमाण ०.५९२ मेट्रिक

टन स्टीलची वाढ मोजमाप पुस्तिका क्रमांक १४६० पृष्ठ क्रमांक १८ वर नोंद दर्शविली आहे. म्हणजेच १३१ मे.टन+०.५९२ मे.टन=१.९०२ मे.टन चे काम दर्शवून त्यानुसार रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. लेखापरीक्षणाचे वेळी मोजमाप पुस्तिका क्रमांक १४५६ सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे या कामात रुपये ३३,४८७/- इतकी रक्कम नियमबाह्यरित्या खर्च झालेली आहे. परिमाणात अंकगणितीय गणना चूकीची केल्यामुळे संबंधित तत्कालिन शाखा अभियंता यांच्या वेतनातून रूपये ३३,४८७/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

धवेली (ता.रेणापूर) ग्रामीण पाणीपुरवठा कामास सन २००७-२००८ या वित्तीय वर्षात मंजूरी मिळून हे काम २०१३-१४ या आर्थिक वर्षात पूर्ण झाले आहे. या कामावर रूपये ३४,१८,१५८/- इतकी रक्कम खर्च झाली आहे. या ग्रामीण पाणीपुरवठा कामातील लेखापरीक्षणास मूळ मोजमाप नोंदवही पुस्तिका दाखविण्यात आली नाही. या पाणीपुरवठा कामावर पाणीपुरवठा समितीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समितीने रूपये १,०००/- वरील प्रदान धनादेशाद्वारे करणे आवश्यक असताना ते रोखीने करण्यात आले आहे. तसेच या कामावरील कामगारांच्या बांधकामाच्या एकूण मुल्यांकनाच्या एक टक्का प्रमाणे विमा विहित वेळेत उतरविण्यात आलेला नाही. या कामांची चौकशी करून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितांवर कारवाई करून समितीस अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

**त्यानुसार मौ.केकतसिंदगी (ता.जळकोट) येथील कोल्हापूरी बंधारा कामातील व ग्रामीण पाणी पुरवठा धवेली (ता.रेणापुर) येथील पाणी पुरवठा कामातील अनियमितता प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आलेली आहे. मोजमाप नोंदवही पुस्तिका न दाखविल्या प्रकरणी संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून त्यांच्याकडून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कारवाई करून प्रकरणनिहाय रूपये २५,०००/- प्रमाणे एकूण रूपये ५०,०००/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार जे अधिकारी/कर्मचारी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत अशा अधिकाऱ्यांना उक्त अधिनियमाच्या नियम, ७ अन्वये रुपये २५,०००/- दंडाची तरतूद करण्यात आली आहे. अशी तरतूद करण्यात येऊनही अनेक अधिकारी दंड भरण्यास तयार असतात. परंतु लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याचे समितीच्या पाहणीत आढळून आले आहे, असे गैरव्यवहार थांबविण्याकरीता उपरोक्त नमूद केलेल्या अधिनियमात सुधारणा करणे इष्ट आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. उक्त अधिनियमाच्या नियम, ७ मध्ये रुपये २५,०००/- दंडाची तरतूद करण्यात आली आहे. ती सुधारून रुपये ५०,०००/- इतकी अथवा संबंधित प्रकरणी जितकी तरतूद करण्यात आली आहे त्या तरतुदीच्या एक दशांश इतका दंड किंवा जी अधिकची रक्कम असेल असा दंड आकारण्यात यावा अशा प्रकारची सुधारणा महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम, ७ मध्ये करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

**तसेच कामावर असलेल्या कामगारांचा विमा विहित वेळेत काढण्यात आलेला नसल्याने विमा उतरवण्याचा उद्देष सफल होऊ शकत नाही. वास्तविक काम झाल्यानंतर विम्याचे पैसे भरल्यास परिणामी एखादी अप्रिय घटना घडली तर संबंधितांना विम्याचा लाभ मिळणार नाही. यासाठी कोणत्याही कामावरील कामगारांचा विमा उतरवल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात यावेत अशा प्रकारची सुधारणा करण्यात यावी तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८, च्या नियम २५ नुसार कोणत्याही कामाचे रूपये १०००/- वरील रोखीने प्रदान न करता धनादेशाद्वारे प्रदान करण्याची दक्षता घेण्यासंदर्भातील परिपत्रक संबंधित विभागाने त्वरीत निर्गमित करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, लातूर

## सर्वसाधारण शिफारशी

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः लातूर जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची / अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी ती वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकक्मा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रकमा केव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या, शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोप पत्र दाखल करून असे प्रकरणात सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रूपयांचा निधी तरतूद करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रूपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारे होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्टया अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्त्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत शासनाविषयी नाराजी व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून लातूर जिल्हा परिषदेमधील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :**

समितीने लातूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे

लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध  नव्हती आता उपलब्ध् आहेत असे समितीला सांगण्यात आले.  लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे.  लेखा परीक्षक सुरुवातील कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.  मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम,१९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १००  रूपयांचा दंड आकारण्यात येत असे.  कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,०००  रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे.  समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परिक्षणाचे वेळी  लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तरतुदीनुसार रुपये २५०००  इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला.  त्यानुसार लातूर जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३)  नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :—**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली.  समितीला अधिकार मिळाल्यावरून समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरूध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही.  भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याची धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे  समितीला प्रकर्षाने वाटते.  कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते.  भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरूध्द कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे.  **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे.  जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्त्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल.  परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट “ अ ”
# शासनाचे आदेश व परिपत्रके

परिशिष्ट क्रमांक - २.१

शालेय पोषण आहार योजनेतंर्गत
खर्चाचे सुधारीत दर लागू करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- शापोआ २०१०/प्र.क्र.१८/प्राशि ४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २ फेब्रुवारी, २०११.

**वाचा**- १) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २००६
२) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.1-1/2009-Desk (MDM) दि. २४/११/२००९.
३) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.3-5/2010-Desk (MDM) दि. २९/४/२०१०.
४) शिक्षण संचालक (प्राथ.) यांचे पत्र क्र.शापोआ/सु.यो/२०१०-११/प्राशिसं ३०३/३४०९ दि.१९/१०/२०१०.

**प्रस्तावना-** राज्यामध्ये शालेय पोषण आहार (Mid Day Meal) ही योजना इ. १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेतंर्गत इ. १ ली ते ५ वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इ. ६ वी ते ८ वी या उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रतिविद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरविण्यात येतो. या तांदूळापासून शालेय पोषण आहार तयार करण्यासाठी Cooking Cost या शिर्षाखाली केंद्र शासनाकडून आणि राज्य शासनाकडून खर्च करण्यात येत आहे. सध्या प्राथमिक वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु. २.०८ आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी रु. २.६० असा खर्च करण्यात येतो. सदर खर्चापैकी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक या दोन्ही गटामध्ये प्रति दिन प्रति विद्यार्थी ५० पैसे राज्य शासनाचा हिस्सा आहे. केंद्र शासनाने या योजनेमध्ये अन्न शिजविण्याच्या खर्चामध्ये वाढ करण्याचे आदेश दिलेले आहे. तसेच या योजनेमध्ये केंद्र आणि राज्य यांच्या खर्चाचे प्रमाण ७५:२५ राहील असे आदेश दिलेले आहे. या योजनेमध्ये केंद्र शासानाने आणखी सुधारणा केलेली असून स्वंयपाकी तथा मदतनीस या कामासाठी अनुदान देण्यात यावे असे केंद्र

शासनाने आदेश दिलेले आहेत. या योजनेमध्ये केंद्र शासनाने केलेल्या वरील सुधारणा विचारात घेऊन योजनेची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याचप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणी मध्ये दि. १८/६/२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार ग्रामीण भागामध्ये तसेच नागरी भागामध्ये तांदुळाची वाहतूक करण्यासाठी निविदा मागवून पुरवठेदार निश्चित करण्यात यावेत, ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबर आहारासाठी लागणाऱ्या इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात यावा, नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थाकडून Expression of Interest मागवून त्याद्वारे संस्था निवड करुन केंद्रीय स्वंयपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा शाळेमध्ये विद्यार्थ्यांना करण्यात यावा, असे निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार ग्रामीण - नागरी भागामध्ये तांदुळाची वाहतूक आणि ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा निविदा मागवून त्याद्वारे पुरवठादार नियुक्त करुन सुरु करण्यात आलेला आहे. सदर अंमलबजावणी मध्ये येत असलेल्या अडचणी तसेच केंद्र शासनाने संदर्भाधिन दि. २४/११/२००९ च्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या सुचना विचारात घेऊन शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणी मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

**शासन निर्णय-** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाचा हिस्सा आणि राज्य शासनाचा हिस्सा यामधील खर्चाचे प्रमाण ७५:२५ असे राहील. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे आहाराचा पुरवठा करण्यास तसेच त्यासाठी सुधारित दरास मान्यता देण्यात येत आहे.

| लाभार्थी गट | आहाराचे प्रमाण | प्रति दिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादा | प्रति दिन प्रति लाभार्थी आहारासाठी दर |
|---|---|---|---|
| प्राथमिक (१ ली ते ५ वी) | ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार (मध्यान्ह भोजन) | २.६९/- | २.६०/- |
| उच्च प्राथमिक (६ वी ते ८ वी) | ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार (मध्यांन्ह भोजन) | ४.०३/- | ३.८५/- |

२. शालेय पोषण आहाराच्या प्रति दिन प्रति लाभार्थी खर्च मर्यादेमधून प्राथमिक गटामधून ९ पैसे आणि उच्च प्राथमिक गटामधुन १८ पैसे प्रति दिन प्रति लाभार्थी असा निधी शालेय पोषण आहार योजनेसाठी लागणारे विविध साहित्य आणि साधन सामग्री, सुक्ष्मपोषण इत्यादी बाबींसाठी खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये शाळेमध्ये आहार शिजवुन विद्यार्थ्यांना वाटप केले जाते. नागरी भागामध्ये मात्र शाळेमध्ये जागेची कमतरता असल्याने स्वयंसेवी संस्था, बचत गट इत्यादी मार्फत त्यांच्या स्वयंपाकगृहामध्ये आहार शिजवुन त्यानंतर शाळेमध्ये शिजवलेल्या अन्नाचे वाटप केले जाते. शासनाने या योजनेमध्ये सुधारणा करुन नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थाकडून Expression of Interest मागवुन त्याद्वारे संस्था निवड करुन केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर बाब विचारात घेता या योजनेंतर्गत ग्रामीण भागासाठी तसेच शहरी भागासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

४. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबरच इतर धान्यादी मालाचा पुरवठा शाळेमध्ये करण्यात येतो. या धान्यादी मालापासुन आहार बनविण्यासाठी लागणाऱ्या इंधन व मजुरी या खर्चासाठी अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेस प्रति दिन प्रति लाभार्थी ५० पैसे एवढा निधी देण्यात येत होता. त्यामध्ये सुधारणा करण्यात येत असुन प्राथमिक आणि उच्च प्राथमिक लाभार्थ्यांसाठी निश्चित करण्यात आलेल्या आहार खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ग्रामीण भागातील आहार खर्चाची विभागणी**

| लाभार्थी प्रकार | अनुज्ञेय आहार खर्च | धान्यादी माल पुरविण्यासाठी खर्च | इंधन आणि भाजीपाला यासाठी लागणारा खर्च |
|---|---|---|---|
| प्राथमिक | रु. २.६०/- | रु. १.७०/- | रु. ०.९०/- (९० पैसे) |
| उच्च प्राथमिक | रु. ३.८५/- | रु. २.६५/- | रु. १.२०/- (एक रुपया वीस पैसे) |

५. या योजनेमध्ये विहीत करण्यात आलेल्या पाककृतीनुसार आहार शिजविण्यासाठी लागणाऱ्या घटकांमधील भाजीपाला, कांदा, लसूण या वस्तु ग्रामीण भागामध्ये ज्या यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष आहार शिजविण्याचे काम केले जाते, त्यांनी म्हणजे सेवा भावी संस्था किंवा महिला बचत गट इ. यांनी खरेदी करुन त्याचा आहारात समावेश करावा. सदर खर्चासाठी तसेच इंधन खर्चासाठी आहार शिजवण्याचे काम करणाऱ्या संस्थेस (उदा. सेवाभावी संस्था / महिला बचत गट इ. ) प्राथमिक वर्गासाठी रु. ०.९०/- (नव्वद पैसे) आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी रु. १.२०/- (एक रुपया वीस पैसे) एवढा खर्च प्रति दिन प्रति विद्यार्थी याप्रमाणे अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ग्रामीण भागामध्ये अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांना वरील निधी देण्यात यावा. अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांनी आठवड्यातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना पुरक आहार (उदा. फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाने, चुरमुरे इ.) पुरक आहार द्यावा. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या नियमित आहाराव्यतिरिक्त सदरचा पूरक आहार हा अतिरिक्त राहील. तसेच त्यासाठी वेगळा निधी देण्यात येणार नाही.

६. या योजनेमध्ये ग्रामीण भागामध्ये पुवठेधारकामार्फत शाळेमध्ये पुरविण्यात आलेल्या वस्तुंचा वापर करुन शालेय पोषण आहार तयार करण्यात यावा. सदर आहार बनविण्यासाठी लागणाऱ्या इतर वस्तु उदा. भाजीपाला (पालक, मेथी, टोमॅटो, कोथिंबीर, बटाटे, राजगीरा, फ्लावर, कोबी, वटाणा, शेवगाशेंगा, वांगी, दुधी, भोपळा, वाल, तोंडले, गाजर इत्यादी तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या इतर भाज्या), कांदा-लसूण, लिंबू-कडीपत्ता इत्यादी पाककृतीनुसार आहार शिजवण्याचे काम करणाऱ्या स्थानिक यंत्रणेने खरेदी कराव्यात आणि त्याचा आहारात समावेश करावा. स्थानिक यंणत्रेने चविष्ठ आहार बनविण्याचे काम करावे. तसेच त्यामध्ये भाजीपाल्याचा समावेश न चुकता करावा. संबंधित मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याला आहारामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश केला असल्याचे तसेच आहार चविष्ठ असल्याचे खात्री करुन आहार शिजवणाऱ्या यंत्रणेस प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित यंत्रणेस खर्च अदा करण्याची कार्यवाही करावी. वापरलेल्या भाजीपाल्याची

नोंदवहीवर नियमित नोंद अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेने करावी व संबंधित मुख्याध्यापकाने नोंदवही नियमितरित्या प्रमाणीत करावी.

**शहरी भागासाठी आहार खर्चाचे अनुदान-**

७. या योजनेमध्ये शहरी भागामध्ये म्हणजे महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये स्वयंसेवी संस्था / बचत गट यांचेमार्फत शिजवलेल्या तयार आहाराचा पुरवठा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना करतो. सदर तयार आहार पुरवठयासाठी स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी (Expression Of Interest) स्वयंसेवी संस्था / सेवाभावी संस्था / महिला मंडळे / बचत गट यांचेकडून अर्ज मागवून केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे शहरी भागामध्ये ग्रामीण भागासारखी आहार खर्चाची (Cooking Cost) विभागणी करण्याची आवश्यकता नाही. शहरी भागामध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करणाऱ्या यंत्रणेस खालीलप्रमाणे आहार खर्चाचे अनुदान अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| लाभार्थी प्रकार | अनुज्ञेय आहार खर्च | तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणेस अदा करावयाचे अनुदान |
|---|---|---|
| प्राथमिक | २.६० | २.६० |
| उच्च प्राथमिक | ३.८५ | ३.८५ |

**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी अनुदान -**

८. केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेमध्ये अन्न शिजविण्याचे काम करण्यासाठी स्वंयपाकी तथा मदतनीस या कामासाठी स्वतंत्रपणे मानधन अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. राज्यामध्ये या योजनेमध्ये महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था यांचेकडून ग्रामीण भागामध्ये आहार शिजवून घेण्याचे काम करुन घेण्यात येते तर नागरी भागामध्ये महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था यांचेकडून त्यांच्या स्वंयपाकगृहामध्ये शिजविलेल्या अन्नाचे वाटप शाळेमध्ये विद्यार्थ्यांना करण्यात येते. ग्रामीण भागामध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी

खालीलप्रमाणे स्वयंपाकी तथा मदतनीस ही कामे करण्यासाठी अनुदान देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेमधील लाभार्थी संख्या (प्राथमिक अधिक उच्च प्राथमिक मिळुन) (१ ली ते ८ वी मिळुन) | स्वयंपाकाचे तसेच मदतनीसाचे कामासाठी अनुदान प्रतिमहीना वर्षातील १० महिन्यासाठी. |
|---|---|---|
| १. | २५ विद्यार्थ्यांपर्यंत | रु. १०००/- |
| २. | २६ ते १९९ विद्यार्थी | रु. २०००/- |
| ३. | २०० ते २९९ विद्यार्थी | रु. ३०००/- |
| ४. | ३०० ते ३९९ विद्यार्थी | रु. ४०००/- |
| ५. | ४०० ते ४९९ विद्यार्थी | रु. ५०००/- |
| ६. | ५०० ते ५९९ विद्यार्थी | रु. ६०००/- |
| ७. | ६०० ते ६९९ विद्यार्थी | रु. ७०००/- |
| ८. | ७०० ते ७९९ विद्यार्थी | रु. ८०००/- |
| ९. | ८०० ते ८९९ विद्यार्थी | रु. ९०००/- |
| १०. | ९०० पेक्षा अधिक विद्यार्थी | रु. १०,०००/- |

९. शालेय पोषण आहार योजनेमध्ये ग्रामीण भागातील शाळांमध्ये महिला बचत गट स्वंयसेवी संस्था यांचेमार्फत अन्न शिजविण्याचे काम करण्यात येत असल्याने वरील निकषानुसार ग्रामीण भागातील शाळांमध्ये अन्न शिजविण्याचे काम करणाऱ्या यंत्रणेस वरीलप्रमाणे अनुदान अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. स्वंयपाकी तथा मदतनीस या कामासाठी ग्रामीण भागामध्ये महिला बचत गट किंवा स्वयंसेवी संस्था किंवा मानधनी तत्वावरील पदासाठी स्वंतत्रपणे अनुदान देण्यात येणार असल्याने त्यांनी खालीलप्रमाणे कामे करणे आवश्यक राहील.

अ) अन्न शिजविण्याचे काम करणे

ब) तांदूळ व धान्यादी मालाची साफसफाई करणे

क) शाळेमध्ये विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप जेवणाच्या जागेवर करणे

ड) शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी आहाराचे सेवन केल्यानंतर साफसंफाई करणे (स्वंयपाकगृहासह) तसेच सांडलेल्या अन्नाची योग्य विल्हेवाट लावणे.

इ) भांडयाची साफसफाई करणे व जेवल्यानंतर ताटांची स्वच्छता करणे

ई) पिण्याचे पाणी भरणे व जेवताना विद्यार्थ्यांना पाणी पुरविणे

उ) शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवणे

ऊ) अन्न शिजविणा-या यंत्रणेच्या आहारविषयक नोंदी ठेवणे

१०. या योजनेंतर्गत शहरी भागामध्ये स्वंयसेवी संस्था आणि बचत गट यांचेकडून तयार आहाराचा पुरवठा करण्यात येत असल्याने स्वंयपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी शहरी भागासाठी (महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्र) खालीलप्रमाणे निकष विहीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र | स्वंयसेवी संस्था / बचत गट यांचेमार्फत शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा होत असलेली लाभार्थी संख्या | स्वयंपाकाचे तसेच मदतनीसाचे कामासाठी अनुदान प्रतिमहिना वर्षातील १० महिन्यासाठी |
|---|---|---|
| १ | ५०० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. २०००/- |
| २ | १००० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. ४०००/- |
| ३ | ५,००० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. ६०००/- |
| ४ | १०,००० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. ८०००/- |
| ५ | १०००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या | रु. १०,०००/- |

नागरी भागामध्ये स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत त्यांच्या स्वयंपाकगृहातून आहार पुरवठा होणाऱ्या सर्व शाळांमधील मिळुन विद्यार्थी संख्या एकत्रितरित्या विचारात घेण्यात यावी व त्यानुसार वरीलप्रमाणे अनुदान देण्यात यावे. नागरी भागामध्ये तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या संस्थेने त्यांच्या स्वयंपाकगृहात अन्न शिजवुन त्याचे वाटप शाळेमध्ये विद्यार्थ्यांना करणे तसेच शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी आहाराचे सेवन केल्यानंतर जागेची, विद्यार्थ्यांच्या ताटांची साफसफाई करणे ही कामे करणे आवश्यक राहील."

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६९२/१०/व्यय-५ दिनांक २३/११/२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचे शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) २०११०२०२११३३५०००१ क्रमांन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

( ना.उ.रौराळे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री / उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. मंत्री / राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मुख्यसचिवांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मंत्रालयीन विभाग (सर्व)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण सहसंचालक (प्राथमिक / माध्यमिक)
शिक्षण उपसंचालक (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका सर्व
मुख्य अधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद सर्व
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हे
शिक्षणाधिकारी / शिक्षण प्रमुख / प्रशासन अधिकारी म.न.पा. शिक्षणमंडळ सर्व
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व मुख्य लेखा परीक्षक
शालेय शिक्षण विभाग (सर्व कार्यासने ) / निवड नस्ती, प्राशि-४

## परिशिष्ट- अ

## शालेय पोषण आहार योजनेंतर्गत द्यावयाच्या पाककृतीचा तपशिल

## ग्रामीण भागासाठी द्यावयाच्या पाककृती

पाककृती क्रमांक-१ **डाळ तांदूळाची खिचडी / मसाले भात / पुलाव**

इ. १ ली ते ५ वी साठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| मुगडाळ | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे २ ते ५ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ५० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

**डाळ तांदूळाची खिचडी / मसाले भात / पुलाव**

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| मुगडाळ | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे ३ ते ७ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ७५ ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

पाककृती क्रमांक-२ **भात आणि कडधान्याची उसळ भाजी - आमटी**

इ. १ ली ते ५ वी साठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| मोड आलेले कडधान्य<br>हरभरा / चवळी / मटकी / मुग / वटाणा (यापैकी कोणत्याही कडधान्याचा वापर करण्यात यावा ) | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे २ ते ५ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ५० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

**भात आणि कडधान्याची उसळ भाजी - आमटी**

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| मोड आलेले कडधान्य<br>हरभरा / चवळी / मटकी / मुग / वटाणा (यापैकी कोणत्याही कडधान्याचा वापर करण्यात यावा ) | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे ३ ते ७ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ७५ ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

पाककृती क्रमांक-३ **वरण भात / सांबर भात / आमटी भात**

इ. १ ली ते ५ वी साठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| तुरडाळ | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे २ ते ५ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ५० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणतः २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

**वरण भात / सांबर भात / आमटी भात**

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| तुरडाळ | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे ३ ते ७ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ७५ ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणतः ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

पाककृती क्रमांक-१

## गोड भात

इ. १ ली ते ५ वी साठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| मुगडाळ / मसूरडाळ | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ५ ग्रॅम |
| साखर / गुळ | २० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणतः २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

## गोड भात

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| मुगडाळ / मसूरडाळ | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| साखर / गुळ | २० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणतः ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

## (१) नागरी भागातील पाककृती -

शहरी भागामध्ये स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था, महिला मंडळे / बचत गट यांचेकडून त्यांच्या स्वंयपाकगृहामध्ये आहार बनवून त्याचा पुरवठा शहरी / नागरी भागामध्ये करण्यात येतो. त्यामुळे शहरी भागात वरीलप्रमाणे डाळ तांदूळाची खिचडी / मसाले भात / पुलाव, भात आणि कडधान्याची उसळ भाजी - आमटी, वरण भात / सांबर भात / आमटी भात, गोड भात या चार पाककृतीमधून आहार देण्यात यावा. सदर आहारामध्ये पाककृतीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. नागरी भागामध्ये वरील आहाराबरोबर इडली सांबर, मसाला इडली सांबर (सर्व डाळी वापरुन) या

पाककृती देता येतील. मात्र इडली सांबर आणि मसाला इडली सांबर यामध्ये प्राथमिक गटासाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने तसेच उच्च प्राथमिक गटासाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने एवढी पोषण मुल्ये असणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सांबर या पदार्थामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश करणे आवश्यक राहील.

## (२) पाककृतीची निवड करण्याबाबत मार्गदर्शक सुचना -

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती साधारणपणे वरीलप्रमाणे राहतील. प्रत्येक जिल्ह्यामध्ये त्या त्या जिल्ह्याच्या आवश्यकतेप्रमाणे योग्य त्या पाककृतींची निवड आठवडयातील प्रत्येक दिवसासाठी जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल. ग्रामीण भागामध्ये या योजनेची अंमलबजावणी करीत असताना एखादी पाककृती विद्यार्थ्यांना आवडत नसल्यास किंवा विद्यार्थी चवीने ती खात नसल्यास त्या ऐवजी अन्य पाककृतीची निवड करण्यात यावी. प्रत्येक जिल्ह्यामध्ये आठवडयातील दिवसानुसार प्रत्येक दिवशी कोणती पाककृती द्यावयाची याची अगोदर निश्चिती करण्यात यावी आणि त्या जिल्ह्यामध्ये प्रत्येक दिवशी त्या निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना आहार देण्यात यावा.

नागरी भागामध्ये म्हणजे महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पाककृतीची निवड मनपा / नपा स्तरावर करण्यात यावी. मनपा / नपा क्षेत्रामध्ये आठवडयातील दिवसानुसार प्रत्येक दिवशी कोणती पाककृती द्यावयाची याची अगोदर निश्चिती करण्यात यावी आणि त्यानुसार प्रत्येक दिवशी निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना आहार देण्यात यावा. नागरी भागामध्ये तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या संस्थेने नियमित आहारा व्यतिरिक्त आठवडयातून किमान एक दिवस पुरक आहार देणे आवश्यक राहील. सदरचा पुरक आहार हा अतिरिक्त आहार राहील. म्हणजे नियमित आहार अधिक आठवडयातून किमान एक दिवस पुरक आहार देणे

आवश्यक राहील. नागरी भागामध्ये नियमित आहार पुरवठयासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानामधूनच पुरक आहाराचा खर्च भागविणे आवश्यक राहील. त्यासाठी कोणताही अतिरिक्त निधी देण्यात येणार नाही.

## (३) पाककृतीमधील खादय पदार्थांसंदर्भात मार्गदर्शक सुचना -

**(अ) तांदूळ ग्रामीण तसेच नागरी भागामध्ये -** शालेय पोषण आहार योजनेमध्ये विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यासाठी केंद्र शासनामार्फत प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन प्रति लाभार्थी प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी १०० ग्रॅम तांदूळ आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरविण्यात येतो. सदर तांदळाची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून करुन त्यांनतर वाहतूक नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांमार्फत करण्यात येऊन ग्रामीण तसेच नागरी भागातील शाळेमध्ये तांदुळ पुरविण्यात येईल.

**(ब) ग्रामीण भागातील शाळांसाठी धान्यादि मालाचा पुरवठा -** ग्रामीण भागातील शाळांमध्ये पाककृतीनुसार धान्यादि मालाचा पुरवठा करण्यात येईल. सदर वस्तू ग्रामीण भागामध्ये नियुक्त केलेल्या पुरवठादारामार्फत करण्यात येईल.

**(क) ग्रामीण भागातील शाळांमधील आहारात लागणाऱ्या इतर वस्तू -** ग्रामीण भागातील शाळांमध्ये लाभार्थ्यांना आहार पुरवण्यासाठी पाककृतीनुसार लागणाऱ्या क़ांदा, लसूण, कडीपत्ता, कोथबींर या वस्तू अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेने स्थानिकरित्या खरेदी करुन त्याचा आहारामध्ये समावेश करुन चवीष्ट आहार बनविण्याची कार्यवाही करावी.

**(ड) आहारामध्ये पालेभाजांचा समावेश -** ग्रामीण भागातील शाळांमध्ये अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेने पालेभाजांचा समावेश आहारामध्ये प्रति दिन प्रति लाभार्थी प्राथमिक वर्गासाठी ५० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी ७५ ग्रॅम याप्रमाणे करावा. सदर पालेभाजा अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेने स्थानिक बाजारातून खरेदी कराव्यात.

**(इ) अन्न शिजवणा-या यंत्रणेस द्यावयाच्या अनुदानाबाबत सुचना-** अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेस इंधन आणि भाजीपाला यासाठी प्राथमिक वर्गासाठी रु. ०.९०/- (नव्वद पैसे) आणि उच्च

प्राथमिक वर्गासाठी रु. १.२०/- (एक रुपया वीस पैसे) याप्रमाणे प्रति दिन प्रति लाभार्थी अनुदान देण्यात येईल. सदर अनुदानामधून वरील बाबींचा तसेच आठवडयातून किमान एक दिवस अतिरिक्त पुरक आहार देण्यासाठीचाही खर्च भागविण्यात यावा.

*********

परिशिष्ट क्रमांक - २.२

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत
तांदुळाची वाहतूक आणि धान्यादी
मालाचा पुरवठा सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शासन परिपत्रक क्र.शापोआ २००९/प्र.क्र.३८३/प्राशि-४**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक - २६ फेब्रुवारी, २०१०.**

**संदर्भ:-** शासन निर्णय क्र.शापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४ दि. १८ जुन, २००९.

**शासन परिपत्रक -** शासन निर्णय क्र.शापोआ-२००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४,दि. १८.६.२००९ अन्वये तांदुळाची वाहतुक करणे व ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार बनविण्यासाठी धान्यादी (उदा. कडधान्य, तेल, मीठ, मिरची पावडर, मसाला इ.) पुरवठा निविदा मागवून करण्यात यावा, असे आदेश देण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयानुसार शिक्षण संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया राबवून पुरवठाधारकाची निवड करण्यात आलेली असुन निविदा प्रक्रीयेनुसार आलेल्या दरास शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या शालेय पोषण आहार योजनेच्या सुधारणेबाबत अंतिम करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत, तांदुळाची वाहतूक करणे तसेच ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करणे याबाबत मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेसंदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका क्रमांक ९४६६/२००९ वर दिनांक १७.१२.२००९ रोजी शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यानुसार शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदुळाची वाहतूक करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी क्षेत्रीय यंत्रणेला खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

अ) <u>तांदूळ वाहतूक करण्याची कार्यपध्दती :-</u>

(अ-१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारा तांदूळ भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून प्राप्त होतो. निविदा प्रक्रियेनूसार अंतिम करण्यात आलेले पुरवठाधारक दि महाराष्ट्र स्टेट को.-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई हे भारतीय अन्न महामंडळाच्या जिल्हानिहाय गोदामातून शालेय पोषण आहार योजनेसाठीचा तांदूळ उचल करतील. पुरवठाधारक यांनी उचल केलेला शालेय पोषण आहार योजनेचा हा तांदूळ ज्या दर्जाचा व ज्या स्थितीत उचलला आहे, त्या स्थितीत जसाच्या तसा शाळेपर्यंत पोहोच करावयाचा आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून उचल केलेल्या तांदुळाची माहिती पुरवठाधारकांनी दरमहा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना सादर करावी.

(अ-२) पुढील आर्थिक वर्षापासून (२०१०-११) केंद्र शासनामार्फत मोफत देण्यात येणाऱ्या तांदुळाची किंमत राज्य शासनांस अनुदान स्वरुपात वितरीत करण्यात येणार आहे. राज्य शासनाने सदर अनुदान म्हणजे तांदुळाची बीपीएल दराने येणारी किंमत भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन तांदूळ प्राप्त करून घ्यावयाचा आहे. चालू आर्थिक वर्षाच्या (२००९-१०) अखेर पर्यंत मात्र भारतीय अन्न महामंडळच्या तांदुळाची किंमत केंद्र शासनामार्फत परस्पर देण्यात येणार आहे.

(अ-३) पुढील आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेचे वार्षिक कार्य अंदाजपत्रक मंजूर केल्यानुसार संपूर्ण राज्यासाठी जिल्हा निहाय तांदुळाचे नियतन प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत वितरीत करण्यात येईल. शिक्षण संचालनालय (प्राथमिक) ३-३ महिन्याचे (Quarterly) तांदुळाचे नियतन जिल्हानिहाय आगाऊ स्वरूपात वितरीत करतील.

(अ-४) केंद्र शासनाकडून पुढील आर्थिक वर्षापासुन (सन २०१०-११) तांदुळाची किंमत राज्यास अनुदान स्वरूपात प्राप्त होणार आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण संचालनालयाने भारतीय अन्न महामंडळाकडे संपूर्ण राज्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची किंमत (३-३

महिन्यासाठीची) भारतीय अन्न महामंडळाकडे भरण्याची कार्यवाही करावी. सदर निधी भारतीय अन्न महामंडळाला देत असतांना जिल्हा निहाय तांदुळाचे नियतन भारतीय अन्न महामंडळास आगाऊ कळवावे, जेणेकरून भारतीय अन्न महामंडळास आगाऊ स्वरुपात माहिती प्राप्त झाल्याने त्यांना त्यांच्या जिल्ह्याच्या गोदामामध्ये साठा करणे सोयीचे होऊन, संबंधित जिल्ह्यांना तांदुळ वेळेवर उपलब्ध करुन देणे भारतीय अन्न महामंडळास शक्य होईल.

**(अ-५)** प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन तांदुळाचे नियतन व तांदुळाची किंमत भारतीय अन्न महामंडळास अदा केल्याची माहिती सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद तसेच शिक्षण प्रमुख / प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी (महानगरपालिका) यांना कळवली जाईल. त्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे जिल्हा स्तरावरून त्या जिल्ह्यामधील ग्रामीण भागातून तसेच नागरी भागातून (महानगरपालिका, नगरपालिका यामधील शाळांसह) सर्व शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळाची मागणी मंजूर नियतनाप्रमाणे नियुक्त केलेल्या पुरवठादार दि महाराष्ट्र स्टेट को.ऑ. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांना कळवतील. सदर मागणी करीत असतांना २ महिन्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची मागणी करण्यात येईल. तांदुळाचे नियतन जरी ३ महिन्यासाठी मंजूर करण्यात आले असले तरी सुरुवातीला २ महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील व त्यानंतर शाळेमध्ये २० दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असताना पुढील महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील.

**(अ-६)** जिल्हयामध्ये विविध पंचायत समिती गट अस्तित्वात आहेत. त्याप्रमाणे जिल्ह्यामध्ये नगरपालिका/नगर पंचायती/नगर परिषद / कटकमंडळे अस्तित्वात आहेत. त्या शिवाय काही जिल्ह्यामध्ये महानगरपालिका कार्यरत आहेत. जिल्हा स्तरावरून पुरवठा आदेश देत असताना ज्या पंचायत समिती क्षेत्रामध्ये नगरपालिका क्षेत्र येईल त्या नगरपालिका क्षेत्रामधील नागरी भागातील शाळांसाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची मागणी संबंधित पंचायत समिती क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावी. ज्या जिल्ह्यामध्ये महानगरपालिका कार्यरत आहेत त्या महानगरपालिकेमधील सर्व शालेय पोषण आहार पात्र शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळासाठी एक पंचायत समिती गट असल्याचे गृहीत धरण्यात यावे, तसेच कटक मंडळासाठी सुध्दा एक पंचायत समिती गट गृहीत धरावे. म्हणजे उदाहरण स्वरुपाने, एखाद्या जिल्ह्यामध्ये

७ पंचायत समिती, २ कटकमंडळे व २ महागरपालिका कार्यरत असल्यास त्या जिल्ह्यामध्ये शालेय पोषण आहार योजनेच्या मागणीसाठी ७+२+२ =११ गट गृहित धरण्यात यावेत. जिल्ह्यातील गटासाठी गटनिहाय तांदुळाच्या नियतनाची विभागणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

**(अ-७)** तालुकास्तर म्हणजे गटस्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार हे तांदूळ वाहतुकीसाठी निश्चित केलेल्या 'दि महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई या पुरवठाधारकास तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश देतील.

**(अ-८)** या पुरवठा आदेशासोबत गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार हे शालेय पोषण आहार योजनेच्या पात्र शाळानिहाय तांदुळाचे मागणीपत्र प्रमाणानुसार प्राधान्याने ५० किलोच्या गोणीप्रमाणे किंवा गरजेनुसार ५, १० किलोच्या पटीत पुरवठाधारकास पुरवठा आदेश देतील. सदरील पुरवठा आदेश देण्याअगोदर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील.

**(अ-९)** महानगरपालिका व कटकमंडळ या कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासनअधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे पुरवठाधारकास तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश देतील.

**(अ-१०)** या पुरवठा आदेशासोबत महानगरपालिकेचे शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे शालेय पोषण आहार योजनेच्या पात्र शाळानिहाय तांदुळाचे मागणीपत्र प्रमाणानुसार प्राधान्याने ५० किलोच्या गोणीप्रमाणे किंवा गरजेनुसार ५, १० किलोच्या पटीत पुरवठाधारकास पुरवठा आदेश देतील. सदरील पुरवठा आदेश देण्यापूर्वी महानगरपालिकांच्या बाबतीत शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील.

**(अ-११)** मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद अस्तित्वात नसून या संपूर्ण क्षेत्रासाठी बृहन्मुंबई म.न.पा. कार्यरत आहे. त्यामुळे मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या शाळांसाठी तसेच म.न.पा. क्षेत्रातील खाजगी संस्थांच्या शाळांसाठी

लागणाऱ्या तांदुळाच्या तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका हे निश्चित केलेल्या पुरवठाधारकास देतील. पुरवठा आदेशासोबत शालेय पोषण आहारासाठी पात्र शाळांचे मागणीपत्र असावे. शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पुरवठा आदेशाची प्रत्येक प्रत प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांना पाठवावी.

(अ-१२) प्रत्येक शाळेसाठी लाभार्थींच्या गणनेनुसार आवश्यक असणाऱ्या तांदुळाची माहिती सर्व शाळांकडून त्या त्या गटामार्फत गट स्तरावर एकत्रित करण्यात यावी. कोणत्याही शाळेस तांदुळाचे नियतन कमी किंवा अधिक होणार नाही या संदर्भात गट स्तरावरील यंत्रणा जबाबदार राहील. पंचायत समिती गट स्तरावरुन मागणी देणे व त्याप्रमाणे पुरवठा प्राप्त करुन घेणे यासाठी गट शिक्षणाधिकारी हे संनियंत्रण करतील तसेच महानगरपालिका क्षेत्रात मागणी देणे व पुरवठा प्राप्त करुन घेणे यासाठी शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी हे संनियंत्रण करतील.

## ब) तांदूळ वाहतुकीच्या खर्चाचे देयक अदा करण्याची कार्यपध्दती :-

(ब-१) भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून शाळेपर्यंत तांदुळाची वाहतूक करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पुरवठाधारकास प्रत्यक्ष तांदुळ वाहतुक केल्यानुसार वाहतूक खर्चाचे देयक शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरून देण्यात येईल. वाहतूक खर्चाचे देयकात भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून राज्यातील शालेय पोषण आहार योजनेच्या प्रत्येक पात्र शाळेपर्यंत तांदूळ पोहोच करण्यापर्यंत येणारा सर्व खर्च समाविष्ट राहील.

i) भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून तांदूळ उचल केल्यानंतर भारतीय अन्न महामंडळाचे गोडावून ते शाळास्तरापर्यंत वाहतूक, साठवणूक, धुरीकरण, प्रमाणीकरण इ. बाबींची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल.

ii) भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून तांदुळाची उचल केल्यानंतर शाळेपर्यंत पोहोच करण्यापर्यंत संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची असेल. त्यामध्ये गोडावून ते शाळा

दरम्यान वाहतूक करणा-या वाहनांचे विमा, वाहनांच्या अपघाताने होणारे तांदुळाचे नुकसान, तांदूळ साठवणूक करणा-या गोडावूनचा विमा, आग, चोरी, इ. बाबींचा समावेश असेल.

**(ब-२)** सदर देयके अदा करण्यासाठी संबंधित पुरवठाधारक त्या जिल्हयाअंतर्गत गटातील गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे देयक सादर करतील. गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे मुख्याध्यापकाने दिलेल्या पोहोच पावतीनुसार देयक तपासून प्रमाणीत करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे पाठवतील. सदर देयक शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून प्रमाणित करण्यात येईल व प्रमाणित करण्यात आलेले देयक शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवले जाईल. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून प्रमाणित करुन आलेले तांदुळाचे देयक शासनाकडून उपलब्ध होणा-या अनुदानाप्रमाणे संबंधित पुरवठाधारकास प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे स्तरावरुन जिल्हानिहाय देयकानुसार अदा करण्यात येईल.

**(ब-३)** मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या शाळांसाठी तसेच मनपा क्षेत्रातील खाजगी संस्थांच्या शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळाच्या वाहतूक खर्चाची देयके बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी सदर देयकाची तपासणी करुन तसेच गोषवारा प्रमाणित करुन देयकाच्या अदायगीसाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठवतील. वाहतूक खर्चाचे देयक शिक्षण संचालनालयास सादर करताना पुरवठा करण्यात आलेला तांदूळ योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

**(ब-४)** संबंधित पुरवठादारांनी त्यांना प्राप्त झालेल्या शाळानिहाय मागणीनुसार तांदुळ पुरवठा शाळेपर्यंत करावयाचा आहे. नागरी भागातील शाळांसाठी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा अवलंब केला असल्यास त्या शाळांसाठी द्यावयाचा तांदुळ त्या शाळांच्या मागणीप्रमाणे सदर केंद्रीय स्वयंपाकगृह असणाऱ्या ठिकाणी परवठा करणे आवश्यक राहील.

## क) ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करण्याची कार्यपध्दती -

**(क-१)** शासन निर्णय क्र.शापोआ-२००९/प्र.क्र. १३६/प्राशि-४, दि.१८.६.२००९ अन्वये ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार बनविण्यासाठी धान्यादी (उदा.कडधान्य, तेल, मीठ, मिरची पावडर, मसाला इ.) पुरवठा निविदा मागवून करण्यात यावा, असे आदेश देण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयानुसार शिक्षण संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादाराची निवड करण्यात आलेली आहे. त्यानंतर शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १ व दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांचेमध्ये दिनांक २३ ऑक्टोबर २००९ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. दिनांक १८/६/२००९ चा वर नमूद केलेल्या क्रमांकाचा शासन निर्णय, निविदा प्रक्रियेत निश्चित केलेल्या अटी व शर्ती व करारनामा यास अधिन राहून पुरवठाधारकामार्फत ग्रामीण भागातील शाळांमध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येईल.

**(क-२) <u>तालुका स्तर</u>:-** तालुकास्तर म्हणजे गटस्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार निश्चित केलेल्या पाककृतीनुसार ठरवून दिलेल्या धान्यादी मालाची प्रमाणानुसार परिगणना करतील व प्राधान्याने एक, दोन व पाच किलोच्या पॅकींगमध्ये किंवा आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणा-या धान्यादी मालाचे शाळानिहाय मागणी पत्रासह पुरवठाधारकास पुरवठा आदेश देतील. गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक हे संबंधित पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यापूर्वी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील. सदर पुरवठा आदेशाची प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना देण्यात यावी.

**(क-३)** गटस्तरावरुन पुरवठा आदेश ज्या दिनांकास काढला जाईल त्या दिनांकापासून पुरवठा करण्यासाठीचा कालावधी गृहीत धरण्यात येईल. तसेच संबंधितांनी पुरवठाधारकास तांदुळाची वाहतूक तसेच इतर धान्यादी मालाचा पुरवठा, याबाबतचे पुरवठा आदेश एकाच वेळी द्यावेत.

**(क-४)** शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ व धान्यादी माल हा दैनंदिन आहार ब-नविण्यासाठी वापरावयाचा असतो. त्यामुळे त्याचा पुरवठा वेळेवर होणे आवश्यक आहे.

त्यासाठी गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांनी वेळेत मागणी करणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी वेळेत पुरवठा आदेश काढणे व पुरवठा आदेशानंतर पुरवठाधारकाने १५ दिवसाच्या आत मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेत करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधितांनी वेळेत पुरवठा होणेसाठी कालमर्यादेत कार्यवाही करावी.

**(क-५) धान्यादी मालाचा प्रत्यक्ष पुरवठा :-** ग्रामीण भागातील शाळांमध्ये संबंधित पुरवठाधारकामार्फत तांदूळ व इतर वस्तूंचा पुरवठा एकत्रित करण्यात येईल. मात्र तांदूळ पुरवठयाच्या व धान्यादी माल पुरवठयाच्या पावत्या वेगवेगळया ठेवण्यात येतील. संबंधित पुरवठादार सदर मालाच्या पुरवठयासंदर्भातील शासन विहित करील त्या नमुन्यातील पावत्या स्वत:च्या खर्चाने छापून घेईल व त्याच पावत्यांचा वापर पुरवठादार करेल. त्यासाठी गुलाबी, पिवळया व पांढ-या अशा तीन रंगाच्या पावत्या बनविण्यात येतील. गुलाबी रंगाची पावती आहार घेणा-या शाळेकडे राहील. पिवळया रंगाची पावती पुरवठाधारक देयकासोबत जोडून गट स्तरावर सादर करतील. पांढ-या रंगाची पावती पुरवठाधारकाकडे त्याची स्वत:ची प्रत म्हणून ठेवण्यात येईल. सदर पावतीवर गटाचे व जिल्हयाचे नांव, पुरवठयाचा दिनांक, वाहन क्रमांक, माल वाहतूक करणा-याचे नांव इ. तपशील असेल. तीनही पावत्यावर माल योग्य वजनाचा व दर्जाचा व सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहोच मुख्याध्यापक देतील.

**(क-६)** प्रारंभिक पुरवठा २ महिन्यांसाठी करण्यात येईल, त्यानंतर १ महिन्यासाठी पुरेल एवढे अन्नधान्य पुरवठा करण्यात यावा. शाळेमध्ये २० दिवस पुरेल इतका धान्य साठा शिल्लक असताना नवीन पुरवठा आदेश देण्यात येतील. शाळांकडून मागणी वेळेत प्राप्त करुन घेणे व पुरवठा आदेश वेळेत पुरवठाधारकास देण्याची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक शालेय पोषण आहार यांची असेल.

**ड) धान्यादी मालाची तपासणी :-**

**(ड-१)** पुरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने प्रत्येकी २५० ग्रॅम प्रमाणे गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांनी त्यांचे पत्रासोबत शासकीय प्रयोगशाळेत पाठवावेत. शासकीय प्रयोगशाळेतील तपासणीचा संपूर्ण खर्च पुरवठाधारकाने अदा करणे आवश्यक राहील. प्रयोगशाळेचा समाधानकारक अहवाल प्राप्त

झाल्यानंतर मालाच्या देयकासोबत सदरचा तपासणी अहवाल गटशिक्षणाधिकारी व अधीक्षक, शालेय पोषण आहार यांच्याकडे पुरवठाधारक सादर करतील. सदरचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयके अदा केली जातील. धान्यादी मालाच्या दर्जाबाबत काही तक्रारी आल्यास सदरील धान्यादी वस्तू पुरवठाधारकाकडून बदलून घेण्यात याव्यात.

(ड-२) पुरवठाधारकाने सादर केलेल्या पोहोच पावत्या, प्रयोगशाळा तपासणी अहवाल व गटाचा एकत्रित गोषवारा याची तपासणी अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी करावी. गटास प्राप्त झालेला माल योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे प्रमाणपत्र नोंदवून पुरवठाधारकाकडून सादर झालेले देयक शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांना १० दिवसाच्या आत सादर करण्याची जबाबदारी व गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांची असेल. सर्व गट स्तरावरुन धान्यादी मालाच्या पुरवठयाची देयके प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या मंजूर अनुदानातून/ निधीमधून सदर देयके संबंधित पुरवठाधारकास देयक दाखल झाल्यापासून १० दिवसाच्या आत अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करावीत. तांदुळाच्या वाहतूकीची देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद यांचे स्तरावर अदा न करता त्या त्या जिल्हयामधील गट स्तरावरुन तांदूळ वाहतूकीची आलेली देयके यांचा गोषवारा बनवून शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांनी सदर देयके शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे अदायगीसाठी सादर करावीत. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे तांदूळ वाहतुकीची देयके सादर करताना लेखाधिकारी, शालेय पोषण आहार व शिक्षणाधिकारी यांनी योग्य दर्जाचा व वजनाचा माल प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र सादर करावे व त्यानंतर वाहतूक खर्चाची देयके प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडून अदा करण्यात यावीत.

(ड-३) संबंधित पुरवठाधारक त्यांनी पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची देयके ४ प्रतीत बनवून सादर करतील, त्यापैकी १ प्रत पुरवठाधारक स्वत:कडे ठेवतील व देयकाच्या ३ प्रती गट स्तरावर सादर करतील. अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी सदर देयकाची तपासणी करुन त्याचा गोषवारा बनवून देयकाच्या ३ प्रतींपैकी २ देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद यांचेकडे सादर करण्यात यावीत. सदर देयकाची अदायगी करताना

एक प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद व देयकाची दुसरी प्रत मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हापरिषद यांचे कार्यालयात राहील.

**(ड-४)** दि.१८.६.२००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे अन्न शिजविण्याच्या अनुदानात विभागणी करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये पाककृतीनुसार आवश्यक लागणारा इतर धान्यादी माल (उदा. कडधान्य, डाळ, तेल, मिठ, मिरची पावडर इ.) निश्चित केलेल्या पुरवठाधारकामार्फत करण्यात येणार आहे. फक्त अन्न शिजवून देण्यासाठी म्हणजे इंधन व मजूरी यासाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु. ०.५० म्हणजे ५० पैसे याप्रमाणे ग्रामशिक्षण समित्यांना अनुदान देण्यात येणार आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी फक्त इंधन व मजूरीचे अनुदान तालुक्यांना / गटांना वर्ग करावे. व गटांनी ग्रामशिक्षण समित्यांना वर्ग करावेत. इंधन व मजूरीचा खर्च वजा जाता प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी) साठी उर्वरित रु. १.५८ प्रतिदिन प्रतिविद्यार्थी व उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी) साठी उर्वरित रु. २.१० प्रतिदिन प्रतिविद्यार्थी हा खर्च शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पुरवठाधारकाचे धान्यादी मालाची देयके देण्यासाठी उपयोग करावा. गटस्तरावर वर्ग करावयाचा निधी व पुरवठाधारकास अदा करावयाची रक्कम याची एकत्रित मागणी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेकडे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पाठवावी. तसेच मासिक खर्चाचा अहवाल व मासिक प्रगती अहवाल शिक्षण संचालनालयाकडे मुदतीत सादर करावेत. नवीन कार्यपध्दतीप्रमाणे संबंधित शाळेस पुरवठाधारकामार्फत तांदूळ व धान्यादी वस्तूं ज्या दिवसापासून प्राप्त होतील त्या दिवसापासून नवीन पध्दतीप्रमाणे अनुदानाची विभागणी लागू करण्यात येईल. संबंधित शाळेकडे यापूर्वी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वाहतूक होवून आलेला तांदूळ उपलब्ध असल्यास सदर तांदुळाचा साठा नोंदवहीमध्ये तशी नोंद करुन त्या तांदुळाचा वापर करण्यात यावा. पुढील मागणी नोंदविताना शाळेकडील शिल्लक विचारात घ्यावी.

**(ड-५)** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नवीन पध्दतीप्रमाणे पुरवठाधारकामार्फत तांदुळाची वाहतूक ग्रामीण व नागरी भागासाठी करण्यात येणार आहे. त्याशिवाय ग्रामीण भागामध्ये पाककृतीप्रमाणे इतर वस्तूंचा पुरवठा करण्यात येणार आहे. सदर पुरवठा साधारणपणे एकाच वेळी होईल अशा पध्दतीने पुरवठा आदेश देण्यात यावेत. प्रारंभिक पुरवठा

२ महिन्यांसाठी असेल. यानंतर एक महिन्यासाठी पुरेल एवढया धान्यादी मालाचे तसेच तांदूळाचे पुरवठा आदेश देण्यात यावेत.

**(ड-६)** शालेय पोषण आहार योजनेमध्ये वरील सुधारणा अंमलात आणताना यापूर्वी अन्न शिजविण्यासाठी नियुक्त केलेल्या यंत्रणांना आगाऊ कल्पना देण्यात यावी जेणेकरुन त्यांचेकडून आवश्यक वस्तूंची खरेदी होणार नाही.

**फ).** संबंधित शाळेकडून गटशिक्षणाधिकारी व अधिक्षक,शालेय पोषण आहार यांनी खालील माहिती प्राप्त करुन घ्यावी:-

१ नवीन पध्दतीप्रमाणे कोणत्या तारखेस मालाचा पुरवठा करण्यात आला.

२ जुन्या पध्दतीप्रमाणे शाळेमध्ये शिल्लक असलेला तांदूळ किती.

३ १ एप्रिल २००९ ते जुन्या पध्दतीप्रमाणे अन्न शिजवून देण्याचा शेवटचा दिनांक.

४ वरील मुद्दा क्र. ड-४ च्या आधारे इंधन व मजूरीचे अनुदान त्याचप्रमाणे धान्यादी मालाची किंमत याची विभागणी गट स्तरावर करण्यात यावी.

**इ) <u>अन्न शिजविण्याची कार्यपध्दती</u> :-**

**(इ-१)** ग्रामीण भागामध्ये ग्राम शिक्षण समितीने शाळेस उपलब्ध होणारा तांदूळ आणि इतर खाद्य वस्तूंपासून विहित केलेल्या पाककृतीप्रमाणे स्वयंपाक्यामार्फत आहार बनवून घ्यावा. या योजनेंतर्गत स्वयंपाकाचे काम महिला बचत गट, महिला मंडळ यांच्याकडून करुन घ्यावे. मात्र वैयक्तिक स्थानिक स्वयंपाकी नियुक्त करताना त्या गावातील विधवा, परितक्त्या अथवा गरजू महिलांना तसेच मागासवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे.

i)अन्न शिजवून देणा-या व्यक्तींना सक्षम वैद्यकीय अधिका-याकडून आरोग्य विषयक तपासणी करुन घ्यावी व वैद्यकीय प्रमाणपत्र शाळेमध्ये ठेवण्यात यावे.

ii)अन्न शिजवून देणा-या प्रत्येक व्यक्तीकडे कायम स्वरुपाचे संबंधित मुख्याध्यापक यांनी दिलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

iii) विद्यार्थ्यांना दर्जेदार आहार देण्याच्या दृष्टीकोनातून ग्रामशिक्षण समितीने स्थानिक पातळीवर लोकसहभागातून सहभाग घ्यावा. तसेच अन्न धान्य व आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी तपासणी करावी.

iv) सर्व क्षेत्रिय अधिकारी, जिल्हा स्तरावरील भरारी पथके, राज्यस्तरावरील दक्षता पथके यांचे मार्फत आहाराचा दर्जा वेळोवेळी तपासण्यात येईल.

**(इ-२)** ग्रामीण भागामधील शाळेसाठी ग्राम शिक्षण समितीमध्ये शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात पाच (५) लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांना निमंत्रित सदस्य म्हणून घेण्यात यावेत. अशा प्रकारे ग्राम शिक्षण समितीमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रित सदस्य म्हणून घेऊन त्याद्वारे ग्राम शिक्षण समितीने शाळेमध्ये उपलब्ध होणा-या अन्न-धान्यादी मालापासून विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था करावी.

ग). <u>साठा नोंदवही व अभिप्राय पुस्तिका</u> - प्रत्येक शाळेमध्ये (ग्रामीण भागातील तसेच नागरी भागातील शाळांमध्ये) प्राथमिक शिक्षण संचालनालयाने विहित केलेली एक साठा नोंदवही व अभिप्राय पुस्तिका ठेवण्यात यावी. सदर साठा नोंदवही मध्ये शाळेमध्ये प्राप्त होणा-या तांदुळाची नोंद करण्यात यावी. साठा नोंदवहीमध्ये शिल्लक असलेला तांदूळ, पुरवठेदाराकडून/ वाहतूकदाराकडून पुरवठा आदेशानुसार प्राप्त झालेला तांदूळ, शाळेमध्ये आहार देण्यासाठी प्रत्येक दिवशी लागलेला तांदूळ व त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाच्या तांदळाची नोंद करण्यात यावी. ग्रामीण भागातील शाळांमध्ये तांदूळाबरोबर इतर धान्यादि मालाचा पुरवठा करण्यात येणार असल्याने या धान्यादी मालासाठी स्वतंत्र साठा नोंदवही ठेवण्यात यावी व तांदुळाच्या साठा - नोंदवही प्रमाणे यामध्ये धान्यादी वस्तुंची नोंद करण्यात यावी. साठा नोंद वही अद्यावत ठेवण्यात यावी. अभिप्राय पुस्तिकेत आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी ग्रामशिक्षण समिती सदस्य, माता, पालक व अधिका-यांचे अभिप्राय घेण्यात यावेत.

**ह). <u>सर्वसाधारण सुचना :-</u>**

**(ह-१)** पुरवठाधारकाने भारतीय अन्न महामंडळाच्या गोडावूनमधून उचल केलेल्या तांदुळाचे हिशेब प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी) व उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी) साठी स्वतंत्रपणे ठेवावेत व दरमहा तांदूळ उचल वाटप अहवाल प्राथमिक शिक्षण संचालनालयास सादर करावा.

**(ह-२)** तांदूळ व इतर धान्यादी मालाच्या पुरवठयासंदर्भात सर्व यंत्रणांमध्ये समन्वय राखण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दरमहा जिल्हयातील गटशिक्षणाधिकारी,

अधीक्षक, शालेय पोषण आहार, नगरपालिका मंडळे व महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी यांची एकत्रित बैठक घ्यावी. या बैठकीस पुरवठाधारकाचा जिल्हा व्यवस्थापक हजर असणे बंध-नकारक असेल.

(ह-३) शासन निर्णय क्र. सापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि ४, दि. १८/६/२००९, या संदर्भात मागविण्यात आलेल्या निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच संचालनालयामार्फत वरील संदर्भात यापुढील काळात वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व आदेश यांचे पालन करणे पुरवठाधारकास बंधनकारक असेल.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) २०१००२२६१४२६४६००१ क्रमांकाने प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(ना.ऊ.रौराळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मुख्यमंत्र्याचे /उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मंत्री / राज्यमंत्री , शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हे
गट शिक्षणाधिकारी, सर्व
शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी शिक्षण प्रमुख सर्व (म.न.पा./न.पा.)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

परिशिष्ट क्रमांक - ४

**जिल्हा परिषदां व पंचायत समित्यांमधील बांधकामे/विकास योजना यांच्याशी संबंधित प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आणि निविदा/कंत्राट स्विकारण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र ६८०/वित्त-९

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: १९ मार्च,२०१२.

वाचा :- १) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए २०००/प्र.क्र ४०२३/३३ दिनांक १२ जानेवारी, २००१

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए १०९९/प्र.क्र२०८९ भाग-२/३३ दिनांक १२ जानेवारी, २००१

३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र. झेडपीए२००१/प्र.क्र ४०२३/वित्त-९ दिनांक १९ मार्च,२००४

४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए२००८/प्र.क्र ४४४/वित्त-९ दिनांक २५ जून,२००८

५) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र४४४/वित्त-९ दिनांक १५ जुलै, २००८

**प्रस्तावना :-**

शासन निर्णय क्रमांक: झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/वित्त-९, दिनांक १५ जूलै,२००८ अन्वये जिल्हा परिषदांमधील बांधकामे व विकास योजना राबविण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्याबाबत जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तथापि, जिल्हा

परिषदांकडे राबविण्यासाठी देण्यात आलेल्या विविध योजनांमुळे जिल्हा परिषदांकडील कामाच्या व्याप्तीमध्ये व स्वरुपात वृध्दी झाली असून दरम्यानच्या काळात बांधकामासाठी वापरावयाच्या सिमेंट/स्टील व इतर साहित्याच्या दरातही बरीच वाढ झालेली आहे. तसेच संदर्भीय क्र.५ येथील शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकारांमध्ये काही बाबी समाविष्ट करणे आवश्यक असून त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषदेतील खातेप्रमुखांना विकास योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करणे, तसेच भाग-३ मध्ये रु.५० लाखाचे वरील कामे किंवा विकास योजना राबविण्यासाठी येणाऱ्या खर्चाला द्यावयाच्या तांत्रिक मान्यतेबाबत निर्देश देणे इ. बाबी अंतर्भूत करुन काही अधिकारांमध्ये वाढ करणेही गरजेचे आहे.

उपरोक्त बाबींचा संदर्भीय क्र.५ येथील शासन निर्णयामध्ये समावेश नसल्यामुळे सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना जिल्हा परिषदांना अडचणी येत आहेत. त्यामुळे वरील सर्व बाबींचे निराकरण करण्यासाठी शासनाचे मार्गदर्शन होणेबाबत जिल्हा परिषदांकडून सतत विचारणा करण्यात येत आहे. उपरोक्त परिस्थितीचा विचार करता जिल्हा परिषदामधील बांधकामे किंवा विकास योजना राबविण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्याबाबत जिल्हा परिषदांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा करण्याची व त्याअनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील नियम-९९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील कलम-४ खालील परिशिष्ट-दोन मध्ये दुरुस्त्या करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

त्यानुसार वरील संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णय क्रमांक:झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/ वित्त-९, दिनांक १५ जूलै,२००८ रद्द करण्यात येत असून, आता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील नियम-९९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील कलम-४ खालील परिशिष्ट-दोन अन्वये जिल्हा परिषदामधील विविध योजना राबविण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्याबाबतचा आणि कंत्राटे स्विकारण्याच्या अनावर्ती खर्चाच्या अधिकारासंदर्भात सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील नियम ९९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता,१९६८ मधील कलम ४ खालील परिशिष्ट-दोन मधील जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या शक्तींची प्रक्रांती (Devolution of Powers)**

| अ.क्र | अधिकाराचे स्वरुप | अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकारी /प्राधिकरण (Authority) | अंदाजित अनावर्ती खर्च (रुपयात) न्यूनतम मर्यादा | अधिकतम मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भाग-१ | **मूळ** बांधकामे व **दुरुस्ती यांच्या** संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार | | | |
| | | **जिल्हा परिषद** | | |
| | | १.उप अभियंता | | १,००,०००* |
| | | २.कार्यकारी अभियंता | १ ०० ००१ | १०,००,०००* |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी /अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | १० ०० ००१ | २०,००,००० * |
| | | ४.अध्यक्ष, स्थायी समिती | २० ०० ००१ | २५,००,००० * |
| | | ५.सभापती, विषय समिती | २० ०० ००१ | २३,००,००० * |
| | | ६.विषय समिती | २३ ०० ००१ | ३० ०० ००० |
| | | ७.स्थायी समिती | २५ ०० ००१ | ५० ०० ००० |
| | | ८.जिल्हा परिषद | ५० ००,००१ | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | -- | ५,००,००० * |
| | | २.सभापती,पंचायत समिती | ५ ०० ००१ | १०,००,००० * |
| | | ३.पंचायत समिती | १० ००,००१ | संपूर्ण अधिकार |

| अ.क्र | अधिकाराचे स्वरुप | अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकारी /प्राधिकरण (Authority) | अंदाजित अनावर्ती खर्च (रुपयात) | |
|---|---|---|---|---|
| | | | न्यूनतम मर्यादा | अधिकतम मर्यादा |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भाग-२ | विकास योजना यांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार | | | |
| | | **जिल्हा परिषद** | | |
| | | १.जिल्हा परिषदेचे खातेप्रमुख | | १०,००,०००* पर्यंत |
| | | २.मुख्य कार्यकारी अधिकारी /अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | १० ०० ००१ | २०,००,००० * |
| | | ३.अध्यक्ष, स्थायी समिती | २० ०० ००१ | २५,००,००० * |
| | | ४.सभापती, विषय समिती | २० ०० ००१ | २३,००,००० * |
| | | ५.विषय समिती | २३ ०० ००१ | ३० ०० ००० |
| | | ६.स्थायी समिती | २५ ०० ००१ | ५० ०० ००० |
| | | ७.जिल्हा परिषद | ५० ००,००१ | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | -- | ५,००,००० * |
| | | २.सभापती,पंचायत समिती | ५ ०० ००० | १०,००,००० * |
| | | ३.पंचायत समिती | १० ०० ००१ | संपूर्ण अधिकार |

| अ.क्र | अधिकाराचे स्वरुप | अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकारी /प्राधिकरण (Authority) | अंदाजित अनावर्ती खर्च (रुपयात) | |
|---|---|---|---|---|
| | | | न्यूनतम मर्यादा | अधिकतम मर्यादा |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भाग-३ | मूळ बांधकामे व दुरुस्ती यांच्या संबंधातील तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार | | | |
| | | १.उप अभियंता | | ५,००,००० *पर्यंत |
| | | २. कार्यकारी अभियंता | ५ ००,००१ | २५,००,०००*पर्यंत |
| | | ३) अधिक्षक अभियंता (राज्य शासन) | | मूळ कामे व दुरुस्त्या या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अद्ययावत शासन निर्णया प्रमाणे तांत्रिक मान्यतेचे अधिकार राहतील. |
| | | ४) मुख्य अभियंता (राज्य शासन) | | मूळ कामे व दुरुस्त्या या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अद्ययावत शासन निर्णयाप्रमाणे तांत्रिक मान्यतेचे अधिकार राहतील. |
| | | ५)कार्यकारी अभियंता ( विद्युत कामे ) | | २,५०,००० * पर्यंत. |
| | | | | या वरील विद्युत कामांच्या रकमेस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अद्ययावत शासन निर्णयानुसार सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक मंजूरी घ्यावी. |

| अ.क्र | अधिकाराचे स्वरूप | अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकारी /प्राधिकरण (Authority) | अंदाजित अनावर्ती खर्च (रुपयात) | |
|---|---|---|---|---|
| | | | न्यूनतम मर्यादा | अधिकतम मर्यादा |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भाग-४ | विकास योजना यांच्या संबंधातील तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार | | | |
| | | १. गटविकास अधिकारी | | ५,००,००० * पर्यंत |
| | | २.जिल्हापरिषदेचे खातेप्रमुख | | १०,००,००० * पर्यंत |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | १०,००,००१ | ५०,००,००० * पर्यंत |
| | | ४.प्रशासकीय विभाग | | ५०,००,००१ व त्यावरील खर्चास शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागाची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी |

| अ.क्र | अधिकाराचे स्वरूप | अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकारी /प्राधिकरण (Authority) | अंदाजित अनावर्ती खर्च (रुपयात) | |
|---|---|---|---|---|
| | | | न्यूनतम मर्यादा | अधिकतम मर्यादा |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भाग-५ | बांधकामे/विकास योजनांच्या निविदा किंवा कंत्राट स्विकारण्याचा अधिकार | | | |
| | | १.उप अभियंता | | १,००,००० * पर्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २.कार्यकारी अभियंता / खातेप्रमूख | १ ००,००१ | १०,००,००० * पर्यंत |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी /अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | १० ०० ००१ | २०,००,००० * |
| | | ४.अध्यक्ष, स्थायी समिती | २० ०० ००१ | २५,००,००० * |
| | | ५.सभापती, विषय समिती | २० ०० ००१ | २३,००,००० * |
| | | ६.विषय समिती | २३ ०० ००१ | ३० ०० ००० |
| | | ७.स्थायी समिती | २५ ०० ००१ | ५० ०० ००० |
| | | ८.जिल्हा परिषद | ५० ००,००१ | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | -- | ५ ०० ०००* |
| | | २ सभापती,पंचायत समिती | ५ ०० ००१ | १०,००,००० * |
| | | ३.पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |

* टिपः- १) या स्तरावर दिलेल्या मान्यतेची माहिती पुढील विषय समितीस/स्थायी समितीस/पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात यावी.

२) भाग-४ मधील विकास योजनेसंदर्भात ज्या विभागाची योजना असेल त्या विभागाच्या पंचायत समिती स्तरावरील अधिकाऱ्याचा तांत्रिक सल्ला घेऊनच गटविकास अधिकाऱ्यांनी त्या योजनेस तांत्रिक मान्यता द्यावी.

३) भाग-४ मधील विकास योजनेसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेतील ज्या विभागाची योजना असेल त्या विभागाच्या विभाग प्रमुखाचा तांत्रिक सल्ला घेऊनच त्या योजनेस तांत्रिक मान्यता द्यावी

४) जिल्हा परिषदेतील प्रत्येक विभागांनी यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करण्यात यावा.

या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील नियम ९९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील कलम ४ खालील परिशिष्ट-दोन मध्ये आवश्यक ते बदल करण्यांत येतील.

हा शासन निर्णय संगणक संकेतांक क्रमांक: २०१२०३१९०७१०१०३१०००१ अन्वये www. maharashtra.gov.in अन्वये शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(एकनाथ मोरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
मा.विधान सभा / विधान परिषद सदस्य
महालेखाकार ( स्थानिक संस्था ) महाराष्ट्र-१, मुंबई (पाच जादा प्रतीसह)
महालेखाकार ( स्थानिक संस्था ) महाराष्ट्र-२, नागपूर (पाच जादा प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त ( महसूल )
संचालक तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, म.रा. कोकण भवन, नवी मुंबई
सर्व सहसचिव / उपसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (कोकण/रत्नागिरी/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती)
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदाचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग ( व्यय-१५ / अर्थ-१७/ वित्त आयोग कक्ष )
ग्राम विकास व जलसंधारण विभाग ( सर्व कार्यासने )
मा.सचिव (ग्रा.वि.व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
निवडनस्ती (वित्त-९)

परिशिष्ट क्रमांक - ७

**राज्यातील मागासवर्गीयांना शैक्षणिक सवलती**

स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदान देण्याबाबतच्या नियमांची सुधारणा.

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीएच-१०९७/प्र.क्र. १०७/मावक-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ मार्च, १९९८.

वाचा :-
1) शासन निर्णय, कामगार व समाजकल्याण विभाग क्रमांक:इबीसी-१०५१/डी, दिनांक ३१ ऑगस्ट, १९५१.
2) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्रमांक:बीसीएच १०७९/४८३२३/सीआर-४९२/बीसीडब्ल्यु-४ दिनांक २२.११.१९८३
3) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दि. ४.११.१९९५
4) शासन शुध्दीपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दि. ६.३.१९९६
5) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दि. २४ मे १९९६
6) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक:टहीएएस-१०९४/प्र.क्र. १७६/मावक-६, दि. २५.७.१९९६
7) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २८/मावक-४, दिनांक २७.८.१९९६.
8) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दिनांक १२.९.१९९६
9) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२(अ)/मावक-४, दि. ५.३.९७
10) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९७/प्र.क्र. २७२/(अ)/मावक-४, दि. ५.३.९७.

सन निर्णय :- स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहांना न्यता व सहाय्यक अनुदान देणेबाबतचे नियम वरील अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद लेल्या शासन निर्णयान्वये शासनाने तयार केले होते. सदर नियमापैकी काही नियमांत वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी ्या वेळी आलेल्या प्रशासकीय स्वरूपाच्या अडचणी विचारात घेऊन तसेच विविध सतिगृह संचालक संघटनांनी वेळोवेळी केलेल्या मागण्या विचारात घेऊन आणि या नियमामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांचा समावेश करून शासन निर्णय यार करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता या निर्णया

सोबत जोडलेल्या परिशिष्ट "जोडपत्र-अ" नुसार स्वेच्छा संघटनांना चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदाने देण्याबाबतच्या सुधारीत नियमांना मान्यता देत आहे. त्यामुळे यापूर्वीचे या योजनेसंबंधातील वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व आदेश रद्द करण्यात येत असून यापुढे या सोबतच्या जोडपत्र"अ" मधील सुधारीत नियमावली लागू करण्यात येत आहे. मात्र अनुदान निर्धारण तसेच वित्तीय बाबींशी संबंधीत बाब जून, १९९८ च्या शैक्षणिक वर्षापासून लागू राहतील,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[जे.पी. डांगे]
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य नाशिक.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर/निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
निवड नस्ती, कार्यासन मावक-४
जा.क्र. जिपनां-समक-वशा-९८ कार्यालय समाज कल्याण विभाग जि.प. नांदेड
दि. २०.५.९८

प्रति,
१) सर्व अनुदानीत मागासवर्गीय वसतीगृह संचालक
ता.- - - - - - - - जि. नांदेड.

समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड.

शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक: बीसीएच: १०९७/प्र.क्र. १०५/मावक-४, दिनांक १९ मार्च १९९८ सहपत्र

जोडपत्र "

महाराष्ट्र राज्यातील स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीय मुलामुलींच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदान देण्याबाबतचे नियम

एक :- नांव

या नियमांना महाराष्ट्र राज्यातील स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदान देण्याबाबतचे नियम असे म्हणता येईल.

दोन :- उद्दिष्ट

मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने त्यांना वसतिगृहाच्या सोयी आणि शैक्षणिक सवलती यांचा फायदा देण्याबाबत प्रोत्साहन देणे.

तीन :- व्याख्या

~~(१)~~ <u>वसतिगृह</u>

या योजनेच्या नियमानुसार विद्यार्थ्यांच्या निवासाच्या प्रयोजनासाठी योग्य म्हणून मान्यता दिलेली, शौचालय, स्वयंपाक घर, भोजन कक्ष, कोठी घर, प्रसाधन गृह व स्नानगृह आणि वसतिगृह अधिक्षकांचे निवासस्थान वगैरेसारख्या आवश्यक सोयींनी युक्त अशी इमारत/घर.

(२) ब <u>निवासी छात्र</u>

मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये आयोजित पूर्णकालीक पाठ्यक्रमाचे शिक्षण घेणारा आणि मागासवर्गीयांच्या वसतिगृहात प्रवेश देण्यात आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी.

(३) <u>तपासणी अधिकारी</u>

संचालक, समाज कल्याण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय समाज कल्याण अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेचा समाजकल्याण अधिकारी, व समाजकल्याण निरीक्षक किंवा संचालक, समाजकल्याण, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, विभागीय समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण अधिकारी वर्ग-१ व २ यांनी किंवा शासनाने प्राधिकृत

केलेला इतर कोणताही शासकीय अधिकारी.

[४] स्वेच्छा संघटना

संस्था नोंदणी अधिनियम, १८६० किंवा मुंबई सार्वजनिक अधिनियम, १९५० यान्वये नोंदणी केलेले कोणतेही अभिकरण/संघटना/संघ/संस्था.

[५] लेखा परिक्षा अहवाल

संबंधीत सेवासाठी अभिकरणाच्या बाबतीत नोंदणीकृत सनदी लेखापालाने संस्थेच्या लेखांची लेखा परिक्षा केल्याबद्दलचा [अभिकरणाची ज्या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आली असेल त्या अधिनियमातील तरतुदीनुसार विहित प्रपत्रातील] अहवाल.

[६] वसतिगृह वर्ष

१ जून पासून सुरु होणारे आणि ३१ मे रोजी संपणारे वर्ष.

[७] सकस व पुरेसे अन्न

शासनाचे अनुदान मिळणाऱ्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहातील निवासी छात्रांसाठी वेळोवेळी विहीत केलेल्या आहाराच्या प्रमाणानुसार द्यावयाचे अन्न.

[८] स्थानिक विद्यार्थी

वसतिगृह ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणच्या स्थानिक हद्दीच्या आत ज्याचे आई वडील सामान्यत: रहात असतील असा विद्यार्थी.

भाग :- नियम

१] मागासवर्गीयांच्या वसतिगृहास मान्यता मिळण्यासाठी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यामार्फत त्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वसतिगृहास ज्या शैक्षणिक वर्षात मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव असेल. त्या शैक्षणिक सत्राच्या किमान १ वर्ष आधी [म्हणजे जून पूर्वी] १ वर्ष संस्थेचे वसतिगृह चालविलेले असावे. तसेच विहीत नमुन्यामध्ये अर्ज परिशिष्ट [ब] सादर केलेला असावा. सदर अर्जाचा नमुना समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालयात रु. १००/- चलन अथवा रोखीने भरणा करुन उपलब्ध होऊ शकेल.

२] ज्यांच्या व्यवस्थापनाची नोंदणी, संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा मुंबई सार्वजनिक अधिनियम १९५० याखाली करण्यात आलेली आहे,

...ारी मागासवर्गीयांपैकी वसतिगृह मान्यतेसाठी पात्र असतील.

[३] मान्यतेसाठी अर्ज [illegible] वसतिगृहाची गरज आहे. [illegible] आराखड्याप्रमाणे [illegible] पुढील [illegible] अधिकारी [illegible] ठिकाणी [illegible] पुढील [illegible] संचालक, समाज कल्याण यांच्यामार्फत शासनाच्या पूर्वानुमतीकरिता [illegible] असतील.

[अ] मागासवर्गीय मुले/मुलींची विद्यमान वसतिगृहे, मागासवर्गीय मुले / मुलींची संख्या आणि विद्यमान वसतिगृहातील जागा / प्रवेश [illegible] विचारात घेता एखाद्या भागात नवीन वसतिगृह सुरू करणे आवश्यक आहे काय ?

[ब] व्यवस्थापनाने पुढीलप्रमाणे किमान प्रमाण दर्शविणारी मोठी सुविधा उपलब्ध केली आहेत काय ?

[क] वसतिगृह परिसर [illegible] सुविधा उपलब्ध असावी

१— [illegible] प्रमाणपत्र दर्शवावे.

[२] वसतिगृहाच्या इमारतीत प्रत्येक निवासी छात्रास किमान २४ चौरस फूट ते कमाल ४० चौरस फूट या प्रमाणात शयन व भोजनासाठी पुरेशी जागा आहे काय ?

[३] वसतिगृहातील निवासी छात्रांना भोजन व शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणानुसार पुरेसे अन्न आणि निवास व्यवस्था [illegible] पुरविण्यात येते काय ?

[-] संस्था आर्थिक दृष्ट्या संपन्न असण्यासाठी वसतिगृहाचे व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेच्या नावे बँकेत किमान रु.१०,०००/- ठेव स्वरूपात जमा असावे, तसेच मान्यतेच्या वेळी व्यवस्थापनावर आर्थिक [illegible] दायित्व अस्तित्वात नसावे.

[ड] शासनाकडून नवीन वसतिगृह सुरू करण्याबाबत मान्यता [illegible] अर्थसंकल्पात तरतूद समाजकल्याण विभागाच्या अर्थसंकल्पात अथवा जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात उपलब्ध आहे काय ?

[ड] वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांकरिता शक्यतो मैदानी व बैठे खेळांची सोय पुरेशा प्रमाणात तसेच दैनंदिन उपयोगातील सर्वसाधारण औषधी संच उपलब्ध आहे काय ?

४] वसतीगृह प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थिनीचे आईवडील किंवा पालक यांचेकडून वसतिगृह चालक संस्थेस कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही.

५] निवासी छात्रांनी शिक्षण विभागाने मान्यता दिलेल्या शाळेतील किंवा इतर कोणत्याही संस्थेतील आयोजित शिक्षक्रमाना नियमितपणे उपस्थित राहिले पाहिजे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारणे लेखी नमूद करुन शासनाने ज्यांना मान्यता दिलेली नाही अशा संस्थेच्या किंवा खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या तांत्रिक वर्गामध्ये जाणा-या निवासी छात्रांच्या बाबतीत जर त्यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका--यांच्या पुर्व मंजूरीने वसतीगृहात प्रवेश देण्यात आला असेल तर अशा विद्यार्थ्यांवर अनुदान देण्यास परवानगी देता येईल.

६] या नियमान्वये मान्यता मिळालेल्या कोणत्याही नवीन वसतीगृहात किमान २० अनुसूचित जातीचे [बी.पी.एल.] दारिद्र्यरेषेखालील व महाराष्ट्रातील रहिवासी असलेले निवासी छात्र असणे बंधनकारक राहिल.

[अ] ज्या ठिकाणी नविन वसतीगृह प्रस्तावित असेल ते ठिकाण समाज कल्याण अधिकारी यांनी तयार केलेल्या योजनाबध्द आराखड्यात असावे

[ब] प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना अंथरुण-पांघरुणाची व्यवस्था संस्थेने पुरेशा प्रमाणात केलेली असावी.

[क] वसतीगृह इमारतीत छात्राकरिता शौचालय व स्नानगृह पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावे.

[ड] वसतीगृहात किमान १ महिना पुरेल एवढा धान्य साठा कोणत्याही तपासणीचेवेळी उपलब्ध असावा. तसेच छात्रांना सकाळी नाश्ता व दोन्ही वेळेचे भोजनात वरण, भात, पोळी, भाजी व किमान घटकांचा समावेश असावा.

७] वसतीगृहास मान्यता देण्यात आल्यावर त्याच्या सहाय्यक अनुदानाचे प्रदान खालीलप्रमाणे विनियमित करण्यात येईल.

मान्यतेच्या पहिल्या वर्षात व्यवस्थापनास रु. २०००/- [रु.१,५००/- आवर्ती आणि भांडीकुंडी, फर्निचर इ. खरेदी करण्याकरिता रु. ५००/- अनावर्ती अनुदान] इतके वार्षिक अनुदान देण्यात येईल. त्यानंतर मागील वर्षी वसतीगृहाच्या पटावर असलेल्या मागासवर्गीय निवासी छात्रांच्या सरासरी संख्येच्या[वेळोवेळी वसतीगृहास दिलेल्या भेटीच्या आधारे निश्चित केलेली सरासरी] संदर्भात त्या वसतीगृहाच्या अनुदानासाठी पात्र म्हणून निश्चित केलेल्या छात्रांच्या कमाल संख्येच्या अधिनतेने /

स्थापनात वावयाच्या नियमित अनुदानाची गणना करण्यात येईल.

याली नमूद केलेल्या शर्तींना अधीन राहून वसतीगृहांना यालील दराने अनुदान मंजूर करण्यात येईल.

[एक] निवासी छात्र मुला-मुलींच्या बाबतीत दरमहा रु. ३३५/- प्रमाणे दहा महिन्यांसाठी

[दोन] जे निवासी छात्र एकाच इयत्तेत दोनदा नापास झालेले असतील किंवा परिक्षेला गैरहजर राहिल्याने किंवा परिक्षेला बसले नसतील किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे खंड पडला असेल तर अशा छात्रांसाठी कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

[तीन] जे निवासी छात्र महाराष्ट्र व्यतिरिक्त इतर राज्याचे असतील त्यांच्यासाठी कोणतेही अनुदान दिले जाणार नाही. या संबंधात जी व्यक्ती स्वत: किंवा तिचे आई-वडील वसतीगृहाच्या प्रवेशाच्या तारखेला किमान पंधरा वर्षासाठी महाराष्ट्राचे कायम रहिवाशी असतील अशी व्यक्ती ती महाराष्ट्रातील व्यक्ती असे समजण्यात येईल.

[चार] ज्याचे आई-वडील किंवा पालक, वसतीगृह ज्या शहरात किंवा गावात असेल त्याच शहरात किंवा गावात राहत असतील आणि ज्यांना त्यांच्या स्वत:च्या घरून त्यांची शाळा इत्यादिमध्ये उपस्थित राहणे शक्य असूनही वसतीगृहात प्रवेश देण्यात आला असेल अशा छात्रांवर अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. मात्र बाहेर गावातील अथवा शहरातील वर्ग ५ ते १० वी पर्यंत तसेच १० वी नंतरच्या मान्य महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना [स्थानिक विद्यार्थी वगळून] वसतीगृहात प्रवेश देण्यास अनुमती राहील व असे विद्यार्थी/विद्यार्थीनी अनुदानास अनुज्ञेय राहतील.

[पांच] स्थानिक विद्यार्थ्यांसाठी कोणतेही अनुदान देण्यात येणार नाही मात्र मांग, भंगी, कातकरी व गोंड या जमातीच्या स्थानिक विद्यार्थ्यांना आणि अनाथ, अपंग व निराश्रित छात्रांना अग्रक्रमाने विहित टक्केवारीचे अधीन राहून प्रवेश देता येईल व त्यावर विद्यार्थी अनुदान देय राहिल.

[सहा] समाज कल्याण विभागाच्या विभिन्न अधिका-यांनी शासन परिपत्रक संकीर्ण -१०९४/प्र२/मावक-१, दि. ३१.३.१९९५ नुसार अथवा त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार केलेल्या तपासणीतील प्रत्यक्ष उपस्थितीच्या सरासरीच्या आधारेच अनुदान निर्धारित केले जाईल. मात्र प्रत्यक्ष तपासणीच्यावेळी वसतीगृह प्रवेशित विद्यार्थी शाळेत शिकवणीला

प्रात्यक्षिक (प्रॅक्टीकल) / खेळ इत्यादी विश्वसनीय कारणाकरिता वसतीगृहाबाहेर गेले असतील व तपासणी अधिकाऱ्यांची तशी खात्री झाली असेल तर तशी नोंद शेरेबुकात घेऊन हजेरी अनुज्ञेय करावी. तसेच तपासणीच्या दिवशी शक्यतो शाळा /कॉलेज /पाठ्यक्रम सुरु होण्याच्या अगोदर किंवा नंतर जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थी वसतीगृहात हजर असतील अशा सकाळच्या किंवा सायंकाळच्या वेळात [मुलींच्या वसतीगृहाबाबत सकाळी ६ पूर्वी ते सायंकाळी ६ नंतरच्या वेळेत पुरुष तपासणी अधिकाऱ्यांनी भेट न देण्याच्या नियमाचे पालन करुन] वसतीगृहांना भेटी देऊन हजेरीबाबत तपासणी करावी.

वसतीगृहाच्या मासिक तपासणीसाठी जाणाऱ्या अधिकारी अथवा कर्मचारी यांनी वसतीगृहात उपस्थित मुलांची हजेरीची संख्या व मुलांची नावे नमूद करावीत.

[सात] वसतीगृह प्रवेशित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संख्येवर टक्केवारीचे बंधन राहणार नाही व त्यांचेवर देय अनुदान हे इतर प्रवेशित विद्यार्थ्यांवर देय अनुदानाप्रमाणेच संस्थेस अदा केले जाईल. अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांना शालांत परिक्षेनंतरची केंद्र शासनाकडून शिष्यवृत्ती मिळते अशा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेतून निर्वाह अनुदानाएवढी रक्कम अथवा शिष्यवृत्तीची रक्कम कमी असल्यास पूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी परस्पर कोषागारात भरणा करतील.

[आठ] सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या वसतीगृहाच्या व्यवस्थापनात एखादा नोंदणीकृत सनदी लेखापालाकडून आपल्या लेखाची लेखा परिक्षा करुन घ्यावी लागेल. नंतरच्या वर्षात कोणतेही अनुदान मिळण्यासाठी आधीच्या वर्षाचा लेखा परिक्षा अहवाल चालू वर्षाच्या ऑक्टोबर अखेरपर्यंत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा समाज कल्याण अधिकारी यांना सादर केला असला पाहिजे. स्वयंसेवी संस्थेकडून सनदी लेखापालाच्या लेखा परिक्षण अहवालाचा मागील वर्षाचा अनुदान विनियोग अहवाल प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत प्राप्त करुन घ्यावा. संबंधीत संस्थेने या मुदतीत सदर अहवाल सादर न केल्यास एकूण देय अनुदानाच्या ५ टक्के पर्यंतच्या रकमेत कपात करण्याच्या दंडात्मक कार्यवाहीस संस्था पात्र राहिल.

[आठ] अनुदानाचे निर्धारण

वसतीगृह चालविण्याबाबतच्या नियमित निर्धारित केलेल्या सवलीत शर्ती पूर्ण करण्याच्या अधीनतेने वसतीगृह पुढीलप्रमाणे सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असेल.

[अ] दरडोई अनुदान :- नवीन मान्यता दिलेल्या वसतीगृहास मागील वर्षी संस्थेने केलेल्या मान्य बाबीवरील एकूण खर्चाच्या ६० टक्के किंवा मंजूर संख्येनुसार प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या छात्राच्या सरासरी संख्येप्रमाणे १० महिन्यांकरिता विहित दराने आकारण्यात येणाऱ्या रकमेच्या ६० टक्के, इतकी रक्कम अग्रीम अनुदान म्हणून जूनमध्ये देण्यात येईल. पहिला हप्ता ६० टक्के माहे जूनमध्ये तर दुसरा हप्ता ४० टक्के माहे जानेवारीमध्ये अथवा डिसेंबर ऐवजी माहे मार्च पूर्वी वितरीत करण्यात येईल. तथापि समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर वसतीगृहात भेट देऊन वसतीगृह समाधानकारक चालू असल्याची खात्री केलेली असावी. अग्रीम अनु अनुदान हे खालील शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येईल.

स्वयंसेवी संस्थेकडून सनदी लेखापालांच्या लेखा परिक्षण अहवालासह मागील वर्षाचा अनुदान विनियोग खर्च अहवाल प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत प्राप्त करुन घ्यावा. संबंधीत संस्थेने या मुदतीत सदर हू अहवाल सादर न केल्यास एकूण देय अनुदानाच्या ५ टक्के पर्यंतच्या रकमेत कपात करण्याच्या दंडात्मक कार्यवाहीस संस्था पात्र राहिल.

प्रचलित नियमावलीतील इतर सर्व बाबींची पूर्तता करुन घेऊन संस्थेस वेळीच अनुदान देणेबाबत समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद जबाबदार राहतील.

अनुदानाचा पहिला हप्ता हा आधीच्या वर्षाच्या वार्षिक आवर्ती अनुदानाच्या ६० टक्के इतक्या मर्यादेत असेल आणि तो वर्षाच्या अखेरीस समायोजित करण्याच्या अधीनतेने असेल आणि खबरदारीचा उपाय म्हणून जर वसतीगृह वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी बंद करण्यात आले असेल तर अग्रीम अनुदानाची रक्कम परत घेण्यात येईल. आणि जर संचालक, समाज कल्याण यांनी किंवा जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्याने मागणी केल्यावर उक्त रक्कम परत करण्यात आली नाही तर ती रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल असा करारनामा व्यवस्थापनाबरोबर करण्यात यावा.

चालू ...साठी दिलेल्या ६० टक्के अग्रिम अनुदानाचा विनियोग वसतिगृह व्यवस्थापनावर झाल्याची खात्री वसतिगृह तपासणी अधिकारी तथा प्राधिकृत अधिकारी आपल्या तपासणीत करतील आणि या अधिकाऱ्यांनी, वसतिगृह केलेले अधिकारी आपल्या तपासणीत करतील आणि या अधिकाऱ्यांनी, वसतिगृह तपासणीकरिता दिलेल्या भेटीत निदर्शनास आलेल्या प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्येच्या सरासरीप्रमाणे अंतिम ४० टक्के अनुदानाचे अवेक्षण करुन समायोजित करण्यात येईल. मात्र वसतिगृहातील विद्यार्थ्यांची संपूर्ण वर्षाच्या उपस्थितीची सरासरी ७५% किंवा त्याहून अधिक असल्यास विद्यार्थी मान्य संख्ये एवढे पूर्ण अनुदान मिळण्यास संस्था पात्र राहील.

[ब] अधिक्षकाच्या वेतनावर अनुदान :- पूर्णकालीन अधिक्षकाची शैक्षणिक पात्रता एस.एस.सी. पास असावी. पूर्णकालीन अधिक्षक हा दरमहा रु. ६००/- किंवा व्यवस्थापनाने अधिक्षकाच्या वेतनावर खर्च केलेल्या रकमेच्या ५० टक्के रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमेइतके सहाय्यक अनुदान मिळण्यास संस्था पात्र असेल.

[क] वसतिगृह भाडे अनुदान :- वसतिगृहाच्या इमारतीच्या भाड्याबद्दल व्यवस्थापनाने केलेल्या खर्चाच्या ७५ टक्के इतके सहाय्यक अनुदान मिळण्यास व्यवस्थापन पात्र असेल. मात्र त्यासाठी व्यवस्थापनाने दिलेले भाडे वाजवी असल्याबाबत आणि भाड्याची जागा आवश्यकत्या कमाल व किमान गरजेपेक्षा कमी किंवा जास्त नसल्याबाबतचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने आणि समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रमाणित केले असले पाहिजे.

[ड] इमारत परिरक्षण अनुदान :- व्यवस्थापनाच्या मालकीच्या वसतिगृह इमारतीसाठी अनुदान खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेच्या अधिनतेने, व्यवस्थापनाने केलेल्या खर्चावर अनुज्ञेय असेल. इमारतीचे भांडवली मूल्य नक्की ठरवून घ्यावे. एकूण भांडवली मूल्यांच्या ७.५ टक्के इतकी रक्कम निर्धारित करण्यात यावी. परिरक्षण अनुदान अशारितीने निर्धारित केलेल्या भांडवली मूल्याच्या ७.५ टक्क्यांच्या ५० टक्के दराने निश्चित करण्यात यावे. ही रक्कम परिरक्षण अनुदान म्हणून देण्यात येईल. मात्र, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याचे त्या रकमेच्या वाजवीपणाबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. लागेल. जेव्हा परिरक्षणासाठी केलेला प्रत्यक्ष खर्च हा अशारितीने काढलेल्या अनुदानापेक्षा कमी असेल तेव्हा फक्त प्रत्यक्ष खर्चाइतकी रक्कम परिरक्षण अनुदान म्हणून देण्यात यावी.

[इ] अनावर्ती अनुदान :- मान्यतेच्या पहिल्या [illegible] फर्निचर इत्यादींच्या खरेदीसाठी रु.५००/- इतके अनावर्ती अनुदान मिळण्यास पात्र असेल. त्यानंतर व्यवस्थापन तीन वर्षांच्या कालांतराने निवासी छात्रांसाठी भांडीकुंडी, फर्निचर, खेळांच्या वस्तू इत्यादींसारख्या गोष्टी पुरविण्यासाठी निधीच्या उपलब्धतेच्या अधीनतेने मुला-मुलींच्या मान्य संख्येनुसार प्रत्येकी रु. २५/- प्रमाणे अनावर्ती अनुदान मिळण्यास पात्र असेल. हे अनुदान मंजुरीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत वापरण्यात आले नाही तर त्यापैकी न वापरलेली रक्कम वसूल करण्यात यावी. यासाठी व्यवस्थापन, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे [विहीत ["ड" संलग्न नमुन्यात] अर्ज करील.

[फ] दंड म्हणून कपात :- खालीलपैकी कोणत्याही उणिवांबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास/समाज कल्याण अधिकाऱ्यास अथवा संचालक, समाज कल्याण यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास व्यवस्थापनावर कोणत्याही वेळी प्रत्येक प्रकरणात रु. १०००/- [साधे एक हजार फक्त] पर्यंत दंड आकारता येईल आणि सदर दंडाची रक्कम व्यवस्थापनास द्यावयाच्या अनुदानातून वजा करण्यात येईल.

[१] सुखसोयी पुरेशा आणि स्वीकृत प्रमाण दर्जाच्या नसणे [खेळगांवाखेरीज इतरत्र संडास, बाथरूम, दिव्यांची सोय, प्रमाणित दर्जाचा आहार, पाणी इत्यादी.

[२] निकृष्ट अपुरे अन्न

[३] अभिलेख अद्यावत ठेवलेले नसणे.

[४] स्वच्छता राखलेली नसणे.

[५] निवासी छात्रांची उपस्थिती वार्षिक सरासरी ७५ टक्केपेक्षा कमी न असणे.

[६] किमान १ महिना पुरेल एवढा धान्यसाठा वसतीगृहात सदोदित उपलब्ध नसणे.

[७] इमारत निवासी व्यवस्था पुरेशी नसताना मंजूर संख्येपेक्षा विनापरवानगीने जादा विद्यार्थी भरणा करणे.

[८] विद्यार्थ्यांकडून फी वसूल करणे.

[९] वसतीगृह प्रवेशितांसाठी शौचालय व स्नानगृहाची सोय उपलब्ध नसणे. परिच्छेद असमाधानकारक व्यवस्थेमुळे वसतीगृहाच्या मंजूर संख्येत कपात करण्यात येईल.

१०.

[१] मंजूर संख्येत वाढ :- व्यवस्थापन निरनिराळ्या शर्तींच्या अधिनतेने निवासी छात्रांच्या केवळ मंजूर संख्येवर सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असेल. वसतीगृहातील छात्रांच्या मिळील संख्येत वाढ करू इच्छिणाऱ्या वसतीगृह व्यवस्थापनाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात [परिशिष्ट(क)] अर्ज करावा. जर शर्ती पूर्ण केल्या असतील आणि तशा वाढीसाठी, असमाधानकारक व्यवस्थापनामुळे रद्द करून उपलब्ध झालेल्या, मान्य विद्यार्थी संख्येच्या कोट्यातून/जिल्ह्यातील वापरात न आलेल्या मान्य विद्यार्थी संख्या आणि जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक, समाज कल्याण, पुणे यांचेमार्फत शासनाची पूर्वानुमती घेऊन मंजूर संख्येत वाढ करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देतील. नंतरच्या वर्षापासून वसतीगृह वाढीव मंजूर संख्येवर सहाय्यक अनुदानही मिळण्यास पात्र असेल. मात्र विद्यार्थी संख्या या योजनेअंतर्गत शासनाने वेळोवेळी संबंधीत जिल्ह्यासाठी ठरवून दिलेल्या मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा अधिक होता कामा नये. तसेच मान्य संख्येच्या पूर्ण क्षमतेने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळावा म्हणून कमी प्रवेशित/अत्यल्प उपस्थिती असणाऱ्या वसतीगृहांबाबत नियमांच्या अधिनतेने तात्काळ कार्यवाही करावी.

[२] <u>प्रवेशासाठी कार्यपद्धती :-</u>

[एक] व्यवस्थापनाने विस्तृत प्रसिध्दी देऊन अर्ज मागवावेत.

[दोन] मागासवर्गातील म्हणजे अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यातील सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश खुला असेल. मिळालेल्या सर्व अर्जांची नोंद प्रवर्गनिहाय नोंदवहीमध्ये करण्यात येईल. मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गासाठी खालील टक्केवारीप्रमाणे प्रवेश देण्यात यावा.

१] अनुसूचित जाती ८० %
२] अनुसूचित जमाती १० %
३] विमुक्त जाती व
भटक्या जमाती ५ %
४] विशेष मागास प्रवर्ग २ %
५] अंध व अपंग व्यक्ती ३ %

प्रवेशासाठी मागासवर्गीयांच्या निरनिराळ्या प्रवर्गासाठी निश्चीत केलेल्या टक्केवारीमध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती इत्यादीतील सैनिकांच्या मुलांना व मुलींना आणि इतर अवलंबितांना तसेच बाल कामगारांना [illegible]

(तीन) अनुसूचित जातीसाठी राखून ठेवलेल्या जागापैकी, महानगरपालिका क्षेत्रात ब"अ "वर्गाच्या नगरपालिका क्षेत्रात १४ टक्के जागा "मांग व मेहतर" जमातीसाठी (मांग जमातीसाठी ७ टक्के जागा आणि मेहतर जमातीसाठी ७ टक्के) आणि जिल्हा व तालुका पातळीवर १० टक्के जागा (मांग व मेहतर जातीसाठी प्रत्येकी ५ टक्के) एकत्रितपणे राखून ठेवण्यात येतील.

(चार) जर सर्वप्रकारे प्रयत्न केल्यानंतरही अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय यापैकी कोणत्याही विशिष्ट प्रवर्गासाठी राखून ठेवलेल्या जागा रिकाम्या राहिल्या तर त्या खालील प्राधान्य क्रमानुसार भरण्यात याव्यात.

1) मांग व भंगी जातीचे विद्यार्थी.
2) विमुक्त जाती व भटक्या जातीचे विद्यार्थी
3) अनुसूचित जमातीचे विद्यार्थी
4) अनुसूचित जातीतील विद्यार्थी
5) इतर मागासलेले व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थी.

वसतीगृहाचे व्यवस्थापन, अशाप्रकारे जागामध्ये बदल करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात (परिशिष्ट"ड") शिफारशीसह पूर्वीच अर्ज करतील. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी [illegible] स्थानिक परिस्थितीची पाहणी केल्यानंतर तसे करण्याबाबतची आवश्यकता पटवून शासनाच्या पूर्वमान्यतेने अशाप्रकारे बदल करण्यास परवानगी देता येईल. अशारितीने जागामध्ये बदल करण्यास देण्यात आलेली परवानगी ही त्या विशिष्ट शैक्षणिक वर्षापुरतीच असेल.

आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही वसतीगृहात प्रवेश देता येईल. मात्र त्यासाठी मंजूर जागापेक्षा अधिकी जादा जागा उपलब्ध असल्या पाहिजेत. मंजूर जागापेक्षा अधिकी २० टक्क्यापर्यंत अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. आर्थिक दृष्टया मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या २० टक्के जागापैकी १५ टक्के जागा इतर मागासवर्गातील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी आणि राहिलेल्या ५ टक्के जागा इतर जातीसाठी राखून ठेवण्यात येतील.

(सहा) बाहेरगावच्या इयत्ता ५ वी पासूनच्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. तथापि अनाथ, अपंग, निराश्रित विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

(सात) ज्या गावी ४ थ्या इयत्तेपुढील शिक्षणाची स्थानिक शिक्षण सोय नसेल अशा गावातून आलेल्या मागासवर्गीय / आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

(आठ) ज्यांच्या आई-वडीलांचे किंवा पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २४,०००/- पेक्षा किंवा शैक्षणिक प्रयोजनासाठी शासन वेळोवेळी निश्चित करील अशा उत्पन्नाच्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल अशा मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश देता येईल.

(नऊ) व्यवस्थापन प्रत्येक वसतीगृहासाठी बँकेत एक स्वतंत्रपणे खाते उघडील. वसतीगृहाचे अधिक्षक आणि व्यवस्थापनाचा स्थानिक कोषाध्यक्ष हे खाते संयुक्तरित्या चालवतील.

(दहा) व्यवस्थापन आणि वसतिगृहाचा अधिक्षक समाजकल्याण विभागाच्या तपासणी अधिकाऱ्यास वेळोवेळी हवी असेल ती माहिती तत्परतेने वक्तशीरपणे पुरवील. व्यवस्थापन समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्ताची एक प्रत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे पाठवील.

(अकरा) अनुदान मिळणारी मागासवर्गीय मुलींची वसतीगृहे महिला तपासणी अधिकाऱ्यास तपासणीसाठी सर्व वेळी खुली असतील. तथापि कोणत्याही पुरुष तपासणी अधिकाऱ्याने सायंकाळी ६ ते सकाळी ६ वाजेपर्यंत मुलींच्या वसतीगृहात भेट देता कामा नये. मुलांच्या वसतीगृहाचा संबंध असेल अशी वसतीगृहे तपासणी अधिकाऱ्यांना तपासणीसाठी कोणत्याही वेळी खुली असतील.

(बारा) वसतीगृहाची व्यवस्था समाधानकारकरीत्या पाहिली जात नाही. असे दर्शविणारा प्रथम दर्शनी पुरावा ज्या प्रकरणात असेल अशा प्रकरणी तपासणी अधिकाऱ्यांना सदर वसतिगृहाच्या कामकाजाची चौकशी करण्याचा आणि वसतिगृहाच्या व्यवस्थापनाच्या संबंधात विशेषत: हिशोब ठेवणे, नोंदवह्या व अभिलेख ठेवणे, पर्यवेक्षी कर्मचारी वर्ग बाबतची माहिती आणि निवासी छात्रांचे वर्तन चांगले राहील व त्यांच्यात शिस्त राहील याची खात्री करून घेण्यासाठी केलेल्या व्यवस्थेच्या संबंधात चौकशीच्या प्रयोजनासाठी माहिती देणे संस्थेवर बंधनकारक राहिल. तशी सर्व माहिती देण्याविषयी व्यवस्थापनाने नकार दिला तर सदर वसतीगृहाची मान्यता काढून घेतली जाण्यास पात्र

(तेर) वसत. अधिक्षकाने योग्य हिशोब ठेवण्यासाठी [illegible]
वेळोवेळी निर्देश देण्यात येईल. त्याप्रमाणे अभिलेख व नोंदवह्या ठेवल्या पाहिजेत. वसतीगृहाचे सर्व अभिलेख व. नोंदवह्या वसतीगृहातच ठेवण्यात याव्यात आणि आवश्यक असेल तेव्हा त्या तपासणी अधिका-यास सादर करण्यासाठी जतन करण्याबाबत आवश्यक ती काळजी घेण्यात यावी. त्याचबरोबर आजारी छात्रांची माहिती वैद्यकीय उपचारविषयक माहितीचे रजिस्टरदेखील असावे.

| | नोंदवह्यांची यादी | जतन करावयाचा कालावधी. |
|---|---|---|
| १) | निवासी छात्रांची सामान्य नोंदवही | कायम ✓ |
| २) | रोकड वही/खाते वही/प्रमाणकांची फाईल | कायम ✓ |
| ३) | निवासी छात्रांची उपस्थिती नोंदवही | ५ वर्षे ✓ |
| ४) | वस्तुसंग्रह व स्थावर मालमत्ता नोंदवही | कायम ✓ |
| ५) | अन्नधान्य व इतर उपयोगी जिनसांची दैनदिन खर्च दर्शविणारी आणि कपडे अंथरुण-पांघरुण व औषधे यासारख्या इतर आवश्यक वस्तूंची संग्रह नोंदवही | ५ वर्षे ✓ |
| ६) | निवासी छात्रांची शैक्षणिक प्रगती दर्शविणारी नोंदवही | ५ वर्षे |
| ७) | देणगी नोंदवही | कायम |
| ८) | आलेल्या प्रवेश अर्जाची प्रवर्गनिहाय संख्या आणि प्रवेश दिलेल्यांची प्रवर्गनिहाय संख्या दर्शविणारी प्रवेश नोंदवही | ५ वर्षे |
| ९) | भेट-पुस्तक | कायम |
| १०) | ग्रंथालय नोंदवही | कायम |
| ११) | वैद्यकीय उपचार नोंदवही | ५ वर्षे |
| १२) | आवक व जावक नोंदवही | ३ वर्षे |
| १३) | मुलींची मासिक पाळी नोंदवही | ५ वर्षे |

१०) <u>मान्यता काढून घेणे.</u>

गंभीर स्वरुपाच्या उणिवा आणि किंवा गैरव्यवस्थापन असेल अशा प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संचालक, समाज कल्याण यांच्या पूर्व

....१४..

परवानगीने वसतीगृहाची मान्यता काढून घेता येईल. आढळून आलेल्या सर्व उणिवांच्या बाबतीत व्यवस्थापनावर न चुकता "कारणे दाखवा नोटीस" बजावून त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात यावे. व्यवस्थापनास याबाबतीत आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात यावा. असे स्पष्टीकरण मिळाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी स्पष्टीकरणाची छाननी करतील आणि त्यांचे समाधान झाले नाहीत र याबाबतची कारणे नमूद करून वसतीगृहाची मान्यता संचालक, समाज कल्याण, पुणे यांच्या पूर्व परवानगीने काढून घेतील. मान्यता काढून घेतल्याच्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट तारीख नमूद करतील.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध सचिव, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे अपील करता येईल. व्यवस्थापनाने, मान्यता काढून घेण्याबाबतचा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपील दाखल केले पाहिजे. सदर अपील रु. २०/- च्या मुद्रांक कागदावर सादर करणे आवश्यक आहे. अशा सादर केलेल्या अपीलाची प्रतिलिपी संचालक, समाज कल्याण, पुणे संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधीत समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनाही पाठवावयात [प्रतिलिपी प्रतीत मुद्रांक कागदाची आवश्यकता नाही]

एखाद्या वसतीगृहाची मान्यता काढून घेण्यात आली असेल आणि त्या बंद वसतीगृहाच्याऐवजी नवीन वसतीगृहास मान्यता द्यावयाची असेल तेव्हा नवीन वसतीगृहास मान्यता देण्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास संचालक, समाज कल्याण यांचेमार्फत शासनाची परवानगी घ्यावी लागेल. एखाद्या वसतीगृहाची मान्यता शैक्षणिक सत्राच्या मध्येच काढून घेण्यात आली असेल तर त्या वसतीगृह प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत आवश्यक उपाययोजना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी वसतीगृहाची मान्यता काढलेल्या गावात/शहरात किंवा अन्यत्र दुसरे या योजनेतील मान्यता प्राप्त वसतीगृह असल्यास अशा वसतीगृहात या विद्यार्थ्यांची पर्यायी सोय करावी.

११] <u>वसतीगृह व्यवस्थापनास बंधनकारक असे जादाचे नियम :-</u>

सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या वसतीगृहाच्या व्यवस्थापनाने या नियमावलीत वर नमूद केलेल्या शर्तींशिवाय आणखी पुढील शर्तींचेही पालन केले पाहिजे.

[एक] वसतीगृहाचे ठिकाण किंवा भाड्याने घेतलेली इमारत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

(१) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेशिवाय वसतीगृहाचे व्यवस्थापन इतर कोणत्याही अभिकरणाकडे परस्पर हस्तांतरीत करता येणार नाही.

(नऊ) अधिक्षकाच्या नेमणुकीसाठी पूर्वमान्यता मिळविण्यात यावी. एकदा नेमणूक केलेल्या अधिक्षकाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय काढून टाकता येणार नाही.

(दहा) निवासी छात्र किंवा कर्मचारी कोणत्याही राजकीय किंवा सांप्रदायिक चळवळीत भाग घेणार नाहीत किंवा त्यासाठी वर्गणी देणार नाहीत. स्वतः चळवळ करणार नाहीत/सहाय्य करणार नाहीत याची व्यवस्थापनाने खात्री करुन घेतली पाहिजे.

(अकरा) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास/समाज कल्याण अधिकाऱ्यास हवी असलेली विवरणे आणि माहिती नियत तारखांना पुरविण्यात येते, याची व्यवस्थापनाने खात्री करुन घेतली पाहिजे.

(बारा) वसतिगृहा तपासणीसाठी कोणत्याही वेळी खुली राहतील. याची व्यवस्थापनाने खात्री करुन घेतली पाहिजे. तथापि, पुरुष तपासणी अधिकाऱ्यांनी संध्याकाळी ६.०० ते सकाळी ६.०० या वेळेत मुलींच्या वसतिगृहांना भेट देता कामा नये.

(तेरा) वसतिगृहास दिलेली मान्यताही त्याच जिल्ह्यापुरती मर्यादित राहिल. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात वसतिगृह स्थलांतरित करता येणार नाही.

१२) <u>योजनेचे अंतिम अधिकार</u> :-

<u>या योजने संदर्भात शासनाचे आदेश अंतिम राहतील.</u>

# परिशिष्ट “ ब ”

# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**सोमवार, दिनांक १० सप्टेंबर, २०१८**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, लातूर

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(९) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१०) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक लोकप्रतिनिधी**

श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, कामगार तथा पालकमंत्री

**स्थानिक पदाधिकारी**

(१) श्री. मिलींद लातूरे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, लातूर
(२) श्री. रामचंद्र तिरूके, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, लातूर
(३) श्रीमती संगीता घुले, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, लातूर
(४) श्री. संजय दोरवे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, लातूर
(५) श्री. प्रकाश देशमुख, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, लातूर
(६) श्री. अनिल भिसे, सभापती, पंचायत समिती, रेणापूर
(७) श्री. सत्यवान कांबळे, सभापती, पंचायत समिती, देवणी
(८) श्रीमती सुनिता डावरे, सभापती, पंचायत समिती, चाकूर
(९) श्री. अजित माने, सभापती, पंचायत समिती, निलंगा
(१०) श्रीमती भिक्का वर्षा सतिश, सभापती, पंचायत समिती, शिरुर अ.
(११) श्री. धोंडीराम बिराजदार, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१२) श्री. सुरेश लहाने, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१३) श्री. बसवराज बिराजदार, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१४) डॉ. संतोष वाघमारे, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१५) श्री. राहूल केंद्रे, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक,

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री. संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
(२) श्री. अनंत कुंभार, सहायक आयुक्त (विकास)
(३) श्री. शा. मो. यु. शेख, सहायक संचालक (लेखा)

**जिल्हा परिषद, लातूर**

(१) डॉ. विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. एस. डी. जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. सुधीर भातलवंडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
(४) श्री. एन. आर. केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(५) श्री. यु. व्ही. साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) श्री. जे. एस. शेख, उप मख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(७) श्री. एम. एम. कुलकर्णी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)
(८) श्री. ए. एन. गौरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा)
(९) श्री. आर. आर. जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(१०) श्री. बी. आर. शेलार, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग
(११) श्री. पी. के. पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)
(१२) श्री. ए. बी. मोहरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१३) श्री. ए. एस. उकिरडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१४) श्री. बी. यु. बोधनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१५) श्री. एस. के. मिनगीरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(१६) डॉ. पराग गंगोधर, तालुका आरोग्य अधिकारी
(१७) श्री. बी. एस. रणदिवे, कृषि विकास अधिकारी
(१८) श्री. डी. एच. दाईगडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर
(१९) श्री. टी. के. भालके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औसा
(२०) श्री. ए. पी. पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर
(२१) श्री. एस. आर. यमुलवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर
(२२) श्री. आर. व्ही. मुक्कावार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा
(२३) श्री. एस .एम. गोडभरले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर
(२४) श्री. एम. वाय. अभंगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर
(२५) श्री. जे. डी. गोरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट
(२६) श्री. एस. ए. अकेले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी

(२७) श्री. एन. एस. शेरखाने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अ.

(२८) श्री. ओमप्रकाश निला, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, लातूर

(२९) डॉ. सी. आर. धनगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी

(३०) श्री. ्बी. आर. शेलार, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील लातूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०१८**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, लातूर

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१०) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(११) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१४) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**विभागीय आयुक्त कार्यालय**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
(२) श्री. श्याम पटवारी, सहायक आयुक्त (चौकशी)
(३) श्री. अनंत कुंभार, सहायक आयुक्त (विकास)

**जिल्हा परिषद, लातूर**

(१) डॉ. विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. एस. डी. जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. सुधीर भातलवंडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. एन.आर. केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. यु. व्ही. साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) श्री. जे. एस. शेख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(७) श्री. एम. एम. कुलकर्णी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. ए. एन. गौरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा)

(९) श्री. आर. आर. जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१०) श्री. बी. आर. शेलार, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(११) श्री. बी. आर.शेलार, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१२) श्री. ओमप्रकाश निला, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, लातूर

(१३) श्री. पी. के. पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)

(१४) श्री. ए. बी. मोहरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१५) श्री. ए. एस. उकिरडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१६) डॉ. सी. आर. धनगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी

(१७) श्री. बी. यु. बोधनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१८) श्री. एस. के. मिनगीरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१९) डॉ. पराग गंगोधर, तालुका आरोग्य अधिकारी

(२०) श्री. बी. एस. रणदिवे, कृषि विकास अधिकारी

(२१) श्री. डी. एच. दाईगडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

(२२) श्री. टी. के. भालके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औसा

(२३) श्री. ए. पी. पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर

(२४) श्री.एस.आर.यमुलवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर

(२५) श्री. आर. व्ही. मुक्कावार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा

(२६) श्री. एस. एम. गोडभरले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर

(२७) श्री. एम. वाय. अभंगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर

(२८) श्री.जे. डी. गोरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट

(२९) श्री. एस. ए. अकेले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी

(३०) श्री. एन. एस. शेरखाने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक - २ संदर्भात लातूर जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१८

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, लातूर

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१०) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(११) श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.
(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक,

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री. संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
(२) श्री. श्याम पटवारी, सहाय्यक आयुक्त (चौकशी)
(३) श्री. अनंत कुंभार, सहाय्यक आयुक्त (विकास)
(४) श्री. शा. मो. यु. शेख, सहाय्यक संचालक (लेखा)

**जिल्हा परिषद, लातूर**

(१) डॉ. विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. एस. डी.जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. सुधीर भातलवंडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. एन.आर.केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(५) श्री. यु. व्ही. साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) श्री. जे. एस. शेख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(७) श्री. एम. एम. कुलकर्णी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)
(८) श्री. आर. आर. जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(९) श्री. ओमप्रकाश निला, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, लातूर
(१०) श्री. बी. आर. शेलार, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग
(११) श्री. पी. के. पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)
(१२) श्री. बी. आर. शेलार, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा
(१३) श्री. ए. एन. गौरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा)
(१४) डॉ. सी. आर. धनगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी
(१५) श्री. ए. बी. मोहरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१६) श्री. ए. एस. उकिरडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१७) श्री. बी. यु. बोधनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१८) श्री. एस. के.मिनगीरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(१९) डॉ. पराग गंगोधर, तालुका आरोग्य अधिकारी
(२०) श्री. बी. एस. रणदिवे, कृषि विकास अधिकारी
(२१) श्री. डी. एच. दाईगडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर
(२२) श्री. टी. के. भालके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औसा
(२३) श्री. ए. पी. पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर
(२४) श्री. एस. आर. यमुलवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर
(२५) श्री. आर. व्ही. मुक्कावार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा
(२६) श्री. एस. एम. गोडभरले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर
(२७) श्री. एम. वाय. अभंगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर
(२८) श्री. जे. डी. गोरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट
(२९) श्री. एस. ए. अकेले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी
(३०) श्री. एन. एस. शेरखाने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील लातूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १७ जुलै, २०१९**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(४) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(५) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(४) श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(५) श्री. निलय नाईक, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. सु. रा.भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
(२) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग)
(३) श्री. एस.डी. सुर्यवंशी, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग
(५) श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(६) श्री. विजयकुमार कलवले, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग
(७) श्री. आत्माराम लुबडे, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(८) श्री. प्रमोद पाटील, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

**जिल्हा परिषद, लातूर :**

(१) डॉ. विपीन इटनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. एस. डी. जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. प्रभु जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(४) श्री. उदयसिंह साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
(५) श्री. रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. जी. जी. परगे, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) डॉ. वैशाली जामदार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(८) श्री. पी. के. पवार, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग
(९) श्री. बी. आर. शेलार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-२०१४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग), सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. कैलास घाडगे पाटील, वि.स.स.
(३) श्री. अनिल पाटील, वि.स.स.
(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.
(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
(६) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स.
(७) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.
(८) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.
(९) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(२) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(४) श्री. महादेव जानकर, वि.प.स.
(५) श्री. सदाभाऊ खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्रीमती दिपा देशपांडे, संचालक.

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :-**

(१) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री. संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभाग
(३) श्री. नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(४) श्री. मंगेश मोहीते, सह सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय
(६) श्री. विजयकुमार कलवले, सहायक निर्देशक, रोजगार हमी योजना.

**जिल्हा परिषद, लातूर :**

(१) श्री. अभिमन्यू गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
(२) श्री. संतोष जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
(३) श्री. प्रभु जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.

(४) श्री. रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

(५) श्री. दशवंत व्ही. व्ही., प्राथमिक शालेय शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-१४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभाग, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.
(३) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
(६) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. सुनिल परब, कक्ष अधिकारी
(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. माधव नागरगोजे, संचालक.

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :-**

(१) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग
(२) डॉ. नितीन करीर, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग
(३) डॉ. प्रदीप व्यास, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) श्रीमती वन्दना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग
(५) श्री. नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना.
(६) श्रीमती आय. ए. कुंदन, सचिव, महिला व बाल विकास विभाग
(७) श्री. वि. ल. लहाने, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(८) श्री. सतिश तुपे, सह सचिव, वित्त विभाग
(९) श्री. मंगेश वसंत मोहिते, सह सचिव, ग्रामविकास विभाग
(१०) श्री. श्री. दे. लोंढे, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(११) श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(१२) श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग
(१३) डॉ. विजय वृंदेवए, सहसंचालक, आरोग्य विभाग

**जिल्हा परिषद, लातूर :**

(१) श्री. अभिमन्यु गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

(२) श्री. गोकुळ देवरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण, जिल्हा परिषद, लातूर

(३) श्री. रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

(४) श्री. भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर

(५) श्री. संताजी माने, प्रशासन अधिकारी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-१४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना, सचिव, महिला व बाल विकास विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सह सचिव, वित्त विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, सहसंचालक, आरोग्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची उर्वरित मुद्यांसंदर्भात साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. शेखर, निकम, वि.स.स.

(४) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(५) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(६) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१०) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(११) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(१२) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(१३) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(१४) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(१५) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी
(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत अकरावा अहवालाच्या प्रारूपावर विचार करून किरकोळ सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई